
माणूस
प्रवास - पर्यटन
विशेषांक
प्रिल १९८७
हा रुपये
कांचनगंगा
खराचे
व्हान
जा पाटील -
त्मचरित्रातील
वडक भाग
किंग क्लबस्
वी विधायक
ळवळ

## ‘ राजा ’ सामाजिक बांधिलकीचा म्हणूनच तुफान लोकप्रिय !

राजाने १९५७ सालच्या आपल्या ८० दिवसाच्या देशभ्रमंतीनंतर
अफाट नियोजन कौशल्यामुळे व राष्ट्रप्रेमी वृत्तीमुळे

**३० वर्षांत महाराष्ट्रालाच नव्हे तर साऱ्या देशाला पर्यटनवेडे केले !**

**पर्यटनाद्वारे ‘ राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रप्रेम ’ ह्या सूत्राचा तो प्रणेता बनला !**

आदर्श व्यवसाय नीती व शिस्तबद्धतेमुळे भारतीय पर्यटन क्षेत्राला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यातही तो अग्रणी ठरला ! ही अतिशयोक्ती नव्हे तर वस्तुस्थिती आहे हे ‘ राजा ’चे स्पर्धकही मानतात नि म्हणूनच कृतकृत्य भावनेतून

# राजातर्फे ‘ सामाजिक कृतज्ञता ’ स्पेशल ट्रेन !

भाऊबीजेला निघून झाशी, ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, वृन्दावन, दिल्ली, हरिद्वार, हृषिकेश, मसूरी, सिमला, चंदीगड, भाक्रा, अमृतसर

## इतरांहून भव्य ३१ काश्मीर सफरी

हवं तर मार्गावर दिल्ली आग्राही पहा वा पहेलगामला मुक्काम घ्या ! युसमर्ग, सोनमर्ग, गुलमर्गसह २५ स्थळे

**सुपरफास्ट भरल्या ! खोटया नावापेक्षा रविवारी निर्धास्त चला ! १२ बोगी तय्यार !**

**१५ लक्ष चौ. फुटांचे भव्य ‘ न्यूडोज ’ वा ‘ लेक व्ह्यू ’ हॉटेल व लक्झरी बसेस !**

## २४ मसूरी व/वा सिमला, चैल, कुलू, मनाली सफरी

**काश्मीरपेक्षा दर्जेदार, व्यवस्था व ४-४ एअरकंडीशंड बसेस फक्त राजाच देतो**

१८ एप्रिल, २, १६ व ३० मे : १०/१२ दिवसांच्या खऱ्या आरामदायी सफरी. हवेतर नेपाळ वा काश्मीरसह यंदा दार्जिलिंगचा सभाव्य तणाव वा ‘ रास्ता रोको ’ ध्यानी घेऊन मुद्दामच योजीत आहोत निर्धास्त अशा

## नेपाळ, पोखरा, हिमालय दर्शन सफरी

१२ एप्रिल व १८ ऑक्टोबर सोबत हवं तर सिमला, कुलू, मनाली वा काश्मीर घ्या. ‘ राजा ’ स्वतः असणार

## ३८ बँकॉक, सिंगापूर वा दुबाय शॉपिंग टूर्स

फक्त आम्हीच ९ रात्री देतो व ‘रिव्हर क्वाय’ दाखवतो
(रु ५२२४।-व पुढे)
.१८ मार्च, १, १५ व २९ एप्रिल, १३ व २७ मे व १० जून

३ वा ६ दिवसाच्या खास सफरी (रु ३७५०।–व पुढे)
२१ मार्च, ४ व १८ एप्रिल, २,१६,३० मे, ३ व २७ जून

**फसू नका ! आमचे पत्रक पडताळून पहा.** (मार्चमध्येच चला व रु. २०००।– टॅक्स वाचवा !)

## युरोप-अमेरिका-जपान सफरींनाही ‘ राजा ’च हवा !

पत्ता राजा ट्रॅव्हल्स, स्वीट होम, ले. ज. रोड, माटुंगा (प.), मुंबई-१६ (फोन्स : ४५६३६४, ४६७६५६ व ४६७६७५ सकाळी ९ ते ११ व सायं. ५ ते ८) इथेही बुकिंग करा : ९, आनंद वैभव, प्लाझाशेजारी, दादर पश्चिम. (साय. ५ ते ८) पुणे प्रतिनिधी : ऑटी–मधुवन, फर्ग्युसन रोड, (टे. ५४०५७) पुरंदरे १०७, बुधवार, गणपती चौक ( टे. ४४३४७५ )

प्रवास - पर्यटन
विशेषांक
एप्रिल १९८७

# माणूस

अनुक्रम

**मुलाखती**

यशवंत कोकाटे–अंजली कीर्तने / ४
गिरिविहार–दिलीप लागू / ६२

**लेख**

ललिता बर्वे / ६
छाया राजे / १६
संजय होनकळसे / ३५
चंद्रकांत वर्तक / ४५
विनय सहस्रबुद्धे / ४८
विजय साखळकर / ५१
माधव / ६५
सुलोचना देवलकर / ७०
स. शि. भावे / ८३

**प्रवासवर्णन**

फिरोझ रानडे / १०
अनिता परांजपे / ४१

**आत्मवृत्त**

राजा पाटील / ५६
गोविंद बाबाजी जोशी / ७६

**कथा**

अशोक काळे / २६

**कादंबरी**

सौ. अंजनी नरवणे / ८५

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
या अंकाचे संपादन सहाय्य
**अविनाश कोल्हे**
मुखपृष्ठ
**विलास तुरकर**
आतील चित्रे
**श्याम देशपांडे**
व्यंगचित्रे
**अभिमन्यू कुलकर्णी**

वर्ष : सव्विसावे
अंक : ३६ ते ५२
७ फेब्रुवारी १९८७ ते
३० मे १९८७
किंमत : दहा रुपये
वार्षिक वर्गणी : साठ रुपये
पत्ता : १०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.
फोन : ४४३४५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे नियतकालिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

# २६।२७

माणूसचे हे सव्वीसावे वर्ष. या वर्षात वाचकाना दर आठवड्याला न भेटता अधूनमधून भेटावे असे योजले होते. त्याप्रमाणे वर्षात एकूण (हा अक धरून) आठ वेळा वाचक-भेट झाली. माणूसचा वर्षारंभ जून महिन्यातला. जून १९८६ मध्ये चार अक साप्ताहिकाचे निघाले. त्यानंतर ऑगस्ट ८६ मध्ये दोन '**नवजागर**', जानेवारी १९८७ मधला '**प्रजासत्ताकदिन**' व हा चालू '**प्रवास–पर्यटन**' असे चार विशेषाक म्हणून प्रसिद्ध झाले. या सर्व आठ अकाची मिळून पृष्ठसख्या सुमारे ७०० होते. गेल्या २५ वर्षांच्या प्रथेप्रमाणे अगदी दर आठवड्याला नाही तरी एकूण असा भरीव ऐवज या, त्यातल्या त्यात अनिश्चिततेत गेलेल्या सव्वीसाव्या वर्षातही माणूसने वाचकाना सादर केला. वर्गणीदाराना त्याच्या त्याच्या हिशोबाप्रमाणे अक पाठविले गेले ठेव–वर्गणीदारापैकी अपवाद म्हणून २।३ जणानीच आपली वर्गणी–ठेव योजनेतील ठेव परत मागितली. ती त्याना त्वरीत दिलीही गेली. जवळजवळ सर्वांनीच अक या नाही त्या स्वरूपात निघत आहेत तोवर आपला वर्गणीचा किंवा ठेवीचा आधार कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. उलट काही जणानी ठेवीची रक्कम वाढवावी अशीही सूचना केली. वर्गणीदार–ठेवीदार यानी हा जो विश्वास बाळगला त्याचे मोल सद्य.स्थितीत विशेष आहे माणूस याबद्दल या सर्वांचा मन.पूर्वक आभारी आहे

वेगळे, ताजे, सकस, विचाराना, भाव–भावनाना चालना देणारे साहित्य देण्याची माणूसची नेहमी धडपड असते. याही वर्षी, प्रकाशनाबाबत अनिश्चितता असूनही, या धडपडीला चागला प्रतिसाद लाभला दोन्ही 'नवजागर' विशेषाक तर वाचकाना आवडलेच. पण यापूर्वीच्या प्रजासत्ताकदिन विशेषाकावरही वृत्तपत्रातून, वाचकाकडून चागले अभिप्राय आले. एक उत्स्फूर्त प्रतिक्रिया येथे उद्धृत करण्यासारखी आहे हा अपरिचित वाचक लिहितो–

८।२।८७


श्री. माजगावकर यास
स न.
अकस्मातपणे म. टा. मध्ये 'माणूस'ची प्रजासत्ताक विशेषाकाची जाहिरात वाचली. त्यापाठोपाठ तो अक स्टॉलवरून विकत घेतला. एवढ्या महिन्यानी 'माणूस'चे दर्शन हेच मोठे आनददायी होते ! 'माणूस' बद पडल्यापासून मराठीत एकही आवर्जून विकत घेऊन वाचावे असे साप्ताहिक उरलेले नाही. कारण सर्वच साप्ताहिके, अधिक लोकप्रिय कसे बनायचे, या चिंतेत पडली असावीत लोकप्रिय बनण्यास ऑब्जेक्शन नाही पण त्याच्यापैकी एकालाही दर्जा नाही. त्यामुळे 'माणूस'ची अनुपस्थिती आणखी जाणवते.
'माणूस' चे ४ महिन्यापूर्वीचे दोन्ही विशेषाक ('नवजागर' १, २) व हा अक नेहमीप्रमाणे दर्जाला साजेसे आहेत. राजीव गाधीच्या राजवटीसंबधातील व हिंदू धर्मावरील लेख मननीय आहेत. या सर्वांपेक्षा स. शि. भावेचे जे पत्र प्रसिद्ध केले आहे ते अगदी मनातील विचार व्यक्त करणारे वाटले. सामाजिक कार्य करणाऱ्या तरुणासाठी महाराष्ट्रात ५० लाखाचा निधी उभा राहू शकतो तर 'माणूस' सारख्या महत्त्वाचे सास्कृतिक कार्य करणाऱ्या साप्ताहिकासाठी छोटासा निधी उभा का राहू शकणार नाही ? 'माणूस'चे माझ्यावर तरी काही चागले सस्कार आहेत मी फिजिक्स व इजिनियरीगच्या ३ डिग्रीज मिळवल्या पण शाळा–कॉलेजमध्ये कोणी कुठलेच सस्कार करण्याचा प्रयत्न केला नाही जे शिकलो ते वाचनातून व इतर ठिकाणाहून. यात 'माणूस'चा वाटा मानतो. त्यामुळे परत एकदा 'माणूस' सुरू व्हावा अशी इच्छा आहे हे कळवण्यासाठी पत्राचा प्रपच !

आपला
पकज कुरूलकर
मुबई

माणूसचे नवीन वर्ष जून महिन्यात सुरू होईल त्यासुमारास एखादा विशेषाक प्रसिद्ध करण्याची योजना आहे तोवर हा विशेषाक विचाराना व प्रत्यक्ष कृतीलाही भरपूर खाद्य पुरवेल अशी आशा आहे. कारण माणसाच्या भौतिक पातळीवरील प्रवासाप्रमाणेच भौतिकापलिकडील, माणसाची आध्यात्मिक प्रवासाची ओढही विचारात घेतली गेली आहे.

**संपादक**

## मुलाखत : श्री. यशवंत कोकाटे




**१९७५** साली महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची (M. T. D. C.) स्थापना झाली.

आता एक तप उलटून गेलं आहे. ७५ सालची परिस्थिती आज १२ वर्षांनंतर बरीच बदलली आहे. मुख्य म्हणजे गेल्या काही वर्षांत पर्यटकांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. प्रवासाबाबतचा उत्साह वाढला आहे. त्यामुळेच M. T. D. C. चा व्यापही वाढला आहे. तेव्हा M. T. D. C. चं स्वरूप समजावून घेणं आज अगत्याचं आहे. M. T. D. C. तील एक प्रमुख अधिकारी, जॉइंट डायरेक्टर ऑफ टूरिझम श्री. यशवंतराव कोकाटे यांची ही मुलाखत घेण्यामागे हा हेतू आहे.

**: पर्यटन हा आज केवळ श्रीमंती शौक उरलेला नाही. सामान्य माणसंही आपापल्या कुवतीनुसार, उत्साहानं प्रवास करताना दिसतात. याची कारणमीमांसा तुम्ही कशी कराल ?**

: पर्यटकांची वाढ ही भारतातच नव्हे तर जगभर झालेली आहे. वेगवेगळ्या प्रयोजनानं लोक प्रवास करतात. धार्मिक स्थळं पाहणं, वैज्ञानिक निरीक्षण करणं, सहलीला जाणं, छंद जोपासणं, देश पाहणं असे अनेक उद्देश असतात. या सगळ्याचं मुख्य कारण असं की औद्योगीकरणामुळे, लोकांना पोटापाण्यासाठी शहरात राहावं लागतं. यंत्रवत जीवन जगावं लागतं. गतिमान जीवनाशी जुळवून घ्यावं लागतं. याचा परिणाम असा होतो की या चाकोरीतून सुटायची ओढ त्याच्या ठिकाणी निर्माण होते शांतता हवीशी वाटते. काही क्षण तरी या गतिमानतेच्या बाहेर जावंसं वाटतं. दुसरं कारण असं की पुस्तकापलीकडच्या शिक्षणातही आज अनेकांना रस वाटायला लागल्यानं पक्षिनिरीक्षण, वैज्ञानिक सहली, आकाश दर्शन, हायकिंग या सारखे छंद आज जोपासले जात आहेत. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजेच पर्यटकांच्या संख्येत झालेली वाढ.

सध्या खरं तर परीक्षांचे दिवस आहेत आणि तरीही तीनेक दिवसांची सुट्टी जोडून आली की आमची सर्व पर्यटन केंद्रं भरून जातात.

**: या वाढीव पर्यटकांची व्यवस्था तुम्ही कशा प्रकारे लावता ? त्यांना आकृष्ट करण्यासाठी तुमच्या नव्या योजना आहेत का ?**

: पर्यटकांची व्यवस्था आम्ही दोन प्रकारे लावतो. एक म्हणजे नवनव्या ठिकाणांचा, निसर्गरम्य वा धार्मिक महत्त्व असलेल्या परिसरांचा आम्ही शोध घेतो. हल्ली सागरी किनाऱ्याबद्दल फार आकर्षण निर्माण झालंय. उन्हाळ्यात हिलस्टेशन्सही लोकांना हवी हवीशी वाटतात. तेव्हा पर्यटकांच्या आवडीनिवडींचा विचार करून आम्ही नवी स्थानं विकसित करतो.

दुसरं म्हणजे जुन्या ठिकाणांच्या निवासस्थानांत, सोयीत आम्ही वाढ करतो. जेणे करून जास्तीत जास्त प्रवाशांना याचा लाभ घेता येईल.

**: तुमच्या नव्यानं विकसित झालेल्या वा होत असलेल्या काही पर्यटन केंद्रांची माहिती सांगाल का ?**

गेल्या काही वर्षांत अत्यंत लोकप्रिय ठरलेलं केंद्र म्हणजे गणपतीपुळे. निसर्गरम्यता व धार्मिक माहात्म्य या दोन्ही गोष्टींमुळे या

केंद्राला महत्त्व प्राप्त झाल आहे हे केंद्र विकसित करण्याच श्रेय श्रीमती मालती तावे वैद्य याना आहे. तिथे आम्ही लावलेली बाग, फळझाड, नारळीपोफळी यामुळे निवासस्थानाची रम्यता निश्चितच वाढली आहे. गणपतीपुळयाबद्दल भारताचे पर्यटन मत्री मुफ्ती महमद सईद यानी व राज्यमत्री श्रीकात जिचकर यानीही अत्यत समाधान व्यक्त केलेल आहे

हिलस्टेशनवरील केद्राचा विचार करायचा तर अलीकडे माळशेज घाटाला महत्त्व येऊ लागलेलं आहे जून ते सप्टेंबर या काळात त्या परिसरात फ्लेमिंगो पक्षी फार मोठ्या सख्येन येतात आणि त्याना पाहण्यासाठी पर्यटकही माळशेज घाटाकडे धाव घेतात.

या शिवाय वेळणेश्वरचा विकास आम्ही नव्यान हाती घेतलाय वसईच्या किल्ल्यातला दहा एकराचा प्लॉटही आम्ही विकसित करणार आहोत. लोणावळ्याला ट्री-टॉप रेस्टॉरंट बाधत आहोत खोपोलीला मोटेल झालंय पढरपूर, तुळजापूर, आवढ्या नागनाथही नव्यान विकसित झालय प्रवाशाचा प्रतिसाद जितका वाढेल तितकी नवी काम आम्हाला सुरू करता येतील

**एखाद पर्यटन केंद्र विकसित करताना कोणत्या बाबीचा प्रामुख्यानं विचार केला जातो वा केला जावा ?**

: पर्यटनकेद्र विकसित करताना निवास, भोजन, वाहनव्यवस्था यासारख्या गोष्टीचा विचार करावा लागतो. शिवाय पर्यटक निवासात इलेक्ट्रिसिटीची सोय, पाण्याची व्यवस्था आहे का नाही हे पाहाव लागत. पण मला वाटत की या सर्वांपेक्षाही आज या केंद्राची माहिती लोकापर्यंत पोहोचणं ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे. मार्केटिंग जर व्यवस्थित नसेल तर या सोयी असूनही त्याचा उपयोग होणार नाही. म्हणूनच अलीकडे आम्ही मार्केटिंग ऑफिसर्स नेमले आहेत.

वेगवेगळ्या शिक्षणसस्था, औद्योगिक केंद्र, कर्मशिअल सस्था याना ते भेटी देतात व पर्यटनकेंद्राची माहिती देतात. आमच्या सवलत योजना, व्यवस्था समजावून सागतात.

या सदर्भात एक अनुभव सागण्यासारखा आहे रायगडचं पर्यटन केंद्र गेले ८-१० वर्षं आहे. ते बद करायची वेळ आली होती. कारण तिथे राहायची सोय आहे हे लोकाना ठाऊक नव्हत. लोक गड चढून जायचे आणि दिवस मावळताना परत यायचे. त्या सुदर ठिकाणी राहायची इच्छा अनेकाची असते. त्याच आता मार्केटिंग केल्यापासून मात्र, तिथे गेल्या चार महिन्यापासून जागा उपलब्ध नाही अशी वेळ आलेली आहे

याउलट कार्ल्याला केद्राजवळ गाड्या थाबत नाहीत; पण तरीही ते केंद्र इतक लोकप्रिय आहे की तिथे नेहमी गर्दी असते. काहीही गैरसोय पत्करून लोक वीक-एडला तिथे येतातच. त्याच मार्केटिंग कराव लागतच नाही.

**: एखादं पर्यटनकेंद्र विकसित करायचं का नाही हे तुम्ही कसं काय ठरवता ?**

: आम्ही प्रवाशाचा सर्व्हे घेतो. त्याच्या अडचणी, गैरसोयी काय आहेत, मागणी काय आहे हे समजून घेतो. उदाहरणार्थ शेगावला असं लक्षात आल की, मदिरात दर्शन घेण्यासाठी रोज जवळजवळ १० हजार बाहेरगावची माणसं येतात. सुट्टीच्या दिवशी तर हा आकडा २५ हजारापर्यंत जातो. याची राहायची काहीही सोय नाही. मदिरात जी काय सोय आहे तेवढीच. तेव्हा त्या क्षेत्राचा विकास करणं अत्यंत आवश्यक होत.

**: पक्षिनिरीक्षण, हायकिंग, ट्रेकिंग या छंदांसाठी म्हणून मुद्दाम काही क्षेत्रं विकसित केलेली आहेत का ?**

: अशी क्षेत्र अलीकडे विकसित झालेलीच आहेत. उदा. – भंडारदऱ्याला तुम्ही गेलात तर तेथून सह्याद्रीच सर्वोच्च शिखर सर करायला जाता येईल. ट्रेकिंग, हायकिंग दोन्ही करता येईल माळशेजला, नवेगावला पक्षीनिरीक्षण करता येईल. वाइल्ड लाइफसाठी ताडोबाचं जगल आहे.

इतकच की आता पूर्वीपेक्षा या छदाची दखल अधिक जाणीवपूर्वक घेतली जाईल. आता भारत सरकारनच ट्रेकिंगला महत्त्व दिलेल आहे. सरकार ट्रेकिंगसाठी मदतही द्यायला तयार आहे.

**: पर्यटक वाढल्यामुळे फायदा होतच असेल पण तोटे कोणते झाले आहेत ?**

: तोटे ? तोटे व्हायचं काहीच कारण नाही !

**: तोटा म्हणजे असं की वाढत्या गर्दीमुळे विशिष्ट लोकप्रिय स्थानाचं सौंदर्य, शांतता नाहीशी होण्याची. तियेही पुन्हा गजबजाट, बकालपणा येण्याची शक्यता असते शांततेसाठी येथे येणारा प्रवासी अक्षरश हताश होतो. गोव्याच्या बाबत असा प्रकार होतो. यावर तोडगा काय ?**

: एक तोडगा आहे जिथे असा सॅच्युरेशन पॉईंट आला असेल तिथे पर्यायी केंद्र निर्माण करायची. गोव्याप्रमाणेच महाबळेश्वर, पाचगणी इथेही आता सॅच्युरेशन झालेलं आहे. त्याला पर्याय म्हणूनच आम्ही आता कोयनानगर विकसित करणार आहोत.

**M. T D. C तर्फे महाराष्ट्र राज्याबाहेरील सहली काढल्या जातात का ?**

: आमच्या सहली भारतभर आहेत. जम्मू-काश्मिरपासून ते रामेश्वरपर्यंत आम्ही, एखाद्या ट्रॅव्हलिंग कंपनीसारख्याच कडक्टेड टूर्स काढतो. शिवाय आमच्या सहली स्वस्त, माफक दराच्या, सामान्य माणसाच्या खिशाला परवडतील अशा असतात या सहलीबरोबर आमचे मॅनेजर्स असतात आणि ते व्यवस्था बघतात पण ह्या सहलीबद्दलची माहितीही लोकांपर्यंत पोहोचायला हवी. मार्केटिंगमध्ये आम्ही कमी पडतो पण आता त्या दिशेने आमचे प्रयत्न चालू आहेत

**: देशी प्रवाशांच्या जोडीनं विदेशी प्रवासीदेखील तुमच्या केंद्राकडे आकृष्ट झालेले आहेत का ?**

: विदेशी प्रवासी मुख्यत: आकर्षित होतात ते अजिंठा – वेरूळच्या लेण्याकडे. त्यामुळे औरंगाबादला विदेशी प्रवासी येतात; पण आम्हाला खात्री आहे की लौकरच गणपती पुळे हेदेखील एक आकर्षणकेंद्र होईल आणि परदेशी प्रवासी गणपती पुळ्यालाही मोठ्या सख्येन भेट देतील

¤

'गावी नसेल ते भेटवा' ही म्हण एका वेगळ्या सदर्भात व असमाधानी वृत्ती दर्शविण्यासाठी वापरली जाते. परंतु नाण्याच्या दुसऱ्या बाजूचा विचार करायचा तर गावकुसाबाहेरच्या, वेगळ्या जगाबद्दलच कुतूहलच माणसाला प्रवासाला उद्युक्त करत. या भ्रमतीतच त्याच्या मनाच्या व अनुभवाच्या कक्षा विस्तारतात. 'माझ गाव'ची सीमारेषा स्वाभाविकपणेच 'माझा देश'शी भिडते आणि शेवटी 'विश्वचि माझ घर' वाटायला लागतं.

–अंजली कीर्तने

# होम, स्वीट होम

## ललिता बर्वे

हाताला चुरचुरीत लागणारा गुळगुळीत पांढरा शुभ्र जाडसर कागद. त्यावर जाड छाप्यातले काळे आकडे, त्यांच्या शाईचा उग्र तरीही हवासा आणि हुरहूर लावणारा वास–अर्थात नव्या कोऱ्या वर्षाचं कोरं करकरीत कॅलेंडर आणि त्याच्या पहिल्याच पानावर, पहिल्याच महिन्यात, उठून दिसणाऱ्या तीन लालचुटुक तारखा–२४–२५–२६ जान्युअरी. सुट्ट्यांच्या उत्सुक शिरगणतीच्या पहिल्याच फेरीत, निर्विवाद मानाचं पहिलंच स्थान मिळवणारा सुट्ट्यांचा चक्क सिक्सेन्स ! ज्याला जाहिरातवाल्यांच्या भाषेत ' डिलाइटफुल ट्रेझर हंट ऑफ अनएक्स्प्लोअर्ड पॉसिबिलिटिज ' असं काहीतरी ' इग्झॉटिक ' वगैरे म्हणता येईल ! लगेच मळके कपडे आणि विस्कटलेली कपाटं इत्यादी मंडळींनी हात वर केला. त्यापाठोपाठ भिंतीला तंगड्या लावून एरवी हराम असलेला आराम मनसोक्त करून घ्यावा या विचारानं आवाज बुलंद केला.

मग आठवले दिवस काही वर्षांपूर्वीचे. कॉलेजमधले. लग्नानंतर लगेचचे. कमी कौटुंबिक जबाबदारीचे. जेव्हा महिन्यातले दोन तरी शनिवार रविवार जायचे भटकंतीत. हा किल्ला चढ, तो माळ तुडव. फार नाही तरी थोडीशी बिकटच वहिवाट असण्याचे दिवस. आणि लगेच ठरवून टाकलं, या सुट्टीत कुठेतरी बाहेरगावी जाऊया. मुंबईपासून, गर्दीपासून, धूळ आणि उकाड्यापासून आणि रूटीन चिंतांपासून दूर. मुंबईच्या रखरखाटापासून दूर.

कल्पनेवर शिक्कामोर्तब झालं आणि तयारीला सुरुवात केली. योजनाबद्ध नियोजन ही यशाची गुरुकिल्ली असते. (सन्माननीय राष्ट्रीय अपवादांनी हा नियम सिद्ध होईल.) सबब पद्धतशीर योजनांना सुरुवात केली. एम. टी. डी. सी. ची पत्रकं, कुठल्याकुठल्या माहितीची चिटोरी, मुंबईतले कॉन्टॅक्ट नंबर्स टिपलेली टेलिफोनची डायरी असा सर्व डाटा जमा केला. सुट्टी केवळ तीनच दिवसांची. त्यामुळे मर्यादा अनेक. ठिकाण जवळ हवं. जायला यायला सोयीचं हवं. फार आडवाटेचं, धाडसी नको. कारण आपल्यासारख्या कुटुंब–कबिलेवाल्या, लेकुरवाळ्या लोकांना ते सोयीचं नव्हे. मराठी किंवा गुजराती पद्धतीचं सहज घशाखाली उतरू शकेल असं जेवण हवं. कारण परत एकदा पूर्वीचंच. तेव्हा अशी आखुडशिंगी बहुदुधी ठिकाणंच बघायला हवीत. नेहमीच्याच यशस्वी हिलस्टेशनांची यादी काढली, आणि हॉटेलांच्या मुंबईतल्या कॉन्टॅक्ट नंबरांची आराधना सुरू केली. ' २४–२५–२६? सॉरी, तेवढे दिवस सोडून बोला.' एवढ्या एका वाक्यापुढे संभाषण सरकेना, तेव्हा लक्षात आलं की आपण कुठे जायचं आणि कुठे रहायचं हे निर्णय आपल्या हातात नाहीतच मुळी. या गाठी कुठेतरी अदृष्टात घालून ठेवलेल्या आहेत, आणि एक अज्ञात अंगुली आपल्याला तिकडे नेणार आहे !

कुठे जावं आणि कुठे राहावं हा सस्पेन्स चांगला २–४ दिवस टिकला. मग माथेरानच्या एका हॉटेलवाल्यानं हिरवा दिवा दाखवला. फक्त तुम्ही तीनऐवजी चार दिवस तरी आमचा पाहुणचार घ्याच अशी प्रेमळ आग्रहवजा अट मात्र त्यानं घातली, आणि ती आम्हाला पाळावीच लागली. ' ये तो हमारे बिझनेस के दिन होंगे बाईजी, आप चाहे तो तीन दिन रहो या तीन घंटे. पॅकेज तो हम चार दिन का ही देंगे ! '

एक दिवसाचे पैसे अधिक भरावे लागण्याची टोचणी हिशेबी मनाला लागलीच. पण प्रवासात अधिक उणं चालायचंच असं म्हणून स्वतःची समजूत घातली. तसं तर खरं म्हणजे इथेच अंदाज यायला पाहिजे होता की ही अज्ञात अंगुली अदृष्टाच्या कुठल्या खड्ड्यात आपल्याला नेऊन घालते आहे! पण तसा तो नाही आला खरा.

योजनाबद्ध नियोजनाचा योजनाबद्ध कचरा केला तो रेल्वे रिझर्वेशन प्रकारानं. मुंबई माथेरान थेट रिझर्वेशन मिळतं. पण ते पुण्याच्या रिझर्वेशन प्रमाणे फक्त तीन दिवस आधी. तेव्हा अशा त्या शुभदिनी, सकाळी उठून, स्नानादीने शुचिर्भूत होऊन दहा वाजता व्ही. टी. स्टेशनवर पोचले. खिडकी उघडत होती ९ वाजता. तासभर उशिरा म्हणजे फार नव्हे, अशा भाबड्या समजुतीत. पण हाय ! २४ तारखेची सगळी रिझर्वेशन्स कधीच फुल झाली होती. डेक्कन एक्स्प्रेस, मिरज एक्स्प्रेस, सिंहगड एवढ्या सगळ्या गाड्या तासाभरात खरंच भरल्या असतील का ? रेल्वे तर एका वेळी एका माणसाला चाराहून अधिक रिझर्वेशन्स देत नाही. मग एवढं रिझर्वेशन केवळ एका तासात खरंच झालं ? की बोगस बुकिंग झालं ? की बुकिंग झालंच नाही आणि बोर्डावरच्या ' नॉट अॅवेलेबल ' मध्ये गडबड आहे ? की... ? परत एकदा ' अनएक्स्प्लोअर्ड पॉसिबिलिटिज. '

खरं म्हणजे प्रवासाचा उत्साहच मावळला आणि इतके दिवस आपण या मोहाला बळी कसे पडलो नाही याचा साक्षात्कारही झाला. म्हणजे ट्रेकिंग करताना ट्रेकिंगचे आणि उनाडपणाचे उसूल ठीक आहेत. कुठूनही कुठेही चालणं. कसंही खाणं–पिणं, रिझर्वेशन असणं नसणं, रात्री फलाटावरच्या बाकड्यावर नाही तर स्टेशन यार्डात झोपणं या सगळ्या गोष्टी तिथे नॉर्मल सदरातच येतात कारण व्यवस्थितपणा आणि नियोजन हे सगळे फालतू अनावश्यक तपशील वाटत असतात. घोळदार माणसं तेव्हा दयेला पात्र ठरतात, किंवा काय हा यांचा नखरा, मग घरातच बसा म्हणावं, असं तरी नाक उडवून म्हटलं जातं !

आता स्वतःवरच घोळदार होण्याचा प्रसंग आल्यावर ते उद्गार किती अनुदार होते असं वाटायला लागलं ! सेकंडक्लास नव्हे तर फर्स्टक्लास रिझर्वेशन देखील भरलेलं. आपण पैसे खर्च करायला तयार अस-

ताना आपल्याला सुरक्षित, सुखरूप आणि किमान आरामाचा प्रवास का करता येऊ नये ? अर्थात रेल्वे नसली तरी आणखी एक खुष्कीचा मार्ग शिल्लक होताच, तो म्हणजे नेरळ, माथेरान टॅक्सीचा.

ज्या तीन दिवसांच्या सुट्टीची आम्ही आतुरतेने वाट पहात होतो अशा त्या सुट्टीच्या पहिल्या दिवशी दुपारी बारा वाजता कर्जत लोकलने आलेलो आम्ही अशाच आणखीही अनेक प्रवाशांसह नेरळ स्टेशनवर उभे असून पुढील प्रवासाची सोय होईल अथवा कसे याची चिंतायुक्त विचारणा करीत आहोत अशा चित्राकडे, प्रिय वाचकहो, आता आपण कटाक्ष टाकू या. नेरळहून दुपारी चारला माथेरानला जाणारी गाडी आतापासूनच नखशिखांत गर्दीनं भरली होती. वरून खाली येणाऱ्या टॅक्सी अर्ध्या वाटेतच कुठे तरी वळून परस्पर वर जात होत्या आणि स्टॅंड-पर्यंत क्वचितच येणारी टॅक्सी पकडण्यासाठी शक्ती आणि युक्ती दोन्ही आवश्यक होतं.

आर. टी. ओ. नं सकाळीच छापा घालून बऱ्याच गाड्या उचलून नेल्या होत्या. आमची टॅक्सी त्यातनं कशी वाचली कोण जाणे. नेहमीच्या भाड्यापेक्षा फक्त तिप्पट पैसे आम्ही अधिक दिले. प्रीमियर पद्मिनीमध्ये आम्ही आठ प्रवासी. एरवी या मार्गावर ड्रायवरसकट फक्त चार जण जाऊ शकतात. जरा रेललं की प्रेशरकुकरच्या सेफ्टी व्हॉल्व-सारखं गाडीचं दार फाटकन उघडायचं. समोर भयंकर वळण आलं की आमचा शूर चक्रधर खाली वाकून फेल झालेले ब्रेक्स हातानं वर काढायचा. तो दारू प्यायला आहे का हा प्रश्न आपल्या अखत्यारीतला नाही हे मी पहिल्या पाच मिनिटांतच ठरवून टाकलं. तशात एकविसाव्या शतकाकडे भर-धाव चालल्यासारखी त्याची गाडीही सतत चौथ्या गीअरमध्ये. अरे बाबा, थेट वर पोचवणार की काय आम्हाला, असा विनोद अनेकदा सुचला; पण त्याच्या कारुण्याच्या झालरीमध्ये तो पार दिसेनासा झाला.

सकाळी सकाळी उठून लोकलच्या चाकोरी-तल्या गर्दीतून नेरळ. नंतर तिथली रखडपट्टी टॅक्सीतल्या चाकोरीबाहेरच्या गर्दीतून माथेरान. हमालांशी घासाघीस आणि अखेर स्वावलंबन. या साऱ्या कार्यक्रमात हॉटेलमध्ये पोचून जेवण आणि झोप हा सर्वांत रम्य मुद्दा होता. ज्या मुद्द्याला मी घरात बसून ठाम नकार दिला होता.

दुपारच्या झोपेनंतर संध्याकाळी फिरा-यला बाहेर पडलो, आणि थक्कच झालो गावाच्या वेगळ्याच दर्शनानं म्हणजे जंगल-तोड वगैरे सोडा पण गर्दी ? आपण दादरच्या रानडे रोडवरून संध्याकाळचे चाललो आहोत अशी भावना जी मनात पक्की झाली ती जाईचना. सारखं आपण कुणावर तरी आपटतोय नाही तर आपल्या-वर कुणीतरी आपटतोय. गावात वाहनं नाहीत हाच काय तो विसावा. एवढ्या गर्दीत माणसांची अधिकाधिक भर पडतेच आहे. टॅक्सीस्टॅंडच्या दिशेनं माणसांची रीघ लागली आहे. एखादी नेरळ माथेरान गाडी येऊन आणि काही हौशी जीवांना गर्दीत ओतून जाते त्या छोट्याशा गाडीच्या डोक्यावर, पायऱ्यांवर, कपलिंगवर बसून उभं राहून प्रवास करणाऱ्यांना पाहून वाटलं की इच्छा आहे तिथे मार्ग आहे हे खरं; पण ही इच्छा घोरच चिवट असली पाहिजे ! एवढ्या अफाट गर्दीमुळे वळणा-वळणातून वाट काढ-ताना या गाडीचा तोल तर जायचा नाही ना ?—

बाजारचा अरुंद रस्ता. पायापायानी उडणारी धूळ. दुकानामधले सळणाऱ्या प्रका-शाचे दिवे. दुकानदारांचा आरडाओरडा— हे घ्या—ते घ्या, पिपाण्यांचा कलकलाट आणि इथे तिथे थव्या—थव्यानं बसलेली माणसं. त्यांची विखुरलेली सामानं आणि रडणारी पोरं, हे लोक मंझिलतक तर पोचलेत; पण निवारा नाही. हॉटेल नाही. राहण्याची व्यवस्था काय ? आहे रे आणि नाही रे यांच्यामधला फरक याहून स्पष्ट आणि सरळ सोट क्वचितच असेल !

बाजारात चक्कर मारताना नाहीरे वर्गा-तली मित्रमंडळी भेटली. त्या दोघांसाठी हॉटेल शोधताना परिस्थितीचं चांगलंच भान आलं. माथेरानमध्ये त्या दिवशी आणि त्या संध्याकाळी आलेल्या हजारो प्रवाशांची राह-ण्याची सोय होऊ शकत नव्हती. शक्य होतं ते लोक आल्या आल्याच परत फिरले होते. पण परतीचे दोरही कापलेले होते. परती-साठी टॅक्सीची रड तर होतीच. शिवाय गाडीचं रिझर्वेशन पुढच्या तीन दिवसांसाठी उपलब्ध नव्हतंच. ( परतीच्या प्रवासात काय होईल हे आता कळलंच. ) त्यामुळे निदान रात्र माथेरानमध्ये काढणं भाग होतं. माणसं त्या रात्री रस्त्यावर झोपली. जंगलात चादर पसरून झोपली. हॉटेलांच्या पुढच्या ओट्यां-



वर झोपली. स्थानिक जनतेन तर घरात-ल्यानी बाहेर झोपायच आणि आपली झोपडी रात्रीसाठी दोन–तीनशे रुपयासाठी द्यायची असा अभिनव मार्ग काढला. एका हॉटेल-वाल्यान आठ बिछान्याची डॉर्मिटरी आमच्या मित्राना देऊ केली. दर प्रत्येकी शभर रुपये. त्यात जेवण नाही, चहा नाही बिछान्याची अवस्था सशयास्पद आणि प्रकाश योजनेच्या नावान उजेड ! खोलीला जोडून बाथरूमही नाही. आणि कळस म्हणजे ही पूर्ण खोली तुम्हीच घ्या असा त्याचा आग्रह चेक आउट टाइम सकाळी ७ चा, म्हणजे फक्त एक रात्रीचे आठशे रुपये. कुठल्याही पचताराकित व्यवस्थेला मागे टाकतील असे हे दर. हा बावा आपल्याला परदेशी टूरिस्टाच्यात मोडतोय की काय अशी शका यायला लागली !

अखेर त्याना आमच्याच खोलीत समाविष्ट करून दोन नाहीरेंचा प्रश्न तरी आम्ही सोडवला.

पण रात्री लवकर झोप येईना. एक तर प्रचड उकाडा ! चक्क ! लोकसख्येत एवढी भर पडल्यान तपमान बऱ्यापैकी वाढल असणार ! (उलट पक्षी मुबईत या दिवसात बराच गारवा होता अशी साक्ष खूप जणानी दिली बरोबरच आहे ! ) दुसरं म्हणजे हॉटेलच्या मधल्या चौकात गदारोळ रगात आला होता. हॉटेलवाल्यान उत्साही लोकासाठी सगीत खुर्ची आणि हाउसी–अर्थातच बक्षिसासह चालू केला होता. पलीकडच्या सिनेमा हॉलमधून मध्येच पायरेटेड विडिओ कॅसेटमधल्या लेटेस्ट हिट सिनेमातले आवाज बुलद होत होते सपूर्ण हॉटेलभर हॉटेल-वाल्यान केलेल्या डिस्को रोषणाईचे किरण दारा-खिडक्याच्या फटीमधून डोळ्याचा बरोबर वेध घेत होते

या सर्वांच्या पलीकडे कुठेतरी शात डोगर होते सळसळती जगल होती. त्यातले दचकलेल्या माकडाचे, पक्ष्याचे चित्कार होते. मद, उग्र रानवास होते. सौम्य तारकाची नक्षी होती. त्याचा अस्फुट प्रकाश होता. झाडामध्ये कदाचित थोडी थडी रेगाळली होती

पण या असल्या काही भलत्या सलत्या गोष्टी हॉटेलवाल्याच्या 'पॅकेज'मध्ये बसत नव्हत्या. त्या आमच्यापर्यंत न पोचलेल्या बऱ्या अशीच त्याची खटपट असावी. त्यान आमच्याकडून छनाछन पैसे घेतले होते आणि त्याचा तसाच खणखणीत माल देणं एवढच त्याच काम होत !

या तीन दिवसात सहा सात हजार प्रवासी माथेरानला आले आणि त्याची सोय करण हे गावाच्या कुवतीबाहेर होत. सकाळी उठून नळाचा पान्हा आटलेला पाणी पुरणारच कस ? हिलस्टेशनच्या सकाळीसारखी सुदर सकाळ मुळी उजाडलीच नाही. सकाळ आली ती घामट, घुळकट, शिळी, जागरणाची माणस दिवसभर वेगवेगळ्या पॉइंटसना भेटत राहिली ती विंचवासारख बिऱ्हाड पाठीवर घेतलेली चालण सक्तीच, कारण घोडे एक तर परवडतीलच अस नाही, आणि त्याचीही टचाई. पढरपूरचे बडवे, गयेचे पड्ये आणि बनारसचे जे कोण असतील ते (बहुधा ठगच असतील) याच्या भव्य–दिव्य यादीत हिलस्टेशनचे हॉटेलवाले, घोडेवाले याचाही समावेश करायला हरकत नाही. गरिबी आहे, पैशाची गरज आहे हे खर. धद्याच्या वेळा मर्यादित आहेत हेही खर. पण समोरची सगळीच गिऱ्हाइक भाडवलशाहीचे काळ्या पैशाच्या गाद्यावर लोळणारे प्रतिनिधी थोडेच असतात?

## बुडला बिचारा सूर्य

खरा कळस चढवला त्या सध्याकाळच्या अनुभवानं. हिलस्टेशनच्या पायड्याला अनुसरून सगळी जनता सनसेट पॉइटला लोटली होती. सनसेट पॉइटला माणसं कशाला जातात अशी तुमची समजूत आहे ? सूर्य मावळताना बघायला ? साफ चूक दारू पिण, चणे–फुटाणे खाण, मुद्दाम लक्ष वेधल जाईल अस उथळ वागण. अतिशय गलिच्छ शेरेबाजी आणि रानटी उत्साहान म्हटलेली त्याहूनही गलिच्छ गाणी. गलिच्छ ऐकण्याचा आपला आयुष्यभरचा कोटा पूर्ण झाला असं त्या सध्याकाळी वाटल. एका तरुण मुलीची, पाचसहा जणाच टोळक, तिच्या आईवडिलादेखतच जी निर्लज्ज चेष्टा करत होत, ते पाहून वाटल की, आपल्याला कोणी आवरल नाही तर आपण या प्राण्याना कड्याखाली ढकलून देणार ! ही सगळी बहुधा राहण्या–जेवण्याची व्यवस्था न झाल्यान चिडचिडलेली तरुण मडळी असावीत अस म्हणून पाहिल. तारुण्याचा जोर, तारुण्य–सुलभ आकर्षण असेल असंही म्हणून पाहिलं, पण माफ करवेना उदारमतवाद, व्यक्तिस्वातत्र्य कसल्याच शीर्षकाखाली माफ करता येईना, अशी ही गुडगिरी, सूर्यास्तानतर काळोख्या रस्त्यावर आता मोकाट सुटेल तेव्हा आपल कस होईल अशी काळजी लागून राहिली

तस त्या सूर्यास्तानतर फार भावुक, रोमाचक अपेक्षा नव्हत्याच. बुडला बिचारा सूर्य एकदाचा आणि एक तमाशा सपला. परतीच्या रस्त्यावर, आपल्याला वाटणाऱ्या आचरट झुडगिरीच्या काळज्या किती खऱ्या होत्या हेच परत परत लक्षात येत राहिल. अरुद रस्ता. एका बाजूला दरी दुसऱ्या बाजूला मुन्शीपाल्टीच्या कृपेन अखड खोदकाम. माणस मेंढरासारखी दाटीवाटीन चाललेली, त्याच्यातच काही जणानी घोड्याना काठ्या टोचून उधळवण्याचे उपद्व्याप केले, तेव्हा तर परिस्थिती भलतीच गभीर झाली.

या साऱ्या गदारोळातून बाहेर पडण्यासाठी आमच्या घोडेवाल्यान एक बिनगर्दीचा आडरस्ता शोधून काढला. जी ए कुलकर्ण्यांच्या कथेत भेटत तसल जगल. पायाखालचा अपरिचित रस्ता, अनपेक्षित वळणाचा आणि ओबडधोबड. हिंदकळत्या टॉर्चच्या प्रकाशात वेड्यावाकड्या मागेपुढे होणाऱ्या झाडाच्या सावल्या, पण मुख्य सूत्र अधार

त्या वेड्यावाकड्या काळोखात अतर्मुख होताना भलतेच वेडेवाकडे विचार मनात यायला लागले. राग, दु ख, निराशा आपल्या ट्रिपचा विचका झाला यात काही सशयच नाही. आपल्या परीन शक्य तेवढं सर्व नियोजन आपण केल होत. मग गडबड कुठे झाली आणि का ? आपल्याला पडणारे प्रश्न चुकीचे की आपण त्याना शोधत असणारी उत्तरं चुकीची ? असा सभ्रम मनात निर्माण झाला. आपल्या या ट्रीपचा विचका झाला आहे हे प्रथम मान्य केल आपण नियोजन तर बऱ्यापैकी केल होत. पण त्याच्यात लक्षात घेतला न गेलेला क्ष होताच, म्हणून तर प्रवासाच समीकरण चुकल. आता हा क्ष कोण ?

क्ष म्हणजे गर्दी का ? म्हणजे वाढती लोकसख्या का ? जिचा स्फोट दर दशवार्षिक शिरगणतीत धक्का देऊन जातो ? पण वाढती लोकसख्या म्हणताना आपल्या डोळ्यासमोर अपरिहार्यपणे येते झोपडपट्टी नाहीतर पदपथनिवासी पिल्लावळ. जिथे नुसतीच खाणारी तोडं वाढतात, पण कामाचे हात

वाढत नाही. इथे जमणारी गर्दी तशी नाही. ती कगाल नाही. काळ्या–पाढऱ्या मार्गानं जमलेला पैसा तिच्याकडे आहे, आणि तो खर्च करण्याची तिची तयारी आहे, तेव्हा प्रत्येकालाच इथे यायचा हक्क आहे.

गर्दी म्हणजे क्ष नव्हे. मग बहुधा आपली ठिकाणाची निवड चुकली का ? आपण रूळलेल्या ठिकाणी गेलो. चाकोरीबाहेर पडलो नाही. पण सुटसुटीत असताना आपण पडत होतो की चाकोरीबाहेर. आणखी काही वर्षांनी परत पडता येईल तस. पण आता संसाराच्या ऐन मध्य लटपटीत असताना धोपट मार्गच बरा वाटतो. चाकोरीबाहेरच्या ठिकाणी सोय होईल याची खात्री काय ? चार–पाच वर्षांपूर्वी जव्हारला गेलो होतो. तिथल्या गेस्ट हाऊसच आम्ही बऱ्याच आधी केलेल रिझर्वेशन कुणीतरी जिल्हा पातळीवरची गाधी टोपी येणार म्हणून कॅन्सल झाल. हे अर्थात तिथे पोचूनच कळल तेवढ गेस्ट-हाऊस सोडल तर गावात राहायची सोय काही नाही (ही गोष्ट १९८२ मधली आहे. आता अशी परिस्थिती नाही.) पण मुलाना घेऊन असली धाडस जरा कठीणच. जिथे इतपतही सोय नाही, अशा ठिकाणी जगलात नाही तर समुद्रकाठी तबू ठोकून राहण्याचा कौटुबिक पातळीवरचा अमेरिकन बिनधास्तपणा आपल्यात नाही खरा; पण हा आपल्या सामाजिक आणि मानसिक घडणीचा भाग झाला. तेव्हा एवढा विशाल आणि सदिग्ध क्ष धरण्याऐवजी दुसरा एखादा क्ष सापडतोय का पाहू या

अधिकाधिक ठिकाणाचा पर्यटनस्थळ म्हणून विकास केला तर सुखी प्रवासाच समीकरण जमेल का ? त्यामुळे प्रवासेच्छूची गर्दी विभागली जाईल. स्थानिक माणसाना कामधदा मिळेल. वाहतुकीच्या जाळ्यामध्ये त्याचा समावेश होऊ शकेल.– आणि त्याचबरोबर तिथे जगलतोड होईल. हवा-पाण्याचं प्रदूषण होईल. आपल्या उपजत आळशीपणाबरोबर तिथल्या लोकाना चोरी, लबाडी असले शहरी व्यापारी दुर्गुण आत्मसात करण्याची सधी मिळेल. पर्यावरणाचा बट्ट्याबोळ होईल जिथल्या जागा सदासर्वकाळ भरलेल्या असतात अशा सरकारी पर्यटक निवासात आणखी एकाची भर पडेल. विशेषत: हिमाचल प्रदेशात फिरताना थोड नाव झालेल्या आणि टूरिस्ट नकाशावर सहसा नसलेल्या ठिकाणातला हा फरक लगेच लक्षात येतो.

## जाहिरातींचं काय ?

समजा आपल्याकडे भ्रष्टाचार खूप आहे असं म्हटल तर ? म्हणजे एवढी रिझर्वेशन्स भरतात किंवा माणस अचकट विचकट वागतात, तेव्हा आपल्याकडच्या लोकाना कोनै सेन्स जरा कमीच अस म्हटल तर ? तसं अस्वच्छपणा, गैरशिस्त याच्याबद्दल आपल्याला जरा सॉफ्ट कॉर्नर आहे हे खरंच; पण वॉटरगेट आणि जपानी भ्रष्टाचारासारख्या गोष्टी पहिल्या जगातही घडतातच तेव्हा आपण माणस खास वाईट नाही

का, गड्या आपुला गाव बरा असं म्हणत मी घरातच राह्यला हव होत ? सागितल्या कोणी या नसत्या उठाठेवी इथून उठून तिथे जायला ? पण मग त्या मोठ्या मोठ्या रगीत सरकारी जाहिरातीच काय ? डिस्कवर अमुक, ऐंजॉय तमुक, त्यातून सस्कृती-सगम, देशाची ओळख आणि व्यापार उद्योगाला चालना मिळणार आहे ना ? इडिया ऑन व्हील्स अशा आपल्या अकामध्ये इंडिया टुडेन देखील याची कौतुकान नोद घेतली आहे. 'सेज मिस्टर अमुक अमुक, ज्युनियर एक्झिक्युटिव फ्रॉम अ मल्टिनॅशनल कन्सर्न इन बॉम्बे, दॅट ही इअरमार्क्स ए सर्टन सम पर इयर फॉर ट्रॅव्हलिंग...' तेव्हा एवढे महाजन ज्या पथान जातात त्यान जाण्यात बहुधा चूक नसावी.

हा, एक मुद्दा आहे यात्रा–मेळ्याना जी जनता जमते त्या परमार्थी लोकाना इहलौकिक सोयी-गैरसोयीशी देण घेण नसत. ज्याला प्रवासाशी कर्तव्य आहे, त्यालाही कदाचित तोच विचार करायला हवा. भारतासारख्या देशातल्या स्त्रियासाठी स्त्रीमुक्तीचा विचार नाही अस पतप्रधानानी मागे एकदा मला सागितल होतं. आरामशीर प्रवासाच्या अपेक्षेबद्दलही कदाचित तेच लागू असेल.

एवढी सगळी माणस एकदम बाहेर पडली कारण सुट्ट्या अशा लागून लागून आल्या. त्यातही राष्ट्रीय सुट्ट्या बिचाऱ्या अगदीच अत्र ना परत्र. दिवाळीचं अभ्यंगस्नान सोडून चालायचं नाही. झेंडावदनाची अशी जबरदस्ती काही नाही. सर्वांना सुट्ट्या एकदम येऊ नयेत अशी रचना तर कठीण आहे पण केव्हा कोणी गावाला जाव हे सरकारी फतवा काढून ठरवल तर ? अस ऐकल आहे की पूर्वी चीनमध्ये लोकसंख्या वाढीच एक लक्ष ठरवलं जायचं आणि ते सगळ्या मोहल्ल्याना, वस्तीला वाटून अखेर कुटुबापर्यंत पोचायचं तेव्हा तुमची इच्छा असो वा नसो सार्वजनिक हित पहिल ! तसच प्रवासावर नियत्रण ठेवून आपणही साम्यवादाकडे जाऊ या !

मुळात प्रवासाला जाण्याची गरज का निर्माण होते ? याच्या अनेक चागल्या आणि पॉझिटिव कारणाबरोबर एक निगेटिव कारण असं आहे की, शहरीकरणाच्या, औद्योगिकीकरणाच्या सपाट्यात माझा परिसर आणि आयुष्य एवढ नीरस, उजाड होत आहे यत्रवत होत आहे. कामाचे तास जाचक आहेत. ऑफिसच वातावरण, बाहेरचा रस्ता हे सारं रखरखीत आहे त्यात मजा नाही, मोकळेपणा नाही स्वातत्र्य नाही. खरच माझ शहर थोडही सुदर करता येणार नाही का ? माझ्या घराच्या आसपास गारवा आणता येणार नाही का ? माझ्या ऑफिसजवळ बागा नसतीलच का ?

साठा प्रश्नाच्या या कहाणीला माझ्याकडे तर एकही उत्तर नाही. कदाचित हे प्रश्नच चुकीचे आहेत. कदाचित या सगळ्याच्याच उत्तरात क्ष अडकलेला आहे.

## उपसंहार

उप कसला, मुख्य संहारच तो सागावासा वाटत नाही, पण ते प्रवासवर्णनाच्या रीतीला धरून होणार नाही म्हणून नाईलाज आहे. येताना जेवढे पैसे टॅक्सीला दिले, त्याहून थोडे जास्तच हमालाला देऊन सामानाची आणि आपापल्या पायावर आमची अशी नेरळपर्यंत व्यवस्था केली शेकडो लोकानी हेच केलं होतं. पुढे यथावकाश वेगवेगळ्या लोकलची गर्दी अनुभवत घरी पोचलो. ताबडतोब कॅलेंडरवरच्या सर्व लाल तारखा काळ्या करून टाकल्या आणि होम स्वीट होम अशी भली मोठी पाटी दारावर लावून टाकली.

□

# वाराणसीत दोन दिवस

## फिरोझ रानडे

वाराणसीला म्हणजे बनारसला पोहोचलो तो अंगात ताप, सर्दी–पडसं घेऊनच.

गेले तीन–चार दिवस उत्तर–प्रदेश व बिहार राज्यात फिरत होतो. येथे कधी होत नाही असा पाऊस झाला होता व अजुनी होत होताच. बहुतेक नद्यांना पूर, अगदी महापूर आले होते. पण मला पावसात भिजणं भागच होतं. मी ज्या निम–सरकारी संस्थेतर्फे गेलो होतो त्यांच्या नव्या इमारतींकरता जागा पक्क्या करायच्या होत्या. त्या घरात बसून थोड्याच पक्क्या होणार होत्या ? आणि त्यासाठी भिजून घेतल्यावर सर्दी–पडसं होणार नाही तर काय होईल ?

ह्या सर्दी-पडश्यानं शरीर अवघडलं होतं, तर मन त्याहूनही जड झालं होतं. मुंबईहून उत्तर देशी येताना मनात थोडी धाकधूक होती. तिथलं वातावरण काही मोठं उत्साहवर्धक असणार नव्हतं. केव्हा. कुठे काय आपत्ती कोसळेल हे सांगता येणार नव्हतं. कुठे रामजन्मभूमीबद्दल गोंधळ, मारामाऱ्या, तर कुठे अतिरेक्यांनी निष्पाप प्रवाशांवर केलेले जीवघेणे हल्ले. माझ्या कार्यक्रमात उत्तरप्रदेश आणि बिहार या नंतर दिल्लीचाही समावेश होता. वाटलं होतं, सगळीकडे वातावरण अगदी तंग असेल. झालेल्या प्रकारांबद्दल सगळीकडे चिंता व चर्चा होत असेल. काही तरी अनपेक्षित आणि कडवट घडेल असं सारखं वाटत होतं.

पण गेल्या पाच–सहा दिवसांचा अनुभव अगदी वेगळा होता. त्या निम–सरकारी संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या गराड्यात मी गेले काही दिवस होतो. तसे कागदावर ते 'निम-सरकारी' असले तरी वृत्तीनं ते पुरे सरकारी लोक होते. चवथ्या पे–कमिशननं आपल्याला काय दिलं ( व त्याहीपेक्षा काय दिलं नाही) ह्याच विषयात त्यांना गोडी होती.

ह्यांच्या प्रांतातच, काही योजने अंतरावर, प्रभू रामचंद्रांच्या जन्मस्थानावर बांधलेल्या मशिदीबाबत केवढं रण माजलं होतं. कित्येक वर्षांनंतर त्या देवळाची कवाडं उघडली गेली होती, कित्येक शतकांनंतर तेथे पूजा–आरती झाली होती आणि त्याचा साधा घंटानादसुद्धा येथे ऐकू येऊ नये ना ?

पंजाबात एवढी मानवी हत्या होते आहे, अगदी दररोज होते आहे, त्या प्रचंड वादळाचे थोडेसुद्धा वारे येथे वाहू नयेत ? भले त्या निरपराध लोकांच्या किंकाळ्या ह्यांच्या कानावर पडल्या नसतील पण बातम्या ऐकल्या–वाचल्यावर मनावर त्यांचा थोडातरी ओरखडा पडायला नको ?

सगळं जीवन अगदी संथ, शांत व नेहमीप्रमाणे. माझ्याबरोबर असलेल्या निम–सरकारी लोकांचंच नाही, अगदी सगळ्या प्रजेचं. खांबाखांबावर राजेश खन्ना–स्मिता पाटील यांच्या नव्या चित्रपटाच्या जाहिराती लागल्या होत्या. कोपऱ्या–कोपऱ्यावर 'कर्मा' सिनेमाची जंगी चित्रं उभारली होती. हातात पिस्तूल घेऊन दोन नट एकमेकांकडे रागाने पाहत होते. आणि त्यांची ती लुटपुटीची लढाई पहायला लोक चित्रपटगृहावर शेकड्यांनी गर्दी करत होते.

हिंदू, मुसलमान, शीख या धर्मियांमध्ये सध्या वातावरण तापलं होतं. हे सगळे लोक मनाने एक झाल्याशिवाय देशाला तरणोपाय नाही असं सगळ्यांना वाटत होतं, तर येथली उत्तरप्रदेश, बिहारची मजल अजुनी ब्राह्मण, ठाकूर, रजपूत, भूमिहार ह्या जातीच्यापुढे गेली नव्हती. मुसलमानांचं अस्तित्व त्यांना जाणवत नव्हतं, शीख तर काय त्यांच्या खिसगणतीतही नव्हते.

कोणी अधिकारी मला भेटून गेला की, तो गेल्यावर, त्याचा ठाकूरपणा, ब्राह्मणपणा वा राजपूतपणा याबाबत चर्चा होत असे. तो अमक्या जातीचा आहे म्हणून त्याला कसा फायदा मिळतो आहे हे मला बाकीचे लोक समजावून सांगत.

त्या दिवशीची नैनितालची गोष्ट. माझ्यासमोर इतर माणसं होती, तसाच एकतीस–बत्तीस वर्षांचा, चलाख व चुटचुटीत तरुण पण बसला होता. आपण ब्राह्मण आहोत हे त्याने मोठ्या चतुराईने मला सांगितले होते. अशा उत्तर प्रदेशी ब्राह्मणाच्या भेटीची मी कित्येक दिवस वाट पाहत होतो. उत्तरप्रदेशी ब्राह्मणांबद्दल मला कित्येक दिवस कुतूहल वाटत होतं. बाकी सगळ्या प्रांतांतून ब्राह्मण वर्गाची राजकीयदृष्ट्या पिछेहाट झाली असली तरी उत्तर प्रदेशात त्यांचा फार जोर आहे. एक राजकीय शक्ती म्हणून त्यांना मानलं जातं, हे कसे काय ? हे कळून घ्यायची फार इच्छा होती पण इतक्या लोकांदेखत तसं काही बोलणं शक्य नव्हतं.

तेव्हा उत्तर प्रदेशी ब्राह्मणाबद्दल दुसरा एक प्रश्न जो बरेच दिवस मनात होता, तो विचारला, 'आमच्याकडे मराठी ब्राह्मणात तीन पोटजाती आहेत. तुमच्याकडे किती आहेत ?'

त्याने सांगितलेली माहिती मजेशीर होती. तेथे दोन जातीचे ब्राह्मण आहेत. एक मोटी धोतीवाले व दुसरे छोटी धोतीवाले. अर्थात त्यात मोटी धोतीवाले हे श्रेष्ठ ! त्या एकमेकांत रोटी व्यवहार होतो पण बेटी व्यवहार होत नाही. तो तरुण (अर्थातच) मोठ्या धोतीवाल्यांपैकी होता.

'मग हे एन. डी. तिवारी वगैरे कोणते धोतीवाले आहेत ?' माझा प्रश्न.

'ते छोटे धोतीवाले आहेत.' त्याने माहिती पुरवली.

तो गेला तशी दुसरा एकजण लगोलग माझ्याजवळ आला. एकतर मी मराठी त्यातून माझ्या खाण्या–पिण्याच्या सवयींवरून मी ब्राह्मण असेन असा कोणाला संशयही आला नसता.

'इंजिनियरसाहाब, ये ब्राह्मन बडे उस्ताद होते हैं । ये साहाब बडी डिंग मार रहे थे ना ? उसकी वजा क्या है, पता है ? ये तिवारीसाहाब के बहन का लडका है, अपनी

सगी बहेन का। सब बडी जगा तिवारी-साहाबने ब्राह्मणों को दियी है।

□

वाराणसी स्थानकावर उतरलो तो अंगात ताप व मनात गेले चार–पाच दिवसाचा जड अनुभव घेऊन.

प्रथम मी हॉटेलवर जाऊन थोडी विश्रांती घ्यावी आणि मग इमारत बांधायची आहे ती जागा पाहायला जावं असं मला स्थानकावर घ्यायला आलेल्या लोकांनी सुचवलं. पण मी तापाने व जड डोक्यानं इतका बेजार झालो होतो की जर हॉटेलवर विश्रांतीसाठी गेलो असतो तर संध्याकाळपर्यंत उठलो असतोच ह्याची शाश्वती नव्हती. म्हणून लगेचच जागा पहावी. त्यावर काय रिपोर्ट लिहायचा तो लिहावा व मग हॉटेलवर येऊन स्वस्थ पडावं असं मी ठरवलं.

त्याप्रमाणे कामं झाली, रिपोर्ट लिहायचा तो लिहिला, जेवलो व झोपलो तो दुसऱ्या दिवशी सकाळीच उठलो.

चांगल्या झोपेमुळे मन प्रसन्न झाले होते. उठून खिडकीच्याबाहेर पाहिले तर बाहेरही छान ओलसर उन पडलं होतं. म्हटलं, आता हॉटेलात बसण्यात अर्थ नाही. नास्ता, आंघोळ वगैरे आटपण्याच्या गोष्टी आटोपल्या व हॉटेलच्या बाहेर पडलो.

बाहेर पडलो तर समोरच 'माणूस–गाडचा' म्हणजे सायकल–रिक्षा उभ्या होत्याच. हॉटेलच्या मॅनेजरने दशाश्वमेध घाट सगळचांत जवळचा आहे, तो पाहण्यासारखा आहे व त्याच्याजवळच काशी–विश्वेश्वराचं मंदिरही आहे हे सांगितलं होतं. रिक्षावाल्याशी उगाचच घासाघिशीकरता घासाघीस केली. तो मागेल ते द्यायचं हे मी आधीपासूनच ठरवलं होतं.

रिक्षा सुरू झाली. अर्थात रिक्षावाल्याला माझा पहिला प्रश्न म्हणजे तुझं नाव काय ? हा होता.

'सीताराम सक्सेना' त्याने सायकलच्या पॅडलवर सगळा जोर लावत सागितलं, 'हम लोग कायस्थ हैं।' उत्तर हिंदुस्थानात हीच पद्धत आहे. नावाबरोबर आपली जातही सांगतात.

सक्सेना, सिन्हा, माथूर, श्रीवास्तव वगैरे कायस्थ मंडळी मला चांगली माहीत होती. बिहार, उत्तरप्रदेशच्या सांस्कृतिक जीवनात कायस्थांची फार चलती आहे.

'अरे, कायस्थ हो, फिर रिक्षा क्यूं चला रहे हो ?' मी त्याला टोचलं.

'क्या करे साहाब, हमारी तकदीरही अैसी है।' असे म्हणून त्याने आपल्या तकदिराचा फसाना सांगायला सुरुवात केली

कोणतेही गाव खऱ्या अर्थी पहायचं असेल तर सायकल रिक्षानं फिरावं. अगदी मुंगीच्या पावलानं जाणारी ही रिक्षा आपल्यापुढे सगळं गाव हळुवारपणे उलगडते. शांतपणे त्या गावाचा पोत पाहता येतो.

सीताराम सक्सेना आपली कहाणी सांगत होता आणि मी आपला इकडे तिकडे पाहत गाव न्याहाळत चाललो होतो.

वाराणसी हे हिंदूंचं सगळचात पवित्र क्षेत्र मानलं जातं. काही हजार वर्षांपूर्वी येथलं काशी विश्वेश्वराचं मंदिर बांधलं गेलं.



हिंदू धर्मियाचा तो मानबिंदू होता. त्याच हरण करण्याकरता औरगजेबान ते मदिर पाडल आणि तिथेच मशीद बाधली. औरगजेबानं जेव्हा देवळावर हल्ला केला तेव्हा देव बाटवले जातील ह्या भीतीन पुजाऱ्यानी ते देवळाजवळच्या विहिरीत टाकून दिले होते. ते अजूनी तेथेच विहिरीतच आहेत. औरगजेबान पाडलेल्या मदिराजवळच अहिल्याबाईन नवं मदिर बाधलं व तेथे दुसर शिवलिंग स्थापल वगैरे इतिहास मला माहीत होता. औरगजेबानतर इग्रज येईपर्यंत तेथे मुसलमानी राज्य होते.

इग्रजाचं पण बनारस हे आवडत ठिकाण. इग्रजाच्या आमदानीतल्या किती तरी वैभवशाली इमारती इथ आहेत. सस्कृत पाठशाळेची इग्रजानी बाधलेली भव्य वास्तू तर अप्रतिम आहे. येथे कपनी सरकारची मोठी थोरली बाग आहे. बगाली क्रातिकारकाच्या भीतीने जेव्हा इग्रजानी कलकत्त्याहून आपली राजधानी हालवावयाच ठरवून ती दिल्लीला नेली, त्यावेळी आग्रा, उज्जैनी वगैरे शहराबरोबर बनारसचा पण सभाव्य राजधानी म्हणून विचार झाला होता. हिंदुस्थानची राजधानी बनारस ही व्हावी अशी पुष्कळ इंग्रजाची इच्छा होती.

हे सगळ पूर्वीच ऐकलेल व वाचलेल मी मनातल्या मनात रवथ करीत सायकल रिक्षातून चाललो होतो इग्रजी सत्तेचे इमारतरूपी अवशेष अधूनमधून दिसत होते. त्याच प्रमाणे स्वराज्यात बाधल्या गेलेल्या इमारती पण डोळ्यापुढून जात होत्या.

हे सगळ होईपर्यंत घाट आला. अर्थात त्याबरोबर पंडेपण आले. माझे पडेपण कोणी कराव ह्याबाबत प्रथम त्याच्यात लठ्ठालठ्ठी झाली. एक उरला त्याला मी वाटेला लावला आणि घाटावर गेलो.

गंगामाता दुथडी भरून वाहत होती. शांत, गभीर. काही खळखळ न करता. तिच्या काठावर केवढा मोठा इतिहास घडला होता. प्रथम राजपूत होते, मग अफगाण, त्यानतर मोगल. त्यानतर आलेले इग्रज जाऊनसुद्धा आता चाळीस वर्षं झाली होती पण गंगामातेला ना त्याचा खेद ना खत.

घाटाच्या काठावर प्रातोप्रातीचे आलेले भाविक स्नान करत होते. सगळ्या प्राताचे आणि अठरा पगड जातीचे. पण त्या सर्वांत बंगाली बाबू प्रामुख्यानं दिसत होते. बगाली सास्कृतिक जीवनात अलाहाबाद आणि काशी बनारस ह्याना फार महत्त्व आहे मात्र ह्याच धार्मिक वृत्तीच्या लोकानी पश्चिम बगालचे राज्यकर्ते म्हणून निवडून दिल आहे. धर्मावर विश्वास नसणाऱ्या साम्यवादी लोकाना!

मी घाटावरची सगळी मजा शांतपणे पाहत उभा होतो. तेवढ्यात एक नावाडी सगळे घाट दाखवून आणतो. दोन–दोन रुपयात.' म्हणून साद घालू लागला. ते घाट पहायला साधारण अर्धा–पाऊण तास लागणार होता. म्हटल हे काही वाईट नाही माझ्यासारखे आणखीही काही हौशी लोक निघाले.

होडी प्रथम प्रवाहाच्या विरुद्ध चालली होती. त्यामुळे नावाड्याना जबर जोर करायला लागत होता. तरी बर, तें होडी काठाकाठानं नेत होते तिथे नदीचा जोर थोडा कमी होता. जाताना नावाड्याची रनिंग कॉमेंट्री चालू होती. नाना नावाचे, नाना लोकानी बाधलेले घाट हा अहिल्याबाईचा, हा अमक्याचा, हा तमक्याचा असे करता करता एक लाल दगडातला अत्यत सुबक व प्रशस्त घाट लागला हा 'राजा का घाट' म्हणून नावाड्यानी सागितले. आणि 'राजा' म्हणजे 'पुनेका पेशवा बाजीराव राजाने बनाया है' म्हणून आणखी माहितीही पुरवली. अर्थात बाजीराव म्हणजे दुसरा बाजीराव! पहिल्या बाजीरावाला लढायाच्या गडबडीत घाट बांधायला वेळ तरी कुठे मिळाला असणार? नतर राजा हरिश्चद्र घाट व शेवटचा कोणा राजपूत राजाने बांधलेला. घाट पाहून सपले तसे परत निघालो. आता होडी प्रवाहपतित होती, त्यामुळे नावाड्यानी काही न करताच वेगान चालली होती. परत एकदा सगळे घाट नजरेखालून गेले आमचा जेथून निघालो होतो तो घाट आला तसा उतरलो व काशी विश्वेश्वर मदिराच्या दिशेने जाऊ लागलो.

मंदिराचा रस्ता असा विचारायलाच लागला नाही. बहुतेक लोक तिकडेच चालले होते. रस्ते म्हणजे बोळ, नॅरो किंवा मिटर गेज करता रेल–लाईन असते तसे लहानगे अरुंद असे होते. त्यात जागोजागी गायी मोठ्या आरामात भक्तांनी दिलेल खात उभ्या होत्या, रंवथ करीत होत्या आणि येणाऱ्या जाणाऱ्याचा रस्ता अडवीत होत्या.

कोणीतरी त्याना 'हाड-हाड' केलं तस एका वयस्क गृहस्थान, 'गाईला अस हाड–हाड करू नये, ती गौ–मैया आहे' म्हणून धडा दिला

मदिर जस जवळ येऊ लागल तस तसं दुतर्फाचे दुकानदार हार–फुलं घेण्याचा आग्रह करू लागले चपला ठेवण्याची सोय आहे म्हणून सागू लागले, पण मी अगदी देवळाजवळच्या दुकानातून फुल घ्यायची व तिथच चपला ठेवायच्या अस पक्क ठरवल होत. देवळाच्या चारी बाजूना असे बारीक बारीक बोळ, नतर चपला ठेवलेले दुकान सापडायला तर पाहिजे? म्हणून ही सावधानता.

तेव्हा अगदी मुख्य दाराजवळच जे दुकान होत तिथ फुल–हार घेतला, चपला ठेवल्या तेवढ्यात एक पडे बुवा हजर झाले. ह्यावेळी मी ठरवल होत की पंड्याला नाही म्हणायच नाही.

पड्यावरोबर देवळात शिरताच त्यान वर देवळाच्या कळसाकडे पाहयला सागितल पाहतो तो सगळा कळसच्या कळस आपला सोन्याने मढवलेला! 'ह्याला दहा मण सोनं लागल आहे.' अस पड्या बुवानी सागितल. म्हटल, असेल बुवा, दहाच का? वीस मणही असेल. इथे मणभर सोन म्हणजे किती असतं, हे कोणाला ठाऊक होत? . . .

त्या दहा मण सोन्याच कौतुक करीत आत गेलो. सगळीकडे गोधळ माजला होता एक भली मोठी नेपाळी लोकाची बायका–मुलासकट टोळीच्या टोळी आली होती. त्यामुळे मूळच्या गोधळात आता नेपाळी भर पडली होती नेपाळी बिचारे भोळे भाबडे ह्याच्याकडून चागला पैसा सुटेल अशी पंड्याची अपेक्षा व त्या अपेक्षेच्या हिशोबात त्याची आरडाओरड!

देवळाच्या आत एका बाजूला पाण्याने भरलेले छोटेसे कुड होते. त्यातून शिव–लिंग अर्धं–मुर्धं डोकावत होत. हाच सध्याचा म्हणजे काही वर्षांपासूनचा काशीविश्वेश्वर! माझ्या पंड्याने त्याला हार घालायला, फुलं वहायला व नमस्कार करायला सागितलं.

त्याप्रमाणे करून झाल्यावर तो मला आजूबाजूची कोणा देवीच, मारुतीचं वगैरे मदिर दाखवू लागला. मला त्यात रस नव्हता.

'वो, कुवा कहाँ है ? जहाँ महादेवजीको छिपाया था ?' मी अगदी न राहवूनच विचारलं.'

'बताता हूँ, बताता हूँ' म्हणत मला तो देवळाच्या मागल्या बाजूला घेऊन गेला.

तीन–चार फूट रुंदीची ती विहीर होती. बाजूला दोन–अडीच फूट उच भिंती व वर एक मेणकापडाच झाकण टाकलेल. त्यावर काही नाणी पडलेली होती.

'जब औरगजेबने मदिर टुडवाया, तो भगवान अपवित्र न हो इसलिये शिवलिंग यहाँ छिपाया गया.' पड्येबुवा माहिती देऊ लागले. लगोलग आजूबाजूला सात आठजण जमलेच. पड्यान त्याना परत तो इतिहास सागितला वर 'कुवा मैय्या की जय !' म्हणून आरोळी ठोकली न त्याच बरोबर पैसे टाकण्याची याचना केली. 'पैसे टाका' म्हणून त्याने माझ्या खांद्याला हात लावताच मी झिडकारून टाकला.

'अरे, ह्या लोकाना काही लाज–लज्जा, शरम, अभिमान नावाची गोष्ट आहे की नाही ? एकतर औरगजेब तुमचं देऊळ तोडतो व तिथ मशीद बाधतो ह्याचा मोठा राग यायला पाहिजे. निदान आपल्याला आपले देव विहिरीत लपवून ठेवायला लागले ह्या आपल्या नामुष्कीचीच खर म्हणजे लाज शरम वाटायला पाहिजे ते सगळे राहिले बाजूला पण उलट आता तीच विहीर 'कुवा मैय्या' झाली होती व ते पैसे मिळवण्याच साधन केल गेल होत. आपल्याकडे कोण, 'मैया' होईल ह्याचा काही भरवसा नाही. गगा पण मैया, गाय पण गो–मैया आणि नामुष्कीची निशाणी विहीर, ती पण 'कुव्वा मैयाच !'

कुव्वा मैयाच दर्शन घेऊन त्या सगळ्या गोंधळातून बाहेर पडलो. ह्या देवळाच्या मागच्या परिसरातच औरगजेबान पाडलेल मदिर व तिथच त्यान बाधलेली मशीदपण आहे. मी तिकडे जाऊ लागलो.

'साहाब, वहा मत जाइये। वहा कुछ नही है। बस टुटा हुवा मदिर है और मसजिद.' पंड्या सागू लागला

'मुझे वही देखनी है। तुम अपना काम सभालो' मी अत्यत रागावलेला आहे हे पाहून पड्या तेथून सटकला. म्हटल, आता शांतपणे पाहता येईल. पडक मदिर आणि मशीद दोन्ही चार–पाच फुटी उच चबुतऱ्यावर आहेत. पडक मदिर राजस्थानी लाल दगडातल आहे. त्याच दगडाची मशीदपण आहे. पण तिला पांढरा रग फासला आहे. औरगजेबाला मदिर पाडून मशीद बाधायची फार घाई झाली होती अस दिसल. त्यान मदिर पुरतेपणी पाडलही नव्हत. औरगजेबान पाडलेल व नतर मशीद बनवलेल हे काही पहिल देऊळ नाही. कृष्णजन्मस्थळाच मथुरेतल मदिर त्यान अगदी जमीनदोस्त केल व तिथच भव्य मशीद बाधली काशीतल हे अर्धपडक लाल दगडाच मदिर व त्याला लागूनच असलेली पाढरी मशीद हे आम्हा भारतीय हिंदू–मुसलमानाच्या ऐतिहासिक सबधाच प्रतीकच म्हणाव लागल.

देवळाचा दगड व त्यावरच खोदकाम व नक्षीकाम खास राजपूत पद्धतीच दिसत होतं, देऊळ फार जुन नसाव काहीतरी सातव्या वा आठव्या शतकातल वाटत होत. त्यावेळी ह्या भागावर राजपूत सत्ता होती. गगाकिनारी राजपूताचा घाट तर होताच पण गावात जतर–मतर म्हणजे वेधशाळा पण होती. त्याच सुमारास हे देऊळ बाधलं असणार

हे सगळे विचार मनात घोळवीत मी ती मदिर–मसजिद पहात होतो. त्या वास्तूभोवती चक्कर मारत होतो. मी एकटाच. औरगजेबान मदिर पाडल त्यावेळी तो सर्वसत्ताधीश होता. त्यावेळी त्याला विरोध करण शक्य झाल नसेल, भीतीन भगवान कुव्यात लपवावे, लपून ठेवावे लागले असतील, हे सगळ आपण समजू शकतो; पण औरगजेबानतर ? त्यानतर जवळ जवळ शभर वर्षांचा काळ गेला मोगल सत्ता मोडकळीला आली होती. जवळ जवळ तीस–पस्तीस वर्षं ह्या भागात मराठ्याचं वर्चस्व होत. त्याना ही मशीद पाडून परत मदिर उभाराव अस वाटल नाही ? 'राजा बाजीरावान आपल्या बायका–मुलाच्या आघोळीला म्हणून एवढा थोरला मोठा घाट बाधला, त्याला नाही वाटल की आपण परत एकदा विश्वेश्वराच मदिर बाधावं अस ? इतके राजपुत सरदार होते, त्याच्याही मनात कधी आल नाही ? असे कसे आम्ही नादान लोक ? की ते सगळे औरगजेबाच्या भुताला भीत होते ? माझी मलाच चीड आली.

पण राजपुताना व आपल्या बाजीरावाला तरी याबद्दल दोष देण्यात काय अर्थ ? आपल्याकडे पवित्र आणि अपवित्रपणाबद्दलच्या कल्पना इतक्या पक्क्या आहेत की कोणी ती मशीद पाडून देऊळ बाधायच म्हटल असतं तर त्याला धर्म–पडितानी मुळीच परवानगी दिली नसती.

विश्वेश्वर मदिराची तर फार जुनी गोष्ट. सरदार पटेलांना सोमनाथाच देऊळ, पूर्वी गजनीच्या महमुदानं पाडलेल्या जागी बाधायच होत, तर सगळ्या हिंदुस्थानात एकही ब्राह्मण पौराहित्य करायला तयार झाला नाही. आपले लक्ष्मणशास्त्री जोशी तेवढे तयार झाले तेव्हा कुठे तिथ देवाची स्थापना झाली व भव्य दगडी मंदिर बाधल गेल.

आता मी औरगजेबान बाधलेली मशीद दुरूनच पाहत होतो. तिच्यात खास असं काही नव्हतं. जुन्या देवळाखालचा तळमजला तसाच ठेवून त्यावर रागेन तीन घुमट असलेली मशीद बाधलेली आहे अगदी लहान पचवीस एक फूट उंचीची. मदिराचेच दगड उलटे करून वापरून त्याना पाढऱ्या चुन्याचा रग दिला आहे. एकदर तिथे शुकशुकाट वाटत होता.

मनात औरगजेब व त्याची मशीद या बद्दलच विचार चालले होते. अरे, आपण का पाहू नये ती मशीद, वर जाऊन ? असा विचार येताच आपणा बहुसख्याक लोकाच्या मनात जी भावना अगदी प्रथम येते ती म्हणजे भीतीची, ती माझ्याही मनात आली. आत जाऊन मशीद पहायची ? नको रे बाबा ! उगाच आपण जायचं आणि काही तरी होऊन बसायच. बनारसमधल्या दग्याला आपल्यामुळ सुरुवात व आपणच पहिले बळी. बाहेरून पाहिली ना मशीद ? पुष्कळ झाल ! एवढ सगळे विचार मनात येऊन गेले व परत आयला निघालो.

पण हे काही खरं नाही, असं वाटल. आपल्याच देशातल्या एका मशिदीत जायला आपल्यालाच भीती वाटावी ? वर मशिदी सगळ्याकरता खुल्या असतात. आपल्या सारखी, तिथं दार बंद नसतात. मग जाऊन बघायला काय हरकत आहे ? आत्तापर्यंत मी बाकीच्याना नाव ठेवली व आता मीच स्वतः औरंगजेबाच्या भुताला भितो आहे ?

मन घट्ट केलं आणि पायऱ्या चढून वर

गेलो आवाराच लोखडी दार घुसतच लोटून घेतलं होतं. ते ढकलून आत गेलो. मशीद उजव्या हाताला होती. समोर एक म्हातारा मुसलमान पाण्याचा हौद साफ करत होता. डाव्या बाजूला एका तंबूखाली हवालदार व दोन पोलिस खुर्च्या टाकून गप्पा मारत बसले होते. त्याच्याकडे गेलो आणि मी मुंबईहून आलो आहे व मला मशीद बघायची आहे अस सागितले. हवालदारानं, 'जरूर मशीद पाहा, पण पायातले जोडे वगैरे काढून ठेवा' अस सागितल.

'मी मघा मदिरात दर्शनाला गेलो होतो त्याच वेळी चपला काढून ठेवल्या आहेत.' अस मुद्दाम सागितल. हेतू हा की माझा हिंदूपणा त्यांना पक्केपणी कळावा.

त्या तीन घुमटाच्या मध्यभागी जो घुमट होता त्याच्या खालचा हॉल काही तरी तीस बाय तीस फुटाचा असावा सगळीकडे शात गभीर होत. हॉलच्या पश्चिम दिशेला महिरत होती बाजूला मुल्लाकरता लाकडी घडवंची होती. समोर जुन्याच पण स्वच्छ सतरंज्या पसरलेल्या होत्या. साफ. एकही सुरकुती न पडलेल्या. गरम झालेल डोकं एकदम शात झालं काही म्हणा, इथ देवाची प्रार्थना करावी असं वातावरण आहे हे नक्की देव व आपण समोरासमोर आहोत आणि आपण त्याची करूणा भाकतो आहोत, हे अशा शात आणि पवित्र स्थळीच शक्य होईल

जरी असले विचार मनात आले तरी ही मशीद आपल देऊळ पाडून बाधली गेली आहे ही रुखरुखही मनातून गेली नव्हती. त्या रुखरुखीत मशिदीतून बाहेर पडलो तसाच मदिराच्या आवारातूनही बाहेर पडलो आणि सरळ चपला काढून ठेवल्या होत्या त्या दुकानाशी आलो.

फुलवाल्याला पैसे देऊ लागलो तर त्याच्या मागल्या दगडी भिंतीवरच्या शिलालेखाकडे लक्ष गेल. देवनागरी लिपीत आणि हिंदी भाषेतला तो शिलालेख होता. जुन्या वळणाची लाबडी अक्षरं होती. ती इमारत होती नगारखान्याची आणि कोणी सलामत अल्ली नावाच्या नबाबानं ती काशी विश्वेश्वराकरता बाधली होती ती ही लाल दगडातली भारी कोरीव काम केलेली इमारत.

तो शिलालेख वाचीत मी उभा राहिलो. मी काय एवढं अन् लावून वाचतोय ते फुलवाल्याला कळेना. त्याने प्रथम शिलालेखाकडे पाहिल व नंतर 'असतात अशी काही चक्रम माणसं' अशा अर्थी माझ्याकडे पाहिलं आणि आपल्या कामाला लागला.

म्हणजे जसा दऊळ तोडणारा औरगजेब होता तसाच त्याच विश्वेश्वराकरता नगारखाना बाधून देणारा कोणी पेशवा वा राजपूत नव्हता तर कोणी सलामत अली होता! पण हा इतिहास आपल्याला कुठे सागितला जातो? हे सुद्धा हिंदू–मुसलमान संबंधाच प्रतीक नाही?

आम्हाला नाही औरगजेबाबद्दल चीड वा राग, नाही सलामत अलीचं कौतुक आम्ही आपले गंगा–मैयासारखे. काठावर काय चालल आहे त्याच ना सोयर ना सुतक.

☐


*With Best Compliments From*

**THE ALL INDIA FEDERATION OF COOPERATIVE SPINNING MILLS LIMITED**

14, MURZBAN ROAD, 2ND FLOOR, BOMBAY - 400 001

**Shri V. G. Puranik**
Managing Director

**Shri K. H. Patil**
President



# विमा पॉलिसी ध्यायच्या वेळेला पूर्ण व खरी माहिती द्या.

## त्यामुळे क्लेम जलद रीत्या देण्यास आम्हाला सोपे जाईल.

आपण ज्या वेळेला विमा पॉलिसी घेता त्या वेळेला आपल्याला योग्य सल्ला देण्यास व सर्वतोपरी मदत देण्यास एल आय सी एजंट तत्पर असतो साहजिकच तो आपल्याकडूनही पूर्ण सहकार्याची अपेक्षा करतो.

### संपूर्ण विश्वास आवश्यक

विमा हा एक संपूर्ण विश्वासाने, कसल्याही लपवा-छपवी शिवाय करावयाचा करार आहे. (संपूर्ण माहिती उघड करणे विमेदारावर बंधनकारकही आहे.) साहजिकच आपले वय, वैद्यकीय तपासणी व उपचार यांचा इतिहास, कौटुंबिक माहिती आणि इतर महत्त्वाची माहिती विमा प्रस्ताव भरतानाच योग्य व खरेपणाने देणे आवश्यक ठरते. अशा प्रकारे दिलेल्या माहितीच्या आधारावरच आपला विमा प्रस्ताव स्वीकारला जात असतो.




### आपल्या हिताची गोष्ट

आपणाला पूर्वी झालेल्या वा सध्या असलेल्या आजारपणाची वा रोगाची माहिती दिली तर विमा प्रस्ताव नाकारला जातो असे मानणे खरे नाही. हजारो विमाधारकांनी आपला खराखुरा वैद्यकीय इतिहास उघड करूनही सर्वसाधारण दराने विमा उतरविलेला आहे, तर काही जणानी जादा, परंतु वाजवी आकार भरून विमा उतरविलेला आहे.

### लक्षात असू द्या की

विम्याच्या क्लेमची रक्कम त्वरित मिळण्याचा सोपा मार्ग म्हणजे पॉलिसी घ्यावयांच्या वेळेला आपली संपूर्ण माहिती सादर करणे हा होय.

योगक्षेमं वहाम्यहम्


लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया

३० वर्षा पासून जनतेच्या सेवेत

LIC/CO/1-87

छाया राजे

# पदभ्रमण, गिर्यारोहण... नवी, विधायक चळवळ



साहस, निसर्ग-प्रेम, पर्यटन, काहीतरी वेगळं करायची आवड, स्वावलंबन, सांघिकवृत्ती या सगळ्यांचा सुंदर मिलाप या पदभ्रमणाच्या छंदात सामावलेला आहे. त्यामुळंच एरवी तोडायला कठीण असणाऱ्या धर्म, जातपात, लिंग, वय, भाषा असल्या भेदांना या भ्रमण मंडळीत थारा नाही.

□

'आता या शनिवार–रविवारचा काय बेत ?' या प्रश्नाला तशी किती तरी वेगवेगळ्या प्रकारची उत्तरं येऊ शकतील ! पण हल्ली जाता–येता दिसणाऱ्या मुलांच्या घोळक्यात कुणी हा प्रश्न टाकला की उत्तरादाखल दुसरा प्रश्नच समोर येतो–

'ऐ, आपण राजमाचीला जाऊ या का ?'

'नको. आता एखाद्या नवीनच ठिकाणी जाऊ !'–आणि अशाच चर्चेत पटकन ठिकाण ठरतं ! 'याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्याशिवाय अशा थाटात हाइकचं पक्कं होतं ! विंचवाच्या बिऱ्हाडाप्रमाणं यांची सॅक पाठीवर सतत तयारच असते ! अडकवली की चालले पदभ्रमणाला !'

शनिवारी रात्री शेवटच्या पॅसेंजरचा प्लॅटफॉर्म ! पाठीवर सॅक अडकवून इकडे–तिकडे आपआपल्या घोळक्यांना शोधणाऱ्या ट्रेकर्सनी कसा गजबजून गेलेला दिसतो. ज्याच्या–त्याच्या खुणेची ठिकाणं ठरलेली असतात. त्याप्रमाणे वेळेवर सगळे जमतात. एकमेकांच्या हाइकची चौकशी होते. मंझिल वेगवेगळी असली तरी मुख्य हेतू एकच असतो ! कधी–कधी तर ग्रूपमधली मुलं एकमेकांना ओळखतही नसतात. केवळ पाठीवर सॅक दिसली की 'हाइकरच आहे. आपल्यातलाच आहे का विचारू' अशा पद्धतीने ग्रूप जमतो ! कधी अर्धवट माहितीच्या आधारे भलत्याच गाडीला येऊन आपल्या ग्रूपला शोधणारा चुकलेला वाटसरू मग नव्याच अनोळखी ग्रूपमध्ये सामील होतो आणि आपली सुट्टी सार्थकी लावतो.

एकूण हायकर्सचा हा संप्रदाय आता खूपच फैलावू लागलाय ! कारण कोणत्याही क्षेत्रातल्या नवख्यांना सामावून न घेण्याचा त्रिकालाबाधित ताठरपणा त्यांच्यात नाही. नव्यानं वाढीस लागणाऱ्या कोणत्याही गोष्टीला असणारा विरोधकांचा ससेमिरा त्यांच्यामागे नाही; की 'जा रे मुलांनो ' आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असं सांगणारे समर्थकही नाहीत ! आहेत ते केवळ अनुयायी ! म्हणूनच याचा झपाट्याने फैलाव होतोय !...

गेल्या चार–पाच वर्षांत अतिशय लोकप्रिय होत चाललेला हा प्रकार आज नक्कीच सर्वांच्या कुतूहलाचा विषय बनलाय. खरंच, का जात असतील हे लोक वेडयासारखे

दऱ्या–खोऱ्यात हिंडायला? काय मिळत याना चाल–चाल चालून आणि स्वत.चीच दमणूक करून घेऊन? हात–पाय मोडून घ्यायची कसली ही हौस? कशाला जिवा-वरचे खेळ खेळतात ही मुल? –असे अनेक प्रश्न *या पदभ्रमणाच्या वाढत्या प्रवृत्तीबरो*-बरच वाढणाऱ्या कुतूहलापोटी मनात येतात! आणि एखाद्या हाइकरला त्यातला एखादा प्रश्न जरी विचारला तरी 'हाय कम्बख्त तूने पी ही नही!' अशा आवेशात उत्तर मिळतं, 'अहो, ने हाइकला आल्याशिवाय नाही कळायच तुम्हाला!'

हाइकमध्ये एका बाबतीत मात्र सगळ्या-चच हाइकला जाणाऱ्याचं आणि क्वचित प्रसगी एकदा जाऊन पुन्हा न जाऊ इच्छि-णाऱ्याचं एकमत असत! ते म्हणजे हाइक-मधून मिळणाऱ्या आनदाबाबत! हाइकची गोडी एकदा लागली की लागली। त्यामुळ एकदा आलेला नवखा हा त्यात बुडूनच जातो. एखादाच असा मिळेल की एकदा हाइकला जाऊन 'आम्हाला नाही बुवा जमायच हाइक–बिइकला जाण,' अस म्हण-णारा! अर्थात याला कष्टाची सवय नसण, साघिक वृत्तीचा अभाव, स्वत ची काम स्वत: करण्याची सवय नसण किंवा शरीर-प्रकृतीला न झेपण अशी अनेक कारण असतात. पण हाइकमधून मिळणाऱ्या अवर्णनीय आनंदा-बाबत मात्र त्याच दुमत नसतं हाइकमधून *बाजूला होणाराही हे आनदान कबूल करतो* की हाइकवरच खडतर कष्टाचं जीवन जरी आपल्याला पेलणारं नसल तरी त्यातून मिळणारा आनंद अवर्णनीय आहे एकदा एखादा किल्ला चढताना जे काय हाल होतील तेच। पण एकदा का वरती पोहो-चल की मिळणारा आनंदही तिथून दिस-णाऱ्या मोकळ्या आकाशात न मावणारा असतो. तिथला मुक्त निसर्ग, थड वारा सगळे कष्ट विसरायला लावतो.

'हाइकला जाऊन मिळत तरी काय?' अस विचारणाऱ्याना हे एक उत्तर– 'अवर्ण-नीय आनद मिळतो!' अर्थात विचारणाऱ्याना हे असल आध्यात्मिक प्रकारात मोडणारं मोघम उत्तर अपेक्षित नसत। त्याचा रोख भौतिक पातळीवरच असतो. 'चार पैसे मिळत असतील तर करावी इतकी धडपड' अशा सुराचा। पण दऱ्या–खोऱ्यात भटक-णाऱ्या हाइकर्सना मात्र त्याच्या या मुलखा-वेगळ्या छदातून पैसा सोडून आणि पैशातून विकत न मिळणार सगळ काही गवसत असत. म्हणूनच तरुण–तरुणी, शिकणारे–नोकरी करणारे, विवाहित–अविवाहित आणि चक्क ६–७ *वर्षांच्या मुलापासून* ते ७०–७५ च्या वृद्धापर्यंत सगळेच या छंदाकडे आकर्षित होताहेत। इतक्या सख्येनं की जणू पर्यटनाला एक समातर व्यवस्थाच निर्माण होऊ पाहत आहे.

साहस, निसर्ग–प्रेम, पर्यटन, काही तरी वेगळं करायची आवड, स्वावलबन, साघिक-वृत्ती या सगळ्याचा सुदर मिलाफ या पद-भ्रमणाच्या छंदात सामावलेला आहे. त्यामुळंच एरवी तोडायला कठीण असणाऱ्या धर्म, जात पात, लिंग, वय, भाषा असल्या भेदाना या भ्रमण मडळीत थारा नाही. म्हणूनच पद-भ्रमणाचा छद हा केवळ छद न राहता ती एक चळवळ होऊ लागली आहे यात स्वत ला झोकून देणारे साहस–प्रेमी लोक आपल्या या वृत्तीच स्वातत्र्यलढ्यात स्वत ला झोकून देणाऱ्या देश–प्रेमीशी नात सागत आहेत. स्वातत्र्य–सग्रामातील लोकानी ज्याप्रमाण घरा–दाराची राखरागोळी करून, बरचस गमावून मोलाच स्वातत्र्य मिळवल तस हे हाइकर्स निर्भेळ आनदाचा अमोल ठेवा मिळवताहेत, जो आजच्या स्पर्धेच्या युगात अभावानच मिळतो! म्हणूनच घरच्या *मामुली विरोधाला कस–बस तोड देऊन वेळ* प्रसगी विरोध डावलूनही हे आपला छद जोपासताहेत, वाढवताहेत. बऱ्याच जणाना घरून तोडावर नाव ठेवण पण पाठीमागून आपल्या छदाचं कौतुक असा लटका विरोधही अनुभवायला मिळतो. त्यामुळं या छदाची धोड–दौड चौफेर सुरूच आहे.

महाराष्ट्रात आणि विशेषत: मुवई-पुण्यात आज याचं प्रमाण खूपच वाढलेलं दिसतय! याच कारण एक तर शहरी वातावरणाचा उबग, त्यामुळ निसर्गाची अधिक ओढ आणि दुसर म्हणजे सह्याद्रीची जवळीक. सह्याद्रीच्या रागा म्हणजे पदभ्रमण करणाऱ्याना त्याचा छंद जोपासण्यासाठी वरदानच! शिवाय त्याला शिवकालीन किल्ल्याचा ऐतिहासिक आधार। कोणी निसर्ग-प्रेमी म्हणून, कोणी इतिहास-प्रेमी म्हणून तर कोणी जुन्या वास्तूचा अभ्यासक म्हणून इकडे आकर्षित होताहेत.

पदभ्रमण, गिरि–भ्रमणाच्या या वाढत्या लोकप्रियतेमुळ त्याची गरज म्हणून वेग-वेगळ्या सस्थाचाही उदय व्हायला लागलाय आपल्या या छदाला नीट आकार देता यावा, एक शिस्तबद्धता यावी म्हणून हा वर्ग संघ-*टित होऊन आपआपल्या सस्था–भ्रमणमडळ*, गट तयार करू लागलाय. मुबईतच अशा जवळजवळ ३०–४० लहान–मोठ्या सस्था आहेत, ज्या केवळ पदभ्रमण, गिर्यारोहण या सारख्या कार्यक्रमाच आयोजन करण्यासाठीच निर्माण झाल्या आहेत. शिवाय शाळा–कॉले-जातून तयार होणारे गट वेगळेच!

पदभ्रमणाचा छद फैलावण्याचे काम कर-ण्यात *यूथ* हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडियाचा फार मोठा वाटा आहे त्याच्यातर्फे हिमालयातील पदभ्रमणाचे कार्यक्रम आखले जाऊ लागलेत.

'*यूथ* हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इडिया' ही जर्मनीच्या आतरराष्ट्रीय सघटनेशी सलग्न आहे. युवकाच्या सर्व प्रकारच्या उपक्रमाना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने भारतात १९२७ साली अस्तित्वात आली. त्याचे इथले मुख्य कार्यालय दिल्लीत आहे. स्टेट कौन्सिलच्या नियत्रणाखाली प्रत्येक राज्यात त्याच्या शाखा आहेत स्टेट कौन्सिलच्या परवानगीने जिल्हा पातळीवरही ठिकठिकाणी यूथ हॉस्टेल्सची युनिट्स उघडली जातात.

दिल्लीच्या मुख्य कार्यालयातर्फे मुख्यत्वे *हिमालयातील पदभ्रमणाचे कार्यक्रम* आखले जातात. त्याला मिळणाऱ्या प्रचड प्रतिसादा-मुळे ३–४ वर्षांपूर्वीपासून पदभ्रमणात भाग घेऊ इच्छिणाऱ्याना दिल्ली कार्यालय त्याच्या स्थानिक युनिटच्या माध्यमातून प्रवेश देते. हिमालयातील पदभ्रमण कार्यक्रमासाठी इंडियन माउटेनिअरिंग फौंडेशनच्या मान्यतेवर बँका, सरकारी कार्यालये याना विशेष सुट्टी-चीही सवलत आहे. तसेच पदभ्रमण कार्य-क्रमात भाग घेणाऱ्याना प्रवासासाठी २५% रेल्वे कन्सेशनही मिळते.

वेगवेगळ्या प्रातामधून येणाऱ्या वेग-वेगळ्या भाषा, धर्म, जाती, रीति-रिवाजाच्या तरुण वर्गाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता साधण हा या प्रयत्नाचा मुख्य हेतू; तसंच युवकामध्ये साहसी वृत्ती बाणावी आणि कमीत–कमी उपलब्ध साधन–सामग्रीमध्ये जास्तीत जास्त आनद मिळवण्याची वृत्ती

जोपासली जावी हा या मागचा दुसरा हेतू ! पाठीवरच्या सॅकमध्ये कपड्यांचा केवळ एक जोड, टॉर्च, वॉटर बॅग, डवा, जरूरीपुरती औषधं. पायात हटर शूज आणि डोक्यावर उन्हापासून सरक्षणासाठी टोपी–इतकं जुजबी सामान घेऊन १०–१५ दिवसाची कष्टाची वाटचाल वेगवेगळ्या भाषा, प्रांताच्या नवीन सोबत्यासह करायची, निसर्ग न्याहाळायचा आणि खेड्यात वसलेला भारत डोळसपणे पाहायचा ! अशी ही सुवर्ण–संधी यूथ हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया वर्षातून दोन वेळा देते. सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये एकदा आणि मे जूनमध्ये एकदा ! ४५०–५०० रुपयाच्या फीमध्ये पदभ्रमणासाठी रिपोर्ट केल्यापासून ते पदभ्रमण पूर्ण करून निघेपर्यंतचा जेवणा-खाण्याचा खर्च आणि साधनाचा सर्व खर्च समाविष्ट असतो ! इतक्या कमी खर्चात हिमालयात भटकती करण्याची संधी मिळणे म्हणजे ट्रेकर्सना पर्वणीच वाटते

स्थानिक कार्यालये, युनिट आप-आपल्या प्रदेशात पदभ्रमणाचे कार्यक्रम आखतात. १९७९ पासून यूथ हॉस्टेलचं मुंबई युनिट सुरू झाल. हाइक, स्लाइड शो, प्रस्तरोत्ताल-नाची ( रॅपलिंग ) प्रात्यक्षिक, सायकलिंग असे त्याचे अनेकविध कार्यक्रम असतात. त्यांच्या पदभ्रमणाच्या सर्वच कार्यक्रमाना भरपूर प्रतिसाद मिळतो. पावसाळ्यात चिंचोटी वॉटरफॉलचा कार्यक्रम खास लोक-प्रिय आहे. त्यामुळे दरवर्षी पावसाच्या मोस-मात त्याच आयोजन ठरलेल !

या भटकण्याचा नादानं वेडावलेल्या तरु-णानी आपल्या सस्था स्थापन केल्या आहेत. या संघटित युवा–शक्तीचा हा छंद केवळ छंदापुरताच मर्यादित न राहता त्यांच्या डोळस भटकंतीतून सामाजिक जाणही निर्माण होऊ लागलीय. गिरि–विहार, नेचर लव्हर्स, दुर्ग–मित्र, एक्स्प्लोरर्स अँड अॅडव्हेंचरर्स, केव्ह एक्स्प्लोरर्स, यंग झिंगारो, जिप्सी हायकर्स, भन्नाट ट्रेकर्स, हॉलिडे हायकर्स, लेडिज माउंटेनियरिंग अँड ट्रेकिंग क्लब, क्रॅकजॅक, क्षितिज, होरायझन, शिखर, दि हिमालयन क्लब यांसारखे नवे–जुने किती तरी गट आज या उद्देशाने वाटचाल करीत आहेत. त्यांची नावंच त्यांचे वेगवेगळे उद्देश, ध्येय, आनंदी वृत्ती स्पष्ट करत आहेत.

अशाचीच 'गिरि–विहार' ही एक अतिशय जुनी साहस–प्रेमी सस्था आहे, जी १९५४ मध्ये 'इन्टर कॉलेजिएट हाइकर्स क्लब' या नावे अस्तित्वात होती. पुढे १९६६ साली हाच क्लब 'गिरि विहार' या नावाने रजिस्टर झाला. त्यांची सभासद संख्या २०० च्या वर आहे. आत्तापर्यंत त्यानी १५ मोहिमा आणि ९ पदभ्रमण कार्यक्रम आयोजित केलेत. हनुमान, नंदाखात, चौधरा, राजरंभा, नदादेवी, फ्रेंडशिप, जोगिन–१, जोगिन–३ कुलू–हिमालयातील चार शिखर, ब्लॅक पीक, स्वर्गरोहिणी–३, स्वर्गरोहिणी–२ आणि कामेट अशी शिखरं त्यानी सर केलीत. २०६९७ फूट उंचीचे स्वर्गरोहिणी–३ हे अजिंक्य शिखर त्यांनी १९८५ मध्ये सर्वांत प्रथम सर केले, तर स्वर्गरोहिणी–२ सर करणारे तेच पहिले भारतीय आहेत. १९६७ साली त्यांनी केलेली हनुमान ही मोहीम खाजगी क्लबतर्फे यशस्वी होणारी पहिलीच मोहीम होती. दर वर्षी ते प्राथमिक प्रस्तरा-रोहणाची प्रशिक्षण शिबिर भरवतात. गेली २०–२२ वर्षे सातत्यानं शिबिराचं आयोजन केल जातय ! त्यातूनच नव्या गिर्यारोहकाचा जन्म होतोय ! त्यांच्यातर्फे हल्ली लहान मुलासाठी निसर्ग-परिचय शिबिरंही आयोजित केली जाताहेत.

## निसर्गाशी जिवंत नाते

निसर्गाशी बांधिलकी मानणारा 'नेचर–लव्हर्स' गट १९७६ साली मुंबईत स्थापन झाला. १९८१ मध्ये तो रजिस्टर करण्यात आला आणि गेल्या १०–११ वर्षांत त्यांची सभासद सख्या ४०० वर पोहोचलीय ! यांनी 'नेचर-क्लब' हा सातवी ते नववीच्या शाळकरी मुलांकरिता नवीन गटही तयार केलाय ! १० शाळामध्ये 'नेचर क्लब'ची स्थापना केली गेलीय. या पूर्वीच अस्तित्वात असलेल्या सस्थाचं लक्ष हाइक्सवरच केंद्रित होतं. त्यामुळं निसर्ग संरक्षण आणि संवर्धन यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टीनं त्यांना आपला नवीन गट स्थापन करणं आवश्यक वाटलं ! पदभ्रमण मुख्य; पण ते करतानाच आजूबाजूचा निसर्ग सुस्थितीत राहावा याची खबरदारी घेणं हा दुसरा हेतू स्लाइड–शो, हिमालयातील पदभ्रमण, पक्षी निरीक्षण असे अनेक कार्यक्रम त्यांच्याकडून आखले जातात. हाइकर्सच निसर्गाच्या अधिक जवळ जातात त्यामुळ निसर्ग सरक्षण–संव-र्धनाचं काम तेच करू शकतील असा नेचर–लव्हर्सना विश्वास वाटतो. या दृष्टीने असे अनेक नवनवीन गट तयार व्हावेत, त्यांनी ठिकठिकाणी अशा कामाची सुरुवात करावी म्हणून नेचर लव्हर्स प्रयत्नशील आहेत नव्या गटाना सर्वतोपरी सहाय्य करायची त्यांची तयारी आहे नेचर लव्हर्सच निसर्गाशी इतकं तादात्म्य आहे की त्याच्या एका सभासदाच्या निधनानतर त्याला श्रद्धांजली म्हणून त्याच्या नावे झाड लावण्याचा अभिनव उपक्रम त्यानी केला. नेचर लव्हर्सतर्फे ताडोबाच्या जंगलाचा एक कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो. सह्याद्रीची भ्रमती तर सतत चालूच असते.

निसर्ग प्रेमाप्रमाणच शिवकालीन किल्ल्यांचं आकर्षण असणाऱ्या ट्रेकर्सचाही एक जुना गट आहे. १०–१२ वर्षांपूर्वी स्थापन झालाय ! 'सह्याद्री विहार मंडळ' हे त्याचं नाव ! किल्ले हा विषय घेऊन छाया–चित्रण करायचं आणि लोकांना किल्ल्यांची माहिती व्हावी या हेतूने ठिक-ठिकाणी त्या छायाचित्रांची प्रदर्शनं भरवा-यची हा उपक्रम ! फक्त वीसच जणांचं मंडळ आहे पण पचेचाळीस–पंचावन्न वर्षांचे सभासदसुद्धा किल्ल्यांची भटकंती आजही करतात. सर्वांत वयस्क व्यक्तीच पदभ्रमणाचं नेतृत्व करते, कारण तिला माहिती अधिक ! आज–काल दहा दिवसांत दहा गड बरेच ट्रेकर्स करतात पण सर्वांत प्रथम दहा दिव-सात दहा गड करणारी व्यक्ती या मंडळाची सभासद आहे. हे मंडळ रजिस्टर्ड नाही. निधी गोळा करायचा नसल्यानं त्याना तशी गरजही वाटली नाही. सभासदानाही सभा-सद शुल्क नाही. ज्याला भटकंतीची आवड असेल, ज्याचं किल्ल्यांवर प्रेम असेल त्या कुणीही यावं आणि यांच्यात सामील व्हावं! आजपर्यंत सावंतवाडी, आबवणं, विझर, वेल्हा येथे किल्ल्यांच्या छायाचित्रांची प्रदर्शनं यांनी भरवली आहेत. त्यांनी आपला भटक-तीचा छद थेट आपल्या घरापर्यंत भिडवला आहे. आपआपल्या कुटुबातील स्त्रियानाही हे मडळ रायगडसारख्या सोप्या–सोप्या ठिकाणी घेऊन जातं. ४–६ वर्षांची मुलही सहभागी होतात. पदभ्रमणाच्या माध्यमातून मुलाना पद्धतशीरपणे घडवता येणं शक्य आहे असं यांना वाटतं ! वेळेअभावी आज आई–वडील मुलांना शाळेच्या पाठ्यक्रमाव्यति-

रिक्त अन्य शिक्षण देऊ शकत नाहीत. निसर्ग त्यानी कवितेतच वाचलेला असतो किंवा घरी टी. व्ही. असल्यास त्याच्या छोट्या पडद्यावर पाहिलेला असतो. एकीकडे मुलाचा चौकसपणा वाढलाय् आणि दुसरीकडे त्याचं आयुष्य बदिस्त होत चाललय ! त्यामुळ निसर्गाची जवळीक आणि पदभ्रमणाची मोकळीकच त्याची कोडी फोडू शकेल ! हल्ली तरुणाच जीवनही दिशाहीन आणि निराशामय झालय ! किल्ल्याची भ्रमती त्याच्यात नवीन उमेद पैदा करू शकते. त्याच्यातला आशावाद जागवते आणि प्रसगावधानही देते. म्हणूनच सह्याद्री विहार मडळ शाळामध्येही प्रदर्शन भरवत आहे भटकतीची आवड रुजवण्यासाठी प्रयत्न करत आहे.

साहसाच्या आवडीमुळे पदभ्रमण, गिरिभ्रमण याकडे वळलेल्याची एक खूप जुनी सस्था आहे–'एक्स्प्लोरर्स अ‍ॅण्ड अ‍ॅडव्हेंचरर्स'. १९७१ साली स्थापन झालेली ही सस्था आज अनेक मोहिमा यशस्वीपणे पार पाडते आहे जवळ–जवळ ५०० लोक याचे सभासद आहेत. पर्वतारोहण आणि त्याच्याशी सबधित उपक्रमाना युवकामध्ये लोकप्रियता मिळावी म्हणून पद्धतशीर प्रशिक्षण, योग्य माहिती व सुविधा उपलब्ध करून देण हे याच उद्दिष्ट आहे युवकामध्ये नेतृत्वक्षमता व जबाबदारीची जाणीव निर्माण होण्याच्या दृष्टीन याना पदभ्रमण, गिर्यारोहण महत्त्वाचं वाटतं ! त्यादृष्टीने प्रस्तरारोहणाची शिबिर भरवली जातात.

'एक्स्प्लोरर्स अ‍ॅण्ड अ‍ॅडव्हेचरर्स' इतकीच जुनी फक्त स्त्रियाचीच एक सस्था आहे ! नाव–लेडिज माउटेनियरिंग अ‍ॅण्ड ट्रेकिंग क्लब. शभराच्या आसपास स्त्रिया याच्या सदस्य आहेत. पूर्वी सरकार मुला–मुलीच्या एकत्र ग्रूपला मोहीम करण्याची परवानगी देत नसे. त्यामुळे मुलीचा वेगळा क्लब स्थापन करण्याची गरज भासली. १९७५ साली हा क्लब रजिस्टर करण्यात आला. बऱ्याच मुलीना मुल–मुली एकत्र जात असतील तर हाइकला जायची परवानगी घरून मिळत नाही. तसेच काही स्त्रियाना सकोचही वाटत असतो अशाना हा क्लब म्हणजे एक चागली सधी आहे. यानी आत्तापर्यंत हिमालयातील अनेक पदभ्रमण कार्यक्रम आणि मोहिमा केल्या आहेत. हनुमान (गढवाल हिमाचल), देवतिब्बा, थारकोट (कुमाऊँ हिमाचल), भारते कुण्टे सप्तशृंगी, हरमुख अशा अनेक मोहिमा केवळ स्त्रियानी करण म्हणजे स्त्रिया शारीरिक दृष्ट्या कमकुवत नसल्याचा ठोस पुरावाच आहे.

## गुहा, भुयारांचा शोध

भुयार शोधून काढण्याच्या उद्देशानं भटकती करणाऱ्याची एक सस्था आहे 'केव्ह एक्स्प्लोरर्स' भुयार शोधण्याचं काम करणारी भारतातील ही एकमेव सस्था आहे.

सुरुवातीला छद म्हणून या साहसाला त्यांनी सुरुवात केली आणि नतर आपल्या सशोधनाचे रिपोर्टस व छायाचित्र पुरातत्व खात्याला पाठवायला सुरुवात केली. आत्तापर्यंत घारगड (नासिक), हिरण्यकेशीचा उगम (आवोली घाट), मागी–तुगीचे भुयार धोडप, माणेकगड, रेवदडा, शिवथर घळ, भामचद्राच्या डोगरातली नैसर्गिक गुहा, देवगिरीचा मौत का कुआ अशा दहा मोहिमा त्यानी यशस्वीरीत्या पार पाडल्यात ! १९८१ सालापासून त्यानी या दिशेन काम करायला सुरुवात केली आणि १९८४ साली 'केव्ह एक्स्प्लोरर्स' रजिस्टर्ड झाली यानी गिर्यारोहणाचेही अनेक कार्यक्रम केलेत. १९८४ सालापासून प्रत्येक वर्षी एक तरी मोहीम आखली जाते. मुली टॉप हे अजिक्य शिखर यानी सर केलय ! सैफी व भागीरथीच्या मोहिमाही यशस्वी केल्या आहेत. प्रस्तरारोहण, प्रस्तरोत्तालनाची प्रात्यक्षिक ते आयोजित करतात एकदा मुबई ते काठमाडू अशी २५०० कि. मी सायकल सफर त्यानी आयोजित केली होती 'केव्ह एक्स्प्लोरर्स' तर्फे वेळोवेळी प्रशिक्षण शिबिर आयोजित केली जातात आत्तापर्यंत झालेल्या ४ शिबिरात १० वर्षांपासून ६२ वर्षांपर्यंतच्या ३५० जणानी प्रस्तरोत्तालन केल ! प्रस्तरारोहणाचं पहिल शिबिर ५ ते १२ एप्रिलला भरवल जाणार आहे साहसाची आवड असणाऱ्या सर्वांनी जास्तीत जास्त सख्येन यात सहभागी व्हावं, त्याच शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन अधिक निर्भय व्हाव, यातूनच उद्याचे महान गिर्यारोहक जन्माला येतील आणि भटकण्याच्या छदातून अभ्यासूवृत्तीला योग्य दिशा मिळेल अस ते मानतात त्याच्या मते वनस्पतिशास्त्र, समाज जागृती इ चे खरे शिक्षण चार भिंतीतल्या बदिस्त शाळा देऊ शकत नाहीत. खुल्या निसर्गातच त्याचं भाडार सापडेल !

फक्त गिर्यारोहण व पदभ्रमण ध्येय असलेल्या 'हॉलीडे हायकर्स' सस्थेचेही १५० च्या आसपास सभासद आहेत सस्था १९६५ साली स्थापन झाली. तेव्हापासून आत्तापर्यंत त्यानी जवळजवळ ३५० हाइकस केल्या ! लिंगाणा, रायगडचा भवानी कडा व हिरकणी बुरूज, ७१० फूट उचीचा वाणचा सुळका, तेलबैला आणि माहुलीचे पाच सुळके हॉलीडे हायकर्सच्या सभासदानीच प्रथम सर केले केदारगगा व्हॅलीची मोहीम, श्वेतवर्ण ग्लेशियर्स मोहीम, व्हॅली ऑफ फ्लॉवर्स पदभ्रमण, कोटेश्वर मोहीम, एव्हरेस्ट बेस, अन्नपूर्णा बेस, झोंगारी हिमालय पदभ्रमण असे त्याचे अनेक उल्लेखनीय उपक्रम आहेत. हॅलेच्या धूमकेतूसाठी पालघर जवळील कोहोच या ठिकाणी याच्यातर्फे आकाशदर्शन शिबिरही भरवण्यात आल होत ! 'हॉलीडे हायकर्स' तर्फे गिर्यारोहकाना साधन खरेदी करण्यासाठी व प्रशिक्षण पाठ्यक्रमासाठी वर्षाला ५ शिष्यवृत्त्या दिल्या जातात. त्यासाठी त्यानी १५०००/– रु. निधी जमवून बँकेत ठेवला आहे.

चाकोरीबाहेर जाण्याच्या, जीवनातील मरगळ झटकण्यासाठी काही तरी वेगळ रोमाचक करण्याच्या इच्छेतून 'जिप्सी हायकर्स' ही सस्था १९७४ साली अस्तित्वात आली. याची सभासद सख्या २५ आहे यानी आत्तापर्यंत १०० च्यावर किल्ल्याची भ्रमती केली आहे ठिकठिकाणी स्लाइड शो केलेत. सह्याद्री विहार मडळाच्या किल्ल्याच्या छायाचित्राच्या प्रदर्शनाना जिप्सी हायकर्सनी खूप मदत केलीय. याची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे किल्ल्याचे फोटो, पदभ्रमण मार्गाचे नकाशे इ चे यानी सकलन केले आहे नव्या टेकर्सना त्याच्याकडून ही माहिती आणि मार्गदर्शन उपलब्ध होऊ शकते.

केवळ भ्रमतो हा हेतू असलल्या, प्रथम शहरी वातावरणापासून दूर जाण्याच्या उद्देशाने व नतर महाराष्ट्रातील किल्ल्याची माहिती करून घ्यावी या हेतूने तयार झालेल्या 'क्रकजॅक' गटाची स्थापना १४ जानेवारी १९८० ला झाली. सभासद ४०–५० आहेत. सगळेच नोकरी करणारे ! त्यामुळे शनिवार–रविवार किंवा एखाद्या



**रमाकांत नवरथ : २८ वर्षाचा हा अपंगही या चळवळीत मागे नाही......**
**छाया : अरुण सावंत**

सुट्टी दिवशी सह्याद्रीतला पदभ्रमणाचा कार्यक्रम ठरतो. लोहगड, विसापूर, तुंगी, तिकोना, सुधागड, सरसगड, तावली, पेब माथेरान, भिंगलवाडी, राजगड, रायगड, प्रतापगड, माहुली, भीमाशंकर शिवधर घळ, कावळ्या अशा अनेक किल्ल्यांची यांनी भ्रमंती केलीय ! प्रत्येक वर्षी सर्वसाधारणपणे एका आठवड्याचा एक पदभ्रमण कार्यक्रम आयोजित केला जातो. १९८४ साली कोकण पदभ्रमणाचा मोठा कार्यक्रम आखण्यात आला. यात १७ दिवसांत सागरतीरावरील व सागरात असलेल्या सर्व किल्ल्यांची भ्रमंती केली गेली.

नवीन वर्षाची सुरुवात नव्या पद्धतीनं करायची या जिद्दीनं ३१ डिसेंबर १९८२ ला 'यंग झिंगारो ट्रेकर्स' संस्था उदयाला आली आणि त्यांच्या उपक्रमाला इतका प्रतिसाद मिळत गेला की आज त्यांची सभासद संख्या ८०० च्या दारात पोहोचलीय ! यांच्यातर्फे प्रत्येक २६ जानेवारीला प्रस्तरारोहणाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. तसंच जो आनंद आपण लुटतो तोच आनंद निसर्गानं ज्यांना जग पाहण्याच्या आनंदापासून वंचित ठेवलंय अशांनाही उपभोगता यावा म्हणून प्रत्येक १५ ऑगस्टला अंधांसाठी हाइक आयोजित केली जाणं हे या क्लबचं मुख्य वैशिष्टच आहे. अंधांना पदभ्रमणासाठी नेणारा हा एकमेव क्लब आहे. आत्तापर्यंत १३९ अंधांनी यांच्या पदभ्रमण कार्यक्रमात भाग घेतलाय, तोही कळसूबाई, लोहगड, विसापूर, रायगड, पेठ, कोथळीगड अशा किल्ल्यांच्या ! 'यंग झिंगारो' मे महिन्यात हिमालयात मोहीमही आखतात.

लोकांमध्ये गिरिभ्रमणाची आवड निर्माण करणं आणि गिरिभ्रमणाच्या कार्यक्रमातून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे पुस्तिका तयार करणं या हेतूने मुलुंड ठाण्याच्या हायकर्सनी १९८२ मध्ये 'चक्रम हायकर्स' ही संस्था स्थापन केली. यांची सभासद संख्या नव्वदाच्या आसपास आहे. आत्तापर्यंत यांनी आकाशदर्शनाचे वर्ग, पदभ्रमणाच्या छायाचित्रणाची स्पर्धा, वृक्षारोपण इत्यादी उपक्रम केले. महिन्यातून २–३ वेळा सह्याद्रीत भटकंती, तीन महिन्यांत एकदा मोठे पदभ्रमण, दर दोन वर्षांनी सह्यांकन मोहीम हे ठरलेले कार्यक्रम ! प्रस्तरारोहणाचे कार्यक्रमही अधून मधून होत असतात.

१९८३ च्या होळी पौर्णिमेला 'भन्नाट'ची स्थापना झाली. त्याचे सभासद ४१ आहेत. इतिहासाची आवड, ग्रामीण जीवनाचा अभ्यास करण्याची इच्छा आणि निसर्ग–प्रेम यामुळं त्यांनी पदभ्रमणाचा आपला गट स्थापन केलाय ! आत्तापर्यंत त्यांनी वासोटा पदभ्रमण कार्यक्रम, पन्हाळा ते विशालगड असे कार्यक्रम आखलेत ! त्यांच्यातर्फे या संबंधीचे स्लाइड शो, तसंच सायकल–सफरी सुद्धा आयोजित केल्या जातात.

'क्षितिज' संस्था ५ जुलै १९८५ ला अस्तित्वात आली. आधीच अस्तित्वात असलेल्या संस्थांमधून एकदम नवीन लोकांना हिमालयातील पदभ्रमणाची संधी मिळण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे हिमालयातील पदभ्रमणासाठी मुद्दाम संस्था स्थापन करण्यात आली. पदभ्रमणाला इंडियन माउंटेनियरिंग फौंडेशनची मान्यता मिळवण्यासाठी ती रजिस्टरही करण्यात आली. आत्तापर्यंत हिमालयात हमता पास पदभ्रमण कार्यक्रम आणि ठाणे–नेपाळ ही मोटरसायकलची सफर आयोजित केलीय. वर्षातून एक हिमालयातील मोहीम करायचीच असं त्यांनी ठरवलंय !

पदभ्रमण संस्थांमध्ये 'वे फेअरर्स इंडिया'

नावाची एक वैशिष्टचपूर्ण संस्था पदभ्रमणाद्वारे अभ्यासाचं ध्येय ठेवून काम करत आहे. पदभ्रमण करताना मार्गातील नागरिकांचं जीवन पहाणं, अनुभवणं आणि त्यावर अध्ययन करणं, तिथल्या उणिवांची नोंद ठेवणं, मातीचे नमुने गोळा करणं, ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करणं, वन्य पशु–पक्षी निरीक्षण आणि निसर्गाचं छायाचित्रण हे त्यांचे उद्देश आहेत. त्यांनी ४ टप्प्यांमध्ये कन्याकुमारी ते खंबात हा अभ्यासदौरा पूर्ण केलाय. भारताच्या सागरी किनाऱ्याचा अभ्यास दौरा हा यांचा वैशिष्टचपूर्ण उपक्रम म्हणावा लागेल.

गडांबद्दल, किल्ल्यांबद्दल प्रेम व अभिमान असणाऱ्या मित्रांनी वैयक्तिक पातळीवर संघटित होऊन गड–कोटांवरची मंदिरं, मूर्ती, जलाशयं, ऐतिहासिक अवशेष स्वच्छ ठेवणं, त्यांची देखभाल करणं, ते नीटनेटके राखणं या उद्देशानं 'दुर्ग–मित्र' नावाची संस्था १९८४ मध्ये स्थापन केलीय! दुर्गांवरील तट–बुरूज, दरवाजे–गुहा वगैरेची स्वच्छता राखणं, दुर्गाच्या परिसरात झाडं लावणं, मार्गदर्शक खुणा रंगवणं, दुर्गप्रेमी व्यक्तींना दुर्गाचा इतिहास – तिथे जाण्याचे सोयीचे मार्ग इ. बाबत माहिती उपलब्ध करून देणं, दुर्ग परिसरातील स्थानिक रहिवाशांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणं हे यांच्या कामाचं स्वरूप आहे. यामध्ये यंग झिंगारो, गिरी विहार, राजमाची ग्राम सहाय्य योजना जिप्सी हायकर्स, ॠकजॅक, गिरिस्नेह अशा संस्थांचे प्रतिनिधी सभासद एकत्र आले आहेत. 'दुर्ग–मित्र' ची सभासद संख्या १७५ आहे. नगर, पुणे, कोल्हापूर, नासिक येथेही दुर्गमित्र आहेत. आत्तापर्यंत माहुली, पेठ व तिकोना या ठिकाणचे कार्यक्रम हाती घेण्यात आलेत!

'द हिमालयन क्लब' नावाच्या आंतरराष्ट्रीय क्लबचेही मुंबईत कार्यालय आहे. या क्लबतर्फे हिमालय, काराकोरम, हिंदु कुशमध्ये पर्वतारोहणाच्या मोहिमा आखल्या जातात. १९२८ मध्ये या आंतरराष्ट्रीय क्लबची स्थापना झाली. विज्ञान, साहित्य व उपयुक्त ज्ञानाच्या विकासासाठी विशेषत: हिमालयातील पदभ्रमण मोहिमांना प्रोत्साहन देणं हे त्यांचं ध्येय ? याची 'न्यूज लेटर' नावाची पुस्तिका निघते. गिर्यारोहणासाठी



शरावती प्रभू : नागफणीच्या कड्यावरून उतरताना......
छाया : अरुण सावंत

भाड्याने साधनं देणं, नकाशे व इतर माहितीची मदत देणं, पर्वतारोहण प्रायोजित करणं आणि त्यासाठी शिष्यवृत्त्या देणं असे त्यांचे अनेक उपक्रम आहेत.

अशा आंतरराष्ट्रीय, त्यांच्याशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय व खाजगी संस्थांव्यतिरिक्त पदभ्रमण–गिर्यारोहणाचे 'आय. आय. टी. सारख्या संस्थांमधूनही गट आहेत. बँकांमधून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनीही आपआपले गट केलेत. इतकंच नव्हे तर निवासी सोसायटचांमधूनही छोटे छोटे गट होताहेत! ४–६ वर्षांच्या मुलांपासून ७४ वर्षांच्या वृद्धांपर्यंत सगळेच यात सामील होताहेत. त्यामुळं हा फक्त तरुणांचाच उपक्रम राहिलेला नाही. अंध आणि अपंगही यात सहभागी होताहेत. 'केव्ह एक्स्प्लोरर्सच्या प्रस्तरोत्तालनाच्या शिबिरात श्री. नवरथ या एल पाय नसलेल्या तरुणाने प्रस्तरोत्तालन केलंय! पदभ्रमणासाठी 'एका पायावर तयार' असणाऱ्या व्यक्तीचं हे शब्दश: उदाहरण आहे.

पदभ्रमणाचं आणि गिर्यारोहणाचं प्रमाण वाढल्यापासून अपघाताचंही प्रमाण वाढलंय अशी ओरड होऊ लागलीय! पण अपघात हे केवळ अपघातानेच होतात. कधी कधी फाजील आत्मविश्वास अपघाताला निमंत्रण

देतो. एक मात्र खर–गिर्यारोहकानी, पदभ्रमण करणाऱ्यानी हे विसरता कामा नये की हा छद ते आनद मिळवण्यासाठी करत आहेत. अमक्याने अमुक सुळका १७ मिनिटात सर केला म्हणून आम्ही तो १३ मिनिटांत करू अशी जीवघेणी स्पर्धा किंवा अमुक गटाने रायगड प्रदक्षिणा अमुक तासात केली म्हणून आम्ही ती त्याहून कमी वेळेत करून दाखवू अशी चढाओढ यात असू नये. सुळका सर करण्यातला आनद ज्या क्षणी तो सुळका सर होईल त्या क्षणात सामावलेला आहे. घड्याळाच्या काट्यावर नाही ! बहुधा मोहिमाच्या वेळी सबधित सस्था योग्य ती खबरदारी घेतातच ! अतिरेकी धोका पत्करला जात नाही. आवश्यक तिथे दोर व इतर साधनही वापरली जातात.

### अपघात टाळण्यासाठी...

मोठे अपघात म्हणजे 'गिरि विहार'च्या १९७० सालच्या नदाखात मोहिमेत श्री. रामदास प्रभू व श्री. डी. सी. अरोरा याचा मृत्यू व 'लेडीज माउटेनियरिंग अॅण्ड ट्रेकिंग क्लब'च्या सुशीला अयगार याचे १९८१ मध्ये दुगडच्या किल्ल्यावरून पडून निधन. हॉलीडे हायकर्सच्या सतोष गुजरलाही लिंगाणा उतरताना दोर तुटून अपघाती मरण आले. तो एकटाच लिंगाणा सर करायला गेला होता त्यापूर्वी हॉलीडे हायकर्सच्याच सभासदानी लिंगाणा प्रथम सर केला होता हॉलीडे हायकर्सच्याच अभय भावेचेही इर्षाळगडावरून पडून निधन झाले. तोही एकटाच ट्रेकला गेला होता. पदभ्रमण–गिर्यारोहण हा एक साधिक उपक्रम आहे त्यामुळ केवळ साहस म्हणून एकटंच जाण योग्य नाही. या अपघाताव्यतिरिक्त कोणत्याही पदभ्रमण–गिर्यारोहण सस्थेत फार मोठे अपघात घडलेले नाहीत. सयोजकाच कौशल्य व समयसूचकता, पुरेशी व योग्य साधनसामग्री, सभासदाकडून होणार नियमाच पालन, यामुळ अपघाताच प्रमाण कमी आहे. भारत सरकारनेही आता हिमालयातील पर्वतारोहण मोहिमासाठी भाग घेऊ इच्छिणाऱ्याना मान्यताप्राप्त माउटेनियरिंग सस्थाचा बेसिक कोर्स करण्याची अनिवार्य अट ठेवली आहे. यामुळही अपघातावर नियत्रण राहील.


अपघात होतात किंवा होऊ शकतात म्हणून नव्यान या क्षेत्रात उतरणाऱ्याच्या सख्येत घट होतेय अस मात्र नाही. उलट शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्याकडे कल वाढत आहे. साहसाची अधिक आवड निर्माण होतेय ! सह्याद्री विहार मडळाच्या एका सभासदाचा अनुभव, खूपच मजेशीर आहे. यामडळाचे एक सदस्य प्रबीत गडावर पदभ्रमणासाठी गेले असता पडले. त्यानतर त्याच्यावर डॉक्टरी उपचार सुरू होते. डॉक्टराची सक्त ताकीद की आता एक वर्ष कुठल्याही गडावर वगैरे जायच नाही काही दिवसानी त्याचा इलाज पूर्ण झाल्यावर डॉक्टरच त्याना म्हणाले, 'मला यायचय एकदा तुमच्याबरोबर प्रबीत गडावर !' आणि पेशटच यावर उत्साही उत्तर 'तेव्हा मी दाखवेन कुठे पडलो होतो ती जागा !'

केवळ अपघाताच्या भीतीनेच हा छद बाळगणाऱ्याना घरच्याचा विरोध होतोय ! नेचर लव्हर्सच्या महेन्द्र गमरेंच्या मते तर त्याचा क्लब हे त्याच एक कुटुबच झालय. त्यामुळ नातेवाईक दुरावत असले तरी त्यानाही आपल्या नवीन कुटुबात सामावून घेण्यासाठी एक स्नेहसमेलन आयोजित करून तेव्हा वृक्षारोपण केल जात ! त्यामुळं हळूहळू त्याचा विरोध मावळून त्याची जागा कौतुकानं घ्यायली जातेय ! 'यग झिंगारो' हाइकर्सनीही पालकासाठी अदमान–निकोबारची ट्रीप आयोजित केलीय. त्याच्या क्लबच्या ऋषिकेश यादवच्या मते पालकाना सहभागी करून घेता येण्यासारखे कार्यक्रम अधूनमधून केल्यान त्याचा विरोध मावळू शकेल सह्याद्री' विहार मडळाच्या अशोक खराडेनीही आपल्या घरच्याना आपल्या छदाची गोडी लावलीय चक्रम हायकर्सच्या कर्वेच्या मते अभ्यास, घरच्या जबाबदाऱ्या या सर्वांना योग्य अग्रक्रम देऊनच हा छद जोपासला जातोय त्यामुळ घरच्याचा विरोध नाही ! गिरी विहारच्या दिलीप लागूना वाटत सर्वांच्याच घरच्याच्या सर्वसाधारण प्रतिक्रिया या भीतियुक्त पार्टिबा अशाच स्वरूपाच्या असतात प्रत्येक आई–वडिलाना वाटत असत की आपल्या मुलानी वेगळं काही तरी करून दाखवाव; पण यातील धोका लक्षात घेता मनात एक अबोल भीती शिल्लक रहातेच ! 'वेव्ह एक्सप्लोरर्स'च्या अरुण सावतच्या ५८ वर्षाच्या आई तर आपल्या मुलाच्या मार्गदर्शनाखाली ड्यूक्स नोज–नागफणीचा ८०० फूट उचीचा कडा प्रस्तरोत्तालन (रॅपलिंग) करून उतरल्या ! आता विरोध कुणी कुणाला करायचा ?

चागल्या वृत्तीना विरोध खर तर कुणीच करू नये आणि विरोधान या वृत्ती थाबवताच येणार नाहीत, इतकी त्याची गती असते. पण हल्ली पदभ्रमणामध्ये सर्वांनी विरोध करावा, कुठे तरी रोकाव अशीही एक विरोधी वृत्ती मूळ धरू लागलीय ! दारू पिण्यासाठी, सॅकमध्ये बाटल्या टाकून केवळ पिण्यासाठीच हाइकला जाण हे त्याच ध्येय! हाइकला जायच ते केवळ 'आम्हीही हे करू शकतो' हे दाखवण्यासाठी ! त्यामुळ चिंचोटी धबधब्याच्या पाण्यात दारूच्या रिकाम्या बाटल्या फोडून टाकण्याचा करटेपणा ते बिनदिक्कत करतात आणि इतर लोकाना मात्र कित्येकदा आपले रक्तबबाळ करून घ्यावे लागतात. हाइक म्हणजे मुला–मुलीनी हातात हात घालून एकत्र हिंडण्या–फिरण्याची उत्तम सधी असाही त्याचा एक समज असावा ! त्याना गडावर पोहोचण्यात स्वारस्य नसत पायथ्याच्या किंवा माचीवरच्या एखाद्या देवळापर्यंत जाऊन तिथेच ते आपली पथारी टाकतात आणि पिण्याचा कार्यक्रम सुरू करतात. मुक्त निसर्ग त्याना धुद करू शकत नाही. म्हणूनच दारुच्या नशेची तिथेही त्याना गरज भासते. कधी कधी गडाखालच्या गावातल्या छोट्या हॉटेलात चहाच्या निमित्तान घुसून फुकटात सगळ्यानी चहा प्यायचा आणि जाता–जाता गोळ्या–बिस्किटाची बरणी उचलून पोबारा करायचा अस करणारेही ट्रेकर्स आहेत त्याना ट्रेकर्स म्हणण भाग आहे, पण त्याच्या या वृत्ती निसर्गप्रेमी, इतिहास प्रेमी, साहसप्रेमी ट्रेकर्सच्या नाहीत त्याच्यामुळ खऱ्या हायकर्सचं नुकसान होतय ! गावातल्या लोकाच सहकार्य कमी होत चालल्याचाही अनुभव येतोय ! काही ठिकाणी गावकऱ्याना रस्ता विचारल्यावर ते जिकडे बोट दाखवतात तो मार्ग चुकीचा असल्याच लक्षात येत आणि पुन्हा तिथून उतरून याव लागत ! एका ग्रुपच्या हायकर्सना आलेला हा अनुभव आहे पण त्या मागच कारणही विचार करायला लावणार आहे. अशाच एका हायकर्सच्या ग्रूपने गावातल्या एका मुलीची छेड काढली होती त्यामुळे चिडून ते मुद्दाम हायकर्सना चुकीचा रस्ता दाखवत. राजमाचीच्या मनोरजन

गडावर गड पहायला गेलेल्या कॉलेजच्या मुलांनीही एकदा गंमत म्हणून वरून किल्ल्याच्या भितीचा एक दगड खाली ढकलून दिला. गडाच्या खालच्या बाजूला टाक्यावर पाणी भरायला आलेल्या एका स्त्रीच्या पायावर तो दगड पडला आणि तिला ६ महिने उपचार करावे लागले. गडावरून दगड ढकलून दिल्यावर तो कसा खाली जातो हे पहाण्यात आनंद मानणाऱ्यांनी तोच दगड खालून तितक्या उंचीवर नेऊन ठेवण्याचं काम करून पहावं म्हणजे किल्ले बांधताना किती मेहनत घेतली गेलीय ते कळेल! खडूनं किंवा कोळशानं किल्ल्याच्या भितींवर आपली नावं लिहून ती अजरामर करू इच्छिणाऱ्यांनीही हे लक्षात ठेवावं की किल्ले बांधणाऱ्यांनी आपली नावं कुठेही लिहिलेली नाहीत.

दारु पिण्यासाठी हाइकला जाणारे पिकनिक आणि हाइक यांतला फरक ओळखतच नाहीत. नेचरलव्हर्सच्या महेन्द्र गमरेच्या मते हाइकर्स हे एकाच उद्देशानं एकाच ध्येयानं वाटचाल करणारे कॉमरेड्सच आहेत! अर्थातच पिकनिक आणि हाइक यात खूपच तफावत आहे. पिकनिकचा उद्देश केवळ मजा करणे असतो. सह्याद्री विहार मंडळाच्या अशोक खराडेंचा अनुभव खूपच बोलका आहे. ते आपल्या दहा वर्षांच्या भाच्याला घेऊन एकदा राजगडावर गेले होते. त्या मुलाला राजगड खूपच आवडला. तिथं त्याला मोकळ्या वाऱ्यात भटकायला मिळालं! बालेकिल्ला पाहून 'शिवाजी महाराज इथे रोज कसे चढले–उतरले असतील' असे प्रश्नही त्याला पडले. त्यानंतर काही दिवसांनी तोच मुलगा शाळेच्या ट्रीपला लोणावळ्याला गेला आणि आल्यावर त्यानं सांगितलं– 'मामा आपण राजगडावर गेलो होतो तशी मज्जा नाही आली!' या दहा वर्षांच्या मुलालाही 'पिकनिक' आणि हाइक मधला फरक कळला होता. हाइकमध्ये केवळ मजा करणं एवढंच अभिप्रेत नसतं! त्यातून निसर्ग अवलोकन, पक्षी निरीक्षण, वनस्पतिशास्त्राचं ज्ञान, खगोलशास्त्राचा अभ्यास समाज जागृती अशी किती तरी कामं होऊ शकतात. निसर्गाचं खुलं दालन जे जे शिकवू शकतं ते आपल्याला कोणत्याही महाविद्यालयात किंवा विद्यापीठात शिकायला मिळणार नाही! कारण फक्त डोळसपणे सगळ्या गोष्टी पहायला हव्यात. ज्यांना याची जाण आहे त्यांची या दिशेनं आगेकूच चालूच राहणार आहे.



सौ. प्रभावती पु. सावंत–अठ्ठावन्न वर्षांच्या आजी. नागफणीवरून उतरण्याच्या पवित्र्यात. शेजारी राजू शिंदे. छाया : अरुण सावंत

चक्रम हायकर्स गिरी–भ्रमण माहिती पुस्तिका व दृकश्राव्य माध्यमातून पदभ्रमण गिर्यारोहणाचा प्रचार करण्याच्या प्रयत्नात आहेत. यंग झिंगारो हायकर्सचे एक सदस्य सुनील राज एकट्टेच मोठ्या जिद्दीने गिरी–भ्रमणाला वाहिलेले 'जिद्द' त्रैमासिक चालवत आहेत 'क्रॅफ्रजॅक' छायाचित्रण, प्रस्तरारोहण, आकाशदर्शन इ बाबतीत तांत्रिक माहितीवर्ग सुरू करण्याच्या तयारीत आहेत. 'एक्स्प्लोरर्स अँड अॅडव्हेंचरर्स' वीस दिवसांच्या मनाली–लेह पदभ्रमणाच्या आयोजनात गुंतले आहेत. 'केव्ह एक्स्प्लोरर्स' हिमालयात निळगिरीची मोहीम आयोजित करत आहेत. 'क्षितिज' ही हिमालयात कोटेश्वराच्या मोहिमेवर जायची तयारी करतोय! हॉलीडे हायकर्स १९८७ मध्ये एकाच वेळी माना, कामेट आणि अबॅगामी ही तिन्ही शिखरं सर करण्याचा प्रयत्न करणार आहे. 'गिरी–विहार' भारतातील सर्वोच्च व जगातील तिसऱ्या क्रमांकाचं कांचनगंगा शिखर (उंची २८२०८ फूट) मार्च–जून ८८ मध्ये शेर्पांच्या मदतीशिवाय व शक्य झाल्यास ऑक्सिजन न वापरता सर करणार आहे. त्यात इतर पाच संस्थांचाही सहभाग राहील.

अशा या पदभ्रमण–गिरिभ्रमणाशी संबंधित असलेल्या जुन्या–नव्या, लहान–मोठ्या संस्था आणि त्यांची वेगवेगळी ध्येयं, उद्दिष्टं, आकांक्षा आणि स्वप्नं! एका संस्थेतला सभासद दुसऱ्याही एखाद्या संस्थेचा सभासद असतो किंवा आपल्या सोयीनुसार वेळप्रसंगी दुसऱ्या गटाबरोबर पदभ्रमणात सामील होऊ शकतो. यांच्यात दुहेरी सदस्यत्वाला आडकाठी नाही. बहुतेक सगळ्याच संस्थांमध्ये कार्याबाबतही सामंजस्य आढळतंय! एकाच प्रकारच्या कामासाठी सगळ्या संस्था आपली वेगळी अस्तित्वं विसरून एकत्रही येताहेत! याच वृत्तीतून मध्यंतरी 'माउंटेनिअरिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' स्थापन करून सर्व संस्थाना एकत्र आणण्याचा प्रयत्नही चालू होता. सर्व किल्ल्यांची, शिखरांची माहिती, छायाचित्रं, नकाशे, मार्गांची माहिती एकत्रित संग्रही ठेवण्याच्या दृष्टीनं अशा संस्थेचा उपयोग होऊ शकतो अपघात टाळण्याच्या दृष्टीने आर्थिक मदत इ. बाबतीत सरकारकडून काही सोयी–सवलती मिळवता येणंही शक्य आहे. इतर खेळावर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या मानानं या उपक्रमालाही सोयी–सवलती दिल्या गेल्या तर त्यातून उत्तम गिर्यारोहक, समर्थ नेतृत्व,

अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि जबाबदार नागरिक तयार होण्याची शक्यता आहे.

जगभर हिंसाचाराला ऊत आला असताना युवा–शक्ती विधायक कार्याकडे वळवण्याच्या दृष्टीन पदभ्रमण हा एक राजमार्गच मानावा लागेल. 'हिंसाचार नष्ट व्हावयाचा असेल तर माणूस निसर्गाच्या अधिक जवळ जायला हवा' हे एका मानवशास्त्राचे विचार गिर्यारोहकाच्या बाबतीत एकदम पटतात निसर्गाच्या जवळ जाणाऱ्या या लोकानी आपआपल्या सस्थामार्फत सुरू केलेल्या सामाजिक कार्यातूनही हेच सिद्ध होतं की हे सघटित गिर्यारोहक उची गाठण्याच्या नादात आपल्या मातीशी असलेल नात विसरलेले नाहीत.

'राजमाचीच्या पायथ्याशी असलेल्या उठेवाडी येथील विकासासाठी श्री. मुकुद गोघळेकर आणि सहकाऱ्यानी सुरू केलेली राजमाची ग्राम सहाय्य योजना' आपल्या मातीशी नात सागणाऱ्या भ्रमण–मडळीचाच उपक्रम आहे गेल्या दहा वर्षांत अविरत प्रयत्नानी त्यानी राजमाचीचा कायापालट केलाय! क्रॅकजॅकने वृक्षारोपण, अधश्रद्धा निर्मूलन या दृष्टीन काम सुरू केलय. नेचर लव्हर्स गेल्या तीन वर्षांपासून तादुळवाडी–सफळा येथे काम करत आहेत. तिथल्या लोकाना कपडे, पुस्तक, वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणं असं त्याच स्वरूप आहे क्षितिजचे बरेच सभासद 'जाणीव' या सामाजिक सस्थेत काम करतात. गिरिविहारने हल्ली – हल्ली लहान शाळकरी मुलाना नेतृत्व, साहस इ. चे शिक्षण मिळवून देण्यावर लक्ष केंद्रित केलय. 'लेडिज माऊंटेनियरिंग व ट्रेकिंग' क्लबनेही पनवेल नजिकच्या नेरे गावातील शातिवनात कुष्ठरोग पुनर्वसन कामात सहभाग घ्यायला सुरुवात केलीय वेगवेगळ्या सस्थाच्या सभासदानी निर्माण केलेली दुर्गमित्र सस्था तर सामाजिक उद्देशानच निर्माण झालीय.'

वेगळ्या वाटेन जाताना, पदभ्रमण करणाऱ्याना छोट्या–छोट्या गावातल्या लोकांच दिसणार जीवन अस्वस्थ करतय! पाणी, वीज तर सोडाच पण ज्याच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजासुद्धा पुऱ्या होत नाहीत अशाची गरिबी त्याना आव्हान देतेय! गडाखालच्या वाडीत थंडीमध्ये फाटक्या कपड्यात गोणपाटावर झोपणारी मुल, स्वेटर, विंडशीटर घालूनही कुडकुडणाऱ्या हायकरची झोप उडवत आहेत या जाग आलेल्यानी आता म्हणूनच आपला छंद छंदापुरता मर्यादित न ठेवता अशा प्रकारची कामं सुरू केली आहेत. गरिबाच जीवनमान उचावण्याचे त्याचे हे प्रयत्न जणू त्याना एखाद उच शिखर सर केल्याचा आनद मिळवून देणार आहेत!

□

---

**पत्ते**

**(१) गिरी–विहार**
C/o दिलीप लागू, ३८२, भागिरथी निवास, न चि. केळकर मार्ग, दादर, मुबई–२८.
फोन ४२२७७२६, ४२२९१५२

**(२) नेचर लव्हर्स**
३०, जकेरिया रोड, मालाड (पश्चिम), मुबई – ४०० ०६४.
फोन ६९५७६४

**(३) दि एक्स्प्लोरर्स ॲण्ड ॲडव्हेंचरर्स**
४२५ हिन्द राजस्थान बिल्डिंग, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व) मुबई–१४

**(४) लेडीज माउंटेनियरिंग ॲण्ड ट्रेकिंग क्लब**
१९. ह्यूजेस रोड, मुबई–४०० ००७
फोन ८२२८२६५

**(५) केव्ह एक्स्प्लोरर्स**
३६/७९३, आदर्श नगर, प्रभादेवी, मुबई–२५

**(६) दुर्ग मित्र**
विनय हिंगोणीकर, दातार चाळ, दातार कॉलनी, भाडुप (पूर्व) मुबई–७८

**(७) यंग झिंगारो ट्रेकर्स**
C/o विनय प्रेस, २६७ जगन्नाथ शकरशेट मार्ग (क्राती नगर समोर) गिरगाव, मुबई–४

**(८) चक्रम हायकर्स**
४, विमा छाया, म फुले मार्ग, मुलुड, मुबई–८१

**(९) सह्याद्री विहार मंडळ**
C/o अशोक खराडे, राष्ट्रीय कॅप मार्ट, डिसिल्वा रोड, दादर, मुबई

**(१०) भन्नाट ट्रेकर्स**
C/o स्मिता सोसायटी, बी–१३, शास्त्री नगर, देवी चौक, डोबिवली (पश्चिम)

**(११) जिप्सी हायकर्स**
C/o विनय हिंगोणीकर, दातार चाळ, दातार कॉलनी, भाडुप (पूर्व), मुबई–७८

**(१२) वे फेअरर्स इडिया**
C/o रवी माहीमकर/मिलिंद कारळे, कमलेश्वर निवास, श्रेयस कॉलनी, आरे रोड, गोरेगाव (पूर्व) मुबई–३३

**(१३) क्षितिज**
C/o श्री. सजय शिदे, ३, आशीर्वाद, दादा पाटील वाडी, नौपाडा, ठाणे

**(१४) हॉलीडे हायकर्स**
C/o प्रो. ए. आर चादेकर, पार्ले-श्वरासमोर, विष्णुप्रसाद सोसायटी, विलेपार्ले (पूर्व), मुबई

**(१५) क्रॅकजॅक**
C/o श्री. तुषार पारखी, १९ लवीना विष्णू नगर, नौपाडा, ठाणे-४००६०२

**(१६) हिमालयन क्लब**
C/o जे. सी नानावटी, सिंधिया हाऊस, बेलार्ड पीयर, पो बा नं, ९०५, मुबई फोन २६२४६१

**(१७) यूथ हॉस्टेल, मुंबई विभाग**
C/o वी जे. पी. सी इन्स्टिटयूट. ३३, कर्वे रोड, चर्नी रोड स्टेशन समोर, मुबई ४०० ००४
फोन – ३५३९२१

**(१८) यूथ हॉस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया**
५, न्याय मार्ग, चाणक्यपुरी, नवी दिल्ली ११० ०२१

**'जिद्द' त्रैमासिकाचा पत्ता**
सुनील राज
५२, परळगाव (भक्ती बिल्डिंग समोर), मुबई – ४०० ०१२,
फोन – ४१३६५८४

---



आता तुम्हीच सांगा काय उत्तर देवू ! ते म्हणतायेत, ह्या अठराव्या शतकातील इमारतीवर इसवीसनापूर्वीच्या आदिमानवाची लिपी कशी ?



साहेब सुसरीची झुंज उद्याही पाहता येईल.
आजचे ‘ बुनियाद ’ कशाला उगाच चुकवायचे ?

# मोबरा

अशोक काळे

लांस वेगासचा चकचकीत विमानतळ पखाजवळच्या खिडकीमधून दिसायला लागला वाजूना वाळवट आणि मध्ये कुऱ्याच्या छत्रीसारखी गोल इमारत पायलट म्हणाला, 'आपण आणखी दहा मिनिटात वेगासला उतरू हवा चागली आहे उष्णतामान सध्या बहात्तर अश वेलकम् टु द सिटी दॅट नेव्हर स्लीप्स, अँड हँग ऑन टु युवर वॉलेटस् ' तो माफक हसला आणि इटरकॉम बद झाला.

वेगासला येण्याची ही त्याची दुसरी खेप. त्या शहराबद्दल त्याला थोड कौतुकमिश्रित कुतूहल होत. माफियाच्या गॅंगस्टर मडळीच्या उद्योगप्रियतेमधून निर्माण झालेल्या ह्या गावात जुगार आणि वेश्याव्यवसाय सरकारमान्य आहेत ही गोष्ट त्याला गमतीची वाटायची आणि आणखी आश्चर्य म्हणजे शिकागो आणि डेट्रॉइटपेक्षा वेगासला खून–मारामाऱ्या कमी. कारण घावरून जर लोक तिथे आले नाहीत तर जुगार खेळणार कोण ?

सामानाच्या फिरत्या कॅरोसिलकडे जाताना तो जाहिराती बघत होता. गोल्डन नगेट, सीझर्स पॅलेस, रिव्हिएरा. जाहिरातीच्या पाटचाखाली लाल फोन तुम्ही पाच ते दहा हजारी सरदार असाल तर हा ताबडा फोन वापरून हॉटेलमधून मोठ्ठी लिमूझीन बोलावता येते. लिमूझीनमध्ये बार असतो आणि रगीत टेलिव्हिजनदेखील. हॉटेलच्या पस्तिसाव्या मजल्यावर तुमची राजस पेट हाउस स्वीट असते तिथे चादीच्या वादलीत बर्फाच्या चुऱ्यात खोचून ठेवलेली डॉन पेरीनो शॅंपेनची घामेजलेली आणि थडगार वाटलीही फक्त तुमचीच. मात्र तुम्ही जुगार खेळायला हवा त्या हॉटेलच्या कॅसिनोमध्ये. कमीत कमी बेट : पाच हजार डॉलर्स.

त्याने सुस्कारा सोडला. तो हाय रोलर नव्हता पण निदान सुरुवात करायला तरी हरकत नव्हती. लाउजमधल्या स्लॉटमशीनच्या ओठात क्वार्टर डॉलरच गोल नाण सरकवून त्याने हॅंडल मारल कसा कोण जाणे, पण त्याचा लग्गा लागला. यंत्राच्या तोडातून बदाबदा क्वार्टर्स पडायला लागले तीन सफरचदाखाली अक्षर उठली· 'जॅकपॉट ! जॅकपॉट !' तो खिसे भरीत होता पण तरीदेखील पाढऱ्या चकचकीत नाण्याची जमिनीवर रास जमली

'घे हे मशीनमध्ये टाक माझ्यासाठी हाताला यश आहे तुझ्या.' विमानातून त्याच्याबरोबर उतरलेल्या स्थूल, गुलाबी म्हातारीने त्याच्या हातात दोन क्वार्टर्स दिले

'ओक्के ' त्याने क्वार्टर्स टाकून हॅंडल खेचलं. पण यश हरवल असावं कुठे तरी कारण काहीच झाल नाही. दोन सत्री आणि एक लिंबू चित्राखाली अक्षर उठली.


'परत लाव पैसे ट्राय अगेन. एवढचातच सोडून चाललास ?'

'सॉरी ' त्याला उगाचच वाईट वाटल. 'हे घे तुझे दोन क्वार्टर्स.'

म्हातारी पैसे न घेता मान हलवून म्हणाली, 'जाऊ दे. तू तरी काय करणार ! माझं नशीब...' मग ती शेजारच्या मशीनकडे वळली पर्समध्ये क्वार्टर्स चाचपत.

कॅरोसिलवर त्याची निळी सॅम्सोनाइट बॅग हळूहळू गरगरत होती. त्याने बॅग उचलली. बॅगेवर चिठ्ठी होती 'व्हिक घोत्रे. व्हाइस प्रेसिडेंट, एम. सी. आय.– शिकागो '

बॅगकडे पहाताना त्याला बर वाटल. बॅग कशी मातब्बर आणि भारदस्त होती. महाग पण दिखाऊ नाही. कुठल्याही तोलामोलाच्या



माणसाला शोभेल अशी बॅग. वीस–बावीस वर्षांपूर्वी तो भारतातून आला तेव्हा त्याच्याकडे वडिलांची जुनाट, चामड्याची बॅग होती. तिचं कुलूप लागायचं नाही. अमेरिकेत उतरल्यावर बॅग उचलली तर हँडलच हातात आलं.

व्हिकचं खरं नाव विकास होतं. सुरुवातीला तो आपलं नाव अगदी सरळ बाळबोध इंग्रजीत 'विकास धोत्रे' असं सांगायचा. ऐकणाऱ्यांचे चेहरे गोंधळायचे. कधी कधी फोनवर दुसऱ्या बाजूने बोलणारे लोक फोनच ठेवून द्यायचे. धंद्याच्या दृष्टीने हे बरं नव्हतं. तेव्हा तो स्वतःचं नाव 'व्हिक' असं सांगायला लागला. मॅगी मात्र अजून त्याला चक्क 'विकास' अशी हाक मारायची.

त्याला सकाळची मॅगी आठवली. शेजारच्या पलंगावर झोपलेली उशीवर विखुरलेले पिवळे केस. तो उठून हळूच तिच्याशेजारी बसला आणि त्याने अलगद तिच्या केसांमधून बोटं फिरवली. तिच्या केसांचा मंद सुगंध त्याला आवडायचा. तिने झोपेने जडावलेले डोळे उघडले आणि ओठांवर जीभ फिरवली.

'गो टु स्लीप, हनी' तो पुटपुटला.

ती कोपरावर रेलली. कपाळाला आठ्या घालून अंधारात चमकणाऱ्या घड्याळाकडे बघत म्हणाली, 'किती वाजले ?'

'सहा वाजताहेत.'

'वेळ आहे अजुनी.' ती अर्धवट झोपेत म्हणाली आणि तिने पुन्हा डोळे मिटले. त्याचा हात आपल्या हातात धरून

एका हळव्या जवळिकीने त्याचं मन भरून गेलं. तिच्या डोळ्याभोवतालच्या अस्फुट पण निश्चित सुरकुत्या. मानेखालती सैल होणारी कातडी. त्याच्यासमोर ती बदलत होती· एखादं टवटवीत, प्रसन्न फूल हळूहळू मलूल होत जावं तशी. तोही तिच्याबरोबर बदलत होता. ड्रेसिंग टेबलवर ठेवलेल्या लग्नाच्या फोटोमधला स्वतःचा चेहरा बघताना त्याला आपल्या हसण्यात नीताचा भास झाला.

मॅगीने एक गोष्ट केली होती. नीतीचे सगळे फोटो, सगळे कपडे, सगळ्या बाहुल्या पत्र्याच्या मोठ्या ट्रंकेत भरून ती माळ्यावर टाकून दिली होती. ट्रंकेला जाडजूड कुलूप होतं. नीतीची खोलीसुद्धा पार बदलली होती. जमिनीवरच्या कार्पेटपासून भिंतीवरच्या वॉलपेपरपर्यंत. खोली बंदच असायची बहुतेक. फक्त कुणी पाहुणे आले की उघडायची. तरीसुद्धा नीती दिसायची. सकाळी कोवळ्या हातांनी त्याच्या गळ्याभोवती विळखा घालून म्हणायची, 'आय लव्ह यू डॅडी.'

'आय लव्ह यू प्रिन्सेस' तो स्वतःशी पुटपुटला.

'अं ? काय म्हणालास ?' मॅगी अजूनही अर्धवट झोपेत होती.

'काही नाही. मला उठायला हवं. तू झोप.'

तो विमानतळाच्या दारापाशी आला. दाराच्या काचेमधून लिमूझीनच्या रांगेत जांभया देत उभी असलेली माणसं दिसली. त्याचा घसा गरम होता. परत एकदा प्रयत्न करायला हरकत नाही....

त्याने क्वार्टरची दहा नाणी यंत्रात भरली. हँडल मारल. आतली चित्र गरगर फिरली. दोन सफरचंद आणि एक गुलाबाचं फूल

'हिम्मत नको हारू बेटा. परत एकदा होऊन जाऊ दे!' चित्राखाली नेहमीची अक्षरं उमटली.

त्याने खांदे उडवले. मग पुन्हा खिशात हात घालून मूठभर नाणी आत ढकलली

त्याच नशीब खरच जोरावर होत पुन्हा खळखळाट झाला. त्याला जॅकपॉट लागल. तो खाली वळून खिसे भरीत असताना कुणी तरी म्हणाल, 'हॅलो स्ट्रेंजर! नशीबवान आहेस.'

त्याने मान वळवून पाहिल.

तोकडा स्कर्ट आणि निळा ब्लाउज घातलेली मुलगी त्याच्याकडे बघत होती. स्कर्टच्या खाली निळा मॅचिंग पँटीहोज, उंच टाचाचे बूट, लालभडक लिपस्टिक आणि कानात चौकोनी रंगीत तुकडे. पिवळे, वळणावळणाचे खांद्यावर पोचणारे केस. तोंडाच्या कोपऱ्यात जळणारी सिगरेट

'बिगिनर्स लक्' तो हसला. खिसे खुळखुळवत बॅग उचलून निघाला.

मुलगी सहज त्याच्याबरोबरच निघाली. जुनी ओळख असल्यासारखी.

'पहिल्यांदाच आलाहेस वाटत वेगासला?'

तिचा आवाज थोडा खरखरीत. सिग्रेटी ओढून झाला असेल. चालताना पारव्यासारखी छाती पुढे काढायची लकब उचीला नीतीएवढीच असेल. नि वयाने? चेहरा जून वाटतो. पण ह्या पोरीच्या बाबतीत सागणं कठीण असत रोगणाचे आणि मेकपचे थर फसवे असतात फार

'नाही. दुसऱ्यादा.'

'कन्व्हेन्शन?'

त्याने मान हलवली.

ती चालताना त्याच्या थोडी जवळ आली. त्याच्या अगाला अग घासल.

'मजा करायला आला आहेस ना--' तिने त्याच्या डोळ्यांत पाहिल.

'अर्थातच. इथे येतो कोण एरवी?'

तिने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

'वेट अ मिनिट' मग लालभडक पर्समध्ये खुडबूड करून छोटस कार्ड त्याच्या हातात ठेवल.

'घे ठेवून' तिने डोळा बारीक केला 'तुला गरज लागली तर फोन कर'

त्याने कार्ड वाचल

'ब्ल्यू एंजल्स. एस्कॉर्ट सर्व्हिस. कॉल अस फॉर अ गुड टाइम आम्ही सगळी क्रेडिट कार्ड घेतो.'

'ब्ल्यू एजल्स काय?' तो जाणत हसला.

'व्हाटस् युवर नेम हनी?'

ती थोडी अडखळली

'व्हिकी – त्या कार्डाच्या कोपऱ्यात आहे बघ.'

कार्डाच्या दोन्ही कोपऱ्यात पोरीची नाव होती व्हिकी, शेरी, व्हिवियन, रेचेल नि आणखी काही.

'दॅटस् फनी' त्याने सिग्रेट पेटवली. 'माझ नाव व्हिक.'

'अँड आय म व्हिकी –' ती खेळकरपणे हसली. 'ओक्के व्हिक. गिव्ह मी अ कॉल.'

टाचावर टकटकत आणि कमरेत मुरडत ती दाराशी गेली. त्याला अर्धवट हात केला.

कल्पना असूनही त्याला थोडफार आश्चर्य वाटल रिक् ह्या मिलियन डॉलर क्लबमधला त्याचा सहकारी तो बराच जाणकार होता. दोन घटस्फोट होऊन तिसरा संसार चालवीत होता. पहिल्या दोन बायकाच्या पोटगीसाठी आपल्याला काम कराव लागत अस तो म्हणायचा. त्याच्या पाठीवर थाप मारून तो सल्ला देता झाला होता, 'गो टू वेगास अगेन. लॉट ऑफ फन नि जुगार खेळायला तर इतकी मजा येते – आम्ही दर वर्षी जातो. खोलीत राहतच नाही. रात्रभर गॅबलिंग ...'

'बायकोला आवडत तुझ्या?'

रिक् मोठ्याने हसून म्हणाला, 'आवडत? अरे, माझ्यापेक्षादेखील अट्टल जुगारी आहे ती मागच्या वर्षी तिला सात–आठशे डॉलर्स मिळाले. ती लागलीच दुकानात गेली आणि एक मस्तपैकी हिऱ्याची आगठी घेऊन आली.'

'मॅगीला नाही आवडल फारस –'

रिक्ने खांदे उडवले. मग त्याच्याजवळ सरकला खालच्या आवाजात म्हणाला, 'मग एकदाच जा की. लेट द ओल्ड लेडी स्टे होम. यू गेट अ ग्रेट पीस ऑफ अॅस देअर, प्रिटी चीप, टू' आणि त्याने आपल्या ओठाचा चंबू करून तोंडात हवा ओढली होती.

पण गमतीची गोष्ट म्हणजे ह्या पोरीचं नावदेखील व्हिकी. तो व्हिक आणि ती व्हिकी.

लिमूझीनच्या रागेसमोर अजस्र, झगझगीत जाहिराती. चट्टयापट्टयाची बिकिनी घालून हसतखेळत मार्लबरो सिगरेट ओढणारी ताम्रवर्णी घट्ट तरुणी, सोनेरी 'शिवास रीगल' बर्फाच्या ठोकळ्यावर ओतणारा केसाळ छातीचा सिनेनट, सहा दाराच्या लाबलचक सुळसुळीत, अबलख मोटारी पुढच्या सीटवर युनिफॉर्ममधला शोफर, मागच्या खिडक्याच्या काळ्या काचा अर्थातच बंद हवा थोडीशी गरम. लास वेगासचा अर्थ त्याने मुद्दाम स्पॅनिश डिक्शनरीत काढून पाहिला होता. लास वेगास म्हणजे सुपीक मळे म्हणे ह्या रेताड माळाला सुपीक मळा म्हणणारा इसम नक्कीच विनोदी असणार

पण तो एकटा आला ते एकंदरीत बरं झाल. मागे एकदा मॅगीला घेऊन आला होता तेव्हा ती खोलीमधून बाहेरसुद्धा यायला तयार नव्हती. कॅसिनोमधल्या सिगरेटच्या धुराने नि अंधाराने डोक दुखत म्हणाली नि खोलीत बसून राहिली तिला आवडेल म्हणून त्याने मुद्दाम एका महागड्या 'शो' ची तिकिट काढली. एकपात्री कार्यक्रम होता कार्यक्रमाअगोदर स्टेकच जेवण होत लोक दारू पीत पीत दाद देत होते. अश्लील विनोदाना, आपण किती रसीले आहोत हे दाखविण्यासाठी चढाओढीने हसत होते. पलीकडच्या टेबलावरचा माणूस सारखा मॅगीच्या पायाकडे बघत होता ती थोड्या वेळाने उठली आणि म्हणाली, 'जाऊ या आपण. कटाळा आला मला.'

दोघ चालत हॉटेलकडे निघाली असताना पलीकडच्या फूटपाथवरून काळ्या झग्यातली एक सुटलेली बाई अडखळत त्याच्या जवळ आली होती त्याच्या सरळ गळ्यात पडून म्हणाली होती– 'मला चालता येत नाही बघ. सगळं गरगरतंय मला खोलीवर सोडतोस?'

मॅगी त्याच्या पुढे होऊन टोकदार आवाजात त्या बाईला म्हणाली होती, 'गेट लॉस्ट हनी; ही इज माय हजबंड.'

हॉटेलच्या खोलीत परतल्यावर तिने नीतीला फोन केला होता जवळजवळ अर्धा तास.

नीती मॅगीसारखीच हट्टी, आतल्या गाठीची मनात काय चाललय ते कळू न देणारी लग्नाला इतकी वर्षं झाली तरी मॅगीच्या डोक्यात काय घडतय ते त्याला नीट उमजायच नाही.

तसा गोऱ्या कातडीच्या बाईशी ससार करणारा काही तो पहिलाच भारतीय नव्हता. मॅगीशी लग्न होऊन बावीस वर्षं झाली, दोन मुलं झाली, मिलियन डॉलर सेल्स क्लबची मेंबरशिप, कंट्री क्लबची मेंबरशिप, गावातल्या सगळ्यात महागड्या वस्तीमध्ये चार बेडरूम्सच घर, रिपब्लिकन पार्टीच सभासदत्व आणि अमेरिकन नागरिकत्व असे बहुमानही मिळाले तरीदेखील मधूनमधून परक वाटायच शिवाय अलिकडे मॅगी दर रविवारी चर्चमध्ये जायला लागली होती तसा तो धार्मिक बाबतीत सहिष्णू होता घरी ख्रिसमस ट्री आणण, त्या वेळेला भेटीची देवाणघेवाण करण, ऑफिसातल्या ख्रिसमस पार्टीला मॅगीबरोबर नियमितपणाने जाण ह्या गोष्टी त्याने बिनतक्रार केल्या होत्या. पण तरीदेखील धर्म विचारला की तो 'हिंदू' म्हणून सागायचा. पाद्री, चर्च ह्या गोष्टीबद्दल त्याला फारसा आदर नव्हता आणि पूर्वी मिशनऱ्यानी विहिरीत पाव टाकून गावच्या गाव कशी बाटवली, भारताच्या राजकारणात ते कसे ढवळाढवळ करतात ह्याच वर्णन त्याने मॅगीपाशी बरेचदा केल होत मॅगीनेही त्याला चर्चमध्ये यायचा आग्रह केला नाही कधी कधी एखादा जिज्ञासू भारतप्रेमी भेटायचा आणि तो हिंदुधर्म, पूजा अशा खोल विषयात शिरायला लागला तर त्याच उत्तर तयार असायच 'हिंदुधर्मात देवाच्या पूजेला देऊळ लागत नाही. नुसता मनातल्या मनात नमस्कार केला तरी पुरत '

मॅगीशी ओळख झाली तेव्हा तो भारतातून येऊन चार–सहाच महिने झाले असावेत आता तो कॉंटॅक्ट लेन्सिस वापरायचा पण त्या वेळी त्याला जाड चष्मा होता अकालीच पिकायला लागलेले केस चेहरा गभीर एकदा प्रोफेसरानी वर्गात त्याला जाहीर शाबासकी दिली होती एक अवघड असाइनमेंट वरोबर सोडवली म्हणून. लेक्चर सपल्या वर मॅगी त्याला भेटायला आली

ती दोघ कॉफी प्यायला गेली त्याला ती आवडली. उंची जवळजवळ त्याच्याएवढी. पिवळे केस, वरचा ओठ थोडा फुगीर, नाकाचा किंचित वर उचललेला शेंडा आणि दोन्ही गालावर वागाचे तपकिरी ठिपके. ती हसायला लागली की तिचे निळे डोळे चमकायचे आणि हसण ओठाच्या कोपऱ्यामधून हळुवार पसरायच.

ती दोघं पुष्कळ वेळा बरोबर जायला लागली. तो थोडा एकलकोंडा होता आपल्या रंगाची, परदेशीपणाची आणि वेगळ्या इंग्रजी उच्चारांची त्याला जाणीव होती. पण तिच्या वागण्यातला सहजपणा कधी बदलला नाही. तो अर्थातच काटकसरीने राहायचा. ती अधनमधन वसतिगृहातल्या त्याच्या खोलीवर यायची. निःसंकोचपणे त्याच्या पलगावर बसून सदऱ्याची बटणं, मोज्याची भोकं अशा दुरुस्त्या करायची कधीकधी काही तरी खायला घेऊन यायची ती आली की त्याला बरं वाटायच. नकळत तिच्या येण्याची तो वाट बघायला लागला.

मग एक आठवडाभर ती वर्गात दिसलीच नाही त्याने डॉर्ममधल्या तिच्या खोलीवर फोन केला. तिची रूम पार्टनर सहज आवाजात म्हणाली, 'तुला माहिती नाही ? मॅगीला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं परवा. पोटात दुखायला लागल खूप. अपेंडिसायटिस. ऑपरेशनदेखील झालं त्याच संध्याकाळी. बरी आहे आता. मला वाटलं तुला कळल असेल.'

तो हॉस्पिटलात तिला भेटायला गेला फुलाचा गुच्छ घेऊन. त्याच्या खिशाला जेमतेम परवडणारा.

लिमूझीन आली. तो खिडकीजवळ बसला. त्याला हॉस्पिटलमधली मॅगी आठवली. पाघरुणाच्या खाली–थोडी फिकट.

'तू सागितलंही नाहीस'

मॅगी पुष्कळ वेळा सागायची नाही. पूर्वी फिरतीवर गेला की तो रोज मॅगीला फोन करायचा नीतीशी फोनवर बोलायचा नीती चटकन फोनवर म्हणून गेली, 'डॅडी, शॉनला लागल खूप. वुइ हॅड टु टेक हिम टु अ डॉक्टर' त्याच्या छातीत धडधडून गेल. मॅगी फोनवर म्हणाली, 'जिन्यावरून पडला. फ्रॅक्चर झालय कोपरावर. कास्ट घातला डॉक्टरानी. तुला दिसेलच आल्यावर उगीच काळजी कशाला, म्हणून नाही सागितल '

मुलाचे चेहरे त्याच्या डोळ्यासमोर तरगून गेले. नीती बरीचशी मॅगीसारखी. उभट चेहरा, किंचित पिंगट केस, डोळे मात्र काळेभोर आणि लाबसडक पापण्या, उचीला साधारण त्याच्याएवढी. मुलगा शिरीष भारतीय वळणाचा. केस त्याच्यासारखे काळे, जाडे ओठ, जरास पुढे डोकावणार पोट. मुलाच्या आवडीनिवडीही पार वेगळ्या. नीती पियानो वाजवायची. तिला वाचायची आवड होती. शॉनच्या आवडी म्हणजे बेसबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल, टेनिस, मोटारी आणि अली–अलीकडे मुली. त्याचं नाव मोठ्या आवडीनं शिरीष ठेवलं. पण त्याचा शॉन कसा आणि कधी झाला हे कुणालाच कळल नाही.

अमेरिकन मुलीशी लग्न केल म्हणून आईवडिलाना थोड वाईट वाटल. पण तशी ती दोघही समजूतदार होती. अमेरिकन मुलीशी लग्न केल म्हणजे अनेक दरवाजे आपोआप उघडतात हे वडिलानी आईला समजावून सागितल. शिवाय इथली वशिलेबाजी, लाचलुचपत, जातपात आणि सावळा-गोधळ ह्या सगळ्याना तोड देण्यापेक्षा तिथे सुखाने राहिलास तर आम्हाला आनदच आहे अस वडिलानी त्याला एका पत्रात लिहिल होतं ते पत्र त्याने अजूनही खणात ठेवल होत. मॅगीनेही खूप मदत केली तो बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनची डिग्री घेत असताना तिने कॉलेज सोडल वेगळी क्रेडिटस् मिळवून शाळेत नोकरी धरली त्याच गाड मार्गी लागेपर्यंत ससार चालवला. लहान नीतीची कानदुखणी, आजारपण, त्याचा चिडचिडा स्वभाव साभाळून त्याचे आईवडील मुद्दाम भारतातून नातीला बघायला आले. त्याला वेळ नसायचा पण मॅगीने गाडीत घालून त्याना न्यूयॉर्क, नायगारा सगळं दाखवल त्याची आई जाताना म्हणालीदेखील 'चागली आहे रे विकास तुझी बायको आपल्याकडच्या मुली काय करतील एवढ केलन् तिने आमच '

मॅगी भारतात मात्र एकदाच आली. तो नतर दोनतीनदा जाऊन आला. आईवडिलाच्या आजारपणात. एकदा पुतणीच्या लग्नाला पण ती तिथल्या आजारपणाना घाबरायची आणि इच्छेविरुद्ध तिला भारतात नेऊन तिच आणि स्वत च प्रदर्शन माडायचा प्रयत्न त्याने केला नाही.

तशी मॅगीच्या घराबद्दल त्यालाही फारशी माहिती नव्हती. ती पाचसहा वर्षांची असताना तिच्या आईवडिलाचा घटस्फोट झाला होता तिच्या आईने नतर दुसरं लग्न केल मॅगीला एक सावत्र भाऊ झाला सावत्र आणि खऱ्या वडिलाबद्दल मॅगी कधी फारशी बोलायची नाही विधवा झाल्यानतर मॅगीची आई बरेच दिवस एकटी राहात होती. पण फार वय झाल म्हणून मॅगी नि तिच्या सावत्र भावाने तिला नर्सिंग होममध्ये ठेवल होत. मॅगी वर्षातून दोनदा आईला भेटायला जायची तोही एकदा मुलाबरोबर गेला होता. पण मॅगी नुसता आईचा हात धरून बसली. आई सारखी थरथरत होती. तिला बोलताही येत नव्हतं. तो नतर परत गेलाच नाही.

बसमधल्या रेडियोवरच सूक्ष्म सगीत, प्रत्येक गाण्यामागे उत्साही आवाजात जाहिरात ! केस काळे करण्यासाठी ग्रेशियन फॉर्म्युला वापरा. फर्स्ट प्रेस्बिटेरियन चर्च. लग्नाची चोवीस तास व्यवस्था. बाकी वेगासला चोवीस तासात घटस्फोट मिळतो म्हणे. मग लग्न का नको चोवीस तास ?

लिमूझीनमधले उतारू नेहमीचेच. मेलेल्या नवऱ्याच्या इन्शुरन्सच्या पैशावर धूम करणाऱ्या काही बडबड्या, टुणटुणीत आणि दीर्घायुषी म्हाताऱ्या. खूप नटल्या आहेत. गळ्यात रगीबेरगी माळा, कानात लाबच लाब डूल. लखलखणारे शुभ्र खोटे दात, डोक्यावर पाढऱ्या केसाच्या व्यवस्थित रचलेल्या टोपल्या, रगवलेली लालभडक नख रिकी म्हणायचा नेहमी 'जमेल तोवर मजा करून घे यार. सेव्हिंग बिव्हिंग झूट आहे सब उद्या आपण मेलो की आपल्या बायका मजा मारतील बघ इन्शुरन्सच्या पैशावर. लास वेगासला नाहीतर मायामीला—'

आणखी काही मडळी. कानावर रेडियोचे हेडफोन्स लावून आपल्याच जगात बुडालेला तरुण मुलगा, पैशाच्या पाकिटातल्या छोट्या कॅल्क्युलेटरवर आकडेमोड करणारा मध्यमवयीन टक्कलवाला नवीन सिस्टिम आणली असेल जुगारात जिकायला अगदी मागच्या बाकावर कबुतरासारख चिकटून प्रेम करणारं नवपरिणीत जोडप मनाला न जुमानता त्याची नजर त्या दोघावर फिरून येते. दोघाचेही हात एकमेकाच्या कमरेखाली. काय करायच ते खोलीत गेल्यावर करा की...

त्याने मॅगीला विचारल होत, लग्नाच्या आधी 'तुझे कोणी बॉयफ्रेंडस् होते का मला भेटण्यापूर्वी ?' मॅगीने कपाळाला आठ्या घातल्या. मग गभीरपणाने बोट मोडली. 'जॉनी, रिकी, ब्रेंट, जो, डेव्ह... निदान आता तरी पाच जण आठवताहेत. प्रयत्न केला तर निदान डझनभर तरी निघतील.'

'बरीच लोकप्रिय होतीस की तू; पण माझ्याशी कस काय लग्न केलस ?'

मॅगी हसली त्याचे केस विस्कटून म्हणाली, 'अमेरिकन जेवणाचा कटाळा आला तेव्हा म्हटल दुसरी चव शोधावी. पण तुला किती मैत्रिणी होत्या भारतात ?'

तो खदखदला. 'मला ? मैत्रिणी ? हाहाकार झाला असता आमच्या घरी माझी पहिली मैत्रीण तू . पहिली नि शेवटची '

पण हेही तितकस खर नाही तो पहिल्यादा फिरतीवर गेला तेव्हा ऑफिसच्या मुतारीत रिकी भेटला. पॅटची झिप लावता लावता खाद्यावर हात ठेवून म्हणाला, 'उद्या जाणार आहेस का ह्यूस्टनला...मग फोन नबर्स घेऊन जा. चागल्या पोरी आहेत. कधी कधी फार एकटं वाटत. फोन कर वाटल तर. नेहमीसारखी काळजी घेतली म्हणजे ठीक.'

पण त्याने फोन नबर्स वापरले नाहीत. नतर महिना दीडमहिन्यात न्यूयॉर्कला जावं लागल. मोटेलमधल्या करकरणाऱ्या बिछान्यात बसून टेलिव्हिजनवर बदलणारी चित्र आणि रस्त्यावरच्या मुग्यासारख्या मोटारी बघायचा कटाळा आला. त्याने फोन फिरवला.

त्याला ह्या प्रकाराची बरीच [माहिती झाली आहे मोटमोठ्या शहरातून 'एस्कॉर्ट सर्व्हिस', 'एटरटेनमेट' अशा नावाखाली मुली मिळण्याची सोय असते तिथे मास्टर कार्ड, डायनर्स क्लब असल्या कार्डावर उधारीदेखील करता येते. मुलीना रोग नसतात कारण एजन्सी त्याच्या तब्येतीची काळजी घेते. आणखी काही परवलीचे शब्द—ब्लो जॉब, राउड द वर्ल्ड काही पोरी हातकड्या, चामड्याचे पट्टे अशा गोष्टीही घेऊन येतात फर्माइश केली तर

त्याला हा प्रकार सोयीचा वाटायला लागला होता. फक्त शरीराची भूक. भावनाची गुतागुत वगैरे चोचले नाहीत. चोख काम आणि रोख दाम. अर्थात ती नेहमीसारखी काळजी घ्यायचाच, म्हणजे कॉंडोम आणि पेनिसिलीनच्या गोळ्या

मॅगी दुरावत चालली होती. आपल्या दोघामध्ये एक काचेची भित उभी आहे अस त्याला अधूनमधून वाटायच. ती अलीकडे चर्चच्या कामात जास्त गुतायला लागली होती. पूर्वी एका बिछान्यावर झोपायची पण नीती गेल्यानतर काही दिवसातच मॅगीने त्याचा मोठ्या हौसेने घेतलेला वॉटरबेड साल्व्हेशन आर्मीला दान करून टाकला. वॉटरबेडवर पाठ दुखते ह्या सबबीखाली. त्याच्याऐवजी दोन छोटे पलग आणले. वेगवेगळे कधी कधी कर्तव्य म्हणून ती दोघं एकत्र यायची देखील पण त्याला इतर पोरी आठवायच्या आणि तिला काय वाटायच कोण जाणे. कधीकधी त्याला तिला सगळ सागून टाकायची ऊर्मी यायची पण तिच्या गंभीर, थोडाफार रूक्ष आणि थकलेल्या चेहऱ्याकडे बघितल की त्याचे शब्द जागच्या जागी जिरून जायचे.

नीतीवर त्याचा जीव होता. मॅगी म्हणायची देखील, 'उगाचच लाडावून ठेवली आहेस तिला. तिच काही चुकतच नाही तुझ्या दृष्टीने त्या शॉनवर मात्र सारखा डाफरत असतोस.'

जन्मानतर त्याला पहिल्यादा दिसली तेव्हा नीती हॉस्पिटलमध्ये नर्सरीच्या काचेआड छोट्या बॅसिनेटमध्ये शात झोपली होती. किंचित पिगट केस, गोल चेहरा आणि प्रावरणाखाली हळू वरखाली होणारी छाती. ह्या छोट्या गोळ्याला जगात आणण्यात आपला काही भाग आहे अस वाटून तो एकाएकी गहिवरला.

तेव्हा त्याला वेळ असायचा. शिडी चढायची एवढी घाई नव्हती. सकाळी उठून अर्धवट झोपेतली नीती डोळे चोळीत त्याच्या बेडरूममध्ये यायची आणि त्याने हात पसरून 'कमॉन प्रिन्सेस' म्हटल की त्याच्या अंगावर उडी मारायची. तिने स्वतःची खोली सोडून अवेळी येण मॅगीला फारसं पसंत नव्हत. मुलानी आपापल्या खोल्यात, आपापल्या बिछान्यात झोपाव प्रत्येकाला प्रायव्हसी हवी अस ती म्हणायची. मग तो सागायचा, 'हे बघ. मी लहानपणी वाढलो दोन खोल्यामध्ये वडील पुजारी आणि

देवळालगत आमची जागा. आई–वडील, दोन भाऊ आणि एक बहीण, सगळे दोन खोल्यां मध्ये झोपत होतो, कितीतरी वर्षं. काही परिणाम नाही झाला आमच्या मनावर. तुम्ही उगाचच स्तोम माजवता भलत्या गोष्टींच. जरा इतर जगात जाऊन पहा म्हणजे कळेल '

नीती भराभर मोठी झाली. सकाळी त्याच्याकडे येईनाशी झाली. पँटी होज्रेस, बुटाच्या हरतऱ्हेच्या जोडया, पॉप गाण्याच्या रेकॉर्डस् आणि मेकप अशा गोष्टी तिला लागायला लागल्या तोंडावर थोडा मुरुम उठला की तिचा मूड जायला लागला. ती बघता बघता उंच झाली, त्याच्याइतकी एक दिवस सध्याकाळी तो टेलिव्हिजनवर फुटबॉल बघत होता घंटा वाजली म्हणून त्याने दार उघडल

सूट घातलेला आणि थोडा भेदरलेला मुलगा हातात फुलाचा गुच्छ घेऊन दारात उभा होता.

'कोण पाहिजे ?' त्याला आश्चर्यच वाटल.

तेवढ्यात मॅगी जिना उतरून खाली आली. अवघडलेल्या मुलाकडे बघून थोडी हसली. 'हॅलो टेड, नीता झालीच आहे तयार '

मग त्याला म्हणाली, 'नीताचा आज प्रॉम डान्स आहे. ह्या टेडबरोबर जाणार आहे ती '

तेवढ्यात नीती फुलपाखरासारखी माडीवरून आली. मनोऱ्यासारखे रचलेले पिंगट केस, ओठावर लिपस्टिक्, अगाभोवती पिसारणारा निळा झगा, कानाच्या पाळयात निळे खडे टेडकडे पाहून ती हसली तेव्हा तिचे पांढरेशुभ्र दात विलगलेल्या ओठांमधून चमकले.

'हाय टेड '

'हाय नीता.' टेडने फुलाचा गुच्छ तिच्या हातात दिला.

दोघ बाहेर पडली मॅगी दारात उभी राहून त्याची मोटार दिसेनाशी होईपर्यंत बघत होती. दार बद करताना म्हणाली, 'छान दिसत होती, नाही दोघं ?'

'कुठे गेली ती ? तो मुलगा कोण ?'

'त्यांचा पहिला डान्स आहे हा वेडया. किती नर्व्हस झाली होती. गेला आठवडाभर काही सुचत नव्हत तिला.'

त्याच्या लक्षात आल की आपली मुलगी आता खरोखरीच मोठी झाली आहे

लास वेगासची स्ट्रिप आली असख्य मोटारींचा वाहता ओघ लक्षावधी रगीत दिव्यांच्या क्षणोक्षणी बदलणाऱ्या प्रचड आकृत्या. लॅसो फेकणारा प्रचंड काउबॉय डयून्स, सँडस, सहारा, सर्कस–सर्कस, फ्लेमिंगो–मार्कीवर झगमगणारी अक्षर जॉनी कार्सन टूनाइट सीझर्स पॅलेस, वेन न्यूटन, जोन रिव्हर्स. आपणदेखील या जाहिरातीमधला एक दिवा आहोत आणि आपलीही उघडझाप होते आहे अस त्याला वाटून गेल.

'गोल्डन नगेट'च्या प्रचड दारासमोर लिमूझीन थांबली. तो बॅग पेलत आत गेला.

बाहेरच्या चकचकीत प्रकाशानतर आत डोळे मिटवणारा अधार थोडा वेळ काही दिसतच नाही जमिनीवर पावल उमटू नयेत असा जाड गालिचा. सिगरेटी, सिगार, पाइपच्या धुराने काळवंडलेली धूसर हवा. हजारो लोक इतस्तत. जुगार खेळून राहिले आहेत. काही स्लॉट मशिनाची हँडल मारणारे कोणी झगझगत्या फिरत्या रूलेटवरच्या नंबरावर पैसे लावणारे. ब्लॅकजॅक, क्रॅप्स आणि पोकरच्या टेबलाभोवती घट्ट वर्तुळ. लाल झगे घातलेल्या लाब तगडयाच्या पोरी उंच टाचावर दारूचे ग्लासेस घेऊन फिरतात. मधूनच जांभया देत त्यांच्या लाडधा झग्यांखाली जाळीचे जाभळे पँटीहोज्रेस आणि टेबलावर ग्लास ठेवायला वाकल्या की छाती आणि नितबाची अर्धवर्तुळ दिसतात त्याच्या अवघडलेल्या शरीरातून एक विचित्र लहर उमटून गेली.

तो रागेत उभा राहिला. खिशातून पत्र काढून त्याने रिझर्वेशन क्लार्कसमोर धरल. 'व्हिक डॉट्री' ती करताना अडखळली. 'कन्व्हेन्शन का ?' तिने मान वर केली.

'हो आणि डॉट्री नाही, डोत्रे–डो अॅज इन जॉन डो.' तो हसला. अमेरिकेत आपल्या आडनावाचा उच्चार शिकविण्याची त्याची जुनी विनोदी पद्धत.

'पैसे कसे भरणार ? रोख की क्रेडिट कार्ड ?' क्लार्क बाईला विनोद ऐकायला वेळ नव्हता.

त्याने क्रेडिट कार्ड खिडकीत ठेवल. बाईने योग्य शिक्के उमटवून त्याची सही घेतली. क्रेडिट कार्ड आणि खोलीची किल्ली एका पाकिटात घालून त्याच्या हातात दिली.

'रूम नबर १०४१ उजव्या बाजूच्या लिफ्टने जा. नि हो, ह्या चिप्स' प्लास्टिकच्या रंगीत चकत्या तिने पाकिटात भरून त्याला दिल्या. 'ह्या फुकट आहेत. इथे जुगार खेळायचा असला तर...आणि.'

ती सवयीनुसार यांत्रिक हसण हसली.

'गुड लक्...'

त्याने सिग्रेट पेटवून धूर ओढला. बेलबॉय म्हणाला, 'बॅग उचलू का ?'

कशाला. त्याच्या मनात आल. उगाच टिप द्यावी लागेल.

'नको. मी नेईन.'

एलिव्हेटर गमतीदार होता. अफूच्या बोंडासारखा. तो इमारतीच्या भिंतीवर बाहेरून डकवला होता. एखाद्या अळीसारखा खालीवर जायचा. पुढच्या तीन बाजू पारदर्शक प्लेक्सीग्लासच्या. वर जाताना दिव्यांच्या उजेडात पेटलेल वेगास सभोवार दिसत होतं.

त्याने खोलीचं दार उघडलं. आतली हवा गरम, कोरडी आणि शिळी. सिग्रेटच्या थोटकानी एक दोन ठिकाणी जळलेल कार्पेट. नेहमीचंच फर्निचर. मोठा डबलबेड. आरशाचं ड्रेसिंगटेबल. खणात गिडियनच बायबल आणि टेलिफोनच्या डिरेक्टऱ्या.

त्याने बटण दाबून टेलिव्हिजन सुरू केला. स्क्रीनवर अक्षरं 'वेलकम टु गोल्डन नगेट' तुम्हाला जुगाराबद्दल जास्त ज्ञान हव असेल तर ही चॅनेल बदलू नका '

बाथरूममध्ये जुन्या ओळखीचा माणूस उभा होता. व्हिक धोत्रे सेल्समन ऑफ द इयर. १९७०, १९७५ आणि १९७९ आता व्हाइस प्रेसिडेंट सेल्स. मेंबर, मिलियन डॉलर क्लब. त्याने प्रतिबिंबापुढे तोंडभर हसून हात जोडले

टबात गरम पाणी जमवून त्याने मनमुराद आंघोळ केली. घरी नेहमी शॉवरखाली उभ रहायला लागायच. कारण टब मळकट झालेला मॅगीला आवडायचा नाही. टबात डुंबताना तो चक्क गायला लागला, आणि एका हाताने साबण हवेत उडवून दुसऱ्या हाताने झेलायला लागला शेवटी बोट पाण्याने सुरकुतायला लागली म्हणून तो टबाबाहेर पडला. अग पुसताना त्याला आपलं सुटलेल पोट आणि पांढरे केस जाणवले.

त्याने सामान नेहमीच्या सवयीप्रमाणे व्यवस्थित लावून ठेवलं. दोनशे डॉलर्स जुगारासाठी म्हणून पाकिटात घातले. बाकीचे पैसे बॅगेत टाकले. बॅगेला कुलूप लावल पाकिटात पैसे भरत असताना त्याला परत कार्ड दिसल

'ब्ल्यू एजल्स. काय त्या पोरीच नाव ? व्हिकी बरी होती तशी. अ गुड पीस ऑफ ॲस.'

त्याला पहिल्यादा ऑफिसातल्या इतराच नवल वाटायच. आपापसात बोलताना स्क्रू, फक् असे शब्द सर्रास वापरणारी आणि फिरतीवर गेल असताना नियमित भानगडी करणारी ही मडळी प्रतिष्ठित वस्त्यामधून मुलाच्या कार्यक्रमाना आपुलकीने जायची. बसिगला विरोध करायची क्वचित एखाद-दुसरा त्याला म्हणायचादेखील. 'व्हिक्, तू का नाही येत चर्चमध्ये ? मॅगी तर दर रविवारी येते. शॉनही असतो कधीकधी.'

तो हसून म्हणायचा, 'धर्म बिर्म खाती मी तिच्याकडे सोपवलीत. शिवाय मी हिंदू आहे अजून.'

हिंदू धर्माबद्दल त्याला काहीच माहिती नव्हती मध्यतरी फिरतीवर असताना एका हरेकृष्ण पथीयाकडून त्याने प्रभुपादाची टीका असलेली गीता उगाचच विकत घेतली होती दररोज रात्री झोपण्यापूर्वी त्याच्यातले तीन–चार श्लोक वाचायचे असा निश्चय केला होता. पण चकचकीत वेष्टनाचं ते पुस्तक त्याच्या ड्रेसिग टेबलावर नुसतच पडून होत त्याच्यावर धुळीचा पातळ थर जमला होता.

खर म्हटल तर मॅगीदेखील हिंदूच होती. लग्न झाल्यावर पहिल्यादा ती दोघ भारतात गेली तेव्हा आईने मोठ्या अपूर्वाईने एक मगळसूत्र तिच्या गळ्यात घातल होतं. शिवाय घरातल्या घरातच कसलासा धार्मिक समारभ करून तिला हिंदू केल होत. तिच नाव मजिरी अस ठेवून. पण तो तिला मॅगीच म्हणायचा. तीही कधीकधी पार्टीला घरी आलेल्या लोकाना 'ही माझ्या सासूबाईंची भेट' म्हणून मगळसूत्र दाखवायची मडळीकडून 'हाउ नाइस, हाउ ब्यूटिफूल, गॉर्जस' असे अभिप्राय उमटायचे. पण मॅगीने मगळसूत्र कधी घातलंच नाही. एकदा त्याने मगळसूत्र नीतीच्या गळ्यात बघितलं. मॅगीला विचारल तेव्हा ती म्हणाली, 'त्यात काय एवढ ? तिला आवडल ते. ती म्हणते इटस् क्यूट.'

स्लॅक्स आणि उघड्या गळ्याचा शर्ट घालून तो खोलीबाहेर पडला. लिफ्टमध्ये आजूबाजूचे दोघेतिघे त्याच्याकडे बघायला लागले तेव्हा त्याला कळल की आपण जुन्या मराठी सिनेमातल्या गाण्याची शिट्टी घालतो आहोत.

अलिकडे त्याला अशी जुनी गाणी अर्धवट आठवायला लागली होती. पण पुष्कळ वेळा मधल्या ओळीच हरवायच्या. लहानपणी आई रामरक्षा म्हणवून घेत असे परवा अचानक ऑफिसात 'बी. एस्. कौशिक' अशी सही असलेलं एक पत्र त्याच्या नजरेखालून गेल आणि त्याला बुध कौशिक ऋषीची आठवण झाली. त्याने रामरक्षा आठवायचा खूप प्रयत्न केला सध्याकाळी तो पुटपुटत असताना मॅगी म्हणालीदेखील

'काय पुटपुटतो आहेस तू ?'

'काही नाही. मी लहानपणी पाठ केलं होत. धार्मिक. ते आठवायचा प्रयत्न करतोय्. सस्कृत.'

मॅगीने भुवया उचलल्या 'तू धार्मिक कधीपासून व्हायला लागलास विकास ?'

मॅगी अस काहीतरी बोलली की तो चमकायचा. तिला आपल्याबद्दल सगळ ठाऊक आहे अस त्याला वाटून जायच. पण तिला माहिती असल नि ती काही बोलत नसली तर बिघडल कुठे ?

त्याने नोटा मोडून चिप्स घेतल्या. आकड्यावर चकत्या ठेवून फासे झुगारले.

तो खेळात गुतत गेला. पहिल्यादा तीन-चार वेळा त्याचे पैसे गेले पण शेवटच्या विसानी हात दिला. त्याच्या भोवताली गर्दी होऊ लागली. समोर पातळ चकत्याच्या रगीत चळती उभ्या राहिल्या. झगा घातलेल्या मुलीने त्याला ड्रिंक दिल तेव्हा त्याने दहा चिप्सची बक्षिसी दिली. तरीही त्याचा सावधपणा शाबूत होता. खेळ कधी थाबवायचा हे त्याला ठाऊक होत. त्याने चिप्स खिशात भरल्या. गर्दीतून वाट काढीत तो बाहेर पडला.

जाळीच्या खिडकीपाशी चिप्सचे पैसे करीत असताना एक पोरगी त्याच्या शेजारून म्हणाली, 'हाय बिग स्पेंडर'

पायाखालची जमीन जरा डोलत होती. तरी त्याने ओळखलं. 'कोण ? व्हिकी ?'

पोरीने आश्चर्य दाखवल 'तुला नाव माहित्येय माझ ?'

'हो. सकाळी भेटली होतीस की विमानतळावर. कार्ड दिलस मला ब्ल्यू एजल्स.'

'ओ दॅटस् राइट. पण मला तहान लागलीय् फार. विल् यू बाय मी अ ड्रिंक, शुगर ?'

व्हिकी अगदी खेटून उभी आहे. तोडात च्युइग गम. श्वासावर सिग्रेट आणि कसला तरी पर्फ्यूमचा वास.

'कुठे उतरला आहेस तू ?'

'इथेच. कन्व्हेन्शन आहे आमच.'

ती थोडी आणखी जवळ. तिच अग कपड्यामधून जाणवत

'सध्याकाळी काय करणार आहेस ?'

'कोण जाणे. ड्रिंक घेईन म्हणतो.'

'ओक्के मी येते तुझ्याबरोबर'

'तू ?'

'हो. का ?' तिने डोळे बारीक केले. 'बायकोबियको नाही ना बरोबर ?'

'छे. घटस्फोट झालाय् माझा'

'घटस्फोट झालाय् तर मग अगठी कशाला ठेवली आहेस बोटावर ?'

बरीच चौकस आहे की ही पोरगी

'सवय म्हणून ठेवलीय्. यू. नो चुकल्याचुकल्यासारख वाटत अगठी नसली की.' त्याने सिग्रेटचा धूर काढला. दोघ निघाली. लाल डगला घातलेला उच बेलबॉय व्हिकीच्या जवळून गेला.

'वॉच युवर हँड, बस्टर' व्हिकी किंचाळली.

तो हसला. बेलबॉयने व्हिकीच्या ढुगणाला चिमटा काढताना त्याने पाहिल होत. व्हिकी म्हणाली, 'मला त्याच वाटत नाही काही एवढं ही इज अ होमो एनी वे'

दोघ बारमध्ये आली बाटल्याच्या मखरामागे लाल जाकिटावर काळा बो लावलेला बारटेंडर ग्लासेस पुशीत उभा होता छतावर उलटे टागलेले पेले दिव्यामधून चमकत होते समोरच्या उच स्टुलावर आणि छोट्या टेबलांवर गिन्हाइकाची गर्दी होती. टेबलावर ठेवलेल्या गोल हंड्यामधून मेणबत्त्या तेवत होत्या.

तिने विचारल, 'काय घेणार तू ? नि नाव काय तुझ ?'

'व्हिक्...' सवध नाव सागायच तोंडावर आल होत पण त्याने चलाखीने जीभ आवरली

'ओक्के व्हिक् आणि मी व्हिकी. छान जमतात आपली नावं '

'तू बैस ना इथे' त्याने तिचा हात धरला 'वेट्रेस येईल तिला देऊ ऑर्डर.'

'नको मीच घेऊन येते त्याच्यापेक्षा. वेट्रेस यायला अर्धा तास तरी लागेल. शिवाय तुला घाई आहे, हो ना?'

तिने डोळा बारीक केला. त्याने खिशातून नोट काढून तिच्या हातात दिली.

'जा, स्कॉच घेऊन ये मला स्कॉचच आवडते बर्बनपेक्षा '

'ओक्के हनी. यू आर द बॉस.'

व्हिकी गेल्यावर सिग्रेटचा झुरका घेऊन त्याने डोळे मिटले. त्याला हलकहलक वाटत होत दारूच्या प्रत्येक बाटलीच्या विक्रीमागे व्हिकीला कमिशन सुटत असणार हे तो जाणून होता. ही काही त्याची पहिलीच खेप नव्हती.

व्हिकी शेजारी बसली 'हे राहिलेले पैसे '

त्याने हात उचलला. 'कीप इट्.'

'चियर्स '

व्हिस्कीचा गध तापलेल्या मातीने पहिला पाऊस अगावर घेतल्यासारखा. व्हिकी लहानच दिसते तशी कशी लागली असेल ह्या धद्याला ?

◻

फाटक्या झग्यामधली मळक्या चेहऱ्याची मुलगी पुलावर फिरायला आलेल्या गुलछबू माणसाला म्हणाली,

'आलेपाक हवाय?'

'नको.'

'नको? मग उदबत्त्या घेता?'

माणूस म्हणाला, 'आलेपाक घेईन पुष्कळ आणि उदबत्त्यादेखील पण तू आलीस, तर' त्याने नोट पुढे केली पण ती मुलगी गेली नाही घरी निघून आली· पण ताईच तस पुढे विशेष काहीच झालं नाही. पहिल्या बाळतपणातच गेली तिचा चेहरासुद्धा पुसट झालाय्

◻

व्हिकीचा आवाज दुरून ऐकू आला. 'कसला विचार करतो आहेस?'

'जुन्या गोष्टीचा '

'जुन्या गोष्टी? चमत्कारिकच आहेस. पण एक साग कुठल्या देशातला आहेस तू?'

'मी अमेरिकन नागरिक आहे.'

'ते जाऊ दे रे. पण तू अमेरिकन नाहीस हे नक्की तू मेक्सिकन आहेस की इटालियन?'

'मी भारतीय आहे.'

'ओ ऽ इंडिया' तिने झटकन मनगटावरल्या छोट्या घड्याळाकडे पाहिल. .

'खोलीत जाऊ या?'

'चला.' तो उठला. बारमधली टेबल क्षणभर गरगर फिरली नि नतर जागेवर आली.

तिने बाटली उचलली. टेबलाशी वयस्कर जोडप बसल होत. बाईने मान फिरवली. म्हाताऱ्याने ओशटपणाने त्या दोघाकडे पाहिल.

ती सराइतपणे खोलीत शिरली. नेहमीचाच वावर असल्यासारखी. टेबलावरच्या ग्लासमध्ये स्कॉच ओतून त्याला एक पेला दिला. त्याने तिला जवळ ओढलं. लिप्स्टिकला चॉकलेटची चव. ती दूर होऊन म्हणाली, 'व्हाय डोच्यू गेट इन्टु बेड, लव्हर? आय विल गेट रेडी '

पर्स घेऊन ती बाथरूममध्ये गेली. तो लगबगीने धावला. पँटच्या खिशामध्ये काही नोटा ठेवून पाकीट बॅगेत घातल. पेनिसिलनच्या चार गोळ्या आणि दोन-तीन कॉंडोम्स काढून ठेवली. एक फाटल तर दुसरं असाव. टी व्ही चालू करून तो पलगावर पडला. टेलिव्हिजनवर एक्सरेटेड सिनेमाची एक स्पेशल चॅनेल होती. त्याने ती सुरू केली सिग्रेट ओढता ओढता टेलिव्हिजनवर धावणारी लिंगपिसाट नागडी माणस तो बघत राहिला.

ती खोलीत आली. जाळीच्या काळ्या ब्रासियर आणि पॅंटीवर एक झिरझिरीत नाइटी घालून. मॅगीचा रात्रीचा गाउन नेहमी पायापर्यंत असायचा.

'डू यू लाइक मी हनी?'

'शुअर आय डू, व्हिकी.'

'ओक्के. ती भसकन गादीवर निजली. तिचे हात त्याच्या कपड्यामधून फिरायला लागले.

'शो मी, हाऊ मच.'

नीती अशीच सकाळी यायची अथरुणात. गालाला गाल लावून म्हणायची, 'आय लव यू, डॅडी.'

कुठे बिनसलं कोण जाणे आपलच चुकलं एवढ ओढून धरायला नको होतं.

घरी परत आलो तेव्हा मॅगी रात्री म्हणाली, 'तुला काही तरी सागायचय, नीतीबद्दल.'

त्याची नीती पिंगट केस, काळेभोर डोळे. 'नीता गरोदर आहे तो मुलगा वाह्यातच आहे. शाळा सोडली त्याने. मोटारसायकलीवरून फिरतो. कामाला आहे इथल्या कारखान्यात आणि हो, त्याचा एक रॉक बॅंड आहे...नीती मूल ठेवायच म्हणते. तीही फिरणार आहे बॅंडबरोबर. सध्या दोघ बरोबर राहणार आहेत.'

*नीतीला खूप समजावून पाहिल निदान वर्ष दोन वर्ष थाब.* कॉलेजमध्ये जा तिथे दुसर कोणी तरी भेटेल. सगळ आयुष्य तुझ्या पुढे आहे.' ती बधली नाही. चारचौघासारख फसत फसवत आयुष्य जगायच नाही. माझ त्याच्यावर प्रेम आहे अस काही तरी म्हणाली

'चारचौघासारख म्हणजे कुणासारख? माझ्यासारख? तुझ्या आईसारख?' त्याने विचारलं.

तिने मान हलवली. शब्दाने शब्द वाढत गेला शेवटी तिला सागितल की त्या मुलाबरोबर जायच असेल तर पुन्हा घरी येऊ नकोस. ती खरच निघून गेली. न रडता. छोटी बॅग भरून. भातुकलीचा खेळ मोडावा तशी

एका दुपारी ऑफिसात फोन आला. 'तुमची मुलगी...मोटार अपघात.' मोटरसायकलला ट्रकने उडवल.

नीती मागे बसली होती. सहा महिन्याची गरोदर. त्याला ओळखायला अवघड झालं. इतकी ठेचली होती

व्हिकी खोटे उसासे टाकते आहे नेहमीचच नाटक. फक्त पात्र वेगळी.

तो तिचा हात दूर करतो. 'व्हिकी '

'अ?'

'तुझ वय काय ग?'

ती कुशीवर वळली. त्याच्याकडे बघत म्हणाली, 'एकोणीस वर्षाची आहे मी.'

*खोटं सागतेय् नीतीपेक्षा मोठी असणार.* निदान दोन तीन वर्षांनी तरी...पण ही

काही खरं बोलायची जागा नाही.

तो उठला. त्याने नोटा तिच्या हातात दिल्या

'आयॅम सॉरी व्हिकी.'

'व्हाय ?' तिला राग आला. 'यू आर नॉट गे ऑर समथिंग, आर यू ?'

'नो'

'अॅज यू से, बस्टर माझं काय जातय ?' व्हिकी उठली. नोटा नीट मोजून तिने पर्समध्ये ठेवल्या. खुर्चीवर टाकलेला झगा डोक्यावरून अगात सरकवला. उच टाचाचे बूट चढवले त्याच्याकडे पाठ फिरवून म्हणाली, 'झिप मी अप, विल यू, स्वीटी ?'

त्याने झिप ओढली. पर्समधल्या छोटचा आरशात बघून व्हिकीने लिपस्टिक लावल केसावरून ब्रश फिरवला. तोडात सिग्रेट धरली अर्धवट उघडलेल्या दारात उभ राहून त्याच्याकडे पाहिल.

'यू आर अ नाइस गाय्. पैसे चागले दिलेस तू. डू यू हॅव एनी प्रॉब्लेम ?'

तो एकाएकी थकला.

'व्हाय डॉन्च्यू गेट आउट नाऊ व्हिकी ?'

व्हिकीने धूर सोडला. 'यू नो तू वेडा आहेस खरोखर. मला मघापासून व्हिकी म्हणतो आहेस. मीही म्हटलं नाही काही. आय लेट इट राइड पण माझं नाव टीना आहे'

शिकागो येणार पाच मिनिटात मॅगी आली असेल न्यायला

मॅगी दारापाशी उभी. फुलाफुलाचा फ्रॉक, पिवळे केस, निळे डोळे. शेजारी शॉन.

'हाय मॅगी हाय शॉन.'

'हाय विकास.' मॅगीने चटकन त्याच्या बोटात बोट गुतवली तिच्या तोंडून आपल नाव ऐकायला बर वाटल

'कस काय झाल कन्व्हेन्शन ?'

'चागल झाल. पण कटाळा आला तू हवं होतस यायला.'

'तुला माहीत आहे. मला आवडत नाही वेगास शिवाय शॉनने मित्रांना बोलावून ठेवल होत घरी टेनिस टूर्नामेंटनंतर'

'चागली झाली का रे टूर्नामेंट शॉन ?'

'हो तर मी सेमी फायनलसपर्यंत गेलो. बट डॅड, डिड यू विन एनी मनी इन वेगास ?'

त्याने मान हलवली

'हाउ मच ? शभर दोनशे–?

त्याने हाताची पाच बोट हवेत उचलली. शॉन म्हणाला, 'जी...फाइव् हड्रेड बक्स. दॅटस् अ लॉट ऑफ मनी.' मॅगी त्याच्याकडे बघत होती.

'थकलेला दिसतो आहेस. बरं नाही का तुला ?'

'हो. झोप नाही लागली नीट.'

'घरी गेल्यावर झोप थोडा. उद्यापासून सुरू परत.'

'कोणाचे फोनबिन आले होते ?'

'हो. बुधवारी बार्बेक्यू आणि ब्रिजला जायचय स्मिथ मडळीकड आणि रिक्चा फोन आला होता. तुमच्या रविवारच्या गोल्फसाठी...'

तो घरात आला. घराचा नेहमीचा वास. त्याचा, मॅगीचा, शॉनचा. नीतीच्या रिकाम्या खोलीचा–माळघावरच्या वंद ट्रकेचा

'बियर हवीय् ?' मॅगीने विचारल. 'जेवायला होईल तासाभरात.'

'नाही. मी पडतो जरा.' तो गादीवर पडला. टेबलावर चौघाचा फोटो. तो आणि मॅगी, शॉन आणि नीती


मॅगीने खिडक्यावरचे पडदे खेचले. खोलीत सध्याकाळ झाली तो अर्धवट मोठचाने म्हणाला, 'आय लव् यू हनी'

मॅगीचा गार आवाज 'आय लव् यू टू. फार हळुवार होतोस तू कधीकधी, परत आलास की. झोप थोडा वेळ' तिचे मऊ गरम ओठ त्याच्या ओठांना स्पर्श करून गेले. पिवळ्या केसाचा मंद वास. मॅगीने दार ओढल.

काळ्यापाढऱ्या बाहुल्या हातात हात घालून डोळ्यापुढे नाचायला लागल्या.

□


**चोरटी प्रवासी वाहतूक जनतेची आणि शासनाची लुबाडणूक !**



महाराष्ट्राच्या हद्दीत कत्राटी तसेच टप्पे वाहतूक करण्याचे अधिकार शासनाने फक्त राज्य परिवहन महामडळाला दिले आहेत. तरीही चोरटी प्रवासी वाहतूक करणाऱ्या अनधिकृत गाड्या महाराष्ट्रात सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे महामडळ त्याला कायदेशीररीत्या मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नापासून वचित होते. तसेच सरकारचेही प्रवासी कर रुपाने मिळणारे उत्पन्न बुडते.

**एसटी बसगाड्यांतूनच प्रवास करा चोरट्या प्रवासी वाहतुकीला आळा घाला !**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामडळ
महाराष्ट्र वाहतूक भवन, मुबई ४०० ००८

# पर्यटन अर्थशास्त्र: जग आणि भारत

संजय होनकळसे

' पर्यटन, वाचन व निरीक्षण हे तीन ज्ञानदायक महागुरू होत ' हे सर्वश्रुत आहेच पण यांपैकी पर्यटन व पर्यटन व्यवसाय ही एक आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक उन्नतीची भव्य बाजारपेठ आहे हे अल्पश्रुत आहे.

पर्यटन व्यवसाय हा विविधोद्देशीय व विविधांगी उद्योग आहे. बहुउद्देशीय, कारण अनेकविध कारणांसाठी माणसांना पर्यटनाची जरुरी भासते. उदा. प्रवास, आनंदलालसा, ज्ञानलालसा, व्यापार, उद्योग, धर्मयात्रा, शिक्षण, शैक्षणिक तालीम, संशोधन, आंतरराष्ट्रीय व्यवहार व संबंध राजकीय सामंजस्य व संबंध तसेच पर्यटन विविधांगी आहे कारण यात अंतर्गत व बाह्य वाहतूक, खाद्यउद्योग, निवास, मनोरंजन, आयात–निर्यात इ. आर्थिक अंगे व सामाजिक, सांस्कृतिक ऐतिहासिक, इ. बाजू आहेत. त्याचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर दूरगामी परिणाम होतात. येथे आपण फक्त पर्यटन व्यवसायाच्या अर्थशास्त्रीय अंगाचा जागतिक पार्श्वभूमीवर भारताच्या दृष्टीने विचार करणार आहोत.

पर्यटन व्यवसाय हा जगातील सर्वांत मोठा, मुख्य व जलद गतीने वाढत असलेला व्यवसाय आहे. आज ३०० दशलक्ष पर्यटकांमार्फत दरवर्षी १०० बिलीयन डॉलरपेक्षा ( अमेरिकन ) जास्त आर्थिक उलाढाल होते. पर्यटन व्यवसायाच्या प्रगतीचा वेग जागतिक उत्पन्नाच्या वेगापेक्षा तीन पटीने जास्त आहे. म्हणजेच जर जगात उत्पन्न १००% ने वाढले तर पर्यटन ३०० टक्के या गतीने वाढते. एखाद्या देशाच्या दृष्टीने पर्यटन दोन विभागांत मोडते. अंतर्गत व परदेशीयांचे वा आंतरराष्ट्रीय पर्यटन. जगातील काही प्रमुख अर्थव्यवस्था उदा. स्वीत्झर्लंड, मेक्सिको, स्पेन, थायलंड इ. आज मुख्यत्वेकरून पर्यटन व्यवसायावर विसंबून आहेत. आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने अतिपूर्वेकडील राष्ट्रे, दक्षिण अमेरिका व पूर्व युरोपीय देशांचा अनुभव पर्यटन व्यवसायाचे खालील फायदे दर्शवतो.

(१) **निर्यात उत्तेजक** : पर्यटन व्यवसाय हे अप्रत्यक्ष निर्यातीचे एक मुख्य साधन होऊ शकते (Invisible Item of Trade) आणि गंमत म्हणजे पर्यटनाद्वारे झालेली निर्यात ही अप्रत्यक्ष तर असतेच पण ती राष्ट्रीय संपत्तीचे शोषण न करता प्रत्यक्ष देशाबाहेर वस्तू न जाता निर्यात होऊ शकते. कसे ते आपण पाहूया. सर्वसाधारण निर्यात सिद्धांताप्रमाणे एका देशातील वस्तू दुसऱ्या देशात नेऊन विकली जाते. पण पर्यटनामुळे एका देशातील निर्यात दुसऱ्या देशात वस्तू नेऊन करण्याऐवजी दुसऱ्या देशातील पर्यटक पहिल्या देशात येऊन खरेदी करतात ती अप्रत्यक्षरीत्या निर्यात ठरते. उदाहरणार्थ, समजा एखादा अमेरिकन जर भारतात आला व त्याने आंबा व वडासांबार खाल्ला तर वडासांबार व आंबा निर्यात झाल्यासारखे आहे. कारण वस्तू गिऱ्हाईक देशात जाण्याऐवजी, जागतिक गिऱ्हाईकच वस्तूजवळ येते. म्हणजे तहानलेला पाण्याजवळ जाण्याऐवजी पाणीच तहानलेल्या जवळ आल्यासारखे व ती निर्यात यासाठी कारण प्रत्येक गिऱ्हाईक येताना आपल्या देशाच्या चलनाची गंगाजळी बरोबर आणतात व ती गन्तव्य–देशाच्या परकीय गंगाजळीत भर घालते. तर खाद्यउद्योग पर्यटक निवास, अंतर्गत वाहतूक इ. पर्यटन साधने अशा रीतीने अप्रत्यक्ष निर्यातीस हातभार लावतात. व त्यामुळेच पर्यटन व्यवसाय ही परकीय गंगाजलीचे एक प्रमुख व सोपे स्रोत होत. जागतिक पर्यटकांनी केलेल्या खर्चाचा जवळजवळ १० टक्के भाग प्रत्येकी अमेरिका, स्पेन व इटली या देशात जातो. म्हणजेच अशा परकीय गंगाजळीच्या एक तृतीयांश भाग या तीन देशांत वाहतो यावरूनच त्या देशात पर्यटनास असलेले महत्त्व लक्षात येते.

(२) **रोजगार हमी** : पर्यटन व्यवसायात रोजगारी वाढवण्याची क्षमता आहे. त्यामुळे पर्यटन व्यवसायाची वाढ व विकास भारतासारख्या २७ दशलक्ष बेकारांच्या (नोंदलेले बेकार) देशात उपयुक्त ठरेल. पर्यटन विकासाने प्रत्यक्ष रोजगारी (Direct employment) अप्रत्यक्ष रोजगारी (Indirect employment) व स्वयंरोजगारी (self–employment) निर्माण होऊ शकते. इटली व U. K. येथे टूरिस्ट हॉटेलची एक ब्रँच जवळजवळ सात लाख माणसांना रोजगार देते. पर्यटन व्यवसायाची रोजगार क्षमता लक्षात येण्यासाठी हे उदाहरण पुरेसे आहे. पर्यटन विकासाने प्रत्यक्ष रोजगारी ही टूरिस्ट हॉटेल्स, उपहार गृहे, ट्रॅव्हल एजन्सीज्, टूरिस्ट शॉपस्, वाहतूक व हस्त व्यवसाय, दुभाषी, वाटाडे, मार्गदर्शक अथवा Guide, इत्यादी मार्गाने निर्माण होते. पण पर्यटनाने अप्रत्यक्षरीत्या इतर उद्योगात उत्तेजित रोजगारी (Induced employment) निर्माण होते. जसे बांधकाम व पुरवणी व्यवसाय–हस्तव्यवसाय, लघुउद्योग, आर्टस् व क्रॉफ्टस् (arts and crafts), कटलरी, क्रोकरी, ग्लासवेअर, फॅन्सी फॅब्रिक्स इ. पाहाणीनुसार असे आढळून आले आहे की एका पर्यटक निवास बांधकामाने ३ लोकांना प्रत्यक्ष तर त्याच्या नऊपट अप्रत्यक्ष रोजगारी निर्माण होते. उदा. भारतात १९८० साली ३५४१९ अधिक खोल्यांची गरज होती की, ज्यामुळे १,०६२५७ प्रत्यक्ष रोजगारी व ९,५६,३१३ लोकांना अप्रत्यक्ष रोजगारी प्राप्त झाली असती. त्याचप्रमाणे पर्यटन विकासाबरोबर निष्णात माणसांची गरज व मागणी वाढते, ती निराळीच. उदा इंटिरिअर डेकोरेटरर्स, ग्राफिक डिझाइनर, गार्डनर, Landscape designer वगैरे. याचप्रमाणे एक टूरीस्ट बस जवळजवळ १० ते १६ लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारी देते.

पर्यटन हे स्थानीय असल्याने त्याच्या विकासामुळे स्थानिक रोजगारी वाढते. शहरात वाढणारी गर्दी त्यामुळे कमी होते व समतोल प्रगती होते.

पर्यटनापासून आलेल्या प्रत्येक १०० रुपयातील ३३ टक्के म्हणजे तेहतीस रुपये हे पगार वाटपात जातात. यावरून पर्यटनाचे रोजगारीच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात येते.

**तक्ता क्र. १**

पर्यटकाने खर्च केलेले प्रत्येक १०० रुपये असे खर्च केले व वापरले जातात.

| | |
|---|---|
| १००% | ३ १/२ इन्शुरन्स की. |
| | ६% नफा |
| ९०% | ९½% सोयी. |
| ८०% | ११% कर |
| ७०% | ३०% |
| ६०% | पगार व |
| ५०% | बक्षिसी. |
| ४०% | |
| ३०% | ३७% |
| २०% | खाद्यवस्तू |
| १०% | |

(३) **राष्ट्रीय उत्पन्न गुणक** . निर्यात उत्तेजन व रोजगारी निर्मिती यामुळे पर्यटन व्यवसाय राष्ट्रीय उत्पन्न गुणकाचे काम करतो. सशोधन असे दर्शवते की, पर्यटकाने खर्च केलेला प्रत्येक रुपया एकाच देवाण–घेवाणीत न सपता तेरा ते चवदा देवाण–घेवाणीत अभिसरीत होतो. त्यापैकी ५–६ देवाण–घेवाण व्यवहार ( Transactions ) पहिल्या बारा महिन्यात होतात व गुणकाचे काम करतात. यालाच 'पर्यटन गुणक' म्हणून सबोधता येईल व अतिपूर्वेकडील देशात व पॅसिफिक प्रदेशात ३.२ ते ४.२ इतकी किंमत वा मूल्य येते त्यामुळे प्रत्येक १००० डॉलरचे पाच व्यवहारात ३२७२.५० डॉलर इतका गुणक परिणाम कसा होते हे (तक्ता क्र २) दाखवते.


सोप्या भाषेत सागायचे म्हणजे समजा एखाद्या पर्यटकाने हॉटेलसाठी १०० रु. खर्च केले तर त्याचा खर्च हे मालकाचे उत्पन्न होय. कारण एकाचा खर्च हा दुसऱ्याचे उत्पन्न व तसेच उत्पन्न हे खर्चाचे साधन होय. त्या १०० रुपयातून ३३ रु. पगार, ३७ रुपये खाद्य वस्तूवर इत्यादी ( तक्ता क्र. १ प्रमाणे ) तो तो पैसा त्या लोकाचे उत्पन्न वाढवतो व तसाच खर्चाचे साधन होतो. अशा रीतीने १ नोट जेवढ्या वेळेला फिरेल तेवढे उत्पन्न वाढते. जर वरीलप्रमाणे पाच वेळा पैशाचे अभिसरण धरले व गुणकमूल्य ३.२७ असेल तर एकूण उत्पन्न १०० X ३ २७ म्हणजे ३२७० रु. होते. हेच तक्ता क्र. २ मध्ये दाखवले आहे. तेथे १००० X ३२७ म्हणजे ३२७२.५० एवढे होतात ( तक्ता पहा ). याचा अर्थ असा की पर्यटन विकास हा राष्ट्रीय प्रगतीस पोषक असून राष्ट्राच्या विकासासाठी पर्यटन विकास होणे आवश्यक आहे.

(४) **खर्च–फायदा याचे प्रमाण कमी** . पर्यटन व्यवसाय नुसता राष्ट्रीय गुणक नाही पण पर्यटन व्यवसाय खर्चाचे प्रमाण उत्पन्नाच्या मानाने कमी आहे किंवा उत्पन्नाचे प्रमाण खर्चाच्या मानाने, इतर क्षेत्राशी तुलना केल्यास, जास्त आहे म्हणजेच पर्यटन व्यवसायात गुतवलेला प्रत्येक रुपया इतर व्यवसायापेक्षा जास्त नफा वा उत्पन्न देतो. भारताच्या दृष्टीने हे जास्त हितकारक आहे कारण दात आहेत पण चणे नाहीत अशी भारताची भाडवलाबाबत अवस्था आहे भारतात हे प्रमाण १ : १२ असे आहे. म्हणजे पर्यटन व्यवसायात गुतवलेला एक रुपया बारा रुपयाइतके उत्पन्न देतो व तेही जलद देतो

(५) **सरकारी तिजोरीत भर** : वर सागितल्याप्रमाणे पर्यटन व्यवसाय राष्ट्रीय उत्पन्न वाढवण्यास उपयुक्त ठरतो व त्यामुळेच त्याद्वारे सरकारी तिजोरीतही भर पडते सर्वसाधारणपणे सर्व देशात पर्यटन उत्पन्नाच्या दहा टक्के उत्पन्न सरकारी तिजोरीत जमा होते. यावरून असे निश्चितपणे सागता येईल की, जर पर्यटन व्यवसाय प्रगत झाला तर जास्त उत्पन्न सरकार मिळवू शकेल व तो अधिक पैसा अधिक कल्याणकारी योजना – ग्रामीण विकास, संशोधन, सार्वजनिक बाधकाम इत्यादी–इत्यादीसाठी राबवता येईल. याचाच अर्थ असा की पर्यटन प्रगती ही फक्त आर्थिक विकासाची द्योतक नसून आर्थिक कल्याणाचा ( Economic welfare ) पाया असू शकते.

**तक्ता क्र. २**

| खर्चाची बाब | देवाण–घेवाण व्यवहार डॉलरमध्ये | | | | | एकूण | प्रत्येक डॉलर-मागे वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| निवास | २५० | २५० | १७८ | ११२ | ६४ ५० | ८५४ ५० | ३.४२ |
| खाद्य व पेये | ३२० | ३२० | २११ | १३७ | ६३ ५० | १०५१ ५० | ३ २८ |
| खरेदी | २५० | २५० | १४९ | ८९ ५० | ४८ ५० | ७८७.०० | ३ १५ |
| साईट सीईंग | १०० | १०० | ७०.५० | ४१ | २५ | ३३६.५० | ३.३६५ |
| स्थानीय प्रवास | ५० | ५० | २९ | १६.५० | ७ ५० | १५३.०० | ३ ०६ |
| इतर | ३० | ३० | १६ ५० | ९ | ४.५० | ९०.०० | ३.०७ |
| | १००० | १००० | ६५४ | ४०५ | २१३.५० | ३२७२ ५० | ३.२७ |




(६) **विकासाचा समतोल** : आर्थिक प्रगती व आर्थिक कल्याण याबरोबरच पर्यटन विकासाने आर्थिक विकासाचा समतोलही साधता येतो. कारण मागासलेल्या विभागाचा जर पर्यटनक्षेत्र म्हणून विकास केला गेला तर विकसित व अविकसित भागातील तफावत दूर करता येत. यादृष्टीने अत्युत्तम व समर्पक उदाहरण म्हणून भारताच्या खजुराहोचा उल्लेख टाळता येणार नाही. खजुराहो, जे पंधरा–वीस वर्षांपूर्वी पर्यटनासाठी प्रसिद्ध नव्हते, ते आज जागतिक कीर्तीचे एक पर्यटनक्षेत्र झाले आहे. तेथे दरवर्षी लाखोंनी पर्यटक येतात व त्यामुळे जवळजवळ पचाहत्तर लाख रुपयांच्यावर उत्पन्न प्राप्त होते – ज्यामुळे स्थानिक लोकांना – गाईडस्, मातीकाम करणारे, फोटोग्राफर्स, वाहतूक व्यवसायी, हॉटेलवाले इत्यादी – रोजगारी प्राप्त होते. अशा रीतीने पर्यटनाने मागासलेल्या विभागांना फायदा होतो व नुसती प्रगती नाही तर न्याय्य प्रगती (Growth with justice) साधता येते.

(७) **आंतरराष्ट्रीय सामंजस्य** : पर्यटनाने आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सहकार साधता येतो. दोन व जास्ती देशांतील लोकांत मैत्रीचे व सलोख्याचे संबंध वाढतात.

(८) **स्वावलंबी प्रगती** : पर्यटन हा निर्यातीभिमुख व्यवसाय असल्याने त्यामुळे परकीय गंगाजळी घरबसल्या चालत येते, तर पर्यटन विकासामुळे त्यात वाढ होऊन परकीय कर्जाचा भार हलका होण्यास मदत होते व परावलंबी प्रगती टाळता येते.

## आपली कूर्मगती

पर्यटन हे अशा रीतीने आर्थिक विकास, आर्थिक समतोल, आर्थिक कल्याण व स्वावलंबी प्रगतीचे साधन असूनही भारताची पर्यटन विकासाची धाव जगाच्या मानाने कूर्मगतीने चालू आहे व भारत त्यामानाने फारच मागे आहे. खरे म्हणजे दैवाने भारतात पर्यटनाच्या दृष्टीने दोन्ही करांनी उधळण केली आहे. खालील बाबींवरून भारताचे पर्यटनातील आर्थिक मागासलेपण दिसून येते.

(१) भारताचा जागतिक पर्यटकांमधील वाटा फारच कमी आहे. सर्वसाधारणपणे जागतिक पर्यटकांच्या ०.३ ते ०.५ टक्केच पर्यटक भारतात येतात. आशियात पर्यटक आवकांच्या दृष्टीने भारताचा नववा नंबर लागतो.

१९७२ ते १९८२ दरम्यान जागतिक पर्यटकांची संख्या १९,८०,००,००० पासून २७,९९,००,००० इतकी वाढली तर त्या-

पैकी भारतातील आवक ३,४३,००० पासून १२,८८,००० पर्यंत वाढली. म्हणजे भारताचा वाटा १९७२ ला ०.१७ टक्के होता तो ०.४६ टक्के झाला आहे. म्हणजे भारतातील जागतिक पर्यटकाचा वाटा १ टक्का तर सोडाच पण जगाच्या मानाने अर्धा टक्का पण नाही. यावरून भारताच्या या क्षेत्रातील दयनीय परिस्थितीची जाणीव होते. (तक्ता क्र. ३ पहा)

**तक्ता क्र. ३**

**भारतातील जागतिक पर्यटकांची आवक**

| क्र वर्ष | जागतिक पर्यटकांची संख्या | भारतातील जागतिक पर्यटक | भारताचा सरासरी वाटा (टक्क्यामध्ये) |
|---|---|---|---|
| १९७२ | १९,८०,००,००० | ३,४३,००० | ०.१७ |
| १९७५ | २०,६९,००,००० | ४,६५,००० | ०.२२ |
| १९७९ | २६,९९,००,००० | ७,६५,००० | ० २८ |
| १९८० | २८,०१,००,००० | ८,००,००० | ०.२९ |
| १९८२ | २७,९९,००,००० | १२,८८,००० | ०.४६ |
| १९८४ | ३०,००,००,००० | १२,११,००० | ०.४० |

भारतात येणारे बहुतेक जगप्रवासी हे (६७ टक्के) पश्चिम युरोप उत्तर अमेरिका व दक्षिण आशियातील असतात.

(२) त्याचप्रमाणे पर्यटन उत्पन्नात भारताचा वाटाही एक टक्क्यापेक्षा कमी आहे (तक्ता क्र ४) १९८२ मध्ये पर्यटनापासून एकूण ९९,९०० मिलियन डॉलर एवढ्या उत्पन्नापैकी भारतास फक्त ७५० मिलियन डॉलर एवढेच म्हणजे ०.७५ टक्के उत्पन्न मिळाले. हा वाटा १९७९ ला ०.५१ टक्के होता.

**तक्ता क्र. ४**

**पर्यटन उत्पन्न व भारताचा त्यातील वाटा (मि. डॉलरमध्ये)**

| वर्ष | जग | भारत | भारताचा वाटा |
|---|---|---|---|
| १९७९ | ७५,००० | ३८४ | ०.५१ टक्के |
| १९८० | ९२,५०० | ४८२ | ०.५२ ,, |
| १९८२ | ९९,९०० | ७५० | ० ७५ ,, |

(३) भारताचे पर्यटन उत्पन्न हे त्याच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या मानाने इतर देशाशी तुलना केल्यास बरेच कमी आहे भारताचे पर्यटन उत्पन्न हे राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.०७ टक्के आहे तर ऑस्ट्रिया (७ %), स्पेन (५ %), स्वीत्झर्लंड (५ %), मेक्सिको (४५ %) इतके आहे.

(४) तसेच पर्यटन उत्पन्न हे एकूण निर्यातीच्या १ ५ टक्के भारतात तर ४३ टक्के मेक्सिको, ३३.५ टक्के स्पेन, २२ १ टक्के ऑस्ट्रिया असे आहे. पर्यटन उत्पन्न वाढीचे वार्षिक सरासरी प्रमाण भारतात जगाच्या पर्यटन उत्पन्न वाढीच्या सरासरी प्रमाणाच्या एक तृतीयांशच आहे.

पर्यटन हा इग्लड, स्पेन, इटली, आयर्लंड इ देशाचा क्रमांक एकचा निर्यात व्यवसाय असू शकतो. तर भारतात–जेथे दैवाने एवढी निसर्गसपत्ती व ऐतिहासिक पार्श्वभूमी, सास्कृतिक वारसा बहाल केला आहे–दिव्याखाली अधार का ? विचाराती याची खालील प्रमुख कारणे सागता येतील.

(१) सरकारी पातळीवरील पर्यटन विकासाच्या महत्त्वाबद्दल झालेली डोळेझाक यामुळे सास्कृतिक वारसा, ऐतिहासिक पार्श्वभूमी व नैसर्गिक सौदर्य असूनही 'अति सौदर्य तिथे अज्ञान' असे भारताच्या बाबतीत म्हणावे लागत आहे.

(२) अपुरे व दोषयुक्त पर्यटन व्यवस्थापन

(३) अपुऱ्या, अयोग्य व अर्धवट निवास सोयी

(४) कमजोर व दोषयुक्त अतर्गत वाहतूक व्यवस्था.

(५) पर्यटक आकर्षणाची त्रोटक सोय.

(६) दुर्लक्षित पर्यटक मनोरजन सोयी.

'जसे पेरले तसे उगवते' म्हणून भारताच्या प्रगतीसाठी व खऱ्या अर्थाने एकविसाव्या शतकाकडे कूच करण्यासाठी भारतास पर्यटन विकासाची बीजे पेरणे अत्यावश्यक आहे. वरील कारणमीमांसाच त्याची उत्तरे देतात. पर्यटन विकासासाठी खालील उपाय योजण्याचा निश्चय करणे जरुरीचे आहे.

(१) **सरकारी इच्छा** (Political will) : सरकारी धोरणे व योजना या दृष्टीने राबवल्या पाहिजेत. कारण जेथे स्वेच्छेने स्वारी, तेथे पाऊल हलक्या पदी.

(२) **पर्यटन व्यवस्थापन** : पर्यटनाचे व्यवस्थापन शास्त्रोक्तरीत्या व उपयुक्त करणे हेही आवश्यक आहे. त्यादृष्टीने पर्यटन व्यवस्थापनशास्त्र शिक्षण व सस्था सुरू करणे जरुरीचे आहे पर्यटनाचे व्यावसायिकरण व व्यवहारीकरण करणे आवश्यक आहे भारतात पर्यटन सचालक अनेक आहेत पण त्याचे व्यवहार व व्यवस्थापन अनेक त्रुटीनी भरलेले आहे पर्यटन सचालकाचे रजिस्ट्रेशन अनिवार्य करणे आवश्यक आहे व त्याच्यासाठी एक Code of oonduct तयार करणे आवश्यक आहे पर्यटक तक्रार निवारण करण्यासाठी काही उपाय योजणे जरुरीचे आहे पर्यटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोण योग्य नाही. पर्यटक सचालकाकडून बरेचदा पर्यटक ग्रासले जातात व बरेच वेळा अर्ध्यावर सोडून दिले जातात वा त्याची अडवणूक केली जाते. सचालकाचे सचालन होणे आवश्यक आहे तसेच Guides चागले सुशिक्षित तयार करणे उचित ठरेल. तसेच प्रशिक्षित दुभाषी तयार करणे आवश्यक आहे. भारतात सर्वसामान्यपणे Guides कडे पाहण्याचा दृष्टिकोण उचित नाहीये त्याचे महत्त्वच आपण जाणत नाही.

गाईड चार्जेस हे प्रवासखर्चात घेऊनही व गाईडची हमी देऊनही कित्येक ठिकाणी (मुख्यतः दक्षिणेकडे) गाईड पुरवला जात नाही त्याबद्दल अनेक परदेशी पर्यटकाच्या तक्रारी आहेत. गाईड हा मस्करीचा विषय आपल्याकडे समजला जातो.

(३) **योग्य व उचित निवास सोयी** · पर्यटन विकासाच्या दृष्टीने आणखी एक अडचण म्हणजे निवास सोयी. भारतात १९७९ साली ३६,३०० खोल्याची गरज होती पण १९८२ ला एकूण ४०५ हॉटेल्स-मध्ये २,९३२ खोल्याचीच व्यवस्था होती. यावरून निवास सोयी किती अपुऱ्या व त्याची वाढ किती कूर्मगतीने होत आहे हे समजण्यास अवधी लागणार नाही निवाससोयीच्या दृष्टीने खालील उपाय योजणे आवश्यक आहे

अ) बाधकामासाठी स्वस्त दरात पैसा उपलब्ध करून देणे.

ब) लायसन्सेस त्वरित व जलद वितरण करणे

क) बाधकाम व मशिनरीसाठी सबसिडीज् व ग्रॅन्टस् देणे (अशा उपायामुळे इग्लडमध्ये एका वर्षात २५००·बाधकामे होऊन, ८०००० खोल्या उपलब्ध केल्या गेल्या.)

ड) पर्यटक निवास बाधकामासाठी योग्य जागा आकर्षक किमतीत उपलब्ध करून देणे.

इ) इन्कमटॅक्स व वेल्थटॅक्समधून आकर्षक सवलती व सोयी उपलब्ध करणे. त्याचप्रमाणे मशिनरी मागवण्यासाठी Custom duty मध्ये सवलती जाहीर करणे

ई) सवलतीची व सुयोग्य समुद्री व रेल्वे वाहतूक व्यवस्था

(४) **वाहतूक व्यवस्था व सोयी**

सर्वसामान्य पर्यटकाची मुख्य गरज ही सुखमय व योग्य अतर्गत वाहतूक व्यवस्था कमीत कमी खालील उपाय योजणे आवश्यक आहे·

अ) विविध वाहतूक व्यवस्थामध्ये सख्य, सामजस्य व सहकार असणे आवश्यक आहे याला इतर देशांत Inter-modal transport system असे म्हणतात. त्यानुसार बहुतेक युरोपीय देशात एकाच तिकिटावर तेही भारतात काढलेल्या, अनेक वाहतूक प्रकारातून आपल्या गन्तव्य स्थानास पोहोचता येते उदा. समजा मुवई येथून पॅरिसला लडन येथे मुक्काम करून जायचे असेल तर येथून लडनला विमानाने व तेथे मुक्काम करून रोड व रेल्वे वाहतुकीने इग्लड ओलाडून पॅरिसला एकाच तिकिटावर जाता येते. म्हणजे एका तिकि-टात सर्व वाहतूक प्रकारच नाहीत तर दोनतीन देश ओलाडता येतात त्यातच स्थानीय वाहतूक येते असे भारतात कधी होईल? हे सर्व Inter-modal, Inter-country transport co-operation मुळे साध्य होते भारतात नुसत्या साध्या रेल्वेबुकिंग व रेल्वे बदलण्यातच अनत अडचणी येतात त्यात रेल्वे नोकराना द्यावे लागणारे 'चहा-पाणी' वेगळेच.

ब) विविध वाहतूक प्रकारांत सामजस्य व सहकार येण्याआधी प्रत्येक वाहतूक प्रकाराची योग्य ती प्रगती होणे आवश्यक आहे भार-तात अतर्गत जलवाहतूक ही अत्यंत दुर्लक्षित आहे अफाट जल-संपत्तीचा वाहतुकीसाठी योग्य असा उपयोग भारताकडून होत नाही. जलमार्ग हा कमी खर्चाचा आहे कारण रस्ते व रेल्वे यासारखी तेथे मार्गबांधणी करावी लागत नाही. जलमार्गाला मोकळा मार्ग आहे हे


**पर्यटकांचे श्रद्धास्थान !**

## सचिन ट्रॅव्हल्स

**नावीन्यपूर्ण मध्यप्रदेश टूर** : १९ ते २९ एप्रिल
इदोर-उज्जैन (महाकाळेश्वर) माडू, ओंकारेश्वर, महेश्वर, धार, सांची, भोपाळ, पचमढी, भेडाघाट, जबलपूर व खजुराओ.

**इंदोर-उज्जैन-मांडू** : १९ ते २४ एप्रिल
महाकाळेश्वर-ओंकारेश्वर

**संपूर्ण गोवा दर्शन** : ३० एप्रिल ते ५ मे व २३ ते २८ मे

**गोवा-गोकर्ण** : ३० एप्रिल ते ८ मे व २३ ते ३१ मे
औदुंबर, सागली, नरसोबाची वाडी, ज्योतिबा, सज्जनगड व कोल्हापूर

**काश्मीर दर्शन** : ११ ते २० मे व १८ ते २७ मे

**सिमला-कुलू-मनाली-मसूरी** : २५ मे ते ७ जून

**कलकत्ता-दार्जिलिंग** : ३ ते १६ मे
पुरी-भुवनेश्वर-कोणार्कसह

**कलकत्ता-नेपाळ-दार्जिलिंग** : ३ ते २० मे
पुरी-भुवनेश्वर-कोणार्कसह

**कलकत्ता-नेपाळ** : ११ ते २० मे

**म्हैसूर-बंगलोर-उटी तिरुपतीसह** :
१० ते १९ व २२ मे ते ३१ मे

**मिनी दक्षिण भारत** : २१ मे ते ३ जून
तिरुपती, मद्रास, त्रिची, मदुराई, शिवकाची, विष्णुकाची, महाबलीपुरम, रामेश्वर, कन्याकुमारी व कोडाईकॅनॉल.

**संपूर्ण दक्षिण भारत** : २१ मे ते ७ जून

**बद्रीनाथ-केदारनाथ** : ९ ते २३ जून
(गगोत्री जमनोत्रीसह) हरिद्वार-ऋषिकेशसह

**बद्रीनाथ-केदारनाथ** : ९ ते १८ जून
हरिद्वार-ऋषिकेशसह

**गंगोत्री-जमनोत्री** : १६ ते २३ जून
हरिद्वार-ऋषिकेशसह

सपर्क : **प्रमोद जकातदार**
छप्रा बिल्डिंग, प्लाझा सिनेमासमोर, आर. के. वैद्य रोड,
दादर (पश्चिम) फोन : ४५२६४९
(संपूर्ण दिवस) कार्यालय वेळ : ९ ते ११ व ५ ते ८

लक्षात घेतले पाहिजे. पण याबरोबरच रस्ते बाधणीत वाढ व्हावयाला पाहिजे इतर देशासारखे Six lane मार्ग नाहीत तर निदान योग्य त्या ठिकाणी योग्य असे द्रुतमार्ग तरी हवेत भारतातील सर्व रस्त्यापैकी फक्त तीस टक्केच राष्ट्रीय मार्ग आहेत.

(५) पर्यटक आकर्षित करण्यासाठी अनेकविध सोयी करणे आवश्यक आहे भारत हा फक्त देवळे, हत्ती, गारुडी व ताजमहाल या पलीकडे काही तरी जास्त आहे. उत्सव (गोवा), रग, नृत्य, लोककला निसर्ग, समुद्र व समुद्रसपत्ती, समुद्र किनारे, लेक्स नैसर्गिक चमत्कार (वसिष्ठ कुड, मनाली, अमरनाथ) डोंगर, दऱ्या, खोरी, पर्वत, जगल व जगलजीवन, हाईकिंग, ट्रेकिंग, खाद्य, ऐतिहासिक स्थळे, व्यापार, खेळ, शॉपिग इ या सर्वांची योग्य वेळेला योग्य ती प्रसिद्धी अनेक देशात व्हावयास पाहिजे.

**(६) मनोरंजन सोयी**

मनोरजन सोयी या पर्यटकास पुरवणे अत्यत आवश्यक आहे नाहीतर त्याच्या सर्व सध्याकाळ व्यस्त न राहता त्रस्त राहतील म्हणून स्थानीय लोकाच्या भेटी, स्थानीय लोकाच्यात जेवण व पेय पुरवणे, सगीत नृत्य, लोकनृत्य, लोककला, सिनेमा, नाटक, कॅब्रे व इतर प्रकारची Night life पुरवणे आवश्यक आहे

अशा रीतीने पर्यटन विकास हा राष्ट्रीय विकासाचा पाया करण्यासाठी पर्यटन विकास साधणे जरुरीचे आहे. काळ आणि प्रवाह कोणासाठीही थाबत नाही म्हणून जलद सुधारणा आवश्यक आहे कारण भारतास पर्यटनासाठी लागणारे सर्व काही दैवाने दिले आहे नाहीतर दैव देते आणि कर्म नेते अशी भारताची अवस्था होईल ☐

# पर्यटनाला चाललात, खालील बाबींची काळजी घ्या

१) पर्यटन ठिकाण आधी विचारपूर्वक ठरवा

ठिकाण निवडताना तेथील नैसर्गिक व हवामानविषयक गोष्टी लक्षात घ्या उदाहरणार्थ, नोव्हेंबर, डिसेंबर हे दिवस दक्षिण राजस्थान इ ठिकाणासाठी चांगले पण काश्मिर, हिमाचल प्रदेश येथे त्या वेळेस अतिशय बर्फ तर उत्तरेला इतर ठिकाणी बरीच थडी असते. तरीही दिल्ली, मथुरा, आग्रा, जयपूर इ. ठिकाणी थडीसाठी सर्व तयारीनिशी जावे

२) औषधाची पेटी बरोबर ठेवावी Bandaid, ovamin, Metacyn इ. बरोबर असणे चागले. तसेच लवग, विलायची, सुपारी इ बरोबर ठेवा. उलटीचा त्रास वाचवण्यासाठी. तसेच सुईदोरा व घडीची पिशवी बरोबर ठेवा.

३) तसेच उलटी होऊन बसमध्ये इतराना त्रास देण्याऐवजी व जागा खराब होण्यापासून वाचवण्यासाठी प्लॅस्टिकच्या रगीत पिशव्या बरोबर ठेवा उलटी त्या पिशव्यामध्ये करून पिशवी फेकून द्या. म्हणजे कोणाला त्रास होणार नाही व घाण वाटणार व होणार नाही.

४) आपण जात असलेल्या ठिकाणाबद्दल जास्तीत जास्त माहिती गोळा करा. जाण्यापूर्वी आपल्या शहरातल्या Tourist office मध्ये चौकशी करा व माहितीपत्रक व नकाशा घ्या किंवा I. T. D. C. (India Tourism Development Corporation Western Railway Bldg., A. C. C. office जवळ, चर्चगेट स्टेशन बाहेर) येथे चौकशी करा. त्याचप्रमाणे कित्येक राज्याचे वेगळे असे कार्यालय आहे Tourism office मुंबईत व इतर ठिकाणी आहेत. तेथे माहिती मिळवा. उदा काश्मिर टूरीझमचे ऑफिस 'चिनार' वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे आहे तेथे काश्मिरमधील सर्व माहिती व बुकिंगसुद्धा होते.

५) जर आपण Season मध्ये एखाद्या स्थळी भेट देत असाल तर तेथे राहण्याच बुकिंग Confirm करा सर्वसाधारणपणे सर्व मुख्य ठिकाणावर सरकारने टूरिस्ट रेस्ट हाऊसेस बांधलेले आहेत उत्तरेला तर ती स्वस्त व चागली आहेत त्या व्यतिरिक्त Youth Hostels पण सर्वत्र चागली आहेत. व्यापारी निवासापेक्षाही चागली व सुरक्षित आहेत. कित्येक ठिकाणाच बुकिंग हे मुबईतून होत.

६) जर आपण एखाद्या सहल सचालकाबरोबर जात असाल तर त्याच्या सर्व व्यवस्थेची व परतीच्या प्रवासाची खात्री करून घ्या गरज असल्यास तसा करार करा लक्षात ठेवा जशी तुम्हाला त्याची गरज आहे तशीच त्याना पण तुमची, म्हणजे सहलीला जाणाऱ्याची गरज असते. तुम्हाला आलेल्या चागल्या–वाईट अनुभवाची नोद त्याच्याकडे तुमच्या मित्र आप्तेष्टामध्ये व तुमच्याकडील मुख्य व स्थानीय दैनिकात नोद करा. लक्षात ठेवा. चागल्यातला चागला सचालक तुम्हाला अर्ध्या वाटेवरून सोडून देऊ शकेल व अडवणूक करू शकेल.

७) आपल्या सामानाची चागली काळजी घ्या. प्रत्येक नग दर मुक्कामी मोजून घ्या प्रवासात रात्री सामानाचे सर्व नग एका साखळीने बाधून ठेवा म्हणजे काळजी वाटणार नाही. सामानाच्या नगावर बाहेरून खालच्या तळाला आपल्या नावाची व पत्ता असलेली पट्टी चिकटवा

८) आपल्या परतीच्या प्रवासाची तिकिटे व काही पैसे नेहमी सुरक्षित ठेवा. स्वतःवर जास्त विश्वास असेल तर ते नेहमी आपल्या पर्समध्ये व खिशात पाकिटात ठेवा. जर स्वत पर्स वा पाकिट विसरण्याची शक्यता व भीती वा सवय असेल तर त्या वस्तू बॅंगेत सुरक्षित ठेवा.

९) आपल्याबरोबर किमती वस्तू उदा. सोने वगैरे उगीच जवळ बाळगू नका. सामानाचे ओझे जितके हलके असेल तितके चागले आजकाल बाजारात वजनाने हलक्या व शक्य असेल तिथे foldingच्या वस्तू मिळतात. उदा: छत्री, हवा भरून वापरावयाच्या उष्मा, छत्र्या, इस्त्री, स्टेपलरसारखी शिवायचे हातयत्र, shaving kit वगैरे वगैरे

१०) बॅंकेचे ट्रॅव्हलर्स चेक्स बरोबर घ्या पण त्याबरोबरच थोडी Cash पण बरोबर ठेवा ☐

# ॥ रुद्रनाथ यात्रा ॥ एक लादलं गेलेलं साहस

## सौ. अनिता परांजपे

मनुष्य ठरवतो एक आणि घडतं निराळंच! याची पुरेपूर प्रचिती देणारी आमची रुद्रनाथ यात्रा.

हिमालय जवळून पाहावा, मे महिन्याच्या सुटीत थोडी फार ट्रेकिंगची हौस भागवून घ्यावी ह्या विचाराने गंगोत्रीला निघालेले आम्ही, आठ आठ तास बर्फातून चालतो काय, अन् दोन दिवस अखंड चालू राहणारी बर्फवृष्टी हताशपणे बघत बसतो काय! भर पावसात रात्र जंगलात काढावी लागली. चोरी प्रकरणी आमच्या सामानाची झडती-सुद्धा घेतली गेली. सर्वच विचित्र! ह्या सर्वातून सुटका होऊन सुखरूप घरी परतलो. सगळे आपोआप घडत गेले.

गेली दोन वर्षे हिमाचल प्रदेशात ट्रेकिंगला गेल्यावर हिमालयाचे फारच आकर्षण वाढू लागले. गेल्या वर्षी मे महिन्याच्या सुटीत आम्ही गंगोत्रीला जायचे ठरवले. बारा वर्षे ते पन्नास वर्षे ह्या वयोगटातील आम्ही तेरा मुंबईकर एकदाचे प्रवासाला निघालो.

ऋषिकेशला 'यातायात' बस स्टॅंडवर येऊन थडकलो. बरीच बर्फवृष्टी झाल्याने आणि दरडी कोसळल्यामुळे गंगोत्री, यम्नोत्री व केदारनाथला बसेस जात नव्हत्या. बसस्टॅंड यात्रेकरूंनी खच्चून भरला. बरीच यातायात करून बद्रीनारायणाला जाणारी बस आम्हाला एकदाची मिळाली. वाटेत 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'ला जाता येईल असा विचार करून बसमध्ये बसलो. पण बस चमोलीला अडली. कारण हनुमानचट्टीला दरड कोसळली होती. जोशीमठला बऱ्याच बसेस अडकल्या. यात्रेकरूंची अतिशय गर्दी व गलिच्छपणामुळे चमोलीला परिस्थिती केविलवाणी झाली. चमोलीहून समोरच्या डोंगरातून गोपेश्वर-कडे जाणारा स्वच्छ शांत रस्ता आम्हाला खुणावत होता. चिपको आंदोलनाचा अभ्यास करण्यासाठी पूर्वी एकदा गोपेश्वरला येऊन गेल्यामुळे तो परिसर श्री. परांजप्यांच्या परिचयाचा होता. गोपेश्वरहून रुद्रनाथला जायचे असे ठरवले. बस सोडून दिली.

सॅक्स पाठीवर घेऊन आमच्या ट्रेकिंगला सुरुवात झाली. दोन-तीन तासांची दमछाक करणारी चढण चढून गोपेश्वराच्या देवळात आलो. बरेच कोरीव काम केलेले ते प्राचीन शिवालय होते. देवळाबाहेर भला मोठा त्रिशूल उभा केला होता. भारतातील अति पुरातन वस्तूंपैकी तो एक आहे असे कळले. योगायोग असा की त्याच दिवशी गोपेश्वरहून रुद्रनाथची पालखी जाणार होती. हिवाळा संपता संपता देवाचा मुखवटा रुद्रनाथला नेला जातो. पट उघडण्याचा समारंभ होतो. नंतर रुद्रनाथच्या यात्रांना प्रारंभ होतो. या वर्षीच्या बर्फवृष्टीमुळे पट उघडण्यास उशीर झाला होता. आम्हाला आयती सोबत मिळाली. आम्ही त्या वीस-पंचवीस लोकांबरोबर चालायला सुरुवात केली. चढाची पायवाट असल्याने त्या गावकऱ्यांबरोबर चालताना आम्हा शहरी लोकांचा दम निघाला. संध्याकाळ झाली. वाटेत ग्वाड नावाचे २५-३० उंबऱ्यांचे गाव लागले. पाटलांनी पूजा करून पालखीचे स्वागत केले. आम्हाला गावातील पंचायतघर राहण्यासाठी दिले. पालखीबरोबरचे लोक ग्वाड निवासी असल्याने आपापल्या घरी पांगले.

दुसरे दिवशी भल्या पहाटे आम्ही गावकऱ्यांच्या आधीच पुढे कूच केले. पायवाट अरुंद पण पक्की होती. मधेच पठार लागले. आजूबाजूच्या वृक्षांच्या सावल्यांमुळे उन्हाचा त्रास जाणवत नव्हता. पायवाट झाडीमध्ये लुप्त झाली. कुठे जावे असा संभ्रम पडला असताना गावकऱ्यांनी आम्हाला गाठले. उन्हे कलता कलता आम्ही एका गोशाळेजवळ येऊन पावलो. गोशाळा म्हणजे एका पठारावर गुरांचे पाचसात गोठे होते. पण तेव्हा ते रिकामे होते. चरण्यासाठी आलेल्या गुरांना बांधण्याच्या त्या जागा. रात्र गोशाळेत काढण्याचे ठरले. पुढे मुक्काम करायला निवाऱ्याची जागा नव्हती. चालून चालून भागल्याने फास्ट टु कुक असे नूडल्स करून खाल्ले. पाण्यासाठी मात्र मैलभर पायपीट करावी लागली.

पहाटे तीन वाजता उठून चालण्यास सुरुवात केली. आता वाट कठीण होती. दोन-तीन ठिकाणी कडे कोसळले होते. कोसळलेल्या धोंड्यांवरून उड्या मारत जावे लागत होते. त्या दगडधोंड्यातून झरा झुळझुळ वाहत होता. पुढे उभे चढ लागले. समोरचा सरळसोट उंच डोंगर बघूनच मन हबकून गेले. गावकरी केव्हाच पुढे निघून गेले होते. दुपारी त्या डोंगराच्या कण्यावर पोचून पलीकडे पाऊल टाकले मात्र... दूरवर केदार, बद्री, नंदाघुंटी इ. बर्फाच्छादित शिखरांची रांग स्वच्छ उन्हात तळपताना दिसली. आतापर्यंत आलेला सर्व थकवा क्षणात नाहीसा झाला. याचसाठी केला होता अट्टाहास... असे वाटणारे दृश्य बघून भरून आले.

आम्ही अकरा हजार फुटांची उंची गाठली होती. रुद्रनाथची उंची नऊ हजार फूट. म्हणजे आता उताराचा रस्ता. पुढे पालखी घेऊन माणसे गेली होती. डोंगराच्या कडेकडेने जाणारा 'सगर' गावाहून यात्रेसाठी काढलेला रस्ता पुढे दिसत होता. चांगली पायवाट होती. पुढे काय वाढून ठेवले आहे याची कल्पनाच आली नाही.

एका झाडाखाली बर्फ पडला होता. सगळे



**रुद्रनाथाच्या पिंडीवरील साज**

छायाचित्रकार : जयंत गोखले

◻

धावले. बर्फाचे गोळे केले. बरोबर आणलेले रूह–अफजा त्यावर टाकून खाल्ले.

पायवाटेवर बर्फ साठला होता. मोठ्या उत्साहाने एकमेकांना सूचना देत, काठ्यांचे आधार घेत त्यावरून चालत गेलो.

काही अंतर चालल्यावर आजूबाजूचे डोंगर व सबंध पायवाट बर्फाने आच्छादलेली दिसली. पोटात गोळा उठला. प्रयत्नपूर्वक धैर्य गोळा केले. एकामागून एक चालत होतो. सर्व डोंगराच्या वरच्या कण्यावर येऊन पोचलो.

डोंगराच्या पलीकडच्या उतारावर संपूर्ण बर्फ बघून सगळे गोठून गेले. गावकरी केव्हाच पुढे गेले होते. दृष्टी पोचत नव्हती इथपर्यंत संपूर्णपणे भुसभुशीत बर्फाचे साम्राज्य पसरले होते. त्या पांढऱ्याशुभ्र बर्फाचा धसका बसला. तशात वातावरण बदलू लागले. आकाश झाकोळून गेले. तुरळक बर्फवृष्टी होऊ लागली. डोक्यावर बरसाती घेऊन कापसासारख्या भुरभुरणाऱ्या बर्फाकडे हताशपणे बघत राहिलो. आकाशाच्या फाटक्या छपराखाली बर्फवृष्टी अंगावर घेत बर्फातच थांबायची वेळ आली. निवाऱ्याची जागा नाही. मागे फिरता येत नाही. पुढेही जाता येत नाही. असहाय्यता, अगतिकता म्हणजे काय हे त्याक्षणी पूर्णपणे कळून चुकले.

आमचे दैव बलवत्तर म्हणा वा देवाची कृपा म्हणा निसर्गाने आपल्या रौद्र रूपाची एक चुणूक आम्हाला दाखवून बर्फवृष्टी थांबवली. चरकलेल्या मनाला थोडासा दिलासा मिळाला. तेवढ्यात तीन–चार माणसे मागून येताना दिसली. एकदम हायसे वाटले. त्या यात्रेकरूंबरोबर एक 'गाईड'सुद्धा होता. गाईड कसला 'देवदूत'च तो. त्याला पुढे घालून आम्ही चालू लागलो. गावकऱ्यांच्या पाऊलखुणा बर्फात दिसत होत्या. त्या पाऊलखुणांवर पावले टाकून जात होतो. एकमेकांना धीर देत वाटचाल सुरू होती. भुसभुशीत बर्फात घसरून पडत असल्याने अंग बधिर झाले. अंधार पडू लागला. देऊळ तर अजून कुठे दृष्टिक्षेपात येत नव्हते. थोड्या वेळाने पायाला माती लागली. भरपूर चिखल होता. हंटरशूज पाण्याने थबथबून गेले होते. गेल्या दहा तासांत तहान, भूक, दमणूक ह्या सर्व जाणिवा नाहीशा झाल्या होत्या. खांदे बधिर झाल्याने पाठीवरच्या जड सॅकचे ओझे जाणवत नव्हते एकच उद्देश–कसेही करून देऊळ गाठायचे. त्याशिवाय गत्यंतर नाही. आजूबाजूला मिट्ट काळोख. भराभर पाय उचलत होतो.

त्या मिट्ट काळोखात एक दिवा लुकलुकला.

दिवा बघून सगळ्यांनी मदतीसाठी हाका मारायला सुरुवात केली. दिवा पुढे सरकताना बघून जीव भांड्यात पडला. टॉर्च डोक्याला बांधलेला एक मनुष्य सामोरा आला. ओळख सांगितली. मंदिराचा पुजारी होता तो त्याच्यामागे तीन–चार मदतनीस. एकाच्या हातात गरम चहाची किटली. त्या चहाची गोडी काय म्हणून वर्णावी !

त्यांच्या मागोमाग देवळाच्या मठात आलो. तेथील स्वागत अप्रतिम ! परत चहा, पायांना लावायला मोहरीचे तेल दिले. मोठी शेकोटी पेटवून दिली. गारठून गेलेल्या आम्हाला बूट काढण्यासाठी सुद्धा त्यांनी मदत केली. गरम रोटी, उडदाची उसळ दिली. स्वेटर्स, ब्लँकेटस् हवी का विचारले. आमची अपेक्षा फक्त निवाऱ्याची होती पण इथे त्यांनी गरम अन्न, उबदार वस्त्रे देऊ केली.

सामान आत ठेवू लागलो. साधुमहाराज म्हणाले की, 'इथे सामान कुठेही ठेवा. चोरीची कसलीच भीती नाही.' एवढा प्रचंड बर्फ तुडवून कोण येणार म्हणा चोरी करायला !

पहाटे जाग आली ती लोकांच्या गलबलाटाने. काहीतरी विचित्र घडल्याचं जाणवलं. कळलं की देवाची चोरी झाली. चांदीचे छत्र व गणेशमूर्ती चोरीला गेली होती. इथं माणसाच्या चोरीची भीती नव्हती; पण देवाची मात्र चोरी झाली. मन अगदी विषण्ण झालं. पट उघडण्याचा कार्यक्रम यथातथा पार पडला.

देवळात प्रवेश केला. दगडी शिवलिंगावर चांदीचे नाक–डोळे बसवलेले होते. पंचकेदार व्यापलेल्या शंकराचे तोंड म्हणजे रूद्रनाथ, त्याच्या जटा कल्पेश्वरावर, बाहू तुंगनाथावर, नाभी (मध्यभाग) मध्यमहेश्वरावर व पार्श्वभाग केदारनाथावर आहे. ह्या भूमीला म्हणतात रूद्रहिमाल ! गंगेच्या उगमस्थानाच्या दर्शनाने आम्ही संतुष्ट होणार होतो, पण इथे शंकराने स्वतःच्या मुखकमलाचे दर्शन देऊन आम्हाला धन्य केले.

स्वच्छ ऊन पडले होते. आजूबाजूला तुरळक बर्फ उन्हात चमकत होते. देवळावरच्या डोंगरमाथ्यावर जाऊन बसलो. उत्तर दिशेला बर्फाच्छादित शिखरांच्या उंचच उंच रांगा दिसल्या परत येताना गवताच्या मुळांजवळ पावले टाकून भराभर डोंगर उतरण्याचे तंत्र जमले. आजचा दिवस विश्रांती झाली. उद्या येथून निघण्याचे ठरले.

रात्री अंगावर ठिबकणाऱ्या गार थेंबांनी जाग आली. पाऊस सुरू झाला होता. छप्पर गळत होते. सकाळपर्यंत पावसाचे रूपांतर बर्फवृष्टीत झाले. थंडी हाडापर्यंत पोहोचली. स्वस्थ बसण्याखेरीज दुसरे काहीच करता येत नव्हते. अर्धा दिवस चहा करण्यात गेला. उरलेला अर्धा दिवस मूगडाळीचे सूप करण्यात संपला. दमट लाकडांमुळे मठीत धूर कोंडला. डोळ्यांतून पाणी काढत छोट्याशा दरवाज्यातून बाहेरील बर्फवृष्टी बघत बसलो. लाकडे नीट पेटवता येत नसल्याने काहीच ऊब निर्माण झाली नाही. देवळाच्या सेवकाने विस्तव पेटवून दिला पण तोसुद्धा आम्हाला राखता आला नाही. धूर असह्य होई तेव्हा डोक्यावरून ब्लँकेट घेऊन झोपत होतो. बर्फवृष्टीचा होणारा कमी–जास्त वेग बघत दिवस काढला. मधेच उघडीप होई. समोरील बर्फाच्छादित शिखरे दिसू लागत. लगेच

झाकोळून येई व बघता बघता दरवाज्यासमोर धुक्याचा दाट पडदा उभा राही त्या रात्री व दुसरे दिवशी देखील बर्फवृष्टी चालूच राहिली

सकाळी जाग आली खोलीबाहेर पाहिल. अटार्क्टिका मोहिमेत भाग न घेताही दक्षिण ध्रुवावर आल्यासारख वाटल बाहेरील सर्व वस्तू, खोल्याची, देवळाची छपरे बर्फाने आच्छादली गेली सेवक, पुजारी याची कामे बर्फात चालू होती. आम्हीच तेवढे गारठून बसून राहिलो होतो शेवटी एक एक जण उठला. छपरावरील बर्फ काढून पातेल्यात घेतला धुराने भरलेल्या चुलीवर ठेवला त्या चुलीवर मुगाची खिचडी करता करता सध्याकाळ झाली. आज मात्र बर्फातून चालताना मजा वाटत होती. लाबवर हिंडून आलो.


वातावरण निवळायला सुरुवात झाली उद्या ग्वाडचे गावकरी परतणार होते त्याच्याबरोबर निघण्याचे ठरवले. रूद्रनाथचा हा मुक्काम बर्फवृष्टीमुळे अविस्मरणीय झाला. देवाच्या दारी वसती करावी म्हणतात. आम्ही मुबईकर एक रात्र राहून लगेच निघणार होतो. पण रूद्रनाथाला ही गडबड मजूर नसावी. त्याने आम्हाला आणखी दोन दिवस ठेवून घेतले व आपले रौद्ररूप दाखवले ही बर्फवृष्टी कधी थाबणार व कधी इथून हालायला मिळणार असे झाले परतीचा मार्ग डोळ्यापुढे येऊ लागला आता तर तिथे कमरेइतक्या बर्फाचा थर साठला असेल, ह्या कल्पनेनेच भीती वाटली ह्या काळजीपुढे भूकही लागत नव्हती. अर्थात ती काळजी अनाठायी होती हे नतर वाटू लागले नुसती काळजी करून काय उपयोग! आलेल्या परिस्थितीतून मार्ग काढायलाच हवा होता.

'मारवाडिओ चलो' अशी ग्वाडच्या लोकानी आम्हाला पहाटे हाक दिली सामान घेऊन आम्ही साधूच्या मठात आलो तोपर्यंत ते सर्व पुढे गेले होते मदिरासाठी देणगी दिली व साधूचा निरोप घेतला. तेवढ्या वेळात त्यानी चहा व दोन ताटे भरून वाफाळत असलेला साजूक तुपातला शिरा दिला एवढ्या थोड्या वेळात कसा केला कोण जाणे! पच पच उप.काली शिरा खाऊन तृप्तीची ढेकर दिली व पुन. पुन्हा त्याचे आभार मानले औपचारिक नव्हे तर अगदी मन:पूर्वक असे खरे आभार आजतागायत कोणाचे मानले नसतील. त्याना नमस्कार करून निघालो. त्यानी 'आपकी यात्रा मगलमय हो। तुम्ही निश्चितपणे बर्फ पार करू शकाल' असा आशीर्वाद दिला. त्यामुळे आधार आला

रूद्रनाथाचा जयजयकार करून आमच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली. स्वच्छ ऊन होते बर्फाच्या मुलायम थरावर पुढे गेलेल्याच्या पाऊलखुणा स्पष्ट दिसत होत्या. हळूहळू भीती नाहीशी झाली. बर्फात चालण्याचे तत्र जमले व त्याचा आनद मिळू लागला जितके हळू चालू तितका पाय बर्फात अधिक खोल जात होता भरभर चालणे श्रेयस्कर होते मिठासारखे बारीक बर्फ उन्हात चमकत होते गॉगल काढून पुन्हा पुन्हा तो शुभ्र बर्फ पाहण्याचा मोह होत होता पण त्यामुळे डोळ्याना त्रास होण्याची भीती होती इतक्या शुभ्रधवल बर्फावर पाय ठेवताना वाईट वाटत होते काही अतरावर बर्फाचा अगदी उभा चढ लागला पाऊल ठेवताक्षणी ते खाली घसरत होते. खाली सबध पाढराशुभ्र डोगरउतार. दोन मिनिटे आम्ही सर्व अस्वस्थ झालो. पण धैर्याने एकामागून एक सर्वांनी चढ पार केला बर्फाचे गोळे करून एकमेकावर फेकण्याएवढी आमची मन:स्थिती सुधारली. डोगररागेच्या वरच्या कण्यावर आलो. रूद्रनाथहून निघाल्यापासून आम्ही सतत आठ तास बर्फ तुडवत चाललो होतो. मुबईच्या गर्दीत वाट काढत चालणाऱ्या आम्हाला आठ तासात चिटपाखरूसुद्धा दिसले नाही. अखेरीस बर्फ एकदाचा पार केला. आता सर्वजण पोपटासारखे बोलू लागले. हसू लागले भुकेची जाणीव झाली. जवळील लाडू–चिवडा खाल्ला.

बर्फ सपला. दगडधोडे सुरू झाले. 'सगर' गावाची पायवाट धरली वाट जगलातून जात होती हिरवीगार झाडी होती. उतार असल्याने दमणूक होत नव्हती अधार पडू लागला. पण रस्ता सपता सपेना. वाघ पाठी लागल्यासारखे चालत होतो काही झाले तरी आपण सगरपर्यंत निश्चित पोहोचू शकणार नाही असे दिसल्यावर बरीशी जागा निवडून रात्र जगलातच काढायचे ठरले. शेकोटीसाठी प्रत्येकाने चालताना काटक्या गोळा केल्या होत्या आपापल्या पथाऱ्या टाकल्या. काही तरी खाऊन शेकोटी पेटवूया असे म्हणत असतानाच पाऊस पडायला सुरुवात झाली शेकोटी पेटण्याआधीच विझून

रूद्रनाथचा मार्ग



गेली. स्लिपिंग बॅगमध्ये पाणी शिरून भिजलो. थोडा वेळ बॅगसकट बसून होतो. मग तसेच आडवे झालो. दोन तास जोराचा पाऊस पडला. हालचाल केली तर थंडी वाजत होती. जमिनीला टेकलेल्या भागातून कळा येत होत्या. तशातही डुलकी लागत होती. स्वप्नात डोळ्यापुढे बर्फच बर्फ दिसत होता. जंगलात राहायचे ठरले तेव्हा साप, विंचू, चित्ता कितीकांची भीती वाटली म्हणून सांगू ! पण मग कशाचेच भय वाटेना ! देवावर हवाला ! कशाकशाची भीती बाळगायची !

पहाटे लवकर उठलो. अंगात ऊब येण्यासाठी चालणे भाग होते. वाटेत छानसा झरा लागला. झऱ्याचे थंडगार पाणी हाच आजचा चहा ! रानगुलाब, रानचमेली फुलली होती. त्यांच्या सुवासाने परिसर दरवळला. जंगल दाट होते. आता मात्र वाघ पाठीमागे लागल्यासारखे न चालता 'जंगलकी सैर' करण्याचे ठरवले. तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पती बघत चाललो. जवळच्या पिशवीत छोटी रोपे भरत होतो. घरातल्या कुंडीत ही रोपटी रूजतील का असा विचारही मनात आला नाही. रानफुले केसात खोचत होतो. कारण आता आमच्या डोक्यावरील माकडटोप्या निघाल्या होत्या.

सकाळी दहा वाजता 'सगर' गावात पोचलो. छोटी वाडीच होती ती ! चहा मिळेल ह्या आशेने इकडे तिकडे विचारपूस केली. त्यांनी चहाची टपरी दाखवली. ती होती समोरच्या डोंगरात !

सगरहून बसने मंडलला आलो. तिथे उतरताच पोलिसांनी आमचे स्वागत केले. रुद्रनाथच्या चोरीची बातमी तोपर्यंत सर्वत्र पसरली होती आम्ही रुद्रनाथहूनच आलो आहोत असं कळताच त्यांनी आमच्या सामानाची झडती घेण्यास सुरुवात केली. हे आणखी कसले नवीन अरिष्ट ! ह्या पोलिसांचा आपल्यावर विश्वास बसेल ना ! एक रात्र बर्फवृष्टीत काढली, दुसरी जंगलात, पावसात भिजत काढली; तिसरी पोलिस कोठडीत तर काढावी लागणार नाही ना ! असले बायकी विचार माझ्या मनात येऊन गेले. पण ती झडती पोलिसांनी आमच्याबाबतीत केवळ उपचार म्हणून घेतल्याचं कळलं. त्याबद्दल त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली.

मंडलमधील स्थानिक लोकांनी आमच्या रुद्रनाथ यात्रेबद्दल व आम्ही सुखरूपपणे बर्फ पार केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. आम्ही काय सांगणार ! 'यदच्छया कठीण प्रसंग येत गेले. तसेच ते सुटतही गेले. आम्ही फक्त पटावरच्या सोंगट्या' असले आध्यात्मिक विचार प्रथम ह्या प्रवासामुळे माझ्या मनात आले.

इच्छा नसताना एक साहस आमच्यावर लादलं गेलं होतं. ते ज्यानं लादलं त्यानेच ते आपण होऊन संपवलं. पण त्या वादळात आम्हाला जीवनाची एक नवी दृष्टी मिळाली. दुसरे दिवशी आम्हाला ऋषिकेशकडे जाणारी बस मिळाली. परतीचा प्रवास सुरू झाला. पण मुंबईहून निघालेली जी 'मी' होते त्यापेक्षा मुंबईकडे निघालेली ही 'मी' वेगळी होते.

□



**अध्यात्माकडे वळण्यासाठी 'मुंबईचे परतीचे रिझर्वेशन नाही' हे कारण पुरेसे नाही म्हणतोय !**

# प्रवासवर्णनासंबंधी...

## चंद्रकांत वर्तक

प्रवासवर्णन म्हणजे काय ?

ढोबळमानाने बोलायचे तर–

प्रवासाचे, प्रवासासबधी, प्रवासातील प्रसंगा–अनुभवाचे, स्थळाचे, माणसाचे, प्रवाशाने स्वत केलेले–लिहिलेले जे वर्णन ते ‘प्रवासवर्णन’ होय असे म्हणता येईल.

पण मग ह्यातूनच प्रवासवर्णनाबद्दल काही अपेक्षा निर्माण होतात. प्रवासवर्णन ललित वाङ्मयातील एक प्रकार व्हायचा असेल तर ह्या अपेक्षाच्या पूर्तीच्या दृष्टीने–प्रवाशाने स्वत: केलेल्या वर्णनाची वाटचाल व्हावी लागेल. ही वाटचाल म्हणजे निर्मितीची प्रक्रियाच होईल

ह्या प्रक्रियेचा शोध घेतला तर काय दिसेल ?

ते असे–

१. प्रवास स्वत च केला पाहिजे.

२. प्रवाशाने त्या प्रवासाचे सस्कार मनामध्ये करून घ्यायला हवेत.

३. प्रवासवर्णन लिहिताना मनाने तो सारा प्रवास पुन्हा करावयाचा

४ प्रवासाच्या झालेल्या सस्काराचा आठव सतत मनाने त्याच्या लेखनाच्या वेळी करावयाचा

५ प्रवासाचे हे सस्कार म्हणजे स्थळाबद्दल, स्थळाजागी अनुभवलेले सास्कृतिक–सामाजिक जीवन, भेटलेली माणसे, घडलेल्या घटना ह्याच्याबद्दल स्वत च्या मनाशी केलेले चिंतनच होय ह्या चिंतनाचा आठव करावयाचा.

६ ह्या आठवालाच शब्दरूप द्यावयाचे.

७ हे शब्दरूप दिले जाताना प्रवासलेखकाचे म्हणून जे काही व्यक्तिमत्त्व असेल ते स्वभावत:च त्या शब्दरूपात उमटू लागेल.

८ एका परीने स्थळाचे व्यक्तिमत्त्व आणि प्रवासलेखकाचे व्यक्तिमत्त्व एकमेकात मिसळून जातील

असे जर घडले तर प्रवासवर्णन ललितवाङ्मयाचा एक प्रकार होण्याच्या दृष्टीने काही वाटचाल होईल.

◻

प्रवासवर्णन हा ललितवाङ्मयाचा एक प्रकार असला तरी कथा, कादबरी, नाटक ह्या वाङ्मयप्रकारासारखा तो नाही त्याची जवळीक काही प्रमाणात ललितनिबंध, आत्मचरित्र ह्याच्याशी होऊ शकते. त्यालादेखील अपवाद असू शकतो म्हणजे प्रवासातील अनुभवाबद्दल लिहिता लिहिता प्रवासवर्णन आणि लघुकथा एकमेकाच्या सीमारेषा ओलाडतात आणि त्यातून ‘प्रवासकथा’ लिहिली जाते गगाधर गाडगीळाच्या ‘सातसमुद्रापलीकडे’ (१९५९) मध्ये किंवा प्रभाकर पाध्याच्या ‘तोकोनोमा’ (१९५९) मध्ये अशा प्रकारच्या ‘प्रवासकथा’ वाचायला मिळतात त्यातले ‘स्थळत्व’ बाद केले तर त्या कथामधील स्वारस्य निघून जाईल आणि ‘कथापण’ काढून टाकले तर त्या मजकूराला प्रवासवर्णन म्हणून फारच जुजबी पणा प्राप्त होईल. त्याच्यामधील सारे लालित्य प्रवासवर्णन आणि कथात्मता ह्याच्या एकजीव होण्यात आहे. पण हे अपवाद म्हणून सर्वच प्रवासवर्णनकार ‘प्रवासकथा’ लिहू शकतीलच असे नाही म्हणून प्रवासवर्णनाची जवळीक ललितनिबध, आत्मचरित्र ह्याच्याशी सामान्यत होऊ शकते.

आत्मचरित्रात आत्मचरित्रकाराच्या आयुष्यातील अनुभवाचे कथन जसे वस्तुस्थितीच्या पातळीवरून होते तसे प्रवासवर्णनातही प्रवासवर्णनकाराच्या प्रवासातील अनुभवाचे कथन वस्तुस्थितीच्या पातळीवरून होते ह्यात एक सूक्ष्म साम्यही आहे आत्मचरित्रकाराला स्वत च्या आयुष्यातील घटना मनाने पुन्हा एकदा जशा–भोगाव्या लागतात–म्हणजे कल्पनेने त्या जगून स्वत.चा पुनर्शोध घेऊन त्याना शब्दरूप द्यावे लागते त्याप्रमाणे प्रवासवर्णनकाराला प्रवासानतर प्रवासवर्णन लिहिताना मनाने–कल्पनेने पुन्हा एकदा सगळा प्रवास जगावा लागतो–प्रवासातील अनुभवाचा पुनर्शोध घ्यावा लागतो आणि त्याचा लागलेला अन्वय शब्दांकित करायचा असतो. ही सारी प्रक्रियाच प्रवासवर्णनाला लालित्याच्या दिशेने नेत असते ह्या प्रक्रियेत प्रवासवर्णनकाराच्या सवेदनाशील व्यक्तिमत्त्वाला अपरिहार्य महत्त्व असते. उदा. :– एकच स्थळ अनेक प्रवासवर्णनकारानी पाहिलेले असले तरी त्या स्थळाचे वर्णन तो तो प्रवासवर्णनकार त्याने त्याने त्या स्थळाचा अनुभव जसा व ज्या पातळीवरून घेतला असेल त्याप्रमाणे करील. स्थळ तेच पण त्या स्थळाचे जगणे व्यक्तिव्यक्तीगणिक निराळे राहील व म्हणून त्याचे वर्णनही भिन्न भिन्न करील. साहजिकच व्यक्तिमत्त्वातील सवेदनशीलता, सस्कार आणि व्यक्तिमत्त्वाची समृद्धी ह्याचा संबध प्रवासवर्णनात अपरिहार्य ठरतो–व्यक्तिमत्त्वाचा कसच प्रवासवर्णनात उतरतो. आत्मचरित्रातल्या प्रमाणेच प्रवासवर्णनातही समग्र व्यक्तिमत्त्वालाच कौल लावलेला असतो.

प्रवासवर्णनात जो ‘मी’ येतो तो तरी कसा असतो ?

खरे म्हणजे प्रवास करणारा ‘मी’ व प्रवासवर्णन लिहिणारा ‘मी’ ह्याच्यात एक भेद आहे. लिहिणाऱ्या ‘मी’ ला प्रवास करणाऱ्या ‘मी’ च्या अवस्थेत कल्पनेने जाऊन प्रवासाचे सस्कार अनुभवावे लागतात. म्हणजे हे ‘मी’ दोन असतात व प्रवासवर्णन लिहिले जाताना ते एकरूप होतात – असे घडते म्हणून प्रवासवर्णनातील वस्तुनिष्ठ पातळी जाऊन आत्मनिष्ठा अवतरू लागते. ही प्रक्रिया प्रवासवर्णनाला लालित्याचे रूप देते प्रवासवर्णनामधील ‘मी’ हा मानस ‘मी’ असतो

प्रवासवर्णन प्रवासाचा ताजेपणा मनात असताना लिहिले जाणे स्वाभाविक असले तरी पुष्कळदा प्रवासाचा काळ व प्रवासवर्णन लेखनाचा काळ ह्यात खूप अतर पडते–दीर्घ-

काळही मध्ये लोटतो. स्थळ पाहण्याचा अनुभव, प्रसग घडण्याचा अनुभव हे सर्व दीर्घकाळ मनात रेंगाळत राहते–वी रूजलेले असते पण अकुरायला वेळ लागतो–चवीचवीने आठवणीच्या रूपाने ' प्रवास ' आस्वादिला जातो–' प्रवास ' पुन्हा पुन्हा मनातल्या मनात जिवत होतो. असा खूप काळ उलटल्यावर प्रवासवर्णन लिहिणे ह्या गोष्टीपेक्षा स्थळ कसे भावले ह्या गोष्टीला महत्त्व प्राप्त होते. भिन्न भिन्न पातळयावर एकच अनुभव घेणे ही ललितलेखनातील प्रक्रिया घडू लागते. प्रवासवर्णनाची रूढ पद्धत बाजूला ठेवून (गोविंद चिमणाजी भाटयाच्या प्रवासवर्णनातून ह्या रूढ पद्धतीचा उत्तम परिचय होऊ शकतो. ) प्रवासवर्णनकार स्वत.च स्वतःची दिशा शोधू लागतो.

◻

प्रवासवर्णनकाराच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच आणखी एक पदर प्रवासवर्णनात अनुस्यूत असतो. तो पदर म्हणजे स्थळाचे व्यक्तिमत्त्व होय. उदा. बौद्धकालीन लेणी आपण आजच्या काळात जरी पाहत असलो तरी त्या लेण्यात गेल्याबरोबर आपण आजचा काळ विसरून जातो कारण त्या लेण्याच व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या रूपान तो जुना काळ, त्या काळचे शिल्पित स्वरूपात असलेले अवशेष हे सर्व आपल्याला त्याच्यात शोषून घेते. शिवकालात एखाद्या दुर्गावर देखील असा अनुभव येऊ शकेल. कारण स्थळाच्या व्यक्तिमत्त्वात परपरेचे, इतिहासाचे, सस्कृतीचे सचित दडलेले असते. हे सचित वगळून स्थळ सर्वार्थाने पाहिले असे कधीच म्हणता येणार नाही. स्थळ सर्वार्थाने पाह्यचे तर त्याची नस आपल्याला सापडेल अशी सवेदनशीलता आपल्याजवळ हवी आणि आपल्यामागेही परपरेचे, सस्कृतीचे, इतिहासाचे सचित उभे असतेच. स्थळाच्या सचिताची आणि आपल्या सचिताची तार जुळली तर आपण लिहिलेले प्रवासवर्णन आपोआपच वेगळे सूर छेडू लागेल काका कालेलकराची प्रवासवर्णने वाचली तर ह्या गोष्टीचा प्रत्यय आपल्याला सहजपणे येऊ शकेल.

◻

एक मात्र नक्की की, निव्वळ प्रतिभा आणि कल्पकता ह्याच्या जोरावर कथा-कादबरीकार वाङ्मयातर्गत नवे विश्वच उभे करतो तसे प्रवासवर्णनकाराला कधीच करता येणार नाही प्रवास न करता प्रवासवर्णन कधीच लिहिता येणार नाही. त्यामुळे प्रवासवर्णनातील कल्पकता किंवा प्रतिभा वस्तुनिष्ठ पायावरच उभी राहत असते. पूर्वी प्रवास करणाऱ्या लोकामध्ये पुण्यप्राप्तीची इच्छा असणारे यात्रेकरू, धर्मप्रसारार्थ देशातर करणारा भिक्षू – मिशनरी, राजकारणासाठी देशोदेशी जाणारे राजदूत, वकील, एका ठिकाणी वास्तव्य न करण्याचे ' धर्मबधन ' असलेला सन्यासी, वणिक्‌वृत्तीने अलोट सपत्ती मिळवायला निघालेला व्यापारी, प्रदेश जिकायला निघालेले सैनिक, जगातील माहिती नसलेल्या प्रदेशाचा शोध लावण्याच्या ईर्षेने भरलेले दर्यावर्दी असे विविध प्रकारचे लोक असत. त्याच्या प्रवासाच्या प्रेरणा प्रवासलेखकाच्या कधीच नव्हत्या तरीही त्यानी प्रवासाची वर्णने लिहिली. त्या वर्णनात देश–काल–परिस्थिती हालअपेष्टा, मौजमजा इ हकिकती वस्तुनिष्ठपणे येतात. ही वर्णने म्हणजे प्रवासवृत्तात होते.

फाहियानची वर्णने, ह्युएनत्संगची वर्णने, इत्सिगची वर्णने, स्पॅनिश, पोर्तुगीज, इटालियन दर्यावर्द्यांवर मात करणाऱ्या ईर्षेने भारलेल्या इग्लिश दर्यावर्द्यांची वर्णने (ह्या वर्णनाचे सकलन रिचर्ड हॅक्ल्यूटने केले आहे), ड्रेक, कॅव्हेंडिश इ. च्या मोहिमा, वेस्ट इंडिजकडील भ्रमणे (ह्याचा सकलक सॅम्युएल पर्चाज आहे) सर वॉल्टर रॅलीचे गियानाच्या प्रवासाचे वृत्त–अशी वर्णने म्हणजे प्रवासवृत्तातच आहेत हे वृत्तांत रोमहर्षक जरूर आहेत पण त्यात प्रवासवर्णनकार स्वत ला बाजूला ठेवत असतो.

आपल्याकडेही ' अटण ', ' तीर्थयात्रा ' होत्या; पण त्याचा हेतू केवळ धार्मिक होता. त्यामुळे कुणी प्रवानवर्णन लिहिण्याचे मनात आणले नाही. त्यासाठी यावे लागते इग्रज राजवटीच्या काळात ! इग्लिश वाङ्मयाने मराठी साहित्याला जे नवे वाङ्मयप्रकार (कथा, कादवरी, ललित–निबध, निबध, प्रवाणवर्णन इत्यादी) दिले त्यात प्रवासवर्णन हाही आहे त्यामुळे १९ व्या शतकाच्या प्रबोधनयुगात कोलबस, कुक ह्याच्या प्रवासवृत्ताताची भाषातरे झाली. (कोलबसाचा वृत्तात–महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर–१८४९; कप्तान कुक ह्याच्या जलपर्यटनाचा वृत्तात–गणेश सदाशिवशास्त्री लेले-१८५३). पण जेव्हा खरा आणि नितात निराळा असा अस्सल अनुभव आला तेव्हा वृत्तीने आणि पिंडाने लेखक नसूनही गोडसे भटजीनी जे लिहिले ते प्रवासवृत्ताताच्या मर्यादाना पालाण घालीत पलीकडे गेले. वरील विवेचनात उत्तम वाङ्मयकृती म्हणून प्रवासवर्णनाच्या ज्या कसोटया ठरवण्याचा प्रयत्न केला त्या एकाच झेपेत गोडसे भटजीनी आत्मसात केल्या त्याचे ' माझा प्रवास ' हे १८५७ च्या धामधुमीत त्याना सोसाव्या लागलेल्या अनुभवाचे कथन करते; पण ते त्यानी लगेच लिहिलेले नाही २५ / २७ वर्षांनी चिंतामणराव वैद्याच्या प्रेरणेने त्यानी लिहिले – १८८३–८४ च्या सुमाराला. वैद्यानी ते १९०७ साली काटछाट करून प्रसिद्ध केले कारण १८५७ च्या स्वातत्र्ययुद्धाला तेव्हा पन्नास वर्षे पुरी झाली होती. ह्या धामधुमीत त्याच्या आयुष्याची जी वणवण झाली, झाशीची लढाई आणि तिथली कत्तल, लुटालूट (बीजन), तसेच मृत्यू सतत करीत असलेला पाठलाग–द्रव्य मिळवायला गेले पण तसेच आले (दारिद्र्य मागल्या, पुढल्या दारी घिरटतच राहिले) ह्या साऱ्याची 'पुनर्निमिती' च ' माझा प्रवास ' मध्ये झाली आहे ' माझा प्रवास 'चे लेखनही गोडसे भटजी उत्तर हिंदुस्थानातून परत आल्याबरोबर लगेच झालेले नाही. सुमारे दोन तपानी झाले हे लक्षात घेण्यासारखे आहे; पण एक आहे की एवढ्या बडाच्या धामधुमीतही गोडसे भटजी घडलेल्या घटनाची टिपणे लिहून ठेवीत होते. असे जरी असले तरी लिहिण्याच्या आधी मधल्या काळात त्यानी अनेकाना ही प्रवासाची हकीकत सागितली असणार – ह्या टिपणाच्या आधारेच ते सागत असणार. हकीकत सागता सागतानाच त्या वेळचे प्रसग, तीर्थाच्या ठिकाणचे वातावरण, लढाया, वडवाले इ गोष्टी त्याच्या मनात ठसूनच गेल्या त्या सर्वांना ठसठशीत रूप लाभले–हे रूप ' माझा प्रवास ' वाचताना

आपल्याही मनाला जाणवते. हकीकत सांगतानाच गोडसे भटजी मनाने असंख्य वेळा हा प्रवास करीत होते. ते लिहू लागल्यावरही ही प्रक्रिया घडली होती. ह्या प्रक्रियेनेच 'माझा प्रवास' ललितपूर्ण केला. ललित ते असते की एखादे अमूर्त मूर्त करते. 'माझा प्रवास'च्या वाचकाला तो काळ अमूर्तच आहे– अनुभवही अमूर्तच आहेत– गोडसे भटजींनाही एकदा प्रवासातून परतल्यानंतर अमूर्तच झाले आहे. ह्या अमूर्ततेचे मूर्तीकरण ते आपल्या लेखनात करतात–वाचकालाही त्याचा प्रत्यय देतात. असे झाले आहे म्हणून तर 'धार'चा दानाचा प्रसंग, झांशी युद्धाचे ११–१२ दिवसांचे वर्णन, राणीच्या दिनचर्येचे वर्णन, राणीचा विहिरीवर पाणी पिण्याचा प्रसंग, झांशीचे वीजन, 'बंड्या'-तील प्रसंग, लखनौची जागरणे व मौज इ. ना सजीवता लाभली आहे. 'माझा प्रवास' एक उत्तम वाङ्मयीन कृती ह्यामुळेच ठरते.



आणखीही काही वैशिष्ट्यपूर्ण प्रवासवर्णनांचा उल्लेख करता येईल. तो म्हणजे जगन्नाथ विठोबा क्षत्रींनी 'गोकर्णमहाबळेश्वर यात्रेप्रकरणी वृत्तांत लिहिला. (१८६३) पं. रमाबाईनी 'इंग्लंडचा प्रवास' लिहिला. हंसस्वामींचे 'कैलासमानससरोवरदर्शन' (१९१०)ही 'माझा प्रवास'च्या तोडीचे आहे (१८८३). (पहा माणूस – दिवाळी अंक १९७८) लो. टिळकांनी 'मद्रास, सिलोन, ब्रह्मदेशातल्या प्रवासा'वर वसंत व्याख्यानमालेत व्याख्यान दिले–तेही पुस्तकरूपाने आले. पावगींची 'विलायतची वर्णने' आली. प्रवासवर्णनाची संख्या वाढू लागली; पण एक–दोन अपवाद वगळले तर बहुतेक वर्णने प्रवासाचे वृत्तांतच होती. अगदी न. चिं. केळकरांची 'विलायतची बातमीपत्रे' (१९२२) जमेस धरले तरी !

प्रवासवर्णन–एक ललित वाङ्मयीन कृती म्हणून त्या दिशेने प्रवासवर्णनाला ओढणारे म्हणजे काणेकरांचे 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' (१९४०) हे होय. ह्या प्रवासवर्णनात लेखकाचे मन, व्यक्तिमत्त्व, संस्कार, संवेदनशीलता, स्थळा–माणसांबाबतचे कुतूहल, देशकाल परिस्थितीचे सम्यक् आकलन, त्याचबरोबर एक निरोगी, खेळकर, मिस्कील वृत्ती ह्यांचे एक अचूक रसायन तयार झालेले आढळते. ना. सी. फडक्यांनीही 'कमलपत्रे' (१९४९) हे सुबक प्रवासवर्णन त्याच्या लघुकथा तंत्राच्या आडाख्यांवरहुकूम लिहिले आहे.

काणेकरांनी खुल्या करून दिलेल्या दिशेने मग अनेकांनी मोर्चे बांधले; पण त्यातही प्रयोगशीलतेने प्रवासवर्णनाला गंगाधर गाडगीळांनी अधिक मोकळे केले. (गोपुरांच्या प्रदेशात (१९५२) साता समुद्रापलीकडे) पाध्यांचे 'तोकोनोमा,' ज्ञानेश्वर नाडकर्ण्यांची 'विलायती वारी' (१९५८) वसंत बापटांचे 'बारा गावचे पाणी' (१९५९) दि. बा. मोकाशींची 'पालखी' (१९६४) आणि 'अठरा लक्ष पावले' (१९७१) अशी प्रवासवर्णने म्हणजे सुंदर शिल्पेच आहेत. ह्या सर्वात मोल आहे ते रा. भि. जोश्यांच्या 'वाटचाल' आणि मजल दरमजल'ला ! त्यांची रसिक, सौंदर्यग्राही दृष्टी आणि वाचकाच्या मनातही एक आर्त हुरहूर निर्माण करणारी भावसंकुल वृत्ती ह्यांचा संगम त्यांच्या प्रवासवर्णनात झालेला आहे.

प्रवासवर्णन ह्या वाङ्मयप्रकाराची प्रकृती आणि स्वरूप ह्याचा विचार येथपर्यंत थोडक्यात केला. त्याचे निकषही स्पष्ट करण्याचा प्रयत्न काही प्रवासवर्णनांचा थोडाफार अभ्यास करीत केला. ह्यावरून लक्षात येईल की कुणीही प्रवास करून यावे आणि प्रवासवर्णन लिहावे इतके सोपे आणि सुलभपण (किंवा क्षुद्रपण) त्याच्या लेखनात नाही. तिथेही ललित वाङ्मयीन कृतीचीच सर्जनप्रक्रिया घडत असते. प्रवासवर्णन हा इतका व्यापक वाङ्मयप्रकार होऊ शकतो की तो ललितनिबंध, कथा (विनोदी), ललितलेखन ह्यांना आपल्यात सामावून टाकतो.

# मनं जोडणारं पर्यटन

## विनय सहस्रबुद्धे

पंच्याऐंशी सालातली गोष्ट. बाबा आमटयांची पंजाबातली शांतियात्रा – भारत जोडो यात्रा–हा काय आणि कितपत प्रभावी प्रकार आहे हे पहायला जालंदरला गेलेल्या एका मित्रानं पत्रात लिहिलं होतं – 'पदयात्रेतून नेमकं काय साध्य होईल याबद्दल आत्ताच काही सांगणं तसं कठीण आहे. व्यापक परिणाम वगैरेंबद्दल तर सर्वदूर साशंकता आहे. अर्थात एक नक्की. भारत जोडो काय किंवा ज्ञानप्रबोधिनीची सद्भाव यात्रा काय, या दोन्हीच्या निमित्तानं पंजाबात आलेल्या आणि पंजाबातली परिस्थिती अनुभवलेल्या शे–पाचशे मंडळींना एक फर्स्ट हँड एक्सपिरियन्स मिळणार यात शंका नाही. परिस्थिती वरवर तशी शांत असतानाही आतून किती स्फोटक आहे व अगदी क्षुल्लक, निरुपद्रवी कारणांवरूनही कसा भडका होऊ शकतो याची जाणीव इथं डोळसपणी वावरणाऱ्या कोणालाही व्हावी.

'इतरांचं कशाला, माझंच उदाहरण सांगतो. जालंदरच्या देवीतालाब मंदिराच्या धर्मशाळेत मी उतरलोय. हे मंदिर हिंदूंचं! थेट अमृतसरच्या हरमंदिर साहेबची कॉपी. मध्ये देऊळ, भोवती तलाव आणि त्या सभोवार दगडी, पक्की बांधलेली परिक्रमा. मुक्कामात ओळखीचे झालेले दोन–चार हिंदू मित्र व त्यांच्याबरोबरचा एक शीख तरुण मुलगा असे आम्ही सकाळी सकाळी देवदर्शनाला जात होतो. परिक्रमेच्या सुरुवातीला बांधलेल्या दगडी दारातूनच आत जावं लागतं, आम्ही चौघे, बरोबरचा शीख तरुण वगळता – सर्वजण अनवाणीच होतो आणि केवळ अनवधानाने तो शीख तरुण पायातल्या स्लीपर्ससह आत आला. मंदिराच्या अंतर्द्वारात सफाई काम करणाऱ्या महिलेनं हे बघितलं नि जो तोंडपट्टा सुरू केला...शेवटी म्हणाली, 'आपके हरमंदिरमें हमारावाला कोई ऐसा स्लीपर डालकर आता तब तो आप गोलीसे उडा देते. खैरियत समझो, आपको धक्के लगाकर बाहर नहीं भिजवा रहें।'

'आम्ही मध्ये पडलो म्हणून तो बचावला. नंतर सगळं शांत झाल्यावर तो विशीबाविशीतला शीख तरुण म्हणाला, 'इतनी मामूलीसी बाते दंगे–फसाद का कारण बनती है। मैं अकेला होता तो मुसीबत आती।'

वातावरण किती स्फोटक आहे याची ही एक चुणूक!'

¤

'पर्सनल व्हिजिट इज द ओन्ली आय ओपनर' हे किती खरंय! स्वतःहून आपण जोपर्यंत काही पाहत नाही, अनुभवत नाही तोपर्यंत खरीखुरी जाणीव आपल्यापर्यंत पोहोचत नाही. पंजाबात जे खरंय तेच शिलाँगला, दूर अरुणाचल प्रदेशात आणि नागभूमी, मणिपूर इथेही!

¤

पाच–सहा वर्षांपूर्वी आम्ही मणिपूरला गेलो होतो. प्राध्यापक थोंग्रीसिंग यांच्या घरात उतरण्याची व्यवस्था होती. घरात सगळं पाश्चात्त्य वातावरण. सगळा थाट थेट साहेबी पद्धतीचा. पोशाख, गाण्यांच्या सुरावटी, घरातली सजावट, सगळं तद्दन विलायती. पाच–सात वर्षांची त्यांची दोन नातवंडं आहेत. एकाचं नाव यांग–त्सी सिंग आणि दुसऱ्याचंही असंच. चिनी–मणिपुरी असं भेसळ! गोड हसऱ्या चेहऱ्याच्या त्या खेळकर मुलांना मी सहजच विचारलं की, 'तुमची नावं निखळ भारतीय का नाहीत?' त्यांच्यापेक्षा पाच–सहा वर्षांनीच मोठ्या असलेल्या आणि कॉनव्हेंटमध्ये शिकणाऱ्या त्यांच्या स्मार्ट चुणचुणीत बहिणीनं सांगितलं– 'वुई हेट इंडियन नेम्स.'

¤

अरुणाचलाच्या अप्पर सुखानसिरी जिल्ह्याचं मुख्य ठिकाण म्हणजे झिरो नावाचं छोटेखानी टुमदार गाव. या गावाच्याजवळ आपातानी जमातीच्या एका वस्तीवर आम्ही गेलो होतो. तेव्हा पूर्वांचलात प्रत्यही आढळणाऱ्या या भारतद्वेषाचं एक कारण आम्हाला समजलं. तसं पाहिलं तर सगळी वस्ती तशी खाऊन पिऊन सुखी वाटली. भरपूर भात पिकवावा, मिथुन नावाच्या रेड्यासारख्या प्राण्याचं मांस यथेच्छ खावं आणि उरलेल्या वेळात टिपूर चांदण्याच्या प्रकाशात परंपरागत नाच–गाणी फुलवावीत असा सगळा दिनक्रम. इतक्या सुस्थिर जीवनात तुम्हाला नेमक्या समस्या अशा काय आहेत, म्हणजे मुळात आहेत की नाहीत?– या आमच्या प्रश्नावर निर्मळ मनाच्या, प्रामाणिक वृत्तीच्या त्या वस्तीवाल्यांनी सांगितलं, 'आम्हाला कोणी ओळखत नाही हीच आमची खरी समस्या आहे. आम्हाला सांगतात की आम्ही इंडियात राहतो. पण ना आम्ही कधी इंडियात गेलो, ना इंडियावाले कधी इकडे आले.'

'आयडेंटिटी क्रायसिस' असं जे इंग्रजी पत्रकार वारंवार म्हणत असतात, ते नेमकं हेच!

¤

हाच 'आयडेंटिटी क्रायसिस' गेल्या डिसेंबरात अंदमान–निकोबारला गेलो असतानाही अगदी तीव्रतेने जाणवला. विद्यार्थी परिषदेच्या आंतर-राज्य छात्र जीवन दर्शनच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आम्ही निकोबार बेटावर गेलो होतो. निकोबारी जमात ही अंदमानात ह्या वेगवेगळ्या जमातींपैकी सर्वात मोठी जमात. सगळे निकोबारी एक जात मंगोलाईड–मंगोल वंशीय. पुण्याच्याच विजय आणि सरोजा परूळकरांच्या मदतीने तयार केलेला 'संवाद' नावाचा एक स्लाईड–शो आम्ही निकोबारी जमातीच्या काही विद्यार्थ्यांना दाखविला. संपूर्ण स्लाईड–शो ईशान्य भारताच्या संदर्भातला, त्यामुळे अरुणाचल, मणिपूर आणि नागभूमीच्या अनेक मंगोलवंशीय जमातीच्या लोकांचं बरंच चित्रीकरण त्यात होतं. संपूर्ण स्लाईड–शो बघितल्यावर एका निकोबारी विद्यार्थ्यानी काढलेले सहजोद्गार आयडेंटिटी क्रायसिसचं जिवंत उदाहरण म्हणायला हवेत. तो म्हणाला, ,इसका मतलब मेन लँड (मुख्य भूमि) में भी

हमारे जैसा छोटे आँखोंका, चपटे नाक का (म्हणजे मंगोलाईड) आदमी लोग रहता है तो. हमे लगता था की हमही केवल इंडिया में अलग जैसे दिखनेवाले हैं।'

सहज मनात आलं, नुसता स्लाईड शो बघितला तर या उपेक्षित वनवासींना इतका आपलेपणा वाटला, मग प्रत्यक्ष नागा, मणिपूरी लोकच इथे आले किंवा निकोबारी मंडळीच पूर्वांचलात गेली तर–?

◻

राष्ट्रीय एकात्मता हा शब्द वापरून वापरून इतका गुळगुळीत झालाय की त्याची काही सूचित, ध्वनित करण्याची शक्तीच जवळपास नाहीशी झाली आहे. या शब्दाचा नेमका अर्थ काय असं कुणी विचारलं तर आपण काय उत्तर देऊ ? बहुतेक वेळा हा शब्द वेगवेगळ्या उपासना पद्धती असणाऱ्यांमधली एकता या अर्थानेच फक्त वापरला जातो. त्यामुळे सरकारी थाटाच्या प्रचार साहित्यात तर एकता म्हणजे एक दाढीधारी मुसलमान, जरा 'मॉड' वेशभूषा केलेला एक ख्रिश्चन, आणि एक हिंदू (हा बहुधा भस्म–बिस्म लावलेला, शेंडी राखणारा ब्राह्मण दाखविण्याची पद्धत आहे. इतर जाती काय हिंदू नाहीत ? की फक्त प्रतिभात्मक रेखाटनाची सोयच महत्त्वाची ?) असे तिघं, (नि अलीकडे एक फेटाधारी शीखही दाखवायला लागतो.) दाखविण्याची सामान्यतः एक पद्धत आहे. क्वचित कधीतरी बहुढंगी, बहुरंगी वेशभूषा केलेले, वेशभूषेतला फरक ठळकपणे पुढे आणणारे. विविध प्रांतांतले लोक बहुधा जोडपी– एकत्र आणून त्यांची रांग वगैरे दाखविण्याचाही प्रघात आहे.

पण मागे एकदा विश्व हिंदू परिषदेच्या केशवराव केळकरांनी एकतेचा अर्थ समजावून सांगण्याची जी युक्ती सांगितली होती ती खासच म्हणायला हवी. ठिकठिकाणच्या झोपडपट्ट्यांमधून संस्कार केंद्रे चालविणाऱ्या कार्यकर्त्यांच्या एका अभ्यासवर्गात संस्कारक्षम गोष्टी कशा सांगायच्या याविषयी बोलताना केशवरावांनी एक गोष्टच ऐकविली होती. त्या गोष्टीतला एक प्रवासी भारत–भ्रमणाकरिता निघतो. उत्तरेकडून सुरुवात केल्यावर पंजाबात त्याला भेटतो रामकुवर, हरियानात रामगोपाल, उत्तरप्रदेशात रामसिंग, बंगाल्यात रामबाबू, ओरिसात जानकीवल्लभ, आंध्रात रामय्या, तामिळनाडूत रामचंद्रन्, केरळात रामन, कर्नाटकात रामप्पा, महाराष्ट्रात रामभाऊ तर गुजरातेत रामभाई !

एकतेचा अर्थ सांगायला एवढी एक गोष्टसुद्धा पुरेशी व्हावी. प्रचारकी थाटाची सुवचने, वृत्तपत्रातल्या नि टीव्हीवरच्या जाहिरातींचा मारा, किंवा लंबीचौडी शब्दबंबाळ भाषणं या सगळ्यातून जे साधणार नाही ते या छोट्याशा गोष्टीतून साधेल.


◻

अगदी या गोष्टीतला प्रवासीसुद्धा एकतेची जाण जागवू शकला तो भारतभराच्या भटकंतीमुळे ! दक्षिणेकडचा तो मद्रासी, उत्तरेतून येणारा तो भैय्या आणि पूर्वेकडून आलाच तर तो बाबू अशी सरधोपट विभागणी करणारे आपण परस्परांच्या प्रदेशात प्रत्यक्ष गेल्याशिवाय एकमेकांच्या जीवनशैली कशा काय जाणून घेणार ? शेवटी एकात्मता हा एक भावनिक विषय आहे आणि एकमेकांच्या भावना समजून घेणं, जाणणं, हा याचा पाया आहे.

अशा भावना समजून घेणं म्हणजे प्रश्न समजावून घेणं, समस्या जाणून घेणं. त्या प्रदेशाची वैशिष्ट्यपूर्णता, विशिष्ट ऐतिहासिक, सामाजिक पार्श्वभूमी माहिती नसेल तर एखाद्या प्रदेशाबद्दल कसे अकारण गैरसमज निर्माण होतात याची अनेक उदाहरणं सांगता येतील. विशेषतः सीमावर्ती प्रदेशांच्या बाबतीत तर हे अधिकच लागू आहे.

मध्यंतरी गौहाटी–शिलाँग (बर्निहाट) रेल्वे लायनीचा प्रश्न बराच गाजला. अन्यत्र सगळीकडे नव्या रेल्वेलायनी टाकण्याची स्थानिक जनतेची आग्रहाची मागणी असताना मेघालयात मात्र स्थानिक जनतेनी आपल्या राज्यात रेल्वेच नको अशी भूमिका का घेतली ? राज्यात बाहेरच्या नागरिकांचे लोंढेच्या लोंढे येतील अशी स्थानिक जनतेला इतकी भीती का वाटावी ? हे सगळं, त्यातल्या अविवेकीपणासह समजून घ्यायचं असेल तर प्रत्यक्ष मेघालयात जायला हवं.

तिकडे अरुणाचलात दिव्रंग नदीच्या खोऱ्यातला जलविद्युत प्रकल्प अशाच वैशिष्ट्यपूर्ण कारणांमुळे रखडला आहे. या प्रकल्पावर काम करण्यासाठी हजारो मजुरांची गरज आहे. स्थानिक मंडळी ही कामं करायला तयार नाहीत, नि बाहेरून आलेले मजूर इथल्या लोकसंख्येच घटकरूप



(composition) बदलतील म्हणून त्यांच्या येण्याला सर्वांचा विरोध आहे. विकासाच्या संदर्भातली ही एक नमुनेदार अडचण म्हणायला हवी. अर्थात प्रत्यक्ष अरुणाचलात जाऊन तिथल्या जनतेचं भावविश्व जाणल्याशिवाय या मानसिकतेची मुळं सापडणार नाहीत.

केवळ हौसमौजेच्या फिरण्यासाठी म्हणूनच नव्हे तर तो तो प्रदेश, तिथला समाज आणि तिथलं लोकजीवन जाणण्यासाठी पर्यटन, या दृष्टिकोणातून पर्यटनाकडे पाहण्याची वाढती गरज आहे ती या पार्श्वभूमीवरच.

स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी छोट्या-मोठ्या भाषिक, वांशिक, सामाजिक वेगळेपणाचा डंका पिटायचा नि या वेगळेपणाच्या रक्षणाच्या नावाखाली छोट्या गटांची अस्मिता फुलवायची हा आपल्या विद्यमान राजकीय व्यवस्थेतला नित्यक्रम बनत असताना तर ही गरज अधिकच जाणवते. याचा अर्थ पर्यटनातल्या हौसे-मौजेला फाटा देऊन फक्त अभ्यास दौरे काढावेत, सद्भाव-यात्रा न्याव्यात, किंवा पत्रकारी वृत्तीनी हिंडावं असा खासच नाही. आपल्या अनायासे जाण्यातून होता होईतो स्थानिक जनतेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न व्हावा, लोकजीवनाच्या वैशिष्ट्यांची ओळख करून घेण्याकडे आपला कल असावा. इतकं जरी झालं तरी मनं जोडणारं पर्यटन असं एक हेतूपूर्ण स्वरूप विकसित होऊ शकेल.

असं खरंच झालं तर एकात्मतेची एक अंतर्निहित रचना आपाततः साकार होईल. दूरचे प्रदेश आणि त्यांच्या समस्या आपल्याला दूरच्या वाटणार नाहीत. अंदमानच्या जनतेच्या मनात अमेरिकन मनुष्यासारखी एक नि-र्मूल (Rootlessness) भावना का आहे? मणिपूरच्या जनतेला आपल्या सेनेतल्या जवानांबद्दल घृणा का वाटते? ओरिसातल्या बालासोर जिल्ह्यातल्या लोकांचा संरक्षण प्रकल्पाला एवढा तीव्र विरोध कशासाठी? हे आणि असे अनेक प्रश्न, मुख्य म्हणजे त्या प्रश्नांमागची मानसिकता आपल्याला समजून घेता येईल.

नकाशाशेजारी नकाशा ठेवला की एकता होत नाही. एका प्रांतातल्यांना दुसऱ्या प्रांतातल्यांविषयी काही आपलेपणा वाटतो किंवा काय यावर एकात्मता अवलंबून आहे. हा आपलेपणा पुस्तकातले धडे किंवा वृत्तपत्रातल्या बातम्या वाचून निर्माण होत नाही. त्यासाठी हवं सहजीवन, किमानपक्षी त्या त्या समाजाचं जीवनदर्शन. मन जोडणारं पर्यटन ही आजची गरज यासाठीच निर्विवाद आहे. ☐


॥श्री कलेश्वर प्रसन्न॥

व्ही.एस.मालंडकर आणि कंपनी

ज्युवेलर्स

फोन: ४२२८०४४

हनुमान मंदिर समोर, एन.सी.केळकर रोड, दादर, मुंबई-२८

B.Y.P

व्ही. एस्. मालंडकर, सन्स्

ज्युवेलर्स

मॅजेस्टिक सिनेमासमोर, गिरगांव, मुंबई - ४

फोन : ३८९८८८

(B.Y.P)

# कल्पक सहली
## रायगड दर्शन... पूनम... वर्षाविहार...

**विजय साखळकर**

**केवळ पर्यटनासाठी पर्यटन ही कल्पना महाराष्ट्रीय मनात अगदी अलीकडेच रुजली असे म्हणता येईल. आता तो छानपैकी प्रथाही पडू पाहतेय. केवळ महाराष्ट्रीयनांच्याच सहली आयोजित करणाऱ्या खाजगी पर्यटन संस्थांच्या वर्तमानपत्रांतील नियमित प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीच या गोष्टीची साक्ष देतील.**

त्या आधीच्या काळात खाजगी पर्यटनसंस्था होत्याच, पण त्यांना व्यवसायासाठी तीर्थक्षेत्रास काढलेल्या सहलीचे आमीष दाखवावे लागत असे. आता तशी बिल्कूल वेळ राहिली नाही. पर्यटनसस्था नवी असली तरीही केवळ जाहिरात प्रसिद्ध होताच बुकिंगसाठी पर्यटकांची रीघ लागते.

मुंबई, पुणे अशा गजबजलेल्या शहरांतील माणसांच्या दैनंदिन जीवनाला एक सवयच लागून राहते. ठरावीक वेळीच घराबाहेर पडायचे, ठरावीक वेळी धावणारी गाडी–बस पकडणे, ठरल्या वेळी ठरल्या खुर्चीत बसायचे, ठरल्या वेळी उठायचे, ठरल्याच वेळी घरी यायचे, सारे कारभार गर्दीतच. सुटीच्या दिवशी काही करमणूक साधायचे म्हटले तरी तिथेही गर्दी. कधी तरी ही सवय मोडावी असे प्रत्येक शहरवासीयाला वाटत असते.

ही गोष्ट कल्पक सहल आयोजकांनी हेरून कल्पक सहली काढायची टूम काढली. काही तरी नवं अजमावण्याकडे कल असणाऱ्या शहरकऱ्यांनीही या कल्पक सहलींच्या कल्पनेला उदार आश्रय दिला त्यातून या अशा कल्पक सहली काढायचा व्यवसाय फोफावला.

पावसाच्या 'वर्षा विहार', कोजागिरीला 'पूनम सहल' अशा सहली काढण्यात येऊ लागल्या. काहीतरी नवं देण्याचा प्रयत्न चाललाय हे पटण्यासाठी अधिक कल्पक लोकांनी अत्यंत लोकप्रिय व्यक्तींची उपस्थिती या सहलीसाठी ठेवली. लोकप्रिय लेखक, नाटयकलावंत, सिनेकलावंत, दूरदर्शनवरील कलावंत, गायक यांच्यासमवेत गप्पागोष्टींची मैफल अशी योजना अंमलात आणली. अर्थातच अशा चांगल्या उपक्रमांना रसिक मनाच्या माणसांकडून दाद मिळते.

अशा सहलींनाच दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद मिळतोय ही गोष्ट लक्षात येताच मुंबईतील अनेक पर्यटनसंस्थांनी आता अशा लोकप्रिय व्यक्तींच्या सहवासातला दिवस पर्यटकांना आंदण देण्याचा जणू चंगच बांधलेला दिसतो. गेल्या कोजागिरीची सहल एका खाजगी पर्यटनसंस्थेनं काढली. त्या सहलीची जाहिरात फार आधीपासून, म्हणजे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून करण्यात आली होती. ही कल्पक सहलीची टूम किती फोफावली आहे, याची कल्पना यावरून यावी.

पण गेल्या महिन्यातच एका प्रमुख दैनिकातून अशी सहल आयोजित केलेल्या 'चितारी ट्रॅव्हल्स' च्या संयोजनासंदर्भात, या सहलीत सहभागी झालेल्या काही पर्यटकांनी पत्रे लिहिली. 'चितारी ट्रॅव्हल्स'-नंही मागाहून खुलासा केला. पण अशा तक्रारी का येतात? या सहली कशा आयोजित करावयाच्या असतात? पर्यटक दुखावले जाऊ नयेत म्हणून कोणती काळजी घ्यावी लागते? याची माहिती मिळविण्यासाठी आधी 'सचिन ट्रॅव्हल्स' च्या श्री. प्रमोद जकातदार यांची भेट घेतली.

कल्पक सहलींचे कुशल संयोजक म्हणून आज पर्यटन क्षेत्रात श्री. जकातदारांचा दबदबा आहे. एवढा की, 'सहलींचा राजा' म्हणून ओळखले जाणारे राजा पाटीलही 'सचिन ट्रॅव्हल्स' नं आयोजित केलेल्या 'वर्षा विहार'मध्ये सहभागी झाले होते.

कल्पक सहलींची टूम लोकप्रिय करण्यात आणि ही अत्यंत नवी कल्पना रुजविण्यातही श्री. जकातदारांचाच वाटा महत्त्वाचा मानला जातो. आपल्या व्यवसायाचा आरंभही जकातदारांनी अशी कल्पक सहल काढूनच केला होता. ती सहल होती शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या उपस्थितीत रायगड दर्शनाची. शिवशाहिरांनी रायगडाची माहिती या सहलीत पर्यटकांना करून द्यायची अशी ही त्यांनी आखलेली पहिली सहल होती. प्रतिसादही चांगलाच मिळाला. १५० लोकांचा सहभाग या सहलीस लाभला.

या सहल आयोजनानं लक्षात आणून दिलेली एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगताना श्री. जकातदार म्हणतात,

'रायगडावर गेल्यावर लक्षात आलं की, जेवणाची सारी सामग्री आहे फक्त मीठ मात्र विसरले आहे. एकीकडे जेवणाची प्राथमिक तयारी सुरू असतानाचा केवळ मीठ आणण्यासाठी पाचाडला माणूस पाठवावा लागला. यानंतरच्या आमच्या प्रत्येक सहलीत याचा बनविणं आणि प्रत्यक्ष निघतावेळी त्या पुनःपुन्हा चेक करणं यात आम्ही कमालीची काळजी घेऊ लागलो.'



कल्पक सहलींचा प्रारंभ

श्री. प्रमोद जकातदार

या कल्पक सहलींचं संयोजन करण्याची कल्पना कशी सुचली ते सांगताना श्री. प्रमोद जकातदार म्हणतात,

'मी या व्यवसायात नसताही, आधीपासूनच 'साने गुरुजी कथामाला' आदी चळवळींशी संबंधित होतो. लहान मुलांच्या, विद्यार्थ्यांच्या सहली काढण्याचा अनुभवही मला होता. प्रकाशभाई मोहाडीकर हे आमचे मामा. त्यांनी एक कल्पक सहल आयोजित केली होती. कै. आचार्य अत्रे या सहलीस आले होते व त्यांच्या सहवासातील हा दिवस होता. या सहलीस मला जाता आले नव्हते. पण गप्पा, विनोदी चुटके, कथाकथन आणि प्रत्यक्ष आचार्य अत्रे यांचा जवळून सहवास यामुळे सहल एवढी रंगली की या सहलीत सहभागी झालेली मंडळी भेटायची त्या त्या वेळी या सहलीतील सोनेरी क्षणांची आठवण काढीत म्हणायची– मस्त मजा आला बुवा. ही गोष्ट माझ्या मनात घर करून होती. त्यावर आधारीतच शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या समवेत सहल काढून मी व्यवसायास आरंभ केला. पुढे व्यवसायात चांगल्यापैकी जम बसला. मग पुढच्या कल्पक सहलींना आरंभ केला.'

'सचिन ट्रॅव्हल्स' कडून पहिली वर्षा सहल काढण्यात आली. लोणावळ्याला. प्रकाशभाईंनी आचार्य अत्र्यांना घेऊन त्यांच्या खंडाळ्याच्या बंगल्यावर काढलेल्या सहलीसारखीच ही सहल होती. व. पु. काळे यांची लोकप्रियता लक्षात घेऊन या पहिल्या सहलीसाठी त्यांना बोलवायचं ठरलं. श्री. जकातदार म्हणतात,

'ही सहल काढण्याच्या वेळी नफ्याचा विचार मी बाजूस ठेवला होता. थोडा तोटा सहन करण्याचीही तयारी ठेवली. आपल्या आवडत्या लेखकांच्या सहवासातील धुंदफुंद क्षण चाखण्याची संधी पर्यटकांना मिळवून द्यायची हाच उद्देश ठेवला होता.'

सहल काढायची ठरल्यावर, त्या संदर्भात प्रकाशभाईंना सांगताच त्यांनी या उपक्रमाचे स्वागतच केले. पुढे श्री. व. पु. काळे यांची श्री. जकातदार यांनी भेट घेतली. त्यांनी होकारही दिला. अशा कल्पक सहली काढण्याची कल्पना राबविण्याचे ठरविल्याबद्दल जकातदारांचे कौतुक केले. व.पुं.ना या सहलीच्या मानधना संदर्भात विचारले असता आपल्या नेहमीच्या शैलीत व.पु. म्हणाले, 'तुमच्याकडून आमची सहल सहन केली जाणार यातच भरपूर आले. मानधन नको मान दिलात तोच पुरे.'

सहलीची जाहिरात केली गेली. सात बस भरतील एवढं बुकिंग झालं. लोणावळ्याला उतरल्यावर आधी भिजायचं, बुशी डॅम येथे जेवण आणि नंतर व. पुं. चे कथाकथन असा कार्यक्रम होता. सहल उत्तम झाली. दरवर्षी अशी सहल आयोजित करण्याचे ठरले. दुसऱ्या वर्षा सहलीस यशवंत देव होते– १३ बसेस निघाल्या. गेल्या वर्षी वसंत बापट, श्रीकांत मोघे, शं. ना. नवरे यांच्यासह सहल निघाली. पण हॉलची मर्यादा लक्षात घेता केवळ ११ च बसेस नेण्यात आल्या होत्या.

एक सहल यशस्वी होताच जकातदारांनी 'पूनम सहल' योजना आखली. पहिल्या सहलीस पर्यटकांचा सहभाग ७ बसेसचा होता. यावेळचा सहवास ९ बसेसचा होता. या वेळची सहल होती पनवेल 'शांतिवन' येथे. जाहिरात केली होती–

सहल निघाली शांतीवना
गायक वादक सहवासाला
या सामोरे लोकविलक्षण
अपूर्वाईच्या संधीला

सहलीच्या मैफिल संयोजनाची जबाबदारी योजना भाटचे व अशोक भाटचे यांनी जमविली होती. या सहलीचं वर्णन करताना व. पु. म्हणाले, 'आकाशात जेव्हा जेव्हा चंद्र दिसेल त्या त्या वेळी या सहलीची आठवण होईल. मला या दिवसाची ३६४ दिवस वाट पाहावी लागते.'

पुढे केळवे माहिम–पालघर येथे पूनम सहल निघाली. व. पु. माधव गडकरी, अजित कडकडे, बकुल पंडित अशी सारी मंडळी होती. या सहलीची मजा सांगताना यशवंत देव म्हणाले, 'असे मनापासून दाद देणारे श्रोते हवे असतात. पण ते येथेच मिळतात.'

वर्षा आणि पूनम सहलींना आजपर्यंत आशा खाडिलकर, शरद जांभेकर, प्रकाश घांग्रेकर, योजना भाटचे, अशोक भाटचे, वपु, माधव गडकरी, अजित कडकडे, बकुल पंडित, यशवंत देव, मंगेश पाडगावकर यांनी पर्यटकांना सुखद सहवासाचे क्षण दिले हे सांगून जकातदार अभिमानानं म्हणतात,

'एकदा सहलीला आला तो आमचा झाला. एका सहलीस योजना व अशोक भाटचे उपस्थित नव्हते; पण ज्या दिवशी सहल गेली त्या दिवशी त्यांचा लोणावळ्यात मुक्काम होता. प्रत्यक्ष मैफलीत या दोघांनीही उपस्थित राहून आपला जिव्हाळा दाखविला.'

या कल्पक सहलींचा आणि एकंदर सहलींचा अनुभव सांगताना, पर्यटकांच्या भावनांचा प्रक्षोभ टाळण्यासाठी काय करावे लागते, या संदर्भात श्री. जकातदार म्हणतात.

'अशा सहलीस येणारी मंडळी हौशी असतात. त्यांची बडदास्त राजेशाही असावी अशीही त्यांची अपेक्षा नसते. अपेक्षा असते जेवण, चहापान आदी वेळच्या वेळी मिळावं, खरं तर ती आसुसलेली असतात. आपल्या आवडत्या व्यक्तिमत्त्वाच्या अंतरंगाच्या नाना कळा पहायला. अशा वेळी बडदास्त साधी असली तरी त्यांची हरकत नसते; पण सारं काही वेळच्या वेळी व्हावं अशी अपेक्षा त्यांनी बाळगणं चूक नाही.'

आपल्या कल्पक सहलींबद्दलचा एक अभिप्राय दाखविताना श्री. प्रमोद जकातदारांनी माझ्यापुढे वपुंनी त्यांना पाठविलेले दिवाळी

शुभेच्छा कार्ड केले. मजकूर असा–

प्रिय प्रमोद,
दिवाळी जवळ आली म्हणून
आपलं म्हणायचं
हॅपी दिवाळी
वगैरे
पण ते काही खरं नाही.
' सचिन ट्रॅव्हल 'च्या
वेगवेगळ्या कल्पक आणि
दर्जेदार सहलींमुळे
दिवाळी वर्षातून तीन वेळा
भेटते.
तुमच्या सहलींना सौंदर्य आहे ती
त्यांना शिस्त आहे म्हणून
आठवणी अगोदर निर्माण
करायच्या असतात आणि मग
त्यांचं स्मरण करायचं असतं.
असं, ' ॲन अफेअर टू रिमेंबर '
या चित्रपटात सांगितलं आहे.
सचिन ट्रॅव्हलनं आठवणी काढाव्यात
असे क्षण निर्माण केले.
तुमचे मनापासून कौतुक
अभिनंदन.

वरच्या मजकूरातील शिस्त आणि सौंदर्य या शब्दांकडे निर्देश करून श्री. जकातदार म्हणतात,

' ही सारी किमया आपल्या कुशल ऑर्गनायझरांची. ऑर्गनायझर जेवढा हौशी असतो, शिस्तीचा असतो तेवढी सहल अधिक उत्तम होते. शिवाय या सहलींकडे फायदा मिळवण्याचा दृष्टिकोण ठेवून पहावयाचे नसते. आमचा या सहलींकडे पाहण्याचा दृष्टिकोण धंदेवाईक नाही. या सहलींतून मनोरंजन साधायचं, नेहमीच्या धावपळीनं वैतागलेल्या आणि त्यामुळे यंत्रवत सवयी अंगवळणी पडलेल्या माणसांना एक दिवस वेगळा जगल्याचं समाधान मिळावं या हेतूनंच सहली काढण्यात येतात.'

श्री. जकातदारांनी पेरलेली ही कल्पक सहलींची टूम आता चांगलीच रुजलीय. अन्य खाजगी पर्यटन संस्थाही आता अशा कल्पक सहली आयोजित करू लागल्या आहेत; पण त्यात काही तरी चुकत असल्याचा भास जाणवतो. वर्तमानपत्रांतून वाचक पत्रव्यवहाराच्या सदरांतून याची दादफिर्याद वाचायला मिळते. अशा वेळी नेमकं काय होतं ? पर्यटकांचा अतिउत्साह याच्या मुळाशी असतो की संस्था संचालकांचा तो दोष असतो ? पर्यटकांचा प्रक्षोभ होण्याची आणि मजा आली अशी दाद देण्याऐवजी तक्रारींचा पाढा वाचण्याची पाळी का यावी याबाबत विचारले असता जकातदार म्हणतात.

' कारणं अनेक असतात, सर्वप्रथम कुशल संयोजकांचा ताफा असावा लागतो. तो नसला की पर्यटकांचे मूड सांभाळण्यात अडचण निर्माण होते. पर्यटकांचा उत्साह या सहलीत मिसळला की लज्जत वाढते; पण आणखीही एक महत्त्वाची गोष्ट अशी की अशा सहलींना येणारी मंडळी आपापला ग्रुप जमवून येत असतात. यातील एखाद्या ग्रुपच्या मनात असंतोष बळावला की सहलीलाच गालबोट लागते. हे टाळण्यासाठी संयोजक (Organiser) मनमिळाऊ आणि हसऱ्या स्वभावाचे लागतात. पुढची गोष्ट धंदेवाईक दृष्टिकोण नको आमच्या सहलींना येणारी मंडळी, घेतलेला हॉल, त्यामध्ये सामावणारी गर्दी या साऱ्याच गोष्टींचा विचार करून आम्ही कार्यक्रम आखतो. मैफलीचा आस्वाद प्रत्येक पर्यटकाला घेता यावा यासाठी आम्ही क्लोज सर्किट टी. व्ही. नेतो. कार्यक्रमाचं व्हिडिओ शूटिंगही करतो आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट. ती कदाचित तुम्हाला मी सांगत असल्यानं अतिशयोक्तीचं वाटेल पण ती वस्तुस्थिती आहे. प्रत्येक संस्थेची खास वैशिष्टये असतात. आमचं वैशिष्टय कल्पक सहलींचं आहे. काश्मीरची सहल काढावी तर ती राजा पाटलांनीच. आम्ही नक्कल केली तर ती फलदायी ठरणार नाही. तसाच थोडासा भाग आहे. ही



एक दिवस वेगळा जगल्याचं समाधान
बुशीडॅमवरील वर्षाविहार

कल्पना मुळात आमची सेवादल आणि साने गुरुजी कथामालेच्या चळवळीची पार्श्वभूमी, तेथील सहलींचा अनुभव माझ्या गाठीशी जमा होता त्यामुळे या सहली योजताना माझ्या नजरेसमोर प्रत्यक्ष चित्र होते. त्याला आमच्याकडे असणाऱ्या कुशल सयोजकाच्या ताफ्यान रग भरले अस टीमवर्क सर्वच सस्थाकडे असते असे नाही.

## यशाचे रहस्य ?

या सहली कशा असाव्यात, गालबोट न लागण्यासाठी कोणती दक्षता घ्यावी, याविषयी विविध पर्यटकाची भेट घेऊन विचारणा केली असता अनेकानी आपापली मते ऐकविली दरदाचे श्रीकात केळकर, म्हणतात, अशा सहलीचा आवाका छोटा असावा. सरसकट मोठे स्वरूप दिले गेल्यानतर त्याला ओळखी पाळखीच्या पन्नास लोकानी मिळून काढलेल्या आणि उगाच खोगीरभरती म्हणून वाढलेल्या सभासदाच्या पिकनिकचे स्वरूप येते आवाका छोटा असेल तर केवळ हौशी मडळीच या सहलीत सामील होतात. त्यामुळे केवळ काही धुदफुद क्षण जमविण्याच्या इरादानं आलेल्या पर्यटकाना आयुष्यभर जतन करावे-असे सुखद अनुभव जवळ बाळगता येतात. श्री आनद खरात म्हणतात, माणस कशीही असली तरी एकदा प्रस्थान ठेवल्यावर सारी सूत्रे सयोजकाच्या हाती जातात. अशा वेळी सयोजक जितके अनुभवी व कुशल असतील तितक्या प्रमाणात या सहलीची यशस्विता वाढीस लागते. सयोजक–पर्यटकाना जितके समाधानी ठेवण्यात वाकबगार तेवढी पर्यटनाची उंची वाढण्यास मदत होत जाते.

रघुवीर. दर्णे म्हणतात, आपण माणस घरी पखा नसला तरीही खूष असतो, पण दुसरीकडे गेल्यावर आधी पखा सुरू करा असा हुकूम देतो. अशा आनंद पर्यटनाला निघाल्यानतर सयोजक तरी पर्यटकाची बडदास्त ठेवणार किती ? सहल ज्या ठिकाणी गेलीय, त्या ठिकाणी सुविधा ज्या प्रमाणात उपलब्ध असतील तेवढ्याच पुरवू शकणार अशा वेळी सयोजकाशी सहकार्य करण्याचीही तयारी आपण ठेवायला हवी. आपणास राजेशाही बडदास्त मिळण्यापेक्षाही आपण जो अनुभव गाठीस मारण्यासाठी आलो, आपल्या आवडीच्या व्यक्तिमत्त्वाचा सहवास लुटण्यासाठी आलो, तो देण्यात सयोजक कुचराई करीत नाहीत ना. हे तपासण्याचा कल असावा. जेवण, दोन वेळा चहा, आपल्या नेहमीच्या सवयी या आपल्या रोजच्याच असतात त्यातून काही वेगळेपणा शोधण्यासाठी तर आपण अशा सहलीत सहभागी झालेलो असतो.

प्रभाकर पाटील म्हणतात, सहली काढतेवेळी स्थान कोणते निवडले आहे त्यावरच अशा मोठ्या किंवा प्रसिद्ध व्यक्तीच्या सहवासातील सहलीची यशस्विता अवलबून असते. शहरी वातावरणात वाढलेल्या व शहरी वातावरणातील सुविधा अगवळणी पडलेला शहरवासी सहलीच्या दिवसातदेखील आपल्याला शहरातील नागरी सुविधा उपभोगायला मिळाव्यात अशी अपेक्षा बाळगतो. या त्याच्या सवयी सोडावयास तो तयार नसतो. म्हणून अशा सहलीसाठी स्थळे निवडताना बाथरूम्स, सडास आदीच्या सोयी उपलब्ध असतील अशा ठिकाणीच सहली जाव्यात त्या सुविधा जर उपलब्ध नसतील तर कितीही रमणीय ठिकाणी सहली काढल्या अथवा कितीही उत्तम बडदास्त ठेवली गेली तरी नगरवासीय नाके मुरडतोच

चितारी यानी काढलेल्या भव्य सहली सदर्भात याच सुविधावरून, चहापानावरून वर्तमानपत्रातून ओरडा केला गेला होता. त्यातील मुख्य पत्र होते सौ. शोभा जोशी याचे. सौ शोभा जोशीकडे माणूस पाठविला असता त्या म्हणाल्या की, ती गोष्ट आता जुनी झाली त्यावर प्रत्यक्ष चितारीनी देखील खुलासा केला व माधवराव गडकऱ्यानी देखील लिहिले आता तो विषय सपला आहे. त्यावर बोलण इष्ट वाटत नाही

तर हीच भव्य सहल आयोजित केलेल्या महेन्द्र चौबळ याच्याशी सपर्क साधला असता त्यानी म्हटले, चितारीच्या सहलीत एकूण गोधळच झाला. लोक कटाळली व शेवटी गाड्या मुबईस नेण्याची बळजबरी करावी लागली. चौबळ याच्या मते ही सारी जबाबदारी सयोजकावर पडते. सयोजक पुरेसे अनुभवी नव्हते सहलीमधील इतर गोष्टी कशाही असल्या तरी पर्यटक त्या चालवून घेतो, पण खाण-पिण मात्र वेळच्या वेळी हव असत.

श्री. प्रमोदराव चितारी यानी चितारी ट्रॅव्हल्सचा आरभ १९८२ साली केला. पण पर्यटन क्षेत्रातील अनुभव १७ वर्षांचा आहे १९८२ च्या आधी आणखी एका खाजगी पर्यटन सस्थेत त्याची भागीदारी होती. या प्रकारच्या सहलीकडे आपण का आकर्षित झालो यासबधी बोलताना ते म्हणाले,

'शहरी जीवनातील तोच तो पणा निदान एखादा दिवस तरी भिरकावून द्यावा अस प्रत्येक शहरवासीय माणसाला वाटत असत. अशा वेळी एखाद्या दिवशीच्या या सहलीचा आनद मनमुराद लुटायचा आणि परत आपापल्या कामाला दुसऱ्या दिवशी जुडायच ही एक गमतीदार कल्पना. थोडासा रूचिपालट अशी ही कल्पना.

चितारी म्हणतात. वनडे ट्रीपची ही कल्पना अप्रतिम आहे पण ती वन डे क्रिकेट मॅचसारखी आहे. रगली तर चागली रगते नाही तर भ्रमनिरास करते. आपण आयोजित केलेल्या सहलीविषयी सागताना ते म्हणतात,

'आम्ही सर्वाधिक सख्येन पर्यटकाना सामील करवून घेऊन ही भव्य सहल काढली. अन्य कोणतीही सस्था केवळ दोन ते तीन लोकप्रिय व्यक्तीच्या सहवासातील सहल काढते आम्ही चक्क चवदा लोकाचा ताफा घेऊन सहल काढली. ६१४ पर्यटक या सहलीत सामील होते. पण हा आमचा पहिलाच आणि शेवटचा प्रयत्न यापुढे आम्ही या अशा प्रयत्नाच्या वाटेला बिलकूल जाणार नाही '

या आधी अशा कल्पक सहलीच्या सदर्भातच श्री चितारी यानी असे विधान केले होते की, ही सहलीची योजना अत्यत अप्रतिम आहे. पर्यटन संस्थानी ती आवर्जून राबविली पाहिजे या अशा सहली मधूनच अनेक दुर्लक्षित राहिलेली नवी पर्यटन केंद्रे उजेडात येतील. पण असे असताही आपण या सहली काढण्यास उत्सुक नसल्याचे ते म्हणतात, त्यावेळी कोणत्या मनोभूमिकेतून असे विचारताच ते म्हणाले,

'अशा सहलीतून नफा मिळण्याची शक्यता नसते मी सहल काढली तेव्हा नफा मिळेल अशी माझी कल्पना नव्हती. पण समाधान मिळाव. एक चागला उपक्रम पार पाडल्याबद्दल, यशस्वी केल्याबद्दल समाधान लाभावं हीच माफक अपेक्षा होती. पण परिणाम वेगळाच

झाला. मला आर्थिक नुकसान आणि मानसिक क्लेश फार सोसावे लागले.'

या सहलीतील आपले एकूण नुकसान ५२००० रु. झाले असे श्री. चितारी सांगतात. अशा सहलीतील आणखी एक बोच सांगताना श्री. चितारी म्हणतात,

'लोकांची या कल्पक सहलींकडे पाहण्याची दृष्टी अजूनही फॅशन या धर्तीचीच आहे. या सहलीतील मर्म लोकांना अजून पुरेपूर कळालेले नाही. या सहलीत सहभागी झाल्याचा आनंद वाटण्यापेक्षा फॅशन म्हणूनच या सहलीत सहभागी होण्याचा लोक आनंद लुटतात. लोकप्रिय व्यक्तींच्या आकर्षणापोटी, त्यांच्या सहवासात जाण्यासाठी धडाधड बुकिंग केलं जातं. ही मंडळी या सहलीत मोकळी होतात. मोकळी बोलतात. मनमोकळेपणानं त्यांच्यासोबत हव्या त्या विषयावर गप्पा मारता येतात. त्यांच्याबरोबर या सहवासात फोटोही काढणं शक्य होतं. पण प्रत्यक्षात मंडळी या लोकप्रिय व्यक्तींच्या सहवासात रमत नाहीत. जो तो आपल्या मूडमध्ये, ग्रुपमध्ये रमतो. यात कुतरओढ होते सहलचालकाची. त्यानं या पाहुणे मंडळींमध्ये लक्ष अधिक दिलं तर पर्यटक रागवतात. पर्यटकांकडे दिलं तर पाहुणे रागवतात. ही सर्कससारखी अवस्था चालकाची होते !

सहल संयोजक जेवढे कुशल तेवढी सहल यशस्वी होते ही गोष्टही चितारी मान्य करतात. आपल्या सहलीत ७० ते ७२ संयोजक होते असेही ते सांगतात. बाकी कोणतीही व्यवस्था कशीही सहन केली जाते पण जेवण व चहापान वेळच्या वेळी असावं अशी पर्यटकांची अपेक्षा असते. ते वेळच्या वेळी मिळालं नाही तर असंतोषाला तोंड फुटतं असं म्हणताच चितारी म्हणाले,

'कोणताही सहल व्यवस्थापक ही जेवण-चहापानाची व्यवस्था अत्यंत चोख करीत असतो. त्यात कुचराई ठेवत नाही. पण शहरी माणसांच्या कल्पना भयंकर असतात. खेडेगावी उपलब्ध असणाऱ्या सोयींमधून आपल्या सवयी भागवायच्या याचे भान त्यांना राहत नाही. ज्या सुविधा संडास आदी अत्यंत अल्प स्वरूपातच आहेत अशा ठिकाणी त्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देणं सहल आयोजकाला कसे शक्य आहे ?'

□

---



सर, तुम्ही खोदायला सांगितलेल्या जागी मौर्यकालीन गुत्ता असावा. ह्या बाटल्या सापडल्या.

# केल्याने देशाटन

RAJA * RANI * RAJKUMAR
Bombay

## राजा पाटील

राजा पाटील हे माझे नाव आता महाराष्ट्रात, भारतात व परदेशातही सुपरिचित आहे. उत्तम व्यवस्था, व्यक्तिगत देखरेख व सचोटीचा व्यवहार याचा निष्ठावंत भोक्ता म्हणूनही लोक माझी वाखाणणी करतात. त्याचप्रमाणे फटकळ, हट्टी हेडमास्तर म्हणूनही अनेकजण नावे ठेवताना आढळतात. एक मात्र खरे की बदमाश, बिलंदर, भ्रष्टाचारी अशी सध्या प्रचलित व प्रतिष्ठित मानली गेलेली विशेषणे मला चिकटविल्याचे आढळत नाही. ठाणे जिल्ह्याच्या पालघर तालुक्यातील मागासलेल्या भागात जन्म घेतलेल्या माझ्यासारख्या माणसाला तीच विशेषणे लागण्याची मोठी शक्यता होती. मी मात्र बिलंदर न निपजता भावनावश निघालो, भ्रष्टाचारी न बनता भरारी घेण्यास प्रवृत्त झालो, याचे श्रेय माझे वडील रावजी सुकट्या पाटील व आई द्वारकाबाई यांना द्यावे लागेल.

माझे मूळ किंवा पाळण्यातले नाव राजाराम. माझ्या मातापित्यांनी मला जन्मत:च एका थोर पुरुषाचे नाव दिले. माझ्या भावंडांची नावेही रघुनाथ व केसरीनाथ अशी मोठी थोरली ठेवली. या नावांना साजेशी अशी आपली मुले वागावीत व नावलौकिकाला पोचावीत अशी उदात्त भावना त्या काळी आईवडिलांची असे. रंजन, रजनी, रजनीकांत, रतन अशी पोरकट नावे ठेवण्याची परंपरा त्या काळी नव्हती. देव, धर्म, देश, श्रद्धा यांनी भारावलेल्या त्या पिढीची रहाणी गरिबीची व सध्याच्या तुलनेत मागासलेली असेल पण त्यांची मने मात्र श्रीमंत होती. ऐहिक श्रीमंतीपेक्षा पारमार्थिक श्रीमंती त्यांना मोलाची वाटे. त्यामुळेच ती माणसे आर्थिक सुबत्तेबरोबर येणाऱ्या स्वार्थांधतेपासून खूप खूप दूर राहिली. तीच शिकवण त्यांनी आमच्या अंगी बाणविण्याचा प्रयत्न केला. माझ्यापुरते तरी मी याचे श्रेय त्यांनाच देतो. पण असली शिकवण आचरणात आणणाऱ्याला जीवनात जे चटके सहन करावे लागतात ते माझ्या आई–वडिलांनी तर सहन केलेच पण मलाही अशा चटक्यांनी अगदी भाजून काढले. रामायणातील रामचंद्राला आदर्श पुरुष बनणे सोपे होते. पण सध्याच्या असमान समाजव्यवस्थेत व भ्रष्ट वातावरणात राजकीय सद्वर्तन ठेवणे आम्हाला झेपणार नाही याची कल्पना आमच्या आईवडिलांना नव्हती.

मुंबईतील प्रारंभीच्या वास्तव्यात वणवण भटकून, दादरच्या आयडियल फर्निचरमध्ये सुताराच्या वाकड्यावर झोपून दिवस काढण्याचे जीवन मला स्वीकारावे लागले. माझ्या उमेदीची सतरा वर्षे अशीच निश्चित निवारा शोधण्यात व पर्यटनाचा कारभार स्थिरस्थावर करण्यात गेली. पण अखेरीस मला महाराष्ट्रीयांच्या हृदयात कायम स्थान मिळाले. त्याही पुढे जाऊन मुंबई, मनाली, मनिला किंवा म्युनिच अशा जगातील कोणत्याही शहरात वास्तव्य करण्याएवढा अधिकार मी कठोर परिश्रमांमुळे मिळवू शकलो. माझ्या कारभाराचे मुंबईतील केंद्रस्थान, ‘स्वीट होम’मधील माझे ऑफिस अलिशान तर आहेच पण अत्याधुनिकही आहे. त्यामुळे मागासलेल्या मथाणेच्या राजाने द्वारकाबाई व रावजी पाटलांच्या सुप्त आकांक्षेला साकार केले असे मी अभिमानाने म्हणू शकतो. अर्थात यासाठी खूप त्रास, मनस्ताप तसेच आर्थिक ओढग्रस्तही सोसावी लागली. काही वेळा तर प्रतिकूल परिस्थितीचा असा काही वेढा पडला की माझ्या मनात काही वेळा आत्महत्येचे विचारही येऊन गेले. एकदोनदा तर आत्महत्या करण्यासाठी मी सिद्धही झालो होतो. परंतु मला काही हितचिंतक गवसले आणि त्यांनी मला या पराभूत मार्गापासून परतवले. ते दिवस आठवले की वाटते, माझ्या हातून काही तरी सत्कर्म व्हावे, जनता-जनार्दनाची सेवा घडावी, देशप्रेमाचा मंत्र सर्वदूर पसरावा अशीच नियतीची इच्छा असावी. मी स्वत: भविष्यवादी नाही. ज्योतिषादी गूढ शास्त्रांवर माझा विश्वास नाही. पण माझ्या प्रयत्नात ज्यांनी मला सहकार्य दिले त्यांचे ऋण विसरणे केवळ अशक्य आहे.

## सावरकर तसबिरीचा शोध

१९४२ च्या चलेजाव चळवळीने व पंडित नेहरू, महात्मा गांधी, साने गुरुजी आदी नेत्यांच्या तुरुंगवासाने सामान्य माणसांच्या मनातही संघर्षाची ज्योत तेवू लागली होती. समाजसुधारणा, स्वातंत्र्य, स्वदेश हे परवलीचे शब्द बनले होते. साहजिकच आमच्या राष्ट्र-सेवादल सैनिकांचे बाहूही स्फुरण पावू लागले होते.

आगाशीच्या मुक्कामात मी सेवादलाचा साधा शिपाई होतो. शिपाईगडी म्हटला म्हणजे जोमदार शारीरिक कार्यक्रम हवेत. पण सेवादलात गीते, शिबिरे, चर्चा असे बौद्धिक कार्यक्रमच अधिक होते. जवळच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा भरत असे. त्यांचा गणवेष, लाठ्या, लुटपुटूच्या लढाया व शिस्त उठून दिसत असे. या दोन्ही संघ-टनांच्या नेत्यात चुरस व मतभेद काय होते ते त्यावेळी आम्हा मुलांना कळत नव्हते; पण आपले कार्य दुसऱ्यापेक्षा अधिक उठून दिसावे अशी आमच्यात जोरदार ईर्षा असे. तसे करावयाचे म्हणजे अधिक जोमदार कार्यक्रम करायला हवेत हे मी आमच्या शाखाप्रमुखांकडे बोलून दाखवीत असे; पण माझ्यासारख्या पोराचे विचार ऐकतो कोण? तेव्हा आपणच स्वतंत्र शाखा काढून आपल्या कार्याचा झपाटा दाखवायला हवा असे मला वाटू लागले. कदाचित असेही असेल की दुय्यम स्थानावर कार्य करण्याचा माझा पिंडच नसावा.

मथाणेत मी सेवादलाची पहिली शाखा स्थापन केली. अर्थात मीच शाखानायक झालो. मरगळलेल्या मथाणेकरांच्या मनात या उपद्‌व्यापाने नवचैतन्य आल्याचे पाहून आजूबाजूच्या गावांत शाखा काढण्याचा मी सपाटाच लावला. दिवस–रात्र, वेळी–अवेळी धावपळ करून व अभ्यास आणि घरची कामे संभाळून या उद्योगाद्वारे दक्षिण पालघरच्या परिसरात सेवादलाच्या शाखांचे नवे व सुसंघ-टित जाळे मी विणले. या कार्याचे इतर कार्य-कर्त्यांत व संघ स्वयंसेवकांत चुरशीबरोबर द्वेष, मत्सर सुरू होणे स्वाभाविकच होते. त्यातून लहान–मोठ्या कुरबुरीही होत. परंतु प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचे जे काही थोडेफार वाचन मी केले होते त्यातून एक गोष्ट मला उमजली होती. ती म्हणजे आपल्या देशाचा पराजय हा आपल्या दुर्बलतेपेक्षा आपआपसां-तील भांडणे व दुही यामुळेच अधिक वेळा झाला आहे. त्यामुळे साऱ्या देशास प्रगति-पथावर न्यावयाचे असेल तर भांडणे न करता, सर्व स्वभावलहरींच्या व मतांच्या लोकांना आपण बरोबर घेऊन जावयास हवे हे मनात पक्के बिंबले होते. या धारणेतून मी आमचे मतभेद विकोपास तर जाऊ दिले नाहीत, पण संघर्षाचे प्रसंगही कौशल्याने टाळले. असाच एक तीव्र संघर्षाचा प्रसंग आठवतो.

आगाशीच्या शाळेत वार्षिक स्नेहसंमे-लनाचा कार्यक्रम होता. त्यासाठी मोठा मंडप उभारलेला होता. महात्माजी, नेहरू, सुभाष आदी राष्ट्रीय पुढाऱ्यांची छायाचित्रे खांबावर लावलेली होती. यातच स्वातंत्र्य-वीर सावरकरांची तसबीर होती. त्या स्फूर्तिदायी, झुंजार क्रांतिकारकाचे स्थान राष्ट्रीय नेत्यांमध्ये निश्चित महान होते; पण आमच्या काही सेवादल सैनिकांना हिंदुत्वाचा हा आविष्कार खटकला. समाज-वादी व अहिंसक चळवळीच्या नेत्यांत या क्रांतिकारकास स्थान नाही असे त्यांच्या डोक्यात भिनले किंवा भिनवले गेले. झाले ! हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी स्वतःच क्रांतिकारी मार्गाचा अवलंब केला. त्यांनी संमेलनाच्या आदल्या सायंकाळी सावरकरांची तसबीरच नाहीशी केली. या प्रकाराने शाळेत व गावात एकच खळबळ उडाली. संघाचे स्वयंसेवक तर रागाने बेफान झाले. आपल्या आराध्यदैवताची ही प्रचंड मानहानी आहे असे मानून त्यांनी या आव्हानाविरुद्ध दंड थोपटले.

शाळेच्या विद्यार्थ्यांमधील ही बेशिस्त पाहून शिस्तप्रिय गद्रे गुरुजीही खळवले. त्यांनी सावरकरांच्या तसबिरीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. ती परत आणून देण्याचे आवाहनही केले. पण त्यास बिलकूल प्रतिसाद मिळाला नाही. सेवादल सैनिक मूग गिळून गप्प होते, तर संघ स्वयंसेवक दातओठ खात होते. शेवटी सावरकरांची तसबीर पुन्हा जागेवर बसेपर्यंत संमेलनाचा कार्यक्रम रद्द करण्यात आल्याचे गुरुजींनी जाहीर केले.

या प्रकाराने मला फार खिन्नता वाटली. बंधुभाव, सर्वभूती प्रेम ही महात्माजी, साने गुरुजी यांची शिकवण आम्ही अंगी बाण-विण्याचा प्रयत्न करीत असता काही सेवा-दल सैनिकांनी त्याला हरताळ फासावा याचे मला फार वाईट वाटले. ही घटना मला अजिबात पसंत पडली नाही. हा केवळ शाळेच्या इभ्रतीचा प्रश्न नव्हता तर आपल्या थोर राष्ट्रपुरुषांच्या शिकवणुकीचा घोर अपमानही होता. न राहवून मी तडक आमच्या मुख्याध्यापकांकडे गेलो. आणि म्हणालो, 'गुरुजी, तुम्ही काळजी करू नका. सावरकरांची तसबीर मी हुडकून काढतो.' गंभीर चेहऱ्याने गुरुजी माझ्याकडे पहात म्हणाले, 'राजा, तुझ्याच सवंगड्यांनी ती पळवून नेली आहे. त्यांचे वैर संपादून तू ती परत कशी मिळविणार ?' 'गुरुजी, सर्वच सेवादल सैनिक एवढे दुष्ट नाहीत. काहींचे कृष्णकृत्य ते नक्कीच उजेडात आणतील.'



सहलींचा 'राजा'

¤

गुरुजींचा त्यावर विश्वास बसलेला दिसला नाही. कारण त्यांनी व इतरांनी या तसबिरी-साठी बरेच प्रयत्न केले होते. पण ती कुठ-ल्याही वर्गात, कुणाच्या घरातही सापडली नव्हती. शेवटी निकराने मी म्हणालो, 'गुरुजी, प्राण गेला तरी बेहत्तर ! पण ही तसबीर तुमच्यासमोर हजर केल्याशिवाय मी अन्नाचा कणही सेवन करणार नाही अशी मी प्रतिज्ञा घेतो.' माझ्या या उद्गारांनी गुरुजी अगदी गहिवरले. त्यांनी मला होकार दिला व मी या अजब व अवघड आव्हानाला तोंड देण्यासाठी बाहेर पडलो.

दिवसभर मी सेवादल सैनिकांची व कार्य-

कर्त्यांची क्रमाक्रमाने भेट घेत होतो त्यांना समजावत होतो. पण कुणीही दाद देत नव्हते. काहीना तर माझा हा उपद्‌व्याप मुळीच रूचला नाही. त्यानी माझी हेटाळणी केली. राजा स्वत.ला जादा समजतो हे अनेकदा कानावर पडले, मनाचा क्षोभ, चीड व पोटात भूक भडकत असतानाच मी घरोघरी पायपीट चालू ठेवली. रात्री गावातील लोकाची जेवणे होऊन गाद्या पसरल्या गेल्या तरी माझे शोधकार्य चिकाटीने चालूच होते. दिवसभराच्या उपवासामुळे व धावपळीने थकवा जाणवू लागला होता. कुणाकडे चहा तर सोडाच पण साधे पाणीही मी निश्चयाने घेतले नव्हते. कातावलेल्या मन स्थितीत घराकडे पावले वळत असता एक सेवादल सैनिक वाटेत भेटला त्याच्यासह मी जवळच बैठक मारली. बोलण्यासारखे व पटविण्यासारखे काही उरलेच नव्हते. माझा दारूण पराभव होणार हे स्पष्ट दिसत होते जगायचे झाले तर प्रतिज्ञा मोडून अन्न सेवन करावे लागणार होते. अत्यत निराश अवस्थेत मी गप्प बसून होतो.

माझा मित्र मला हळूच म्हणाला, 'राजा गप्प का ?'

'काय बोलायचे आता ? तूच साग '

'राजा तू एवढे कष्ट घ्यायला नको होतेस'

'अरे आपली शाळा, आपला देश, आपले नेते याच्याबद्दल आपणास काही प्रेम व आदर आहे की नाही ? कुठे वीर सावरकर व कुठे आपण पोरकट पोरे ? प्राण गेला तरी चालेल पण त्या थोर स्वातत्र्यवीराला मी शाळेत पुन्हा आणणारच. मग मला थेट अदमानपर्यंत जावे लागले तरी हरकत नाही. '

माझ्या या निर्धाराने तो थोडा हबकलाच. मग हळूच म्हणाला, 'राजा तू वचनाचा पक्का आहेस. मग मला एक वचन देतोस ?'

'कसले व कशासाठी ?' मी विचारले.

'राजा, मी तुला तसबिरीचे गुपित सागितले तर तू माझे नाव कोणाला सागणार नाही असे वचन दे.'

त्याच्या या उद्‌गारांनी माझा थकवा पार पळाला. भूक गायब झाली आणि पेगुळलेले डोळे सताड उघडले. मी त्याला आवेगाने मिठी मारत म्हणालो, 'मित्रा, त्यासाठी एकच काय पण दहा वचने देतो. अरे तू केवढे चागले काम करीत आहेस याची तुला कल्पना नाही.' माझ्या तोडावर हात ठेवीत त्याने मला गप्प राहण्याची खूण केली. मध्यरात्र झाली होती. गावात सामसूम होती. तो हळूच उठला. मीही उठलो व त्याच्या मागोमाग धडपडत चालू लागलो अधारातून वाट काढीत तो गावाबाहेर पडला. वळसा घेऊन शाळेमागच्या झुडुपात पोहचला. तेथे उच गवत वाढले होते. वाटेत काटेरी झुडपे, मोठाले दगड–गोटे होते डास चावत होते तरीही ठेचाळत, अगावर ओरखडे झेलत आम्ही दगडाच्या एका राशीजवळ आलो. चादण्याच्या उजेडात त्याची हालचाल मला स्पष्ट दिसली. मी पुढे होऊन गवत बाजूला केले, तर तेथे एका दगडाआड सावरकराची तसबीर लपवून ठेवलेली होती त्याची ती दैन्यावस्था मला पाहवली नाही. मी झटकन ती तसबीर उचलली, पुसली व थेट हेडमास्तराच्या घरचा रस्ता पकडला.

सावरकराची तसबीर राजाने मिळवली ही बातमी पहाटेच वेगाने गावभर पसरली. सेवादल सैनिक व सघ स्वयसेवक तर धावून आलेच पण जवळजवळ सारा गाव शाळेवर लोटला. सावरकराची ही तसबीर मडपात पुन्हा लावण्याचा मान गद्रेगुरुजीनी मला दिला शाळेवरील कृष्णछायेचे सावट दूर करण्याची कामगिरी बजावल्याबद्दल त्यानी कौतुकाने माझी पाठ थोपटली व जाहीर आभार मानले.

## पर्यटनातून राष्ट्रप्रेम !

मागील वर्षी दोन प्रवास केल्यापासून माझ्या चित्तवृत्ती बहरून गेल्या होत्या. भोवतालचे हजारो लोक केवळ नोकरीला जुपून घेतलेले व ससाराला बाधून घेऊन अडकून पडलेले पाहून मला वाटे, आपण खरे मुक्तात्मे आहोत. पक्ष्याप्रमाणे चौफेर भ्रमतीचा आनद आपण उपभोगू शकतो याचा मला फार अभिमान होता. या ५४ दिवसाच्या प्रवासास निघण्यापूर्वी माझे आईवडील, दोन्ही भाऊ व माझी विवाहित बहीण कमल सावे मला मुबईला भेटायला आले होते. आईवडिलाना पाहून पुन्हा आमची भेट होणार आहे की नाही या जाणिवेने मन गहिवरून आले व त्याच्या या अवस्थेत मदत करण्याऐवजी आपल्या मन.शातीसाठी आपण त्याना सोडून जात आहोत ही वस्तुस्थिती मनाला दु.ख देत होती आणि त्यातूनच वैराग्य आणि विरक्ती अशा भावनाच प्रबळ झाल्या. तरीपण आचार्य कालेलकराप्रमाणे हिमालयाच्या पर्वतराजीतून मुक्त प्रवास करावयाचा व जमल्यास न परतता ऋषिकेशलाच कायमचे वास्तव्य करण्याचे मी ठरविले होते

माझ्या या प्रवासात काही गभीर तर काही मजेशीर घटना घडल्या

तामिळनाडूमधील कुन्नूरच्या एका शाकाहारी भोजनगृहात मी जेवणासाठी गेलो असता तेथे माझ्यासमोर केळीचे पान ठेवण्यात आले होते. केळीची पाने स्वच्छतेच्या दृष्टीने सोयीची असतात. काम सपले की फेकून दिले ताटे घासून साफ करण्याचा त्रास नाही. माझ्यासमोर वाढपी आला. त्याने केळीचे एक पान आडवे ठेवले व तो निघून गेला. शैवपथी लोक आडव्या पानावर व वैष्णवपथी लोक उभ्या पानावर जेवण करतात. पण ही गोष्ट त्यावेळी तरी मला माहीत नव्हती मी मनात म्हटले, घाईगर्दीत वाढप्याने चुकून पान आडवे ठेवले असेल म्हणून मी ते पान सरळ करून उभे ठेवले. मीठ, लिंबू वाढण्यासाठी तो वाढपी जेव्हा आला तेव्हा त्याने उभे पान आडवे केले व तो पुढे निघून गेला. तो भात वाढायला पुन्हा आला तेव्हा मी पुन्हा पान उभे करून ठेवलेले उभे पान पाहून तो खवळला हा गृहस्थ आपली थट्टामस्करी करीत असावा या कल्पनेने तो रागाने मला चार शब्द बोलला ते तामीळ शब्द मला न कळल्याने मी काहीच बोललो नाही तेव्हा चिडून जाऊन तो भोजनगृहाच्या व्यवस्थापकाला घेऊन आला. व्यवस्थापकानेही मला तामीळमध्ये फैलावर घेतले त्यामुळे पगतीतील इतर लोकही माझ्यावर रुष्ट झाले मी त्याना हिंदीतून समजावून सागण्याचा प्रयत्न केला तर ती राष्ट्रभाषा त्याच्या डोक्यावरून गेली. शेवटी मी इग्रजीचा अवलब केला तेव्हा कुठे मला त्याच्या चालीरीतीची कल्पना नाही हे त्याना समजले व प्रकरण मिटले नि मीही आडव्या ठेवलेल्या पानावरील रसम–भातावर आडवा हात मारला

त्या आधीच्या एका प्रसंगात तर लोकांनी माझ्यावर हल्लाच केला होता. बगलोर स्थानकावर आमची बस काही वेळ उभी होती पण मला सडासात जायला सवड झाली नाही. नतर आमची बस हिंदुस्थान मशीन टूल्स (एच्. एम्. टी.) या सरकारी क्षेत्रातील सुप्रसिद्ध कारखान्याकडे निघाली. त्यावेळी वाटेतच मला जरा पोटावरील ताण जाणवू लागला. त्यामुळे कारखान्याजवळ बस थाबताच मी जवळच्या इमारतीकडे धावलो ते अधिकाऱ्याचे बगले होते सडास पलीकडे आहेत असे कोणीतरी खुणेनेच सागितले. मी धावतच त्या बाजूला निघालो. समोर एक सडास उघडा दिसला तेव्हा आनदाने आत शिरलो थोडा वेळ जातो न जातो तोच बाहेर गोगाट सुरू झाला. माझ्या सडासाच्या दारावर जोरजोराने लाथा व बुक्के बसू लागले. घाबरून मी बाहेर आलो तर तेथे जमलेल्या लोकांनी मला एकदम मारझोडच करायला सुरुवात केली हा काय प्रकार आहे मला कळेना. त्याच्या कानडी शब्दाचा मला बोध होईना. त्या लोकाचे बडवणे चालूच होते. मी हिंदीत जोरजोरात ओरडून विचारत होतो, 'यह क्या चल रहा है? क्या बात है?' पण कोणीही माझ्या प्रश्नाकडे लक्ष देत नव्हते. शेवटी मी इग्रजीत जोराने ओरडलो, 'हे काय चालले आहे?' जवळ एक वयस्क शीख उभा होता त्याने लोकाना आवरले व मला दमात विचारले, 'तुला स्त्रियाच्या सडासात जाण्यास लाज कशी वाटली नाही?' मी मागे वळून त्या सडासाकडे पाहिले तेथे एक बाई उभी होती, तिनेच ही सारी आग लावली. सडासावर कानडीत काही तरी लिहिले होते पण मला त्याचा बोध कसा होणार? मी त्या सरदारजीस सागितले, 'मी मुबईहून आलो आहे आणि मला कानडी भाषा समजत नाही.' तेथे जर आमच्याकडील पद्धतीप्रमाणे बाईचे चित्र असते तर हा घोटाळा झाला नसता.

त्या सरदारजीने मग भोवतालच्या लोकाना समजाविले. लोक मोठमोठ्याने हसले व तेथून निघून गेले व मी सुटलो. पण तो सरदारजी खरच मोठ्या मनाचा! जणू काही आपल्याच हातून गुन्हा घडला अशा भावनेने त्याने माझी पुन्हा पुन्हा क्षमा मागितली. माराने अग ठणकत असतानाच मी त्याच्याशी हस्तादोलन केले व तेथून एकदाचा सटकलो

पण असा प्रकार पुन्हा घडू नये याची खबरदारी घेण्यासाठी मी लगेच उपाययोजना केली. पुढच्या प्रवासात नवीन राज्यात शिरताना रेल्वेच्या पहिल्या स्टेशनवर उतरलो की प्रथम प्लॅटफॉर्मच्या टोकाला जाऊन तेथील सडासावरील त्या भाषेतील 'मर्दाना' हा मजकूर मी टिपून घेऊ लागलो व वाटेत तसा मजकूर असलेल्या सडासातच जाऊ लागलो हो, नाहीतर पुन्हा मार खाण्याची वेळ यायची.

## हिंदुस्थानी दणका

आमच्या पर्यटन व्यवसायात अनेक चमत्कारिक प्रसग येऊन जातात प्रसगी राष्ट्रीय अस्मिता दाखवावी लागते. कधी प्रसगावधान दाखवावे लागते तर कधी हाणामारीही करावी लागते.

असाच एक प्रसग श्रीलकेत घडला. अनुराधापुरा नावाचे तेथे एक स्टेशन आहे. आम्ही परतीच्या प्रवासासाठी तेथे गाडीत चढणार होतो कोलबोहून २ डबे रिझर्व येणार होते. श्रीलकेची रेल्वे मात्र अगदी व्यवस्थित आहे. आमचे दोन आरक्षित डबे येणार होते ते त्यानी अगदी वेळेवर पाठविले. पण दुर्दैवाने त्या डब्याबरोबर कोणी रक्षक वगैरे नव्हता.


मी डबे फलाटाला लागल्याबरोबर डब्यात चढलो बघतो तर ७-८ परदेशी जोडपी डब्यात अस्ताव्यस्त झोपली होती. ते सर्व अमेरिकन प्रवासी होते. मी चकितच झालो आमच्याकरिता असलेल्या डब्यामध्ये ते चक्क घुसले होते. मी त्याना इग्रजीतून विनती केली, 'हा डबा राजा ट्रॅव्हल्ससाठी राखीव आहे. कृपया तुम्ही तो खाली कराल काय? पुढचा डबाही आमचा आहे.' पण ते लोक काही ऐकेनात. तेव्हा मी त्याना थोडे दरडावूनच म्हणालो, 'ही माझी शेवटची विनती आहे. तुम्ही आता कृपया डबा खाली करा.' तेव्हा त्यातला एक अमेरिकन माझ्या अगावर खेकसला, 'You bloody Indian, I will throw you out of this window.'

हे ऐकताच माझे रक्त सळसळले, डोके फिरले, मी म्हणालो, 'हे शब्द आम्ही गेली १५० वर्षे गोऱ्या लोकाकडून ऐकले आहेत. आता मात्र एक मिनिटसुद्धा अधिक ऐकणार नाही. पाहूया कोण कोणाला बाहेर फेकतो ते!'

मी ताबडतोब डब्याबाहेर आलो. आमचे प्रवासी माझी वाटच बघत होते. मी सगळ्याना आत घडलेला सवाद सागितला व म्हणालो, 'हा आपल्या राष्ट्रीय अस्मितेचा प्रश्न आहे. आत घुसून बसलेले हे अमेरिकन आपला राखीव डबा खाली करायला तयार नाहीत. आत आपण आपला हिंदुस्थानी दणका याना दाखवायचा. स्त्रिया व मुलाना कोणीही हात लावायचा नाही. बाकीच्याची मात्र मनसोक्त धुलाई करायची आहे चला सगळे!

मग काय म्हणता, आमच्या प्रवाश्यानाही स्फुरण चढले प्रवाश्यामधील तरुण पोरे, आमचे नोकरही धडाधड डब्यात चढले व त्यानी त्या अमेरिकनाना झोडपायला सुरुवात केली एका माणसाला चोपून खिडकीबाहेर फेकायचा. बाहेर दोघे-तिघे तयारच असायचे मग त्यानी त्याला लाथा-बुक्क्यानी तुडवायचा असा एकच हगामा सुरू झाला. हा गदारोळ बघून स्टेशनवरचे इतर लोकही धावत आले डब्यातील अमेरिकन स्त्रियाही धावत बाहेर आल्या व गयावया करू लागल्या. मग मात्र मी आमच्या लोकाना थाबविले व त्या अमेरिकन लोकाना सागितले की आता दुसरीकडे कोठेतरी गुमान जाऊन बसा. पण हे शब्द आयुष्यात कधी काढाल तर याद राखा. आम्ही स्वतत्र भारताचे नागरिक हे शब्द कधीही निमूटपणे ऐकून घेणार नाही. अगदी तुमच्या देशातही तुम्हाला ठोकून काढू

खरी गमत तर नतर आली. श्रीलकेचा रेल्वे प्रवास आटोपून आम्ही बोटीने भारताकडे निघालो. सकाळी चहापानाची वगैरे व्यवस्था करण्यासाठी मी लवकरच केबिनबाहेर पडलो. बोटीचे रेस्टॉरट डेकवर होते. मी डेकवर पोहोचताच त्याच त्या अमेरिकन स्त्रिया 'अरे तो बघा इडियन येत आहे, पळा रे, पळा,' असा आरडाओरडा करत धावू लागल्या. मी प्रथम चकितच झालो पण मग माझ्या लक्षात आले की अनुराधापुराला ज्या अमेरिकन प्रवाश्याना आम्ही चोपून काढले होते त्यापैकीच त्या स्त्रिया होत्या. मी पुन्हा



**किसान स्पेशल सफर : पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासमवेत : १९८०**

काहीतरी गडबड करण्यासाठी येत आहे असा त्यांचा समज झाला असावा. माझ्या हातात मॅगॅफोन होता. मी त्यांना मॅगॅफोन-वर म्हणालो, 'आता तुम्ही माझे मित्र व पाहुणे आहात. तुम्ही माझ्या मायभूमीत येत आहात, आता काही काळजी करू नका.' मग दर पाच-दहा मिनिटांनी त्या अमेरिकनां-पैकी एखादा माझ्याजवळ येऊन अनुराधा-पुराच्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त करू लागला. कारण मला वाटतं त्यांची नशा आणि मस्ती दोन्ही उतरल्या होत्या व त्यांच्यातला 'स्वातंत्र्यप्रिय अमेरिकन' जागा झाला होता.

□

गेल्या पंचवीस–तीस वर्षांतील माझ्या व्यावसायिक जीवनात काही गंभीर प्रसंगा-नाही मला तोंड द्यावे लागले. एकदा स्पेशल ट्रेनने आम्ही राजस्थानला निघालो होतो. अजमेरला आमच्यापैकी एका बाईंना थोडेसे अस्वस्थ वाटायला लागले. छातीत दुखायला लागले व दरदरून घाम सुटला. सुदैवाने त्याच डब्यात आमच्याबरोबर सफरीवर निघालेले डॉ. म्हसकर पतिपत्नी होते. त्यांनी ताबडतोब बाईंना तपासले तेव्हा त्यांना हृदयविकाराची लक्षणे आढळली. त्या बाईंना ताबडतोब हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याचा सल्ला त्यांनी दिला व इतरांनी आग्रह धरला रात्रीची ९–९॥ ची वेळ होती. डिसेंबर महिन्याचे दिवस होते व राजस्थानची कडाक्याची थंडी भेडसावत होती. डब्याबाहेर पडणेही जीवावर आले होते. आम्ही अजमेर स्टेशनवर चौकशी केली. अजमेरला चांगले हॉस्पिटल नव्हते. आता काय करायचे ? मी म्हटले, 'आपण जयपूरला तातडीने पोहोचायचा प्रयत्न करू या. तेथे चांगल्या हॉस्पिटलमध्ये उपचार करता येतील. पण अजमेर-जयपूर अंतर १३५ कि. मी. चे म्हणजे जवळजवळ ४-५ तासांचा प्रवास. डॉक्टरांचे म्हणणे पडले की जय-पूरला पोचेपर्यंत या बाई उपचाराशिवाय जगणार नाहीत. पण मी म्हटले की आपण लवकर पोहोचायचा प्रयत्न करू. झाले. पण सर्वांचा विरोध पत्करूनही मी एकट्याने धावाधाव सुरू केली. मी असिस्टंट स्टेशन-मास्टरकडे गेलो. त्यांना सांगितले की मला तुमच्या डिव्हिजन ऑफिस सुपरिटेंडंटकडे घेऊन चला. त्यांना भेटून मी सांगितले की, 'आमच्यापैकी एका बाईला हृदयविकाराचा झटका आला आहे व तिला वाचविण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे तिला ताबड-तोब फास्टेस्ट पॉसबिल, जयपूरला घेऊन जायला हवे. आमची गाडी लगेच व द्रुतगतीने जयपूरला जायला हवी आहे.'

सुदैवाने डिव्हिजनल सुपरिटेंडेंटला आमचे म्हणणे व घटनागांभीर्यही पटले व त्यांनी लगेच स्टेशन मास्तरना व कर्मचाऱ्यांना आदेश दिले, 'ही गाडी जयपूरला रन–थ्रू जाऊ द्या.' आम्ही त्याचे मनापासून आभार मानले.

गाडी जयपूरला न्यायचा आदेश तर मिळविला. पण खरी कसोटी पुढेच होती. प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. थोडासादेखील उशीर फार महागात पडण्याची शक्यता होती. एक जीव जीवन–मृत्यूच्या सीमारेषे-वर जणू घोटाळत होता. रेल्वे कर्मचारी लगेच कामाला लागले. आमच्या स्पेशल ट्रेनचे शटिंग सुरू झाले. आमच्या ग्रुपमधील प्रवाशांना मात्र हा सारा मूर्खपणाच वाटला. जवळजवळ सर्व गाडीच माझ्याविरुद्ध होती.

अजमेरमधल्याच एखाद्या तज्ज्ञ डॉक्टरकडे वा प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये उपचार करून घ्यावेत असे त्याचे मत होते पण माझा निर्धार मात्र कायम होता जेव्हा असा बाका प्रसग येतो तेव्हा माझ्याच बुद्धीने वागायची मला सवय आहे ऐकावे जनाचे पण करावे मनाचे मी कोणाचेच म्हणणे मानले नाही. गाडी सुटायची वेळ आली स्टेशनवरचा सर्व स्टाफ आम्हाला निरोप द्यायला आला. त्याना मी एक विनती केली. त्याना सागितले की मार्गावर फुरोरा नावाचे एक जक्शन आहे *त्या ठिकाणी आपण तीन मिनिटे गाडी* थावबा व तेथे कृपया एखादा तज्ज्ञ डॉक्टर आपण तयार ठेवा. मार्गावरील या स्टेशनवर एकदा डॉक्टरकडून बाईंची तपासणी करून परिस्थितीचा आढावा घ्यावा, काही तातडीची मदत लागल्यास तेथे मिळवावी असा माझा विचार होता.

एवढ्यात इजिनाच्या बाजूस काही तरी गडबड सुरू झाली. मी धावतच इजिनकडे गेलो. बघतो तर इजिन ड्रायव्हर व इजिनात कोळसा टाकणारे दोघे फायरमन भाडत होते. आमच्या दृष्टीने प्रत्येक मिनिट महत्त्वाचे होते आणि इकडे तर भलतेच काही चालले होते. त्या दोघा फायरमनचे म्हणणे होते की, आम्ही ओव्हरड्यूटी झालो आहोत, दमलो आहोत *त्यामुळे* जयपूरला आम्ही *येणार* नाही. याच्यापैकी एका बहेनजीला हार्टअटॅक आला आहे व तिला जयपूरला ताबडतोब नेणे आवश्यक आहे असे सागून तो इजिन ड्रायव्हर त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होता पण ते फायरमन काही दाद देत नाहीत हे बघून इजिन ड्रायव्हरचा सताप अनावर झाला व त्याने एका फायरमनच्या अशी काही कानफटात लगावली की तो इंजिनातून खालीच कोसळला ड्रायव्हरनेही कोळसे टाकायचे फावडे घेऊन त्याच्यामागोमाग *खाली उडी टाकली व तो त्या* फायरमनला मारायला धावणार तेवढ्यात मी त्याचा हात पकडला मी ड्रायव्हरला म्हणालो '*याला मारू नकोस पाहिजे तर इजिनात कोळसे टाकायला माझी माणसे देतो, पण तू गाडी चालू कर.*' ड्रायव्हर मला म्हणाला, 'आप चिता मत कीजिये. यह लोग जरूर आयेंगे. यह इन्सानियत का सवाल है। आज तुम्हारी बहेन बीमार है, कल हमारी बहेन भी बीमार हो सकती है। मै देख रहा हूँ आप कितनी दौड-धूप कर रहे हैं, और यहा हमारी ड्यूटी होकर भी हम भागेंगे तो कैसा होगा?' मी त्या फायरमनना सागितले, '*तुम्हाला मी बक्षीस देईन पण गाडी लगेच चालू करा*' ड्रायव्हर पुन्हा म्हणाला, 'बक्षीस किसीको नही देना साब. गाडी चलेगी और फास चलेगी.' ते फायरमनही खजिल होऊन इजिनात चढले. मीही इजिनातच बसून राहिलो गाडी चालू झाली.

मी आयुष्यात कधी एवढ्या भरधाव वेगाने चाललेल्या गाडीत बसलो नव्हतो. आमचे वाफेच्या इजिनाचे ते प्रचड धूड कर्णकर्कश शिट्या मारत अक्षरश: भयानक वेगाने दौडत होते, ड्रायव्हरलाही उत्साहाचे उधाण आले होते. तोही मला म्हणाला, '*मेरी जिंदगीमे इतनी फास्ट गाडी मैंने कभी नही चलायी साब यह मौका मुझे पहिली बार मिला है।*' इतर गाड्याना साईडिंगला टाकून आमच्या गाडीला रन-थ्रू सिग्नल दिले जात होते. ड्रायव्हर मोठ्या दिमाखात मला सागायचा 'साब ये फलाणो मेल, यह साब फलाणी एक्स्प्रेस, सबको आज साइडिंगमे डाल दिया है केवल यह इन्सानियतके कामके लिये और शायद भारतीय रेलपर यह पहिला मोकाही होगा।

गाडी फुरोरा स्टेशनवर धापा टाकत *थाबली*. बाईचा डबा इजिनपासून चौथा डबा आहे हे आम्ही अजमेर स्टेशनमास्तरतर्फे फुरोराला कळविले होते. आमची गाडी थाबते न थाबते तोच त्या डब्यासमोर एक *तरुण रुबाबदार डॉक्टर हातात बॅग वगैरे* घेऊन उभा होता. त्याने ताबडतोब बाईंना तपासले व मला सागितले की तुम्ही योग्य निर्णय घेतला आहे बाईंची गभीर परिस्थिती बघता अजमेर हे ठिकाण अत्यत अयोग्य व मृत्यूला निमत्रण देणारेच ठिकाण ठरले असते. कारण तेथे फारशा वैद्यकीय सोयी नाहीत. आता धोका टळला आहे; पण त्याना गाडीतच राहू द्या. मी औषध देतो त्या डॉक्टरानी जयपूर स्टेशनवर ॲम्ब्युलन्सचीही व्यवस्था केली होती ते रेल्वेचे डॉक्टर होते.


दोन मिनिटातच गाडी पुन्हा सुसाट वेगाने निघाली. आम्ही पहाटे दीडच्या सुमारास जयपूरला पोहोचू असा डॉक्टराचा अंदाज होता. आम्ही एक वाजताच जयपूर गाठले. अजमेर ते जयपूर हे १३५ कि. मी. चे अतर आम्ही केवळ अडीच तासात तोडले होते.

जयपूरच्या डॉक्टरानी बाईंना तपासले व सागितले की आत्ताच त्याना गाडीतून हलवू नका आपण उद्या सकाळी काय तो निर्णय घेऊ मला वाटले ते डॉक्टर आपली जबाबदारी टाळत आहेत की काय? पण तसा काही प्रकार नव्हता. स्टेशनबाहेर खरोखरच रुग्णवाहिका तयार होती. हॉस्पिटलमधील एक खोलीही त्यानी तयार ठेवली होती मी त्याना विनंती केली की आत्ताच *आपण बाईंना हॉस्पिटलमध्ये हलविणार* नसलो तरी कृपया रुग्णवाहिका रात्रभर स्टेशनवरच राहू द्या म्हणजे तशीच काही वेळ आली तर हॉस्पिटल गाठता येईल.

अजमेरमधूनच आम्ही रात्री मुबईला लाईटनिंग ट्रककॉल केला होता. सकाळीच त्या बाईंचे यजमान जयपूरला विमानातील टॉप प्रायॉरिटी सीट घेऊन हजर झाले त्याना जेव्हा त्याच्या पत्नी जीवत अशा दृष्टीस पडल्या तेव्हा तर ते माझ्या पायावरच येऊन पडले. इतराकडून त्याना या कठीण प्रसगाची सर्व कहाणी कळली होती. माझ्या निर्णयामुळे मी त्या बाईंचा जीव वाचवू शकलो याचा मला खरोखरच आनद झाला. पण... पण... अशा अनेकाचे प्राण प्रवासात वाचवणाऱ्या ह्या राजाला स्वत च्या आईला हार्ट अॅटॅक आला असताना वा वडिलाना प्रवासातच भयानक आजार आला असतानाही, प्रयत्नाची पराकाष्ठा नि पैशाचे पाणी करूनही वाचवता आले नाही. ह्याची जबरदस्त मानसिक टोचणी आजही माझ्या डोळ्यात अश्रू उभे करते दुसऱ्याचे घरात मागल्य निर्माण करा व स्वत चे दु खाचे प्रदर्शन न करता इतराना हसवण्याचाच प्रयत्न करा ह्या पूज्य सानेगुरुजीच्या शिकवणुकीची जपणूक करणाऱ्या राजाला आयुष्यभर जणू असच वागाव लागलय. त्यात दु ख आहेच, पण कर्तव्यपूर्तीच समाधानही आहे!

□

**सफरसम्राट राजा पाटील याचे आत्मकथन 'केल्याने देशाटन' मुंबईच्या 'आदित्य प्रकाशन या सस्थे' तर्फे जानेवारी १९८८ मध्ये प्रकाशित होत आहे. त्या पुस्तकातील हा काही भाग**



# कांचनगंगा शिखराचे आव्हान आम्ही २४ तरुणांनी स्वीकारले आहे... मार्च ते मे १९८८ खर्च: २५लाख रु.

मोहीम प्रमुखांच्या मुलाखतींवर आधारित लेख

दार्जिलिगच्या उत्तर–पश्चिमेला सुमारे ७४ कि. मी. व एव्हरेस्टच्या दक्षिण–पूर्वेला सुमारे १२० कि. मी. वर उभे असलेले व नेपाळ आणि सिक्कीमच्या सीमेवरून गंगा व ब्रह्मपुत्रेच्या सागराशी होणाऱ्या मीलनाला साक्ष देणारे कांचनगंगा (८५८६ मीटर–२८,२०८ फूट) हे शिखर जगातील तिसऱ्या क्रमांकाचे व भारतातील सर्वोच्च शिखर आहे. महाराष्ट्रातील २४ तरुणांनी मार्च ते मे १९८८ मध्ये ' पंचरत्नेचे हे कोषागार ' लुटण्याचे ठरवले आहे.

जगामध्ये ८००० मीटरपेक्षा उंच अशा १४ शिखरांचे संकुल आहे. त्यामध्ये एव्हरेस्ट, के–२ ( गुडविन ऑस्टीन ), कांचनगंगा, ल्होत्से, मकालू, गशेरब्रुम–१, ब्रॉडपीक, मानस्लू, धौलागिरी–१, अन्नपूर्णा, चो–ओम्, गोसांईथान, नंगा पर्वत, गशेरब्रुम–२ अशा शिखरांचा समावेश आहे. या सर्वांना ' सुपर क्लब ' असे संबोधले जाते. प्रत्येक महत्त्वाकांक्षी गिर्यारोहकांची इच्छा असते की, एक ना एक दिवस या ' सुपर क्लब ' मधील एका शिखरावर पाऊल ठेवावे. भारतातून हे स्वप्न साकार करण्याचा पहिलाच संपूर्ण नागरी प्रयत्न. आमचा हा २४ जणांचा चमू ८८ च्या वसंत ऋतूमधे करणार आहे. यापूर्वी काही मोहिमा भारत सरकारतर्फे किंवा सेनादलातर्फे आयोजित करण्यात आल्या होत्या. परंतु सरकारच्या प्रत्यक्ष पाठबळा'शिवाय आम्ही हा विचार मनात आणण्याचे धाडस केले आहे. इतकेच नव्हे तर या मोहिमेची आणखी काही वैशिष्टचे आहेत. ती म्हणजे शेर्पांच्या मदतीशिवाय, तसेच ' शक्य झाल्यास ' कृत्रिम प्राणवायूचा उपयोग न करता ही चढाई करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

यासाठी लागणार आहे प्रचंड जिद्द, गिर्यारोहणातील प्रगत प्रशिक्षण, संघभावना, नेतृत्व कौशल्य आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे रु. २५ लाख. यापैकी सर्व प्राथमिक गोष्टी तर आमच्याजवळ आहेतच. म्हणूनच आम्ही भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे शिखर कामेर (७७५६ मीटर, २५४४७ फूट) हे मे-जून १९८६ मधे यशस्वीरीत्या सर करू शकलो. परंतु आता आवश्यकता आहे पैशाची. कामेर मोहिमेला खर्च आला सुमारे १ लाख व सदस्य होते फक्त ८. तसेच प्रत्यक्ष हिमालयातील वास्तव्य होते ६० दिवस. परंतु कांचनगंगासाठी अत्युच्च दर्जाची साधनसामग्री तीसुद्धा २४ सदस्य व १५ अती उंचीवर येणारे हमाल यांच्यासाठी लागणार आहे. तसेच प्रत्यक्ष वास्तव्य होणार आहे ९५ दिवस. कामेरसाठी सामानाचा बोजा होता १५०० किलो तर आता असणार आहे ८००० किलो.

सहजच मनात प्रश्न येतो की एवढे सामान का लागते ? याचं उत्तर फार सोपे आहे. एक म्हणजे अतिउंचीवर लागणारं वैशिष्टचपूर्ण खाद्य. तसंच, २५ ते ३० तपमानाचा व ताशी १०० कि. मी. वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांना तोंड देऊ शकणारी साधनसामग्री. यापैकी जे वैशिष्टचपूर्ण खाद्य लागतं ते आम्ही भारतीय बनावटीचंच परंतु तिथे वापरता येण्यासाठी काही बदल करून घेऊन जातो. उदा. तयार उपमा पॅकेटस् किंवा सुकवलेल्या भाज्या इ. पावडर स्वरूपातील दूध, नूडल्स, सुकवलेले मांस (जास्त कॅलरीज मिळण्यासाठी हे आवश्यक असतं) यासाठी याप्रकारचं खाद्य कसं आणि किती टिकतं याचे निघण्यापूर्वी घरी प्रयोग करावे लागतात. उदा. फार कोरड पाडणारे पदार्थ चालत नाहीत. तसेच जास्त चावावे लागणारे

पदार्थही शक्यतो टाळावे लागतात. अत्यंत साध्या वस्तूसुद्धा प्रेशरकुकरमध्ये शिजवाव्या लागतात.

तशीच गोष्ट साधन सामग्रीची. २० ते २८ हजार फुटांवरील अती थंडीचा सामना करण्यासाठी पिसांची बनवलेली ( खास प्रकारच्या बदकाची पिसे ) झोपण्याची पिशवी जॅकेट, पॅंट, हातमोजे इत्यादी तसेच पायात घालण्यासाठी लोकरीचे पायमोजे व खास प्रकारचे बूट, बर्फावरून चालण्यासाठी बुटाला जोडायचे खिळे (Crampons) व हातात धरायची Ice–Axe. तर अति भयावह असे चालुंग हिमनदीतील २ बर्फकडे ( २००० फुटाचा एक व ३५०० फुटाचा दुसरा ) पार करण्यासाठी व त्यापुढील सुमारे ४ ते ५ हजार फूट खडकमिश्रित बर्फाचा कडा चढून जाण्यासाठी सुमारे ६००० मीटर लांबीचा दोर तसेच वेगवान वाऱ्यांचा सामना करणारे तंबू इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. ही सर्व साधने परदेशातून मागवावी लागतात. (कारण भारतात बनवले जाणारे कमी दर्जाचे असते.)

हे सर्व सामान वाहून न्यायला सुमारे ३०० हमाल लागतील. त्यांच्याबरोबर हिले या खेड्यापासून १६ दिवसांच्या चालीनंतर आम्ही मुख्य तळावर पोहोचू. हिले गावापर्यंत (जे नेपाळमध्ये आहे) आम्हाला सर्व सामान रेल्वे व ट्रकच्या साहाय्याने न्यावे लागेल. त्याचा मार्ग मुंबई – कलकत्ता–बिराटनगर (भारत–नेपाळ सीमेवरील गाव) व तेथून पुढे हिले असा असेल. मुख्य तळाच्या पुढे आणखी ६ तळ स्थापन केल्यानंतर ६ व्या तळावरून कमीत कमी २ जणांची तुकडी शिखरारोहणाचा प्रयत्न करू शकेल. परंतु त्यासाठी मनुष्यबळ हे सर्वांचे खर्ची पडते. या सर्वांचे नियोजन हे अत्यंत पद्धतशीर व काटेकोर असावे लागते. यासाठीच चमूची निवड करताना त्याचा गिर्यारोहणातील अनुभव लक्षात न घेता सामान्य जीवनातील कामगिरीकडेही लक्ष पुरवण्यात आले आहे.

## सर्वांगीण पूर्वतयारी

सर्व सदस्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व तयारी व्हावी यासाठी काही खास प्रशिक्षण शिबिरेही आयोजित करण्यात आली आहेत. उदा. होकायंत्राच्या सहाय्याने रात्रीच्या वेळी दिशेचा शोध घेणे, प्रस्तरारोहण मोहिमा, रेडियो वायरलेस ऑपरेशन, अपघातग्रस्त गिर्यारोहकांची सुटका करणे, प्रथमोपचार इत्यादी. इतक्या शास्त्रशुद्ध तयारीची गरज का आहे ते शिखराच्या इतिहासाकडे वळून पाहिले तर सहज लक्षात येते.

सुमारे १८५० पर्यंत 'कांचनगंगा' हेच जगातील सर्वोच्च शिखर मानले जात होते. परंतु त्यानंतर एव्हरेस्टच्या उंचीचा शोध लागला. तसेच 'के–२' या शिखराची उंची कांचनगंगापेक्षा, ५० फुटांनी का होईना, पण जास्त असल्याचे निदर्शनास आले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश पर्यटकांनी व संशोधकांनी सर्व्हे करण्याच्या निमित्ताने या शिखरांच्या पावलांना स्पर्श केला. १९०५मध्ये ऐलीस्टर क्रौलेच्या नेतृत्वाखालील पहिल्या चढाई मोहिमेला अपयश आलं व ४ जणांना प्राणास मुकावे लागले. १९२० मध्ये रेबर्न व क्रॉफर्ड यांनी यालुंग हिमनदीतून प्रयत्न केला. १९२९ व १९३१ च्या डॉ. पॉल बॉअर या जर्मन गिर्यारोहकांच्या मोहिमांना उत्तरेकडूनही अपयश आलं. त्यानंतर फार्मर, डायरेनफर्थ, कुक व एव्हरेस्ट प्रसिद्ध सर जॉन हंट यांचे दुसऱ्या महायुद्धापूर्वीचे प्रयत्न अयशस्वी झाले. १९५४ मध्ये जॉन केम्प व जॉन टकर यांनी यालुंग हिमनदी व दक्षिणेकडील कडा यांची प्रथम सखोल पहाणी केली. शेवटी १०७ वर्षानंतर १९५५ च्या मे महिन्यामध्ये डॉ. चार्लस इव्हान्स यांच्या नेतृत्वाखाली जो ब्राऊन व जॉर्ज बँड यांनी शिखरमाथ्यावर पोचण्याचा मान मिळविला. परंतु त्यांनी शेवटची दहा पावले पुढे न जाण्याचे ठरवले कारण कांचनगंगा हे सिक्कीमच्या महाराजांचे दैवत मानले जाते व त्याच्या माथ्यावर पाऊल ठेवणे क्षुद्र मानवासाठी योग्य नाही या भावनेचा भंग त्यांनी केला नाही. त्यानंतर तब्बल बावीस वर्षांनी, १९७७ मध्ये भारतीय सेनादलाच्या तुकडीस उत्तरेकडून यश आले ते केवळ कर्नल प्रेमचंद व एन. डी. शेर्पा यांच्या जिगरबाज ३००० फुटांच्या अंतिम चढाईमुळे. त्यानंतर १९७९ मध्ये प्रथमच कृत्रिम प्राणवायूशिवाय अती उत्तरेकडून पीटर बोर्डमन, जो टास्कर, डग स्कॉट व जॉर्जेस बॅटमबोर्ग यांना यश आले. त्यानंतर आत्तापर्यंत केवळ ५ इतर मोहिमांना यश आले आहे.

नेपाळमध्ये असलेल्या शिखरावर मोहीम आखायची म्हणजे आणखी एक वैशिष्ट्य असतं. भारतीय शिखरावरील चढाईसाठी भारतीय गिर्यारोहण संस्थान ( Indian Mountaineering foundation ) कडून अर्थसहाय्य मिळते. याउलट नेपाळमधील शिखरासाठी नेपाळ सरकारला शिखर राखून ठेवण्यासाठी फी ( Royalty ) द्यावी लागते. त्यामुळे केवळ परवानगी हातात पडताच सुमारे ५०,००० रुपये खर्च मोहिमेच्या डोक्यावर चढलेला असतो. शिवाय नेपाळ सरकारशी संपर्क ठेवण्यासाठी काठमांडूतील एका संस्थेला दक्षिणा द्यावी लागते. तसेच त्या संस्थेचा एक अधिकारी मोहिमेबरोबर सरकारी प्रतिनिधी म्हणून बरोबर न्यावा लागतो. त्याचा सर्व खर्च व फी द्यावी लागते. जाताना व येताना लागणाऱ्या हमालांवर सुमारे ७ लाख तर अत्याधुनिक साहित्यावर सुमारे ५ लाख रुपये खर्च येणार आहे. या



**मुंबईतल्या अडचणीच्या लहान जागेतही सराव**

आकड्यावरून मोहिमेच्या प्रचंडतेची कल्पना येते

आपल्यापैकी दार्जिलिंगला जाऊन आलेल्या प्रत्येक पर्यटकाने सकाळच्या गुलाबी थंडीत पश्चिमेकडे दिसणारे कांचनगंगा पर्वतराजीचे रम्य दृश्य पाहिले असेल. डावीकडून ओळीने दिसणारी कोकतांग, जानू, राथांग, काब्रू, कांचनगंगाची ४ शिखरे (दक्षिण, मध्य, मुख्य व पश्चिम कांचनगंगा) आणि अती उजवीकडे पांडिम अशी एकाहून एक अप्रतिम शिखरे पाहिली असतील. यापुढे जे दार्जिलिंगला जातील व रोज सकाळी होणाऱ्या या बर्फाच्छादित कोषागाराच्या दर्शनाने धन्य होतील तेव्हा त्यांच्या मनात आणखी एक अभिमानास्पद विचार आल्याशिवाय राहणार नाही याच पर्वतराजीच्या माथ्यावर (अर्थात १० पावले कमी) पाऊल रोवण्याची अमानवी महत्त्वाकांक्षा घेऊन १९८८ च्या मार्च ते जून महिन्यात आपल्यासारखीच सर्वसामान्य राहणी असणारे तरुण येतील आणि मराठी बाण्याचा आणि उज्ज्वल परंपरेचा मानाचा तुरा आणखी उचावतील व पर्यायाने भारतीय तरुणासमोर आणखी एक देदीप्यमान आदर्श ठेवतील. या अत्यंत महत्त्वाकांक्षी मोहिमेचा आपणही अप्रत्यक्ष का असेना परंतु एक भाग होऊ शकतो ही जाणीव नक्कीच सुखावह असेल. सर्वजणांच्या आशीर्वादानेच आम्ही ही मोहीम यशस्वी करू असा आम्हाला विश्वास वाटतो. □

### मोहिमेत भाग घेणाऱ्या सदस्यांची नावे

| | नाव | व्यवसाय | मोहिमेतील मुख्य कामगिरी |
|---|---|---|---|
| १) | वसंत लिमये (३१) | इंजिनियर | नेता |
| २) | संजय बोरोले (२७) | " | उपनेता |
| ३) | दिलीप लागू (२६) | व्यापारी | उपनेता |
| ४) | श्रीकांत ओक (२८) | वकील | अर्थसहाय्य |
| ५) | अनिल कुमार (३०) | अकौंटंट | साधनसामग्री |
| ६) | चंद्रशेखर ताबट (३०) | इंजिनियर | खाद्यसामग्री |
| ७) | रमाकांत महाडिक (३०) | टेक्निशियन | " |
| ८) | ऋषिकेश यादव (२८) | नोकरी | पॅकिंग |
| ९) | डॉ. रवि बापट (४५) | शल्यविद्या प्राध्यापक : मेडिकल ऑफिसर | |
| १०) | डॉ. मिलींद चितळे (२६) | डॉक्टर | औषधसामग्री |
| ११) | चारुहास जोशी (३१) | नोकरी | पोर्टर व्यवस्था |
| १२) | सुनील जोशी (२९) | व्यवसाय | प्रवास |
| १३) | आमोद खोपकर (२६) | नोकरी | हिशोब |
| १४) | सौ. सुनीती जैन (४०) | नोकरी | मोहीम दैनंदिनी |
| १५) | झुझर रंगवाला (२५) | व्यवसाय | जनसंपर्क |
| १६) | उदय कोलवणकर (३०) | इंजिनियर | कार्यवाह |
| १७) | संजय रांगणेकर (२५) | पो. इन्स्पेक्टर | साधनसामग्री |
| १८) | फ्रँको लिन्हारस (३५) | केमिस्ट | उपकार्यवाह |
| १९) | विद्याधर जोशी (२३) | विद्यार्थी | साधनसामग्री |
| २०) | विश्वास सोमण (३२) | व्यवसाय | बेसकॅम्प मॅनेजर |

(इतर ४ सदस्यांची अजून निवड व्हायची आहे.)

गिरिविहार–कांचनगंगा ८८
द्वारा : दिलीप माधव लागू
भागिरथी निवास, १ला मजला
३८२, न. चिं. केळकर रस्ता,
दादर, मुंबई ४०० ०२८

## 'कांचनगंगा' मोहिमेस पंतप्रधानांचे सहकार्य

नवी दिल्ली, दि. २ (विशेष प्रतिनिधी) – मुंबईच्या 'गिरिविहार संस्थे'तर्फे 'कांचनगंगा' शिखरावर जाणाऱ्या गिर्यारोहण मोहिमेस मदत करण्याचे आश्वासन पंतप्रधान राजीव गांधी यांनी दिले आहे.

काँग्रेस (इं.) चे श्री. शरद पवार यांच्यासमवेत या गिर्यारोहण पथकाचे नेते श्री. वसंत लिमये यांनी काल पंतप्रधानांची भेट घेतली. मार्च ८८ मध्ये जाणाऱ्या या मोहिमेस २५ लाख रु. खर्च येणार असून त्यासाठी आर्थिक मदत देण्याची विनंती त्यांनी केली. संरक्षण मंत्री विश्वनाथ प्रताप सिंग यांचीही पवार व लिमये यांनी भेट घेतली आणि त्यांना मोहिमेची माहिती दिली.

(महाराष्ट्र टाईम्स, ३ एप्रिल ८७)



# आंतरराष्ट्रीय पर्यटन आणि आर्थिक विकास

**माधव**

देशात येणाऱ्या परदेशी पर्यटकांमार्फत प्राप्त होणारे विदेशी चलन हा आंतरराष्ट्रीय पर्यटन आणि आर्थिक विकास यांच्या परस्पर-संबंधातील केवळ एक दुवा आहे. पर्यटकांकडून प्राप्त होणारे परकीय चलन आणि निर्यातीद्वारे प्राप्त होणारे परकीय चलन यांतील फरक एवढाच की, निर्यातीत देशी वस्तू परदेशी बाजारपेठेत परदेशस्थांना विकल्या जातात तर पर्यटक स्वतः इतर देशात जाऊन तिथल्या वस्तू व सेवांची खरेदी करतात. पर्यटनाद्वारे प्राप्त होणारे परकीय चलन आवश्यक वस्तू, सेवा वा तंत्रज्ञान यांच्या आयातीसाठी वापरून आर्थिक विकासाला चालना देता येणे शक्य आहे. शिवाय पर्यटनाशी संबंधित क्षेत्रे श्रमप्रधान असल्याने पर्यटन विकासाद्वारे देशांतर्गत रोजगार निर्मिती वाढवता येते.

मात्र पर्यटन व आर्थिक विकास यांच्या संबंधांचा विचार एवढ्या मर्यादित चौकटीत करणे उपयोगी नाही. परकीय चलनाची चणचण असणारा एखादा अविकसित देश जेव्हा पर्यटकांना आकर्षित करण्या-साठी धोरणांची फेरआखणी करू पहातो तेव्हा तर पर्यटन व आर्थिक विकास यांच्यातील व्यामिश्रतेची दखल घेणे अपरिहार्य ठरते.

एकतर देशात येणाऱ्या परदेशी पर्यटकांबरोबरच परदेशी जाणाऱ्या स्वदेशी पर्यटकांचाही विचार करावा लागतो. विशेषतः पर्यटनाद्वारे प्राप्त होणारे परकीय चलन महत्त्वपूर्ण असताना पर्यटनावर खर्च होणारे परकीय चलन विचारात घ्यायला हवे. दुसरे, परदेशी पर्य-टकाना आकृष्ट करण्यासाठी त्या क्षेत्रांना उत्तेजन मिळते ती क्षेत्रे (उदा. पंचतारांकित हॉटेल्स) आपल्या गुंतवणूक विषयक सामाजिक अग्रक्रमांच्या विरुद्ध असू शकतात. परदेशी पर्यटकांसाठी विकसित झालेली ही क्षेत्रे स्थानिक धनिकांमार्फत वापरली जातात आणि चैनीला उत्तेजन मिळते. याचा परिणाम बचतीचे प्रमाण, गुंतवणुकीची रचना इत्यादींवर व म्हणून आर्थिक वाढीच्या आशयावर होतोच

आणि शेवटची महत्त्वाची गोष्ट परकीय प्रवाशांमार्फत मिळणारे विदेशी चलन. आपण पर्यटनक्षेत्राच्या वाढीला प्रोत्साहक अशी जी धोरणे आखतो. त्याशिवाय इतर बाह्य घटकावरही (उदा. परराष्ट्रातील तेजी-मंदीची स्थिती) अवलबून असते. प्रस्तुत लेखात आतरराष्ट्रीय पर्यटन व आर्थिक विकास याच्यातील बहुविध सबधाचा थोडक्यात विचार करून भारतातील पर्यटनक्षेत्राचा, पर्यटनाद्वारे प्राप्त होणाऱ्या परकीय चलनाच्या सदर्भात पर्यटनविषयक धोरणाचा आढावा घेण्याचे योजिले आहे.

देशाटनामुळे मनुजाचे चातुर्य वाढते हे खरे असले तरी देशाटन आवश्यक गरजापैकी नसल्याने उत्पन्नवाढीबरोबर पर्यटनाची प्रवृत्ती वाढते. आतरराष्ट्रीय पर्यटनाबाबत, परदेश प्रवासातील खर्चामुळे, हे विशेषत: खरे आहे विकसित देशातून बाहेर पडणाऱ्या पर्यटकाच्या जास्त सख्येचे हे मुख्य कारण आहे आर्थिक वाढ आणि पर्यटन याच्यातील सबधाचा हा एक पदर आहे. आतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था तेजीच्या अवस्थेत असेल तर परदेशी राष्ट्रातील उत्पन्न व रोजगार यात सातत्याने वाढ होऊन पर्यटकाची सख्या वाढती असेल उलट मदीसादृश परिस्थितीत उत्पन्न व रोजगाराची वाढ कुठित झाली म्हणजे त्याचा परिणाम पर्यटकाच्या सख्येवर होईल. विकसित देशातील पर्यटक जगभरच्या स्थळाची निवड ज्या पद्धतीने करतात ती स्वदेशाला अनुकूल बनवण्याचा प्रयत्न करून विभिन्न देश पर्यटनाच्या बाजारपेठेतील आपला वाटा टिकवू / वाढवू शकतात.

देशात येणाऱ्या परदेशी पर्यटकाकडून परकीय चलन प्राप्त होते मात्र याबरोबरच देशातील पर्यटक इतर देशात जात असतील तर ते विदेशात खर्च करीत असलेले परकीय चलन विचारात घ्यायला हवे प्रत्येक देश विकासाच्या कोणत्या तरी टप्प्यावर असल्याने बाहेर जाणारे व बाहेरून येणारे असे पर्यटकाचे दोन प्रवाह असतील. परदेशी पर्यटकाद्वारे प्राप्त होणारे परकीय चलन व देशी पर्यटक खर्च करीत असलेले परकीय चलन याचा नक्त परिणाम म्हणजे पर्यटनापासून प्राप्त होणारे निव्वळ उत्पन्न. शिवाय पर्यटनाला चालना देण्यासाठी जर काही वस्तूची आयात करावी लागली वा परकीय तंत्रज्ञान, सेवा याची खरेदी करण्यात आली तर या बाबीवरील खर्चही पर्यटकाकडून प्राप्त होणाऱ्या ढोबळ उत्पन्नातून वजा करायला हवा. परदशातून येणाऱ्या पर्यटकाकडून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाच्या तुलनेत देशाबाहेर जाणाऱ्या पर्यटकाचा परकीय चलनातील खर्च व पर्यटन विकासावरील विदेशी चलनातील खर्च मर्यादित ठेवता आला तर पर्यटनक्षेत्र परकीय चलन प्राप्त करण्याचे साधन ठरू शकते. एखादा देश विकासाच्या अशा अवस्थेत असेल – जिथे परकीय चलनाची चणचण हा आर्थिक विकासातला अडसर ठरतो – तर पर्यटनविकास आर्थिक प्रगतीस चालना देणारा घटक ठरू शकतो.

पर्यटनक्षेत्राचा विकास नक्त परकीय चलन मिळवून देणारे क्षेत्र म्हणून विकास करणे तत्त्वत. शक्य असले तरी त्याचा आर्थिक विकासाच्या सदर्भात विचार करताना इतर बाबीही विचारात घ्याव्या लागतील. पर्यटकाना आकृष्ट करण्यासाठी विवक्षित प्रकारच्या सेवा, वस्तू उपलब्ध करून द्याव्या लागतात व त्यासाठी गुतवणुकीची रचना सामाजिक अग्रक्रमापेक्षा वेगळया रीतीने करावी लागते. शिवाय या वस्तू व सेवाचा वापर परदेशी प्रवाशापुरताच मर्यादित रहात नाही त्यामुळे पर्यटनाचा विकास करताना सामाजिक अग्रक्रमाना मुरड घालण्याचे सभाव्य दुष्परिणाम, परकीय चलनातील सभाव्य उत्पन्नाबरोबर विचारात घ्यायला हवेत.

अर्थात आतरराष्ट्रीय पर्यटनाची वाढ आणि सामाजिक अग्रक्रम याच्यात नेहमीच परस्परविरोध असेल असे नाही. उदा. पर्यटन विकासाच्या कार्यक्रमामुळे रेल्वे / विमानसेवा अधिक कार्यक्षम व सौजन्यशील बनल्या तर त्याचा लाभ परदेशी प्रवाशाबरोबरच देशी प्रवाशानाही मिळेल व त्याबाबत कुणाची तक्रार असणार नाही. पर्यटनाशी सबधित क्षेत्रे उदा हॉटेल्स, उपहारगृहे, वाहतूक इत्यादी रोजगार प्रधान असल्याने त्याच्या विकासामुळे रोजगार निर्मिती व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल असे म्हणण्यात येते हा मुद्दाही मान्य करता येईल, पण पर्यटन विकासासाठी पचतारांकित हॉटेल्सची उभारणी, कार्यक्षम टॅक्सीसेवेसाठी मोटारीची आयात, पर्यटक ज्या स्थळाना भेटी देतात तिथे वाहतुकीची सुधारणा इत्यादीमुळे उपलब्ध साधनाचा पर्यटनविकासासाठी अग्रक्रमाने वापर होईल साधनाचा तुटवडा असताना हे असे होणे योग्य आहे का ? शाळासाठी पुरेशा इमारती नसताना व कित्येक खेड्याना बारमाही रस्ता उपलब्ध नसताना महागडी हॉटेल्स व यात्री निवास याची बाधणी व पर्यटनस्थळाकडील रस्ता-रुदी याना प्राधान्य देताना सामाजिक अग्रक्रमाची उलटापालट होते हे लक्षात घ्यायला हवे

## चैनबाजीला उत्तेजन

परकीय चलनाची चणचण गभीर स्वरूपाची असेल तर पर्यटन विकासाच्या धोरणात होऊ शकणारी सामाजिक अग्रक्रमाची उलटापालट एक अटळ किंमत म्हणून स्वीकारण्याला पर्याय नाही असे म्हणता येते व ते मान्य न झाले तरी समजण्याजोगे आहे हे समर्थन मान्य केले तरीही एक अडचण उरतेच व ती अशी की परकीय पर्यटकासाठी निर्माण केलेल्या सोयी/सेवा देशातील श्रीमत नागरिकाना चैनीचे जीवन जगण्यासाठी उपलब्ध होतात पर्यटन विकासासाठी म्हणून विमानसेवा, पचतारांकित हॉटेल्स, सुसज्ज समुद्रकिनारे इत्यादीचा उपयोग देशातील धनिकाना होतोच. असा चैनीचा जीवनक्रम उपलब्ध करण्याचा परिणाम उपभोग्य खर्चाला चालना मिळण्यात व बचतीचे प्रमाण कमी होण्यात होईल जे वर्ग श्रीमतापेक्षा काहीसे मागे आहेत तेदेखील चैनीचा असा जीवनक्रम प्राप्त करणे हे ध्येय म्हणून स्वीकारण्याची शक्यता निर्माण होते नुकताच आधुनिकीकरण/विस्ताराचा कार्यक्रम पार पाडलेल्या मुबईतील एका पचतारांकित हॉटेलातील उपहारगृहात दोघाच्या एका जेवणासाठी साधारण १,००० रु. लागतात अशी माहिती वृत्तपत्रात अलीकडेच आली होती. स्वयपाकाचे आयात केलेले पदार्थ वापरणाऱ्या या उपहारगृहात किती परदेशी प्रवासी येतात व किती देशी हा एक प्रश्नच आहे. यारीतीने पचतारांकित संस्कृतीचा फैलाव होण्याचा परिणाम दीर्घकालीन आर्थिक विकास साध्य करण्यासाठी वर्तमानात बचत करणे, चैनीच्या उपभोगाला आळा बसवणे याबाबत जी सामाजिक तयारी आवश्यक असते ती न होण्यात होतो हा धोका किंवा किंमत बरीचशी निश्चित स्वरूपाची असते तर पर्यटकाकडून प्राप्त होणारे नक्त परकीय चलन पर्यटन विकासाच्या धोरणाव्यतिरिक्त इतर

अनेक घटकावर अवलबून असल्याने बरेचसे अनिश्चित असते थोड-क्यात आंतरराष्ट्रीय पर्यटनाचे आर्थिक विकासावरील परिणाम उघड व फायदेशीर आहेत असे नसून आतरराष्ट्रीय पर्यटनाला चालना देण्याचे सभाव्य दुष्परिणाम नजरेसमोर ठेवून पर्यटन विकासाचे धोरण काळजीपूर्वक आखायला हवे

एक गोष्ट नमूद करायला हवी की पर्यटनाचा विचार करताना प्रवासाचे जे फायदे व्यक्तिगत पातळीवर मिळू शकतात त्याचा आपण विचार करणार नाही. असे करण्यात पर्यटनाचे व्यक्तिगत पातळीवरील परिणाम बिनमहत्त्वाचे आहेत असे सुचवायचे नसून प्रस्तुत विषयाची मर्यादा स्पष्ट करावयाची आहे.

भारतातील पर्यटनक्षेत्राचा विचार करताना पर्यटकाची सख्या, पर्यटकापासून प्राप्त होणारे परकीय चलन व पर्यटनविषयक धोरण याचा विचार करायला हवा. भारतात पर्यटनविकासाचे जाणीवपूर्वक प्रयत्न अलीकडेच सुरू झाले आतरराष्ट्रीय व्यापारातील सततच्या तुटीमुळे निर्माण झालेल्या अडचणीवरचा एक उपाय म्हणून पर्यटन विकासाचे प्रयत्न हल्लीच्या काळात विशेष कसोशीने होत आहेत या प्रयत्नाचे स्वरूप समजावून घेण्यापूर्वी भारतातील पर्यटनक्षेत्राकडे ऐतिहासिक दृष्टिकोणातून एक दृष्टिक्षेप टाकणे उपयोगी ठरेल

परदेशी पर्यटकाची सख्या हा पर्यटनक्षेत्राचे मोजमाप करण्याचा महत्त्वाचा निर्देशाक आहे पर्यटकाची सख्या १९६१ च्या १ ४ लाखा-हून १९७१ मध्ये ३ ०१ लाख व १९७६ साली ५ ३४ लाखापर्यंत वाढली. १९८३ साली प्रवाशाची सख्या १३ ०४ लाख झाली पण १९८४ साली ती १९६५ नतर प्रथमच घटली. यावर्षी देशातर्गत शांतता व सुव्यवस्थेची स्थिती समाधानकारक नसल्याने परदेशी पर्यटकाची सख्या घटली असा अदाज करण्यात येतो १९८५ मध्ये पर्यटकाची सख्या १२ ५९ लाखापर्यंत वाढली तरी ती अद्यापि १९८३ च्या उच्चाकापेक्षा कमीच आहे (तक्ता–१) १९८१ सालापासून परदेशी पर्यटकाच्या सख्येत पाकिस्तान व बागलादेशमधील प्रवाशाचा समावेश करण्यात आला. या दोन देशातील पर्यटकाची सख्या ४ लाखाच्या आसपास राहत आली आहे. पाकिस्तान व बागलादेशातील पर्यटकाची सख्या वगळली तर १९८० ते १९८५ या काळात पर-कीय पर्यटकाची सख्या ८–८ ५ लाखाच्या आसपास घुटमळत राहि-लेली दिसते. एवढेच नव्हे तर १९८३ साली आलेल्या प्रवाशाची सख्या (८ ८५) लाख १९८४ व १९८५ या दोन्ही वर्षात ८ ७३ लाख व ८ ३७ लाख अशी कमी झालेली आढळते. १९७६ ते १९८० या काळात परकीय प्रवाशाची सख्या जवळ जवळ ५०% वाढली पण १९८० ते १९८५ या काळात (बागला देश व पाकिस्तानातील प्रवासी वगळता) प्रवाशाची सख्या फक्त ४.६% नी वाढली. याचे एक कारण १९८०–८५ या काळात विकसित राष्ट्रातील उत्पन्न वाढीचा वेग मदावला हे आहे.

**तक्ता –१ : भारतात येणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या**

| वर्ष | पर्यटक (लाख) | दर पर्यटक सरासरी उत्पन्न (रु.) |
|---|---|---|
| १९६१ | १ ४० | १२७३ |
| १९७१ | ३.०१ | १४४८ |
| १९७६ | ५.३४ | ५३३८ |
| १९८० | ८.०० | १४५७६ |
| १९८१ | १२ ७९ (८.५४) | ८३१७ |
| १९८२ | १२.८८ (८.६१) | ८७७७ |
| १९८३ | १३.०४ (८.८५) | ८२४० |
| १९८४ | १२.११ (८.७३) | १०७३७ |
| १९८५ | १२.५९ (८.३७) | उ ना. |

उ. ना. – उपलब्ध नाही.

कसातील आकडे बागला देश व पाकिस्तानातील पर्यटक वगळता

सदर्भ : CMIE – Basic Statistics.

प्रवाशाच्या सख्येइतकेच प्रवाशाकडून मिळणारे परकीय चलन महत्त्वाचे आहे. तक्ता १ मध्येच दर प्रवाशामागे मिळालेले सरासरी परकीय चलन दर्शविले आहे. यावरून पर्यटकाचा आर्थिक स्तर लक्षात येऊ शकतो. वरील आकडे रुपयाच्या स्वरूपात असल्याने त्यावर विनिमय दरातील बदल व किमतवाढ याचा परिणाम झाला आहे हे उघडच आहे. दर प्रवाशामागे प्राप्त होणारे परकीय चलन १९६१ ते १९८० या काळात सातत्याने वाढलेले दिसते पण १९८१ पासून त्यात घट झाली आहे याचे कारण पाकिस्तान व बागला देशातील प्रवाशाचा सरासरी जीवनस्तर तुलनात्मकदृष्ट्या कमी असल्याने त्याचा भारतातील खर्च बराच कमी असणार.

पर्यटनापासून प्राप्त होणारे परकीय चलन हा जर पर्यटनविका-साच्या धोरणाचा मुख्य आधार असेल तर पर्यटनापासूनचे उत्पन्न परकीय चलनाच्या स्वरूपात आणि भारतीय पर्यटकाच्या परकीय चलनातील खर्चाच्या तुलनेत विचारात घ्यायला हवे. ही माहिती तक्ता २ मध्ये दिली आहे १९७१–७२ साली आतरराष्ट्रीय पर्यटका-कडून ४२ ३ दशलक्ष डॉलर उत्पन्न मिळाले. त्यात १९८०–८१ मध्ये १४७३ ९ दशलक्ष डॉलरपर्यंत वाढ झाली. यानतरच्या काळात पर्य-टनाद्वारे प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात घट झाली आहे उत्पन्नाची मोजणी रुपयाच्या स्वरूपात केल्यास १९८४–८५ सालचे उत्पन्न १९८०-८१ च्या तुलनेत २३% कमी भरते. डॉलरच्या स्वरूपातील घट ४९% एवढी आहे. याचे कारण दरम्यानच्या काळात डॉलर–रुपया याच्या-तील विनिमयाचा दर रुपयाला प्रतिकूल पद्धतीने बदलला.

याउलट पर्यटनावरील खर्च १९७१–७२ च्या २६.२ दशलक्ष डॉलर या पातळीपासून सतत वाढत आला आहे व १९८४–८५ साली तो ३४४.३ दशलक्ष डॉलर एवढा होता याप्रमाणे पर्यटना-पासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात १९८०–८१ सालानतर घट झाली पण भारतीय पर्यटकाचा परकीय चलन खर्च वाढल्याने पर्यटना-पासूनचे निव्वळ उत्पन्न कमी झाले आहे. १९७१–७२ साली असे नक्त उत्पन्न १६.१ दशलक्ष डॉलर होते ते १९८०–८१ सालात १३५९ ७ दशलक्ष डॉलरपर्यंत वाढले पण नतर त्यात सतत घट होऊन १९८४–८५ साली ४११ दशलक्ष डॉलरपर्यंत कमी झाले

रुपया व डॉलर याच्यातील दर रुपयाला प्रतिकूल पद्धतीने बद-लला म्हणजे भारतातील सफरीची डॉलरमधील किमत कमी होते व त्यामुळे जास्त प्रमाणात परदेशी प्रवासी आकृष्ट व्हायला हवेत. पण पर्यटकाच्या सख्येवर परिणाम करणारे किमतीव्यतिरिक्त इतर घटक

तक्ता – २ : पर्यटन – परकीयचलन आय · व्यय

| वर्ष | आय | | | व्यय | | नक्त उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटी रु. | दशलक्ष डॉलर | कोटी रु | दशलक्ष डॉलर | कोटी रु. | दशलक्ष डॉलर |
| १९७१–७२ | ३१·५ | ४२·३ | १९·५ | २६·२ | १२·० | १६·१ |
| १९७८–७९ | ५६४·८ | ६८६·४ | ६४·७ | ७८·६ | ५००·१ | ६०७·८ |
| १९७९–८० | ९१९·४ | ११३५·१ | ८८·२ | १०८·९ | ८३१·२ | १०२६·२ |
| १९८०–८१ | ११६५·६ | १४७३·९ | ९०·३ | ११४·२ | १०७५·३ | १३५९·७ |
| १९८१–८२ | १०६३·० | ११८५·३ | १४४·१ | १६०·७ | ९१८·९ | १०२४·६ |
| १९८२–८३ | ११३०·० | ११६९·० | १८४·५ | १९०·९ | ९४५·५ | ९७८·१ |
| १९८३–८४ | १०७५·१ | १०३९·६ | २४१·५ | २३३·५ | ८३३·६ | ८०६·१ |
| १९८४–८५ | ८९८·० | ७५५·३ | ४०९·३ | ३४४·३ | ४८८ ७ | ४११·७ |

सदर्भ · आर्थिक सर्वेक्षणातील माहिती आधारे

असल्याने विनिमयदरातील बदलाचा अनुकूल परिणाम प्रवाशाच्या वाढत्या सख्येच्या रूपाने मिळू शकला नाही. प्रवाशाच्या सख्येतील १९८४ सालातली घट तत्कालीन अस्थिर स्थितीचे परिणामस्वरूप असली तरी १९८०–८१ नतरच्या काळातील पर्यटन उत्पन्नातील घट आतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील मदीसदृश अवस्थेमुळेही स्पष्ट होऊ शकते

भारतीय पर्यटकाचा खर्च मात्र सातत्याने वाढत राहिला १९७७/७८ च्या सुमारास आपली व्यापारस्थिती आधिक्याची असल्याने व मध्य–पूर्वेतील भारतीयानी मायदेशी पाठवलेल्या पैशामुळे आपला परकीय चलनसाठा लक्षणीयरीत्या वाढला या काळात परदेशी प्रवासासाठी चलन मिळवण्याचे नियम सुलभ व शिथिल करण्यात आले. त्याचा परिणाम परदेशी जाणाऱ्या भारतीय पर्यटकाची सख्या वाढवण्यात झाला असणार गेल्या ३।४ वर्षांत तर हा खर्च दुप्पट– १९८१–८२ मध्ये १६०.७ दशलक्ष डॉलर तर १९८४–८५ मध्ये ३४४ ३ दशलक्ष डॉलर झाला परकीय चलनाची स्थिती समाधानकारक असताना जे शिथिल नियम लागू केले ते परकीय चलनाची स्थिती बिकट झाल्यानतरही चालू राहिले १९८७–८८ च्या अदाजपत्रकात सुचवलेला परदेश प्रवासासाठी द्यावयाच्या परकीय चलनावरील १५% कर ही स्थिती सुधारण्याचा केलेला एक प्रयत्न म्हणावा लागेल. भारतीय उद्योग बहिर्मुख करण्याच्या धोरणाचाही परिणाम परदेशी प्रवासात वाढ होण्यात होणे साहजिक आहे या कालावधीत भारतात येणाऱ्या प्रवाशाची सख्या मदगतीने वाढण्याने पर्यटनाद्वारे प्राप्त होणाऱ्या नक्त उत्पन्नातील घट जास्त ठळकपणे समोर आली, पण पर्यटनापासूनच्या ढोबळ उत्पन्नात घट झाली नसती तरीही, पर्यटनावरील खर्च वाढल्याने नक्त उत्पन्नात घट झालीच असती.

वर ज्याला पर्यटनापासूनचे नक्त उत्पन्न म्हटले आहे त्यात फक्त भारतीय पर्यटकाचा खर्च विचारात घेतला आहे. पर्यटनासाठी ज्या वस्तू व सेवाची आयात करण्यात येते त्या विचारात घेतल्या तर निव्वळ उत्पन्न आणखीन कमी होईल हे उघड आहे

पर्यटनापासून प्राप्त होणाऱ्या नक्त उत्पन्नाचे महत्त्व मोजण्याचा एक उपाय म्हणजे ते चालू खात्यावरील तुटीच्या तुलनेत मोजणे, आयात–निर्यात व्यापारातील तूट पर्यटन, वाहतूक, विमा इ सेवा व परदेशातील नागरिकाकडून पाठवले जाणारे पैसे यामुळे काही अशी भरून निघते पर्यटन, सेवा इ बाबतही तुटीची स्थिती असेल तर चालू खात्यातील तूट व्यापारतुटीपेक्षा जास्त असेल. तक्ता ३ मध्ये पर्यटनापासूनचे नक्त उत्पन्न रकाना १ मध्ये व चालू खात्याची स्थिती रकाना २ मध्ये दर्शविली आहे चालू खात्यातील तुटीत पर्यटनापासूनचे नकत उत्पन्न समाविष्ट असते. पर्यटनाव्यतिरिक्त चालू खात्याची स्थिती दुसऱ्या रकान्यातून पहिला रकाना वजा केल्यावर मिळेल पर्यटनापासूनचे नक्त उत्पन्न या तुटीच्या सदर्भात मोजले तर १९७१–७२ मध्ये पर्यटन उत्पन्न चालू तुटीच्या २% होते ते १९७९–८० मध्ये ५२% एवढे वाढले त्यानतर हे प्रमाण कमी होत १९८४–८५ मध्ये १२ ४% पर्यंत घसरले हे लक्षात घेणे आवश्यक आहे की या कालावधीत व्यापारातील तूट वाढल्याने चालू खात्यावरील तूट वेगाने वाढली सध्या चालू खात्यातील १४% तूट पर्यटनाद्वारे भरून निघते पर्यटनाला चालना देण्याचे प्रयत्न होत असतानाच पर्यटनापासूनच्या नक्त उत्पन्नात सापेक्ष व निरपेक्ष घट व्हावी हे दुर्दैवी असले तरी आश्चर्यकारक नाही त्यामुळे पर्यटन विकासाच्या धोरणाच्या मर्यादा स्पष्ट होतात.

तक्ता – ३ : पर्यटन व देय सतुलन

| वष | पर्यटनाद्वारे नक्त उत्पन्न (कोटी रु.) (१) | चालू खात्याची स्थिती (कोटी रु) (२) | १ चे (२–१) % प्रमाण (३) |
|---|---|---|---|
| १९७१–७२ | १२·० | ५७५·६ | २·० |
| १९७८–७९ | ५००·१ | २४४·८ | ६७·१ |
| १९७९–८० | ८३१·२ | ७६५ ९ | ५२ ० |
| १९८०–८१ | १०७५·४ | २२१८·६ | ३२·६ |
| १९८१–८२ | ९१८·९ | २८१७·९ | २४ ६ |
| १९८२–८३ | ९४५·५ | २७४६·१ | २५ ६ |
| १९८३–८४ | ८३३·६ | २६९४·१ | २२ ४ |
| १९८४–८५ | ४८८·७ | ३४५९·४ | १२ ४ |

सदर्भ : तक्ता –२ प्रमाणे

सहाव्या योजनाकाळात आतरराष्ट्रीय व्यापार तुटीचा बनला. व्यापारतूट भरून टाकण्यासाठी याच काळात आतरराष्ट्रीय नाणे निधीकडून आपण कर्ज घेतले नंतरच्या काळात व्यापारी पद्धतीची कर्जउभारणीही सुरू झाली. या कर्जाची फेड सुरू झाली म्हणजे परकीय चलनाची गरज आणखी वाढेल. या सदर्भात परदेशस्थ भारतीयाना गुतवणुकीसाठी दिलेल्या सवलती विचारात घ्यायला हव्यात. या पार्श्वभूमीवरच अलीकडच्या काळात आतरराष्ट्रीय पर्यटन विकासावरील भर स्पष्ट होतो

सातव्या योजनेच्या काळात पर्यटन विकासाचा धडाक्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे परदेशी पर्यटकाची सख्या सातव्या योजनेच्या अखेरच्या वर्षात २५ लाखापर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हे साध्य करण्यासाठी पर्यटन विकासाची धोरणात्मक व्यूहरचना पुढील प्रमाणे आहे

१) पर्यटकाच्या संख्येत दरवर्षी ७% वाढ

२) पर्यटन विकासासाठी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात कार्यविभागणी.

३) पर्यटकाची बाजारपेठ मिळवण्यासाठी स्थानिक कारागीराना उत्तेजन.

*याचबरोबर राष्ट्रीय एकतेची भावना वृद्धिगत व्हावी म्हणून देशी* पर्यटनाचा विकास करण्याचे प्रयत्न करण्यात येतील

---

## साप्ताहिक माणूस

### मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन

( अधिनियम ४ व नियम ८ अन्वये )

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रकाशन स्थळ | | पुणे |
| २. | प्रकाशन काळ | : | साप्ताहिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक, सपादक<br>नाव व पत्ता | :<br>: | श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव पेठ,<br>पुणे ४११ ०३० |
| ४. | नागरिकत्व | : | भारतीय |
| ५. | प्रकाशन सस्थेचे नाव व<br>तिच्या मालकाचे नाव व पत्ता | :<br>. | राजहस प्रकाशन<br>श्री. ग. माजगावकर<br>दिलीप माजगावकर<br>१०२५ सदाशिव पेठ,<br>पुणे ४११ ०३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे

एप्रिल १९८७

प्रकाशकाची सही
**श्री. ग. माजगावकर**

---

किफायतशीर किंमतीला स्वच्छ, नीटस जागा उपलब्ध असणे ही पर्यटन विकासाच्या सदर्भात महत्त्वाची गोष्ट आहे. सातव्या योजनेत प्रवाशांची सख्या वाढवण्याचे जे उद्दिष्ट आहे ते गाठण्यासाठी ५९ हजार खोल्याची आवश्यकता भासेल असा अंदाज आहे. सध्याच्या ३२ हजार खोल्याची उपलब्धता योजनाकाळाअखेर पधरा हजारानी वाढली तरी १२ हजार खोल्याची तूट राहील. यादृष्टीने हॉटेल व्यवसायात खाजगी गुतवणूक वाढवण्यासाठी सरकारने अनेक सवलती जाहीर केल्या आहेत.

* हॉटेल क्षेत्रात मोठ्या उद्योगसमुहाचा प्रवेश सुलभ व्हावा म्हणून हॉटेल उद्योगाला मिरासदारी विषयक कायद्यातून ( MRTP ACT ) वगळण्यात आले आहे.

* हॉटेल प्रकल्पातील परकीय भाग भाडवल गुतवणुकीची मर्यादा ३०% वरून ४०% पर्यंत वाढवली आहे.

* हॉटेल उद्योगात वापरात येणाऱ्या विविध उपकरणावर आयात करात सवलत यामुळे हॉटेल प्रकल्पाचा खर्च कमी होऊ शकेल.

* काही राज्य सरकारानी पर्यटनाला ' उद्योग ' म्हणून मान्यता दिली आहे

अलीकडेच Indian Institute of Foreign Trade *या सस्थे*ने पर्यटनाला निर्यात क्षेत्र म्हणून मान्यता द्यावी व निर्यातवाढीच्या सवलती पर्यटन क्षेत्राला उपलब्ध करून द्याव्यात अशी शिफारस केली आहे तसेच हॉटेलानी मिळवलेल्या परकीय चलनाचा ५% एवढा भाग मुक्तपणे वापरण्याची परवानगी द्यावी व पर्यटन प्रतिनिधीना त्याच्या परकीय चलनाच्या मिळकतीचा १०% एवढा भाग मुक्त खर्चासाठी द्यावा किंवा त्याना आयात परवाने द्यावेत अशीही शिफारस केली आहे.

पर्यटन विकासाच्या या कार्यक्रमाचा भर परदेशी पर्यटकाचा किफायतशीर किंमतीना कार्यक्षम सेवा उपलब्ध करून जास्त प्रमाणात आकृष्ट करण्यावर आहे पण आपण वर उल्लेखिल्याप्रमाणे पर्यटकाच्या प्रवाहावर परिणाम करणारे बाह्य घटकही महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे पर्यटन विकासाच्या कार्यक्रमाचे यश लक्षणीयरीत्या या बाह्य घटकावर अवलबून असेल. मात्र या कार्यक्रमातर्गत पचताराकित हॉटेल्लची उभारणी सवलतीचा लाभ घेऊन होईल. या 'सेवाचा' लाभ देशी नागरिकाना घेणे महाग व्हावे या हेतूने १९८७–८८ च्या अदाजपत्रकात पचताराकित हॉटेलातील खर्चावर १०% कर सुचवण्यात आला आहे खर्च परकीय चलनाच्या स्वरूपात असेल तर कर द्यावा लागणार नाही त्यामुळे या कराचा प्रतिकूल परिणाम परदेशी पर्यटकावर होणार नाही. *अर्थात* १०% करामुळे पचताराकित हॉटेलात भारतीय नागरिकाचा खर्च कमी होईल असे नव्हे पण परदेशी प्रवाशासाठी सवलती देऊन ज्या हॉटेलाची उभारणी होते आहे त्याचा लाभ घेणाऱ्या धाधवानीच कर रूपाने या सवलतीचा भार– अशत का होईना–सहन करावा हे रास्तच म्हणावे लागेल. □

# क्रेडिट कार्ड पद्धती

## सुलोचना देवलकर

आज मौजमजेसाठी लाखो पर्यटक देश-विदेशांत प्रवास करताना आढळतात. हजारो प्रवासी संस्थाही त्यासाठी निर्माण झाल्या आहेत. परदेशात साजऱ्या करण्यात आलेल्या 'इंडिया फेस्टिव्हल्स' मुळे परदेशी पर्यटकांतदेखील भारतभेटीबद्दलचे आकर्षण वाढीस लागलेले दिसून येते. त्याचा परिणाम म्हणून लाखो पर्यटकांचे लोंढे यंदा जगाच्या कानाकोपऱ्यांतून भारताकडे आले व पुढेही येणार आहेत.

परंतु या परदेशी पर्यटकांचा भारताविषयी भ्रमनिरास न होता त्यांना विविध प्रकारच्या सोयी-सवलती देण्यासाठी व आपली आतिथ्यशीलता दाखविण्यासाठी सरकारी व खासगी पातळ्यांवरून आटोकाट प्रयत्न केला जात आहे.

या सोयी-सुविधांपैकी प्रवास करताना अत्यंत उपयुक्त ठरणारे असते क्रेडिट कार्ड. ज्यांच्या साहाय्याने तुम्ही पैशाची जोखीम बरोबर न बाळगता देखील मनसोक्त खर्च करू शकता. परदेशात क्रेडिट कार्ड पद्धती इतकी लोकप्रिय झालेली आहे की तिच्या जोरावर कोर्टातल्या जामिनापासून ते अगदी स्मशानातल्या थडग्यापर्यंत कोणतीही सेवा अथवा वस्तू तुम्ही खरेदी करू शकता. भारतात क्रेडिट कार्ड एवढे प्रचलित झालेले नसले तरी त्याचे महत्त्व लोकांना समजू लागलेले आहे एवढे निश्चित.

भारतात सध्या क्रेडिट कार्डची सुविधा डायनर्स क्लब, बँक ऑफ बडोदा, सेंट्रल बँक तसेच आंध्र बँक ह्या संस्थांमार्फत मिळते.

ही पद्धत भारतासारख्या विकसनशील देशात लोकप्रिय व्हायला फार वेळ लागला. देशातील लोकांचे राहणीमान, आचारविचार, पद्धती तसेच योजना यशस्वी रीतीने राबविण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ, कॉम्प्युटर हार्डवेअरचा वापर करण्यासाठी लागणारे तांत्रिक ज्ञान आणि पुरेशा दळणवळणाच्या सोयी यांच्या प्रभावामुळे अजूनही ही योजना भारतात म्हणावी तेवढी लोकप्रिय झालेली नाही.


१९६१ साली भारतात पहिले क्रेडिट कार्ड डायनर्स क्लबतर्फे दिले गेले. श्री. काली मोदी यांनी अविरत श्रम करून ही पद्धत कशीबशी लोकांच्या गळी उतरविण्यात यश मिळविले. डायनर्स क्लबचे सर्वांत पहिले तीन मेंबर्स होते इंदूरचे महाराज, जे नंतर कंपनीचे अध्यक्ष झाले, जिम्मी लॉयर व पेसूमल असवानी. अगदी सुरुवातीला ज्यांनी हे कार्ड स्वीकारले ती हॉटेल्स् म्हणजे वाराणसीतले क्लार्कस् हॉटेल, मुंबईतले ताजमहाल हॉटेल तसेच श्रीनगर येथील ओबेराय पॅलेस हे हॉटेल.

भारतातले पहिले क्रेडिट कार्ड म्हणजे एका बाजूला कार्डधारकाचे नाव, पत्ता व सही आणि दुसऱ्या बाजूला रेस्टॉरंस्टची यादी असलेला एक कार्डबोर्डचा पुठ्ठा होता. १९७१ मध्ये त्या जागी प्लॅस्टिकचे कार्ड आले. १९७६ मध्ये डायनर्सची मेंबरशिप ९,००० एवढी होती. तीच आता ७०,००० एवढी आहे.

डायनर्स कार्ड मिळविण्यासाठी त्या व्यक्तीला आपली आर्थिक परिस्थिती व पात्रता सिद्ध करावी लागते. त्यासाठी त्या व्यक्तीकडे रु. ७०,०००।- पर्यंतची जाहीर मालमत्ता कमीतकमी असावी लागते. रु. १०००।- भरून (प्रवेश फी) डायनर्स क्लबचे मेंबर होता येते व डायनर्स कार्ड वापरावयाचे असल्यास ३०० रुपयांची वार्षिक वर्गणी भरावी लागते. डायनर्स क्लबतर्फे वैयक्तिक व कंपनीचे असे दोन प्रकारचे क्रेडिट कार्ड दिले जाते. कंपनीला आपल्या अधिकाऱ्यांसाठी ही सवलत द्यावयाची असल्यास एकावेळी पाच अधिकाऱ्यांची नावे दाखल करावी लागतात व त्या कंपनीचे 'पेड-अप कॅपिटल' २५ लाखाचे असावे लागते. कंपनीला प्रत्येक मेंबरमागे दरवर्षी रु. २५०।- एवढी वार्षिक फी भरावी लागते.

डायनर्स क्लबचे क्रेडिट कार्ड भारत व नेपाळमधील एकंदर ७,००० मेंबर संस्थांमध्ये (हॉटेल्स, शॉपिंग सेंटर्स इत्यादी) स्वीकारले जाते. या ठिकाणी कार्डधारकांना १०% ते ४०% पर्यंत सवलतीच्या दरात वस्तू दिल्या जातात.

डायनर्स कार्ड दाखवून कार्डधारकाने एखादी वस्तू खरेदी केल्यावर त्या दुकानाकडून त्या व्यक्तीला जे बील दिले जाते त्याच्या एकंदर तीन कॉपीज् केल्या जातात. एक कॉपी डायनर्स क्लबकडे, दुसरी खर्च करणाऱ्या व्यक्तीकडे व तिसरी दुकानदाराकडे. अशा तऱ्हेने महिनाभर कार्डधारक वेगवेगळ्या ठिकाणी खर्च करू शकतो.



महिन्याच्या शेवटी डायनर्सकडून एकत्रित बील कार्डधारकांकडे पाठविण्यात येते. त्याच्याजवळ त्याची स्वतःची बिले असल्यामुळे एकत्रित बील योग्य आहे किंवा नाही याची शहानिशा त्या व्यक्तीला करता येते. नंतर ती व्यक्ती डायनर्सचे बील चेकने, डिमांड ड्राफ्टने किंवा रोख रक्कम देऊनही चुकवू शकते. हे कार्ड २४ आंतरराष्ट्रीय विमानतळांवर व ३९ भारतीय विमानतळांवर दाखवून त्याबद्दल कार्डधारकाला तो जात असलेल्या फ्लाईटसाठी १ लाखापर्यंत फ्लाईट इंशुरन्सही मिळतो. डायनर्स क्लब व्यतिरिक्त क्रेडीट कार्डची सुविधा देणाऱ्या तीन बँका आहेत. १) सेंट्रल बँक २) बँक ऑफ बडोदा व ३) आंध्र बँक.

ह्या बँकांतून ही स्कीम थोड्याफार फरकाने अंमलात आणली जाते.

सेंट्रल बँक देऊ करीत असलेल्या सोयीनुसार दोन प्रकारे मेंबरशिप मिळविता येते. १) वैयक्तिक खाते व २) कंपनीचे खाते. मात्र सेंट्रल कार्ड घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचे वा कंपन्यांचे खाते सेंट्रल बँकेत असावे लागते. हे एका व्यक्तीचे कार्ड दुसरी व्यक्ती वापरू शकत नसली तरीही वैयक्तिक पातळीवरून व्यक्ती आपल्या कुटुंबांतील पत्नी, अविवाहित मुलगी व मुलगा (१८ वर्षांनंतर) यांची नावे आपल्या कार्डावर नोंदवू शकते व त्यांनाही त्याचा फायदा मिळू शकतो.

सेंट्रल कार्डचा एक फायदा म्हणजे हे कार्ड वापरण्यासाठी कोणत्याही प्रकारची प्रवेश फी व वार्षिक फी द्यावी लागत नाही. दर पंधरा दिवसांनी बँकेकडून कार्डधारकाला त्याने केलेल्या खर्चासंबंधीचे स्टेटमेंट पाठविले जाते. व त्याच्या सूचनेनुसार तेवढी रक्कम त्याच्या खात्यातून वापरली जाते. फक्त आपल्या खात्यात पुरेशी रक्कम आहे किंवा नाही याची खात्री कार्डधारकाला करावी लागते.

सेंट्रल बँकेने आणखी एक नवीन योजना अलीकडेच सुरू केली आहे. या योजनेला 'एनकॅशमेंट फॅसिलिटी' म्हणतात. ह्यायोगे कार्डधारकाला सेंट्रल बँकेच्या भारतातील २२०० शाखांपैकी कोणत्याही शाखेतून दर महिन्याला २५०० रुपयांपर्यंत पैसे मिळू शकतात.

बँक ऑफ बडोदाचे बॉबकार्ड मिळविण्यासाठी वार्षिक ५० रुपये मेंबरशिप फी भरावी लागते. मेंबरशिप मिळविण्यासाठी अर्जदाराचे बँकेकडे दोन वर्षांपासूनचे खाते असणे जरूर असते. तसेच अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ५०,००० किंवा अधिक असावे लागते.

सेंट्रल कार्डप्रमाणेच बॉबकार्डदेखील पत्नी व अवलंबित मुलेही वापरू शकतात.

बॉबकार्ड कंपनींच्या नावेदेखील दिले जाते. आपली सर्व बिले नियमितपणे चुकविणाऱ्या बॉबकार्ड धारकांना, बँकेच्या काही ठराविक शाखांतून दर महिन्याला रु. २,५००/- पर्यंत पैसे काढण्याची संधी दिली जाते. पण या सुविधेचा कार्डधारकाने एखाद्या महिन्यात जर उपयोग केला नाही तर त्याला ही सुविधा नंतरच्या महिन्यात वापरता येत नाही.

'बॉबकार्ड' हे फक्त बँक ऑफ बडोदामध्ये खाते असलेल्या व्यक्तींनाच मिळू शकते व ते मिळाल्यावर कार्डधारकाला वार्षिक फी देखील भरावी लागते. ह्या मर्यादांमुळे 'बॉबकार्ड' अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचू शकत नाही. याउलट आंध्र बँकेचे आंध्रकार्ड मिळविण्यासाठी वार्षिक फी भरावी लागत नाही. प्रवेश फीसुद्धा भरावी लागत नाही. तसेच कार्डधारकाला आंध्र बँकेत खाते उघडण्याचीही यासाठी गरज नसते. फक्त 'आंध्र कार्ड' बाळगू शकण्यासाठी तुम्ही लायक आहात हे सिद्ध करण्यासाठी तुमचे महिन्याचे उत्पन्न रु. ३०००/- हून जास्त असणे आवश्यक असते.

क्रेडिट कार्ड पद्धती तिच्यातील अनेक त्रुटींमुळे व्हावी तेवढी लोकप्रिय झालेली नाहीय. क्रेडिट कार्डावर फक्त ठराविक वस्तूच मिळू शकतात. ठराविक उत्पन्न असलेल्या व्यक्तीच त्याचा वापर करू शकतात आणि फार थोड्या बँकाच ही सुविधा देतात. पण येत्या काही वर्षांत आणखी बऱ्याच बँकांमधून ही सुविधा देण्यात येईल व त्यातील त्रुटीही बऱ्याच अंशी कमी करण्यात येत येतील यात शंकाच नाही.

□

---



**अगदी मला वाटलं होतं तसंच झालं. मला शोधायच्या गडबडीत नवी लोकर आणायला विसरलात ना!**

# शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्राच्या अंतरंगात नेणारे प्रवासवर्णन

# गोविंद बाबाजी जोशी

## यांच्या रोजनिशीतील काही पाने

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात तीन **जोशी** अगदी प्रसिद्ध होते.

पहिले सार्वजनिक काका (गणेश वासुदेव जोशी). दुसरे डॉ. आनंदीबाई जोशी यांचे पती गोपाळराव जोशी आणि तिसरे वसईचे गोविंद बाबाजी जोशी.

**सार्वजनिक काकांच्यामुळे** पुण्यात सार्वजनिक सभेची स्थापना होऊन सरकार दरबारी जनतेची निर्भयपणे गाऱ्हाणी मांडली गेली. १८७३ मध्ये बडोद्याचे अधिपती मल्हारराव गायकवाड यांजवर रेसिडेंटवर विषप्रयोग करण्याचा आरोप होऊन इंग्रज सरकारने त्यांची सर्व मिळकत जप्त केल्या-मुळे त्यास वकील देण्याचीही ऐपत राहिली नाही, त्यावेळी सार्वजनिक काकांनी या कार्यासाठी एक लक्ष रुपयांच्या मदतीचे आश्वासन तारेने पाठवून दिले. बंडखोर वासुदेव बळवंतांच्या बाजूने वकील म्हणून निर्भयपणे सार्वजनिक काकाच उभे राहिले. दुसऱ्या कोणाची छाती नव्हती !

**गोपाळराव जोशी** म्हणजे महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील भल्याभल्यांची फिरकी घेणारे, विक्षिप्ततेचे वेड पांघरून महाराष्ट्राला शहाणपण शिकवू पाहणारे विलक्षण व्यक्तिमत्त्व.

आणि पदरचे खाऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पायपीट करून, गावोगाव सभा स्थापून लोकजागृती करू पाहाणारे **गोविंद बाबाजी जोशी** हेही आणखी एक तसेच विलक्षण व्यक्तिमत्त्व.

समाजसुधारणेच्या वेडाने झपाटलेले आणि संघटित अशा संस्थात्मक जीवनाची, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महा-राष्ट्राला दीक्षा देऊ पाहणारे, आपल्या सामान्यातील असामान्यतेचे दर्शन घडविणारे हे द्रष्टे व्यक्तिमत्त्व.

होय, गोविंद बाबाजी जोशी हे मुळात एक सामान्य व्यक्तिमत्त्व होते. फारसे शिक्षण न झालेले, त्यामुळे प्रबो-धनाच्या लाटेचे आंग्ल विद्येच्या साहाय्याने आकलन करण्यास असमर्थ असे.

परंतु पुस्तकी शहाणपणापेक्षा एक उपजत असे शहाण-पण जणू काही हा माणूस जन्माबरोबरच घेऊन आला होता....

गोविंद बाबाजी जोशी यांचा जन्म इ. स. १८२६ च्या सुमारास झाला. मूळ आडनाव शेंडे. शांडिल्य गोत्राचे. कोकणस्थ ब्राह्मण.

कोकणातील कुठल्यातरी खेड्यात कोणत्यातरी पूर्वजाने जोसपण केले असल्याने 'शेंडे' यांचे 'जोशी' झालेल्या घराण्यात जन्म.

वडील अव्वल इंग्रजीच्या काळात मामलेदार होते व ते गोविंदाच्या वयाच्या ५ व्या वर्षी निधन पावल्याचे सांगितले

जाते. कारण १८३१ च्या सुमारास एतद्देशीयांना मामलेदारी क्वचितच लाभत असे. त्यामुळे ते मामलेदार कचेरीमध्ये असले पाहिजेत. मृत्युसमयी त्यांनी काही माया मागे ठेवली असावी. ती ५–७ हजार होती. त्याच्या आधारावर तरुणपणी नोकरीची अपेक्षा न ठेवता जोशी सार्वजनिक कार्यामध्ये झोकून देताना दिसतात.

१८४६ पर्यंत वसई येथे प्राथमिक शिक्षण पुरे करून ते पुढे नातेवाईकांच्या आश्रयाने सुरतेस राहून गुजराती व थोडेबहुत इंग्रजी शिकले. इंग्रजी त्यांना फार चांगले येत नव्हते

१८६२ पासून गावात सभा स्थापन करण्याचे, गावोगाव हिंडून लोकजागृती करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. त्याची डायरीही ठेवली. गावोगाव वणवण हिंडत कसलीही अपेक्षा न ठेवता ते ज्या नव्या सुधारणांचा पुरस्कार करीत होते, त्याचे महत्त्व इंदूरचे दिवाण सर टी माधवराव यांच्या लक्षात आले. त्यांनी इंदूर शासनाच्या नोकरीत राहून ' शासकीय उपदेशक ' म्हणून काम करावे असे जोशी यांना सुचविले. परंतु वयाच्या पन्नाशीच्या काळात कोणाच्या बंधनात राहून काम करण्याचे जोशींना मानवले नाही. म्हणून त्यांनी नकार दिला. परंतु १८७७ च्या सुमारास जवळचा पैसा संपला, विपन्नावस्था आली, तेव्हा सरसाहेवांचे स्मरण होऊन जोशी बडोद्यास गेले. त्यावेळी सरसाहेवांना इंग्रजांनी बडोद्याचे दिवाण नेमले होते.

**एक उपेक्षित समाज सुधारक** या नावाने डॉ. अरुण रा. जोशी यांनी १९८१ मध्ये त्यांचे संशोधनपूर्वक चरित्र सिद्ध केले आहे. ते ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाने प्रसिद्ध केले आहे.

सरसाहेबांनी ' सरकारी उपदेशक ' म्हणून त्यांची तत्परतेने नेमणूक केली. १८७७ ते १८९७ अशी वीस वर्षे ते बडोद्याला राहिले.

१८९६ मध्ये बडोदे सरकारच्या छापखान्यात त्यांची रोजनिशी प्रसिद्ध झाली. सुमारे ७०० पृष्ठांची ही रोजनिशी आहे. त्याचे मुखपृष्ठ पुढीलप्रमाणे आहे–



कै. गोविंद बाबाजी जोशी

( छायाचित्र : ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सौजन्याने )

गेल्या तीस वर्षांपूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती

अथवा

# माझे प्रवासाची हकिकत

(रोजनिशी)

गोविंद बाबाजी जोशी

सरकारी भाषण करणारे

निसबत

श्रीमंत गायकवाड सरकार

सन १८९६

स. छा. छा.

जोशी यांनी १८६२ मध्ये मोठ्या प्रयत्नाने वसई येथे सहकारी पतपेढीची स्थापना केली. भारतातला अशा प्रकारचा हा पहिला प्रयत्न आहे. १८६८ मध्ये त्यांनी ठाणे जिल्हा असोसिएशन स्थापन केली. रायगड किल्ल्यावरील शिवाजी महाराजांच्या समाधीच्या दुरवस्थेसंबंधाने पहिला आवाज त्यांनी उठविला व समाधीच्या जीर्णोद्धाराची योजना आखून लोकांचे लक्ष तिकडे वळविले. त्यांच्याच प्रयत्नामुळे लोकमान्य टिळकांचे या कार्याकडे लक्ष गेले व त्यांनी हे कार्य

जोशी यांच्या प्रेरणेने आपल्या हाती घेतले. तळेगावच्या पैसा फडाचीही मूळची कल्पना त्याचीच.

१९०६ मध्ये वृद्धापकाळीही आजुबाजूच्या खेड्यातून लोकजागृतीचे कार्य करीतच त्यानी आपल्या घरी वसईस देह ठेवला.

जोशी यांची ही रोजनिशी म्हणजे १००–१२५ वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्राचे एक साक्षात चित्र होय. त्यातील हा काही सुरुवातीचा भाग संपादित करून येथे दिला आहे.

**– संपादक डॉ. भीमराव कुलकर्णी**

**श्री. जोशी यांच्या रोजनिशीची सुरुवात त्याकाळच्या शैक्षणिक स्थितीचे वेधक चित्र खालीलप्रमाणे रेखाटण्यापासून झाली आहे. त्यानंतर जातकुळीचे व लोकस्थितीचे चित्र त्यांनी रंगविले आहे**

## पन्नास वर्षापूर्वीच्या लोकस्थितीच्या काही गोष्टी

### शाळांची रचना

सन १८४६ साली मी मराठी शाळा सोडली म्हणजे आज बराबर पन्नास वर्षे झाली, त्यावेळी सरकारी शाळांतून अभ्यासाची पद्धत कशी काय होती त्याची हकीकत थोडक्यात देतो मुले कितीही असली तरी शाळेचा मास्तर बहुतकरून एकच असे. मी वसईचे शाळेत असता त्या शाळेंत ८० मुले होती त्यावेळी अभ्यासाची रचना अशी असे की, मोडी कागद वाचणे व मोडी अक्षर लिहिणे, हे सर्व आणि विद्याभ्यासात प्राधान्य गुण असत. साप्रत ज्याप्रमाणे गणित–इंग्लिश हे दोन विषय चागले तयार असले की, त्याची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा उतरावयाची, तसाच प्रकार या दोहोंबद्दल पूर्वी असे याशिवाय त्रैराशिक, पचराशिक, अपूर्णांक, भूगोल व्याकरण तोडपाठ करणे व दोन चार वाक्याचे व्याकरण करता आले की ज्यास आपण बी. ए., एम्. ए. म्हणतो तितकी त्याची योग्यता मानली जात असे त्यावेळी साप्रतप्रमाणे एकवार वर्षातून साहेब ही परीक्षा घेण्यास येत असे. इनामे मिळविण्यास किती अभ्यास करावा लागत असे, याचे उदाहरण मीच आपले तुम्हास सागतो, म्हणजे झाले. मला दोन साले इनामे कोणते प्रश्नाची उत्तरे दिल्यावरून मिळाली आहेत त्याचे स्मरण आहे एक साल नकाशा दाखवून साहेबानी प्रश्न केला की, (कामश्वाटका) कोठे आहे. मी तो दाखविल्याबराबर माझे नाव इनाम देण्यात साहेबानी लागलेच लिहिले, दुसरे एके साली पृथ्वीची आकृती कशी आहे म्हणून विचारले होते, त्याचे उत्तर मी गोलाकार आहे म्हणून दिले होते, याजवरून परीक्षेकरता किती तरी बिकट अभ्यास करावा लागत असे हे आपल्या चागले ध्यानात आले असेल. याप्रमाणे विद्यार्थ्यांसच इनाम मिळत असे असे नाही तर दरसाल साहेबानी फीची शिल्लक किती आहे म्हणून पतोजीला प्रश्न करावयाचा (ही शिल्लक पंतोजीकडेच असावयाची) आणि नतर धोरण पाहून पतोजीस ही इनाम काही रक्कम शाळा उत्तम चालविली म्हणून मिळत असे आणि हा सर्व एक वर्षाचा व्यवसाय दोन कलाकात समाप्त होत असे. शुद्धलेखन मास्तरलाच माहीत नसे मग शिष्यास कोठून येणार अशी त्या वेळची अभ्यासाची रचना असे.

यावेळी साप्रतप्रमाणे अभ्यासावरून क्लासात बसण्याचे नबर किंवा मार्क वगैरे काही एक नसत, परतु 'मायनस मार्कांचे' जागी मार मात्र पूर्ण असे. पंतोजी विद्यार्थ्यांस शिक्षा करीत असत त्याचे प्रकार.

१ वेताच्या बारीक छड्या मारणे.
१ उठबशा करविणे.
१ आगठे धरविणे.
१ मानेवर गुज अथवा खडा ठेवणे, मानेवरील गुज अथवा खडा पडला तर मार पुनः मिळत असे, सबब मुले चिकट पदार्थ मानेस लावीत असत.
१ घोडीवर चढविणे
१ पाणमुत्री मारणे, पाणमुत्री म्हणजे झाऱ्यासारखे आकृतीची लाकडाची मध्ये भोके पाडलेली बनवित असत, ती गुरुराज विद्यार्थ्यांचे हाताची बोटे जरा वाकवून तळहातावर आठ दहा वेळा किंवा त्याचे रागाचे धोरणाप्रमाणे मारीत असत.
१ कोलदाडा घालणे. कोलदाडा म्हणजे दोन्ही हात बाधून हातात गुडघे आणावयाचे आणि हात आणि गुडघे यांचे मधील भोकात आडवी काठी घालून ठेवावयाची नतर त्यास त्या स्थितीत जमिनीवर उताणा ठेवावयाचा.

या सर्व शिक्षाचा अनुभव हे पुस्तक लिहिणाराने घेतलेला आहे

यावेळी मुलास अभ्यासाची पुस्तके आपले खर्चाने विकत घ्यावी लागत नसत. सरकारातून एक किंवा दोन प्रती शाळेकरता येत असत त्या पतोजी वाचीत असे. कधी कधी मुलास वाचण्यास देई आणि इतर मुलानी ऐकावयाचे असा अभ्यास चाले दरम्यान इतर मुले शाळेतील अभ्यास बराबर करीत आहेत किंवा नाहीत, गडबड करीत असली तर एकवार 'हुस्य' म्हणून तोडाने पतोजीने वाजवावयाचे. इकडे पतोजीने पुढे घेतलेल्या मुलाचे वाचन किंवा हिशेब चाललें असतच. इतक्यात कधी कधी जसे चित्त्याचे टिपण अचूक सावजावर जाऊन पडते त्याप्रमाणे जो मुलगा शेजारचे मुलाशी बोलत असेल अगर खरडी लिहीत नसेल त्याजवर पतोजी एकदम तेथे जाऊन पडत मग त्याजवर छड्या पाच चार पडावयाच्या. इकडे वाचन चाललेच आहे कधी कधी पहिल्या वर्गातील मुलास इतर मुले चूप राखण्याकरिता शाळेचे मध्यभागी उभे करीत असत. प्रत्येक खड्यावर बसलेल्या मुलापुढे एक एक धुळाक्षराचा मुलगा असावयाचा. त्याने दररोज एकीकडे कित्ता वळविणे, शिवाय दररोज ठरली असतील

तितकी खरडी लिहिणे आणि एकीकडे त्या मुलाची उजळणी घेणे, त्यास धड्याची वाचणी देणे असा विद्याभ्यास चालत असे. हा धुळाक्षराचा मुलगा आणि खरड्यावर बसलेला मुलगा यात धनी आणि चाकर याचे जवळजवळ नाते असे ऋतुमानाप्रमाणे धन्याकरिता चाकराने कधी बोरे, कधी आवळे, कधी हिरवे आबे, चिंचा (हे पदार्थ बहुतकरून मागीलदारी परसात शेजारी पाजारी प्रत्येकाचे घरी असावयाचे) याची मेजवानी केली पाहिजे. मग हा उपहार बहुतकरून पतोजी शाळेत येण्यापूर्वी किंवा पतोजी आले तरी त्याची नजर चुकवून दोघानी मिळून करावावयाचा. जर याप्रमाणे विद्यार्थ्याने व्यवस्था ठेविली नाही, तर मग खरडी लिहिण्याचे बोरूने लेखणीने त्याची माडी सुजावयाची व डोळ्यातून गगा वहावयाच्या. कदाचित पतोजीने लेखण्या मारताना पाहिले तर कालचा धडा याने धरून करून मुळीच आणिला नाही घरी 'परवाचा' म्हणत नाही. तीन दिवस झाले एक घडा देतो तोदेखील येत नाही; मग काय विचारता आणखी पतोजीकडून पाणमुत्रीची शिक्षा त्यास व्हावयाची.

या वेळी शाळेत बुके असत ती :

| | |
|---|---|
| १ लघु हितोपदेश. | १ मुलासाठी लहान धडे. |
| १ सरकारी कायदे. | १ सारसंग्रह. |
| १ लिपीधारा. | १ कर्तव्यभुमिति. |
| १ रेशिम पिकविण्याचे बुक. | १ पचोपाख्यान. |
| १ महाराष्ट्रबखर. | १ उपयोगी ज्ञान |
| १ शाळापद्धती. | १ इसाबनीति. |
| १ बाळमित्र. | १ महाराष्ट्र भाषेचाकोस. |
| १ नीतिकथा. | १ बालव्याकरण |
| १ सक्षेपबखर. | १ भूगोल. |
| १ महाराष्ट्रखबर. | १ पूर्णांक व अपूर्णांक. |

इतकी पुस्तके सन १८४६ साली वसई येथील शाळेत होती.

## जातकूळ

या वेळी लग्नाचे संबधाने जातकुळीचे महात्म लोकात फार असे. लग्ने करतेसमयी जातकूळ, गणगोत्र पहाण्यापेक्षा श्रेष्ठ मानली जात असे. म्हणजे आधी जातकुळीचा शोध करावयाचा व ती योग्य ठरली तर मग गणगोत्र पत्रिका हे प्रकार व्हावयाचे माझे बापाने आपल्या मुली चागले जातकुळीत पडाव्या म्हणून व्याह्याचे ससारिक स्थितीकडे किंवा मुलाचे हुशारीकडे बिलकूल लक्ष दिले नाही. थोडक्यात सागितले तर जातकुळीचे उत्तमपणासीच लग्न लाविले असे म्हणण्यास हरकत नाही.*

* पन्नास वर्षांत कसा फेरफार लोकाचे समजुतीत होत चालला आहे याचे उदाहरण मीच आपले तुम्हास सागतो. माझे बापाने आपल्या मुली उत्तम जातकुळीत पडाव्या म्हणून जी मेहनत घेतली तशीच मीही घेतली. भेद इतकाच की, मी आपली एक मुलगी देशस्थ ब्राह्मणास दिली आणि एक कऱ्हाडे ब्राह्मणास. मुद्दाम जातीभेदाचे बेडीची बारीकशी कडी तरी तोडावी म्हणून दिली. (७ वर्षांच्या आत लग्न करण्याची रूढी मोडून त्यानी आपल्या मुलीची लग्ने १४ व्या वर्षी केली होती. – सं.)

या जातकुळीचे धर्मशास्त्र सागणारा शास्त्री म्हटला म्हणजे घरातील ती वृद्ध, जिर्ण झालेली म्हातारी होय. लग्न उभे राहिले की, मग त्या, साठी उलटलेल्या धर्मशास्त्र पारगत शास्त्र जाणत्या आजीस मुलानी, नातवानी प्रश्न करावयाचा, आजी, आजी, आपल्या वेणूला 'नातूकडे' द्यावी असे माझे मनात येते, पण नातूची जातकूळ कशी काय आहे ग ? मग विस्तवाचे शेगडीस लहान मुलासारखे चौघडीत घेऊन बसलेल्या आजीने शास्त्रार्थ सागावयाचा; कायरे कोणाची जातकूळ विचारतोस तू ? त्या नातूची का ? त्याची जातकूळ तर उत्तमात उत्तम आहे, हे नातू त्या शेवटच्या पेशव्याचे कारदीतील बाळाजीपत नातूचे घराण्यातीलच ना ! मग मला ते काय विचारतोस ! बाळाजीपत नातूची जातकुळ तर सोन्याहून पिवळी आहे असे आमच्या घरी, सुद्धा म्हणत असत. बर आजी, आजी, त्या बापू गोखल्याची जातकूळ कशी काय ? बापु गोखले जे पेशव्याकरिता रणात पडले तेच ना? इतक्यात नाकास पाणी आलेले असते. ते पुसून जरा विचार करून ऐकलेस का. माझ्या अजे सासूबाई सागत असत (थोडे तोड मुरडून) तेच, मी आपली तुला सागते की गोखल्याची जातकुळ काही चागली नाही. त्याला कनई पदर लागला आहे, असे माझी मावशीसुद्धा सागत असे, (व्यासोनारायणोहरी)

चागली जातकूळ कोणाची म्हणून विचार केला तर ज्याचे कुळात देशाकरता झटणारे पुरुष उत्पन्न झालेले असतील ज्याचे कुळातील पुरुष विवाहित स्त्रीचा अव्हेर करून परस्त्रीसी लपट झालेले नसतील, ज्याचे कुळात खोट्या साक्षी देणार, खोटी खते लिहिणारे नसतील व सारासार विचार करून खरी धर्मतत्त्वे जी ठरलेली आहेत तीच सत्य मानून त्याप्रमाणे चालणारे असे पुरुष असतील तेच खरे मानव व खरे मनुष्य होत. त्याची जात चागली, त्याचे कुळ चागले हा खरा मार्ग असता लोक मूळ सोडून खुळाचे नादी लागले आहेत हे पाहून खेद होतो

॥ गतानुगतिकोलोका न लोका पारमार्थिकाः ॥
॥ वालुकालिंगमात्रेण गतंमेकानभानज ॥ १ ॥

याप्रमाणे लोक, रूढीरूपी बेडीने बद्ध होऊन कारागृहात पडले आहेत !!!

## प्रवासाचा अगदी प्रथमचा प्रारंभ अथवा तीसपस्तीस वर्षांपूर्वीच्या लोकस्थितीच्या काही गोष्टी

या पुस्तकात सन १८६२ सालापासूनचे वर्णन वेडे-वाकडे तरी त्याचा लेख लिहून ठेवून दिले आहे. त्यापूर्वी वेळोवेळी सवड होई त्याप्रमाणे प्रवासाला गेलेला आहे परतु त्याचा लेख लिहून ठेवलेला नव्हता त्या प्रवासात ज्या विशेष चमत्कारिक गोष्टी मी पाहिल्या किंवा ऐकल्या होत्या त्यापैकी ज्याचे स्मरण आज मजला आहे त्याचे थोडक्यात येथे वर्णन देतो, ते वाचून त्यावेळच्या लोकस्थितीचे स्वरूप आपल्या ध्यानात चागले येईल अशी आशा आहे.

पुणे जिल्ह्यात ढमढेऱ्याचे तळेगावानजीक राजणगावचा गणपती म्हणून एक प्रसिद्ध स्थान आहे. तेथील देवळात मुक्कामास असता तेथील इमानदाराची भेट झाली. त्याने सागितले की, आमच्या तालुक्याचे मामलेदारसाहेबास काही वस्तूची गरज लागली आणि ती वस्तू किंवा पदार्थ कोणाकडे असल्याची त्यास खबर लागली, म्हणजे

ती शिपाई पाठवून खुशाल घेऊन जातात. मामलतदार साहेबाकडील दुभती म्हैस उडाली किंवा दूध देत नाहीशी झाली म्हणजे ज्याकडे नवीन म्हैस व्यायली असेल त्याचे गोठ्यात ती उडालेली म्हैस आणून बाधतात आणि त्याची म्हैस घेऊन जातात. पुढे पूर्वी ज्याची म्हैस असे प्रकारे नेलेली असते त्याचा आणि ज्याचे गोठ्यात उडालेली म्हैस बाधली असते त्याचा तटा लागतो, कारण कधी कधी तरणी, ज्वान म्हैस जाऊन त्याचे जागी खराब म्हैस येते या जुलमास काय करावे ! मामलतदाराकडे गेले तर तुम्हाला नगाला नग म्हणजे म्हैस परत मिळाली आहे की नाही ? जा, आम्ही दाद घेत नाही असे सागतात.

### पुण्याचे मराठी वर्तमानपत्रात हा मजकूर येऊ द्या.

सदरहू बाबत कलेक्टरसाहेबाकडे गरीब गुरीबास मामलेतदाराविरुद्ध अर्ज देण्याची हिंमत होत नाही. आम्हास तर याजबाबद वारवार त्रास होतो, कारण आमचे गोठ्यातूनच अनेकदा म्हशी नेल्या आहेत. कलेक्टरसाहेबाकडे दोन चार अर्ज पाठविले, परतु चिटणीससाहेब उलटे सुलटेच समजावितात. म्हणून मोठे अतंतेने सांगत होते मी उत्तर दिले की, मुबईस इग्रजी वर्तमानपत्रे निघत असतात त्यात हा मजकूर येईल तर एक क्षण दाद लागण्यास लागणार नाही. ते म्हणाले आम्हास कोठे इग्रजी लिहिता येते. नतर मी सागितले, असे करा, पुण्याचे मराठी वर्तमानपत्रात हा मजकूर येऊ द्या. त्यांनी विचारले तो कसा येईल. मी सागितले एके कागदावर सुवाच्य बाळबोध लिपीत मजकूर लिहून त्याखाली तुम्ही आपली सही अमुक गावचे इनामदार अशी करा आणि पुण्याचे वर्तमानपत्राकडे पाठवा, म्हणजे झाले, त्यानी पुन्हा विचारले की, आम्ही लिहिलेला सुटे कागदावरील मजकूर वर्तमानपत्रात कसा येईल, तो कागद त्या पत्रास जोडतील का काय करतील ! मग मी त्यास शिळाप्रेसाची व टाईपाचे प्रेसाची माहिती सागितली तेव्हा त्याची खमीबसी समजूत पडली.

नगर जिल्ह्यात सगमनेर तालुक्यात 'सिसन' म्हणून एक गाव आहे तेथे मी मुक्कामास असता एक पाढरपेशे गृहस्थाशी बोलणे सुरू झाले. इकडील तिकडील गोष्टी झाल्यावर त्यानी माझा गाव विचारला. ( माझा गाव वसई आहे हे सागितले असता त्यास समजणार नाही म्हणून मुबई सागितले ) ते ऐकून त्यास फार आनद झाला आणि मग त्याने उत्कठेने विचारले की आमच्या गावच्या चागपाटलाचा गण्या, कर्जी रुपये मजकडून घेऊन मुबईस आपल्या नोकरीवर गेला आहे. तो तुम्ही तेथे पाहिला काय ? आणि त्याच्या खाणाखुणा सागून तो तेथे पारशी शेठकडे चाकरीस आहे तेथे मुबईतच असतो; तो मजला माहित नाही हे सागताच याचे त्यास मोठे नवल वाटले.

बडोदे शहरात सुमारे सन १८५३–५४ साली मी असता राजवाड्यात मोठा लग्नसमारभ होता. त्याची वरात ज्या रस्त्यातून जावयाची होती त्यातील घराचे छपरावर रात्री माणसे मोठमोठाली माणसे पाण्याने भरलेली भाडी घेऊन बसलेली दिसली हे पाहून मला मोठे नवल वाटले.

कारण विचारता लोकानी असे सागितले की, महाराजाचे लग्नाची वरात या मार्गाने जावयाची आहे, त्यावेळी जे दारूकाम सुटेल त्यायोगें आग वगैरे लागण्याची आम्हास भीती आहे, सबब आम्ही आमच्या घराच्या बंदोबस्ताकरिता अशी तजवीज केली आहे.

मी एक दोघास प्रश्न केला की, महाराजास या भर रस्त्यातून मिरवणूक न नेण्याविषयी का अर्ज करीत नाही. हे माझे म्हणणे त्यास पसत पडले नाही. ते म्हणाले की, तसे कसे होईल ? आमच्या महाराजाकडे लग्नसमारभ आहे. त्याची मिरवणूक आमचे दारावरून जाते हे आम्हास भूषण आहे. आम्ही महाराजास मिरवताना पाहू त्यांजवर फुले टाकू, व सधी आली तर ओवाळू या आनंदापेक्षा दुसरे काय पाहिजे, कदाचित कोणाचे काही नुकसान झाले तर ती हकीकत धन्याचे ( महाराजाचे ) कानावर जाताच सर्व व्यवस्था होईल आम्हास त्याविषयी काही एक काळजी करावयास नको

यावेळी 'चिरकदान' रस्त्यात लाविले होते त्याचा प्रकार, रस्त्यात दुतर्फा बाबू ( बास ) पुरलेले असत व त्याजवर आडव्या चिंबा ( कळकाचे चिरून भाग केलेले ) दोन्ही आगाने अशा हाता हाताचे अतराने बाधीत त्याजवर चिखल आब्या एवढाला ठेऊन त्या चिखलावर भली मोठी अर्धा शेर तेल राहील अशी पणती (कोडिया) ठेवीत त्यात सरक्या तेलात भिजलेल्या पेटवून ठेवीत व वेळोवेळी तेल घालीत याप्रमाणे चिरकदानाची रचना होती.

सुमारे सन १८५० साली असावे, मी एके महाराष्ट्र गृहस्थाबरोबर मुबईहून सुरतेस बैल गाडीने आलो या गृहस्थाची मामलेदारीचे जागेवर सुरत जिल्ह्यात बदली ठपक्यामुळे झालेली होती हा गृहस्थ सुरत जिल्ह्याचे हद्दीत आल्यावर ज्या ज्या गावी आमचा मुक्काम होत असे त्या त्या, गावचे पाटलास व इतर गावचे प्रतिष्ठित लोकास बोलावून आणून असे सागे की, आम्ही ठाणे जिल्ह्यात मामलेदार होतो; परतु सरकारने आमची बदली तुमचे जिल्ह्यात केली असून आम्ही या तुमचे तालुक्यासच मामलेदार होऊन येणार आहो, तसे ते लोक लीनतेने उभे राहत, हात जोडीत आमचे सर्वांचे रक्षण करणे तुमचे हाती आहे आम्ही तुमची लेकरे आहो असे म्हणत आणि थोड्या वेळाने परत घरी गेल्यावर पाच शेर तूप, कणिक, साखर, इत्यादी मेजवानीचा शिधा पाठवून देत. याप्रमाणे सर्व गावी सुरत शहरानजीक जाईपर्यंत दररोज घि शक्कर चालली होती

बलसाडनजीक एक खेडेगावी आम्ही मुक्कामास सायकाळचे चार पाच वाजता आलो. चालत आल्या रीतीप्रमाणे मामलेदार साहेबानी गाडीवानास गावचे लोकास बोलावण्यास पाठविले. तो गाडीवान गावातून परत येऊन सागू लागला की, रावसाहेब, गावात कोणी एक मनुष्य नाही सर्व घरास कुलपे लागली आहेत हे ऐकून मामलेदार साहेबास नवल वाटले. नतर आम्ही गावात जाऊन पाहिले तर खरोखर गाव अगदी ओस पडलेला होता. गावात एक देखील मनुष्य नाही, इतकेच नाही, परंतु एक देखील गाडी किंवा बैल कोणाचे दाराशी नव्हता. त्या दिवशी आम्हास दररोजप्रमाणे लाडू मिळणे तर राहिलेच परतु गाड्याचे बैलास गवतसुद्धा मिळाले नाही

असे प्रकारे सर्व गाव ओस पडण्याचे कारणाचा शोध करिता मागून असे समजले की, सुरतेकडून परत मुबईस जाण्याकरिता रेव्हेन्यु कमिशनर साहेबाची स्वारी येत आहे. या स्वारीचा मुक्काम येथून दोन (मजला) मागे आहे. स्वारीस एकंदर २५ गाड्या लागतात. तो मुक्काम गावावर येऊन पडला की, स्वारीची बरदास्त ठेवणारे शिपाई कामगार गावचा सत्यानास करून टाकितात मारझोड लूटफाट

कोंबडी, बकरी यांची धूळधाणी होते. गाडया बैल यांचा सत्यानास होतो. या सर्व जुलुमापासून मुक्त होण्याकरिता गावकरी लोक आज तीन–चार दिवस साहेबांची स्वारी पसार होईपर्यंत दररोज रात्री गावी वस्तीस येऊन पहाटेस उजडापूर्वी आपल्या गाडया बैल घेऊन रानात जात असत असे समजले.*

एके समई मी घणदेवी गावाहून नवसरी गावी जात असता वाटेत सुमारे सात–आठ पार्शांबरोबर माझी बोलाचाली झाली आणि मारामारीपर्यंत गाठ आली. हे पारशी मुंबईहून नवसरीस भाडयाचे गाडयांतून जात होते. गाडीवानापैकी एकजण पारशाचा कड ( पक्ष ) घेऊन मजला वेडेवाकडे बोलून शिव्या देऊ लागला, सबब मी त्याचे गाडीची शिवळ काढून त्याचे बोटावर इतक्या जोराने मारली की, त्याचे बोटातून रक्ताची धार वाहू लागली, तसा तो जास्त माराचे भीतीने गाडी सोडून पळाला पारशीही आतून विरुद्ध बोलत होतेच. सबब गाडीचे बैल सोडून गाडी उलथून टाकली. तसे ते एकमेकावर पडले ही यांची स्थिति पाहून दुसरे गाडीतील पारशी व गाडीवान गाडया टाकून पळून गेले आणि दूर उभे राहिले. आणि तेथून मग शिव्या देऊ लागले, पुढे मला असे दिसले की, मी एकटा आहे. कदाचित हे मजला मारतील सबब मीही हिंमतीने हाताच्या अस्तन्या चढवून त्यांचेच अंगावर जाऊन दम भरला की, तुम्ही काय समजला आहा; नवसारीचा सुभा माझा भाऊ आहे. तुम्ही तेथे चला तर खरे, की तुमचे हातात बिडया घालून तुम्हास कैदेत टाकतो, तसे ते नरम पडत मागे मागे सरू लागले, आणि भाई, बापा, करू लागले.

गुजराथेत सर्वत्र मराठयास भाई म्हणण्याचा प्रघात असे व गुजराथी लोक दक्षणी लोकाबरोबर मोठे सन्मानाने व लिनतेने वागत असत. कोणा गुजराथ्याकडे आपण गेले असता दारापर्यंत पोचविण्यास येणे वगैरे चागले स्वागत करीत असत. अशी त्यावेळी मराठयाविषयी सन्मानबुद्धी होती.

दयाराम आत्मारामाची पेढी दक्षिणेत मोठी प्रसिद्ध होती. या पेढीचे मालकास नऊकोट नारायण म्हणत असत. याचे पेढीवर ठेविलेला पैसा कधी बुडावयाचा नाही अशी ख्याती असे. हिंदुस्थानात अगदी लहान गाव का असेना, पण तेथे दयाराम आत्मारामाची हुंडी चालते. असा हिचा लौकीक असे. ●या पेढीचा मुख्य मालक याचे घर सुरतेस असे, मी सुरतेस असता एका महाराष्ट्र गृहस्थाकडे लग्नसमारंभ होता, सबब त्याचे तर्फेने सदर दयाराम आत्माराम याचे लग्नाचे बोलावणे करण्यास गेलो होतो. त्या समयी त्याचे घरच्या बायका तुरीच्या डाळी निवडण्यास बसलेल्या पाहिल्या, मजवरोबर जो गृहस्थ होता त्यास विचारपूस करिता असे समजले की, मोठा धनवान व्यापारी का असेना, त्याच्या घरच्या बायकानी काही तरी उद्योग केला पाहिजे आणि अशा प्रकारे महिन्याचे रुपया दोन रुपये प्रत्येक बायको कमाविते. या स्त्रिया जी लुगडी नेसलेल्या होत्या ती तीन किंवा चार रुपये किंमतीची होती.

* प्रांतात फिरणारे ऑफिसर लोकानी प्रवासाचे सोईकरता महिनेमहा गाडया ठेवाव्या व दरमहाचे भत्तेबिलात प्रतिज्ञालेख लिहिताना दरमहाच्या भाडयाने गाडया ठेविल्या होत्या अशी प्रतिज्ञा लिहित जावी असे सरक्युलर मुंबई सरकाराकडून झाले होते असे मला माहित आहे पण त्याचा उपयोग त्यावेळी कसा काय होत असे हे यांजवरून चांगले समजते.

● या पेढीची दुकाने महाराष्ट्रात सर्वत्र गावी असत आणि सांप्रत ज्याप्रमाणे पोष्टात सर्व लोक पैसा विश्वासाने ठेवितात तसा विश्वास या पेढीवर लोकांचा असे

## सरदारीणबाईंचा लवाजमा

सुरत शहरात सय्यदपुऱ्यात गंगाधर शास्त्र्यांची* हवेली आहे. तेथे एक बडोद्यांचा बडा सरदार सहकुटुंब उतरण्यास आला होता. त्या सरदाराची पत्नी गाडीतून उतरून वाडयाच्या पायऱ्या ज्या समयी चढू लागली ते समयी दासींनी बाईसाहेबांचे लुगडयाचे ओचे धरले होते आणि खिजमतदाराचे हाताचा आधार धरून या सरदारीणबाई ठुमकत, पायऱ्या चढत होत्या.

मी बडोद्यास असता गोपाळराव मैराळ याजकडे गेलो होतो. यजमानीन बाई तुळशीची पूजा करीत असता डावे आंगी ठेविलेले पूजापात्र उजवे आंगी ठेवण्यास दासीची मदत लागताना पाहिली आहे. कितीएक सरदाराचे घरी लुगडयाच्या चुण्या करून दासींनी यजमानीन बाईचे हाती देणे यात नवल नाही. पण चोळयाच्या गाठीदेखील दासींनी माराव्या लागतात, असे समजले

सांप्रत अयत्या तयार केलेल्या विडया विकणे, त्याचप्रमाणे पागोटी बाधणे हे धंदे नवीन बनले आहेत. पंचवीस तीस वर्षांपूर्वी याची दुकाने नसत, लोक स्वतः आपली पागोटी बांधित असत, व विडया तयार करून ओढित असत.

ज्या वेळी आगगाडया हिंदुस्थानात आल्या नव्हत्या त्या वेळी प्रवास चोहीकडे बहुतकरून बैलगाडीने होत असे. त्याचा प्रकार असा असे; रात्री दोन वाजता गाडया जुंपावयाच्या. सकाळचे नऊ–दहा वाजेपर्यंत हा प्रवास करावयाचा. प्रातःकाळी सात साडेसात झाले की बहुतकरून तरुण माणसे गाडी सोडून पायी चालत त्यायोगे गाडीत संकोच्यात बसावे लागे तो पाय मोकळा होई व वृद्ध माणसास गाडीत हातपाय मोकळा करण्यासवलत होई. पायी चालणारे माणसानी वड किंवा पळस याची पाने मिळाल्यास पहावी व रानशेणी सापडल्यास व लाकडाची काही सोय असल्यास पहावी. बहुतकरून लाकडे फुकट मिळत. जर कदाचित न मिळाली तर मग धर्मशाळेतील वाण्यापासून विकत घेण्याचा प्रसंग येई पण सांप्रतप्रमाणे लाकडेही सरकारची जमाबदीची बाब नसल्यामुळे असे क्वचितच प्रसंगी करावे लागे. मुक्कामावर गेल्यावर आधी चकमकीने विस्तो पाडून तो त्या रानशेणीवर ठेवून अग्निसिद्ध करणे हे एक पहिले विशेष काम असे. याशिवाय आणलेल्या पानाच्या पत्रावळी लावणे, पाणी आणणे, सडा किंवा पोतेरे घालणे, तीन धोंडे मांडणे याप्रमाणे कामे पडत असत; भोजन झाल्यावर भाडी घासणे किंवा घासविणे, वाण्याकडे पोचविणे किंवा बराबरची असल्यास थैल्यांत नीट ठेविणे, ही सर्व कामे झाल्यावर पुन्हा गाठोडी बाधून जरा विश्रांती घेण्यास काळ मिळाला तर ठीक पण सर्व माणसास तसे होतच नसे कारण धर्म शाळेभोवती सुटलेल्या गाडयांचा जेव्हा तळ उठेल तेव्हा सर्व गाडयांनी तयार असलेच पाहिजे. एकटी दुकटी गाडी गेली तर लुटण्याची भीति; सायकाळचे तीन पासून चारपर्यंत तळ उठून गाडया चालत्या होत, त्या रात्रीच्या आठ साडेआठाला पुन्हा मुक्काम सर्वांचा होई. म्हणजे तेथे धर्मशाळेत

* हे त्र्यंबकजी डेंगळयाकडून पंढरपुरी मारले गेले. – सं.

दिवाबत्तीपासून सर्व तयारी करावयाची गाड्यातील गाठोडी, भाडी काढणे, पुन्हा अग्नी सिद्ध करुन (घड्याळ टिपरु) किंवा शिधा डाळ पिठ आणून वरण, भाकरी किंवा जशी सोय असेल त्याप्रमाणे नाहीतर दुपारीच 'खुसप दशम्या' करून घेतल्या असल्यास बरीच मेहनत कमी होई. याप्रमाणे भोजन झाल्यावर भूमीला पाठ लावण्याची व्यवस्था करावयाची. प्रत्येक माणसाने आपल्या उशास एक एक गाठोडे किंवा सामानाचा थैला घ्यावयाचा. त्या थैल्यास किंवा गाठोड्यास बांधलेली दोरी निजण्याचे हाथरुणाखाली घ्यावी लागे. कारण उशाचे गाठोडे घेऊन उचल्ये (गटिये) 'उठावगीर' तेव्हाच लाववित. कधी कधी आवराईत, मैदानात रात्रीचा मुक्काम होत असे असे वेळी लुटारू लोक हळूच येऊन पायाचे बोटास चावा मारीत आणि पळून जात. निजणारा धडपडून एकदम उठे किंवा बसला राही इतक्यात उशाचे गाठोडे त्या चोराचा साथी घेऊन पळ काढी; प्रत्येक मुक्कामास गावचे रामोशी, भिल्ल, वर्तणीये रक्षणाकरता तीन–चार असामी रात्रीचे येत असत; परतु हे चोराचे मिलाफी असत, या रामोशाबद्दल दर माणशी एक एक पैसा द्यावा लागत असे

## कल्याण तारीख १६ माहे जून सन १८६७

कल्याण येथे प्रथम तेथील मुनसफ रावसाहेब मुकुंदराव भास्कर यास आपले सभेचे हेतू विदित केले. परंतु लोकाचा जमाव एकत्र होण्यास काही मार्ग नसल्यामुळे व प्रसिद्ध आमत्रण करावे तर लोक जमणार नाहीत असे समजले. कारण येथील लोकास तसे वळण नाही याजमुळे बरेच दिवस खोटी झाली. नतर एके दिवशी मे. मुनसफ साहेबाकडे लोकलफडाचे मेंबराची सभा झाली, सबब तेथे जाऊन माझे येण्याचे उद्देश सर्वांस विदित केले, परतु त्यापैकी थोडेच गृहस्थास माझा हेतू पसत पडला व ज्यानी मजला मदत करण्याचे कबूल केले होते, त्याजकडूनही पुढे मदत झाली नाही. एके गृहस्थाने सागितले की, भाऊ पुराणिक याजकडे तुमचे हेतुबाबत सभा करण्याकरिता तुम्ही त्याजकडे जावे (भाऊ पुराणिक याजकडे हमेश ब्राह्मण जातीत काही धर्मसबधी तटा पडला असता सभा होत असते). मी सदर गृहस्थास उत्तर दिले की, माझे हेतूचे सबधाने या होणारे सभेत सर्व जातीचे लोक एकत्र होण्याचे आहेत, तेव्हा तेथे सभा केल्याने भाऊ पुराणिक यास पसत होणार नाही. कारण मुसलमान व पारशी लोक वगैरे सभेत येण्याचे आहेत, याजकरिता अन्य ठिकाणी सभा व्हावी हे बरे. परतु ते त्याजला पसत होईना त्याचे म्हणणे की, सभा म्हटली म्हणजे ती पुराणिक याजकडेसच होत आली, ती दुसरे ठिकाणी झाल्याने लोक कसे एकत्र होतील ? व झाले तरी त्यास ग्रामस्थाची सभा असे कोण म्हणेल ?

वसई येथे जेव्हा नवीन अशाप्रकारच्या सार्वजनिक कामाच्या स्कुलात सभा होऊ लागल्या, त्या समयी तेथील भट भिक्षुकास असेच अभिनव वाटत असे. वसई येथे ब्राह्मण जातीत अशी रीत आहे की, धर्मसबधी सभा होणे तर नेमलेले चार गृहस्थास विचारल्याशिवाय करू नये व सभा भरल्यावर शेवट निकाल करते वेळी देखील त्याचे जास्त वजन असे, व हे नेमलेले गृहस्थही वशपरपरेने यावयाचे, पण शहाणपण काही वशपरपरेने येत नाही. याजमुळे असा चमत्कार होत असे की, (का भाऊ तुमचे काय मत आहे) ? तर उत्तर येत असे की, तुमचे मताप्रमाणेच माझे मत आहे. त्या चार गृहस्थात बाळ दीक्षित मराठे याचे नाव आहे, तेव्हा ज्या समयी अशा सभा होण्यास प्रथम आरभ झाला, तेव्हा दीक्षित हे लोकास विचारीत की, अहो आमचे आज्ञेशिवाय सभेस परवानगी कोणी दिली ? परतु पुढे जशा वारवार अशा प्रकारच्या सभा होऊ लागल्या व त्यात बरेच गावचे प्रतिष्ठित येत, तसे त्याचे अज्ञान नाहीसे झाले.' याप्रमाणेच कल्याणास भाऊ पुराणिक याजकडे मात्र सभा होते, असा त्या वरील मदत करणारे गृहस्थाचा गृह होता, याजमुळे त्यानी पुढे मजला मदत करण्याचे सोडले. नतर प्रत्येकाचे घरी जाऊन असे प्रकारची सभा जिल्ह्याचे ठिकाणी स्थापल्याने कसे हित आहे याजबाबत भाषण करून रुकारादाखल बुकावर सह्या घेण्याचे सुरू केले सभासदाच्या सह्या घेण्याचे बुक तांबडे खारव्याचे फणाळ्यात बाधून बगलेत मारून लोकाचे घरोघर फिरावयास जात असे. मजला इतक्या दररोज खेपा घालाव्या लागत असत की, कित्येक भावीक लोकास मी पुराणिक असावा असा भास झाला. व एक दोन शूद्रानी मला असे देखील विचारले की, 'पुराणिकबाबा तुमचे पुराण कोणत्या देवळात होत असते'. प्रथम माझे बुकावर कोणी सहीच करीना. परतु विठ्ठल गणेश जोशी मालगुणकर इनामदार याची भेट घेता त्यानी मात्र हकीकत ऐकताच सही करण्याचे नाकारिले नाही, विठोबाअण्णा याचे विचार फार चागले असल्यामुळे त्यांस मी कल्याणचा नायक असे आनंदाने म्हणतो. कल्याणात मजला याचे योग्यतेचा दुसरा गृहस्थ आढळला नाही असे म्हणण्यास हरकत नाही. याप्रमाणे लिस्टावर सह्या होण्यास आरभ झाला. नतर काही सह्या घेऊन मी हरि विश्वनाथ पटवर्धन याजकडे गेलो आणि त्याजला माझे हेतू दर्शविले. ते ऐकून मान्य आहेत असे त्यानी प्रथम दर्शविले, परंतु सही मात्र दुपारी करीन असे सागितले. मशारनिल्हे पटवर्धन याची सही झाली की कल्याण येथील कुशानाना पिंपळखरे म्हणून जे प्रतिष्ठित सावकार आहेत व ज्याचे प्रामाणिकपण, परोपकारी असेविषयी चोहीकडे प्रसिद्धी आहे तेही सही करितात, अशी रीत असल्याचे समजले. याजमुळे हरि विश्वनाथचे तोडचा रुकार 'विषकुभ पयोमुखा' याप्रमाणे हस्तमुख चेहरा पाहून मजला द्विगुणित आनद झाला

हरि विश्वनाथ याजकडे दोन प्रहरी गेलो असता त्याचे विचार बदलले इतकेच नाही तर त्यानी जबाब दिला की, लिस्टावर ज्या सह्या ठाणे येथील गृहस्थाच्या झाल्या आहेत त्याविषयी आम्हास सशय आहे.

ठाणे येथील सरकारी वकील रामचद्र त्रिबक आचार्य याचे आणि हरि विश्वनाथ पटवर्धन याचे नाते आहे, सबब त्याजकडून सह्या खऱ्या असल्याबद्दल पत्र आणतो म्हणून विनती केली, ती त्यानी मान्य केली, आणि ठाण्यास येऊन रामचद्र त्रिबक याचे पत्र आम्ही सह्या केल्या आहेत, असे नेले. तथापि हरिभाऊ सही करीतना परतु आता नाकारण्यास जागा नाही, असे पाहून शेवटी मजला विचारले की, 'कायहो वसई येथे ब्राह्मणानी जातीबाहेर टाकिले होते ते तुम्हासच काय ?'* मी ती गोष्ट कबूल केली आणि नम्रतेने सागितले, की,

* माझ्या प्रिय गावकऱ्यानी मजला एकच वेळ जातीबाहेर टाकिले होते असे नाही अनेक वेळा अशा शिक्षा दिल्या आहेत. व त्याजबाबत पृ ७९ वर पहा–

मजला जातीबाहेर टाकिले होते. तरी माझे स्वत विषयी आपल्यास जरी किंमत नसली तरी ज्या कृत्याबाबत आपल्यापाशी सही करण्याची विनंती करीत आहे, ते कृत्य योग्य वाटत असेल तर आपली सही लिस्टावर करावी व त्याबाबत आपल्यास रामचद्र त्रिंबक आचार्य याचे पत्रही आहे तेव्हा निरुत्तर होऊन सही करण्याचे कबूल केले. परतु एक अडचण दुसरीच ठेविली की, विनायक गगाधर बोरगावकर जर सही करतील तर मी करीन त्यानी केली नाही तर मी कधी करणार नाही हो. नतर त्याजला घेऊन विनायकराव गगाधर बोरगावकर वकील याजकडे गेलो. त्याजबरोबर दोन घटका बोलणे झाले आणि शेवटी त्यानी सही केली. आणि नंतर हरिभाऊंची एकदाची सही झाली. या पटवर्धनाकडे या कृत्याकरिता माझे आठ–दहा वेळ जाणे झाले. त्यात याची अशी वागणूक असे की, मी गेलो असता आपण मजकडे पाहत देखील नसत. मग या, बसा, म्हणणे दूरच. कल्याण येथील प्रतिष्ठित गृहस्थाच्या सह्या घेण्यात रामचद्र काशीनाथ केळकर या नावाचे गृहस्थानी जे माझ्याशी भाषण केले तेही थोडे चमत्कारिक आहे; मी रामभाऊकडे गेल्यावर प्रथम ही सभा कशी स्थापन होणार आहे, याजबाबत सर्व उद्देश विदित केले नतर रामभाऊनी माझे सर्व भाषण ऐकून उत्तर केले की, इग्रज सरकार आम्हास बुडविण्यास तयार आहे, यात संशय नाही. आणि याजबाबत जी त्यानी (रामभाऊनी) प्रमाणे सागितली ती ही तशीच चमत्कारिक आहेत ते म्हणाले की, सरकाराने आमचे तालुक्यास पैमाष जबरीने लागू केली आमचे हक्क पूर्वापार आहेत, अशा विषयी आम्हीं पुष्कळ अर्ज केले; परतु ते काही एक न ऐकता सरकाराने जास्त दस्त आम्हावर जबरीने बसविला याप्रमाणेच धर्माचे बाबतीतही सरकार आम्हास बुडविण्यास तयार आहे ते असे की, आगगाडीत वर्णाश्रम धर्माचा मुळीच भेद ठेविला नाही ब्राह्मण व अतिशूद्र एकाच गाडीत कोडतात, यात आमचा धर्म अगदी बुडून जातो नवीन कराचे बाबतीत तर सरकाराने सीमा केली आहे जर या दहा सालाची सरासरी काढली तर माझे समजुतीने चोथाई कर वाढले आहेत. साप्रतचे सरकारचे राज्यपद्धतीवरून विचार केला तर पुढे आपले हिंदूची काय दशा होईल ते सागवत नाही. मी आपले ठिकाणी सिद्धात केला आहे की, पन्नास, शभर वर्षानी साप्रत वारली, कोळी लोकाची जशी स्थिती आहे, तशी दशा इग्रज सरकार आमची करणार आहे, यात सशय नाही. याजकरिता जरी सरकारास सभा करून आपले हृद्र कळविण्याचा तुमचा इरादा आहे तरी ज्याचे मनात तुम्हास निर्धन करून टाकण्याचे आहे ते तुमच्या अशा सभाकडे कशाला पाहतील ? अहो निजलेल्यास जागे करणे रास्त आहे, परतु जाग्यास जागे करण्याचे श्रम करण्यात ते हाशील कोणते ? याजकरिता आम्ही तुमचे सभेचे सभासद होऊ इच्छित नाही, इतकेच नाही तर आम्हाला कल्याणकराला ती तुमची सभा नको. त्यास मी समजून सागितले की तुमचे मताप्रमाणे जरी सरकाराने दाद घेतली नाही, तरी ही सभा आपल्यास व्यापारसबधाने ज्या नडी आहेत, त्या दूर करण्यास तरी कारण होईल उदाहरण, कापूस आपले देशात पिकतो तथापि त्याची वस्त्रे होण्यास तो परदेशात पाठवावा लागतो लोखड आमचे देशात होते परतु सुया परदेशातून आणाव्या लागतात. याजकरिता जर आपल्या देशात त्या वस्तू तयार होण्याचा यत्न केला तर पुष्कळ फायदा होईल. ठाण्यास सभा दरसाल भरेल ते समयी आपल्या जिल्ह्यातील तुम्हासारख्या प्रतिष्ठित लोकाच्या एकमेकाच्या ओळखी होतील व असे मोठे कामास एक दोघानी हात घालता येत नाही, अशा कामास कपन्या, मडळ्या स्थापिल्या पाहिजेत. याजकरिता अशाविषयी विचार करण्यास तरी ही सभा उपयोगी पडेल. याप्रमाणे सुमारे दोन घटका त्याजबरोबर बोलणे झाले परतु माझे भाषणाचा काहीएक उपयोग न होता शेवटी त्यानी कटाळून स्वच्छ सागितले की, तुम्ही पाद्री लोकासारखे पुष्कळ बडबड करणारे अहा, आमचा हा कामाचा वेळ आहे सबब तुम्हाबरोबर आम्हास बोलता येत नाही. असे बोलले आणि उभे राहून नमस्कार करून माजघरात गेले. याप्रमाणे इलाज खुटल्यामुळे मी उद्या दोन प्रहरी आपले फुरसतीचे वेळेस आज्ञा असेल तर येईन, असे सागून रजा घेतली. पुढे त्याजकडे दुसरे दिवशी जाण्याचे, परतु एकदर सभा अमामीच्या सभासदाचे लिस्टावर सह्या झाल्याकारणाने मी रामभाऊकडे न जाता भिवडी येथे जाण्याचा विचार केला.

कल्याण येथे ब्राह्मण मडळीत चागले प्रतिष्ठित व सधन पुष्कळ गृहस्थ असून ते सर्व दर्भ समिधात गुतलेले दिसले. त्यात अलीकडील विचारास अनुसरणारे कोणी न भेटल्यामुळे मला फार वाईट वाटते. कल्याण गाव ब्राह्मण वस्तीच्या सबधाने या गावाइतकी मोठी वस्ती ठाणे जिल्ह्यात दुसरे गावी नाही परतु सार्वजनिक सबधाचे विचार मनात आणले तर ज्या प्रमाणाने तो जितका मोठा आहे त्याच प्रमाणाने तो तितका मागे आहे. कल्याण येथे तादुळाचा मोठा व्यापार चालतो. येथून हजारो मण सडीक तादूळ मुबईच्या खपाकरिता दररोज जातात मुसलमान लोकाच्या वस्तीत गेले म्हणजे व्यापार संबंधाने धनसंपदा, मोठमोठया चुनेगच्ची दुमजली, तीन

( पृ ७८ वरून )

मी त्याचे उपकार मानतो. कारण त्यानी जर माझ्याशी असे प्रकारचे वर्तन ठेविले नसते तर माझे मनाचे विरुद्धच्या सर्व भानगडीतून मी कायमचा सुटलो नसतो. त्याची हकीकत थोडक्यात येथे सागतो. त्यानी प्रथम सन १८६५ साली शातिपाठ वाचण्यास व पाचवी व षष्ठिपूजनास येण्याचे बद केले मी ते करण्याचे सोडून दिले. त्यानी श्राद्ध पक्षास येण्याचे नाकारिले मी पितृतिथीचे दिवशी एखाद दोन अध पंगू यास भोजन व दक्षणा देऊन निर्वाह चालविला त्यानी मजबरोबर श्रावणी करण्याचे सोडले तर मीही श्रावणीचे उद्यापन करून टाकिले.

याप्रमाणे जरी धर्मसबधी बाबतीत माझे त्याचे युद्ध चालत असे तरी सार्वजनिक सबधाने त्याचे माझे बिलकुल वाकडे नसे. सदरहू बाबतीत ते माझे सल्याप्रमाणेच वर्तन ठेवीत असत कोणी वाईट चालीचा, लाचखाऊ अधिकारी आला तर त्याचा पिच्छा पुरवून त्यास मार्गावर आणण्याचे बाबतीत मी यत्न करण्यात अगदी कमी करीत नसे व असे प्रकरणात धनाने, मनाने जशी लागेल तशी मदत सर्वलोक करीत असत.

शेवटी एका विधवेचे विवाहाचे प्रकरणात तर 'कली कर्ताच लिप्यते' या वाक्याप्रमाणे मजला जातीबाहेर टाकण्याचे सोडून दिल्यासारखे साप्रतच्या कालमानास अनुसरून केले आहे. त्याजमुळे मी त्याचा आभारी आहे, सन १८७७.

मजली हवेल्या व त्यात तादूळ तयार करण्याचे चाललेले कारखाने दृष्टीस पडतात. ब्राह्मण वस्तीकडे जाल तर त्याची ती जुनी मोडकळ स्थितीस आलेली घरे वगैरे सर्वत्र उदासीनताच दृष्टीस पडेल कल्याण गावी पिपळखरे याचे घराणे सुप्रसिद्ध व सभ्य चालीचे असे आहे. याची देवघेवीचे व्यापारसवधाने फारच सचोटी आहे आस-पासच्या खेडयापाडयातून कुळबी व शेतकरी लोक येतात, त्यास याचे कडे पाणी पाजतात, रुपया घेऊन त्यास चवल्या-पावल्या वगैरे नाणे लागले असताही देतात, गावात कोणाकडे लग्न व्हावयाचे असेल तर त्यास माडवाचे सामान याजकडून थोडया दिवसाचे मुदतीने मिळते. कुशानाना म्हणून जे हल्ली वयोवृद्ध मालक आहेत, ते सायकाळी देवदर्शनास जातात ते समयी देवळातून हिंडून कोणी साधू, सत, ब्राह्मण उपाशी असेल तर किंवा दुखणेकरी असल्यास त्यास यथाशक्ती थोडे औषध व भोजन घालून वाटेस लावतात. आपले व आपल्या मुलाबाळाचे बऱ्याकरिता श्रम करणे हे जीवजतु देखील करतात,' परतु मानवी धर्माचे जे कर्तव्य त्याप्रमाणे या घराण्याचे वर्तन पाहून मनाला आनद झाला.

### मुक्काम भिवंडी तारीख २५ जून सन १८६७

भिवंडी येथे गणपत रावजी माडे वकील वगैरे मडळी चागली असल्यामुळे मजला तसदी पडली नाही. येथील मुनसफ रावसाहेब सखाराम कृष्ण शेट व तालुका मास्तर त्रिंबक केशव परचुरे याची या कामी उत्सुकता पाहून तर मजला फारच आनद झाला. भिवडी येथे एकदर अठरा असामी सभासद झाले व या गावी माझा तीन दिवस मुक्काम झाला होता.

### मुक्काम वसई तारीख २९ जून सन १८६७

भिवडी सोडून मी माझा वस्तीचा गाव वसई येथे जलमार्गाने परत आलो. वसई येथील लोकाचे विचार तर चागलेच आहेत

वसई येथे फुलबर्डा सुपारी उत्तम होते त्याचप्रमाणे वसईची सुकी केळी प्रसिद्ध आहेत. वसईचे लोक मोठे पाणीदार आहेत, याज-बद्दलची हकीकत सन १८५९ साली जी घडली ती येथे थोड-क्यात देतो.

## प्राप्तीवरील कर इन्कम्टॅक्स न बसवून देण्याबाबत मारामारी

सन १८५९ चे सुमारास सरकारने जो इन्कम्टॅक्स नावाचा कर हिंदुस्थानातील रयतवर प्रथम बसविला त्याची समजूत देण्याकरिता मे हटरसाहेब त्या वेळचे वसई प्रातचे असिस्टट कलेक्टर वसईस आले होते, त्याच्याशी जी रयतेची धिगामस्ती झाली त्याची हकीकत खाली लिहिल्याप्रमाणे.

सन १८५७ साली श्रीमत नानासाहेब पेशवे यांनी आपला बाप (दुसरा बाजीराव) यास नेमणूक चालत आल्याप्रमाणे आपल्यासही चालवावी म्हणून त्यावेळच्या ईस्टइडिया कपनीकडे अर्ज केला होता, परतु इग्रज सरकार ती मागणी कबूल करीना. सबब नानासाहेब आणि इग्रज यात जी हातघाई झाली, त्यानतर पुढील साली लढाईत जो खर्च झाला होता तो भरून निघण्याकरिता रयतेवर इन्कम्टॅक्सचा कर बसविला आहे, असे वसई गावात जाहीरनामे लाविले होते व त्याचे वसूलबाकीची सर्व व्यवस्था वसई येथील त्यावेळचे मामलेदार काशीनाथ विनायक लोढे पुणेकर यांजकडे होती. मामलेदारानी रयतेस नोटिशी तलाठीमार्फत घरोघर दिल्या, त्या रयत घेईना व त्या मामलेदार कचेरीपुढे परत पुष्कळानी आणून फेकून दिल्या. सबब वरील असिस्टट कलेक्टरसाहेब रयतेची समजूत घालण्याकरिता म्हणून ठाण्याहून मुद्दाम आले होते, त्याचा मुक्काम रहदारी बगल्यात होता व तालुक्यातील रयत या समयी रहदारी बगल्यापाशी मामलेदार बोलावण्याप्रमाणे एकत्र झाली होती. सुमारे दोन हजारावर लोक जमले होते. त्यास साहेब बहादूर समजूत द्यावयास लागले. व कर बसविण्याचे कारणासह चागले मुद्यानिशी साहेबानी भाषण केले त्याचा जबाब देताना रयतेने जी भाषणे केली ती जरी विसगत व त्याची शब्दरचना बरोबर नाही अशी होती तरी त्यांचा भावार्थ मोठा खोल विचाराचा होता. रयत म्हणाली की, 'हा कर सरकाराने विचार केल्याशिवाय व आमच्या प्राप्तीचा पुरा तपास केल्यावाचून आम्हावर बसविला आहे. असा जुलूम करणे असेल तर सरकाराने आमची घरेदारे विकून पाहिजे तर कर वसूल करावा आम्ही खुषीने कर देण्यास राजी नाही, असे सर्व लोक बोलू लागले त्यानतर साहेबानी हुकूम केला की, काही प्रतिष्ठित लोकास मात्र बगल्या-पाशी आणावे, बाकीच्या लोकास दूर ठेवावे. त्याप्रमाणे अब्रूदार पाढरपेशे वगैरे सुमारे पन्नास लोक बगल्यापाशी नेले. आणि बाकी रयत थोडया अतरावर आठ दहा हातावर मागे राहिली पण तिही हळूहळू त्या पाढरपेशे लोकाचे मागे जाऊन साहेबाचे भाषण ऐकण्यास उभी राहिली सर्वांचे पुढे पाढरपेशे (ब्राह्मण, परभू, गौडब्राह्मण वगैरे) त्याचे मागे वाणी उदमी, त्याचे मागे कासार, सोनार, मुसलमान व सर्वांचे शेवटी काही अतरावर मच्छी मारणारे कोळी व वसई आगरातील किरिस्तान पार्चुगीचमाळी सुमारे तीनशे पासून चारशे लोक उभे होते इतक्यात साहेबाचे शिरस्तेदारानी काल रोजी मामलेदार कचेरीपुढे नोटिसी टाकलेल्या आणवून ठेविल्या होत्याच त्यातून एकेक काढून नावे वाचून हाका मारू लागले या वेळीही साहेबानी सागितले की, सरकारानी जर कर बसविला आहे तर रयतेने सरकारच हुकूम न मोडता मान्य करून नोटिसी ज्याच्या त्यानी घेतल्या पाहिजेत. नतर नावे वाचण्यास सुरुवात झाली. त्यात प्रथमची नोटीस गोवर्धन गगादास वाणी याची निघाली, तसा साहे-बानी त्याच्या नावाचा शिपायाकडून पुकार करविला आणि त्याजला जवळ बलावून साहेब त्याचे हातात नोटीस देऊ लागले असता मी घेत नाही असे गोवर्धन शेटनी सागितले. साहेबानी सर्व लोकास पुन्हा निवेदन केले की, सरकारास नानासाहेबाबरोबर लढाई कर-ताना बहुत खर्च झाला आहे, हाल-अपेष्टाही पुष्कळ भोगाव्या लागल्या आहेत, कर्ज फार झाले आहे व त्याचे फेडीकरिता इन्कम्-टॅक्स (नवीन कर) बसविणे भाग झाले आहे. तर सरकाराला रयतेने मदत केली पाहिजे व हे रयतेचे कर्तव्यही आहे. त्याजवर गोवर्धनदास यानी जबाब दिला की, सरकारचे पुष्कळ अव्यवस्थित व फाजील खर्च आहेत, ते कमी करावे अथवा साहेब लोकांस इत-काले मोठे पगार आहेत की, एका साहेबाचा जो पगार असतो त्याचे चौथ्या हिश्शात त्याच्या ऑफिसच्या सर्व एस्टाब्लिशमेंटाचा पगार

असतो. याप्रमाणे दुसरे पुष्कळ खात्यातही अशीच अव्यवस्था आहे, ती बद करून जो पैसा शिल्लक राहील तो तिकडे लावावा. आम्हा हिंदुस्थानवासी गरीब रयतेवर कर बसवू नये. त्याजवर साहेब बोलले की, जितकी, जितकी काटकसर करवेल तितकी सरकार करीत आहे, त्या विषयी तुम्ही सांगावयास नको. गोवर्धन शेट बोलले की, हे फक्त आपण तोडाने व वर्तमानपत्रात मात्र बोलता परतु सरकारचा हेतु बिलकुल तसा नाही. थोडक्यात सागितले तर आम्ही हिंदुस्थानवासी लोकानी अगदी दरिद्री व्हावे, आमच्या घरात जी थोडी धातूची भाडी व डागडागिणे आहेत, ते नाहीसे करून त्याप्रमाणे अमेरिकेतील रेड इडियन लोकाचा निकाल झाला तसा आमचा निकाल व्हावा अशी आपल्या लोकाची इच्छा आहे आमच्या रयतेच्या घरात पहाल तर दोन प्रहराला पुरेइतके अन्नसुद्धा पुष्कळ लोकाचे घरी राहिले नाही आमचे धंदे व व्यापार सर्व तुम्ही हिसकून घेतले आहेत आम्हास हात बाधून उपासी राहून मरण्याचा प्रसग आला आहे. याप्रमाणे आम्ही अगदी दीन व दरिद्री झालो आहो. याजकरिता आम्हास इन्‌कमटॅक्स नको व आम्ही तो देणार नाही त्याजवर साहेबानी सागितले की, असे म्हणून कधी चालावयाचे नाही. तुम्ही नोटिशी घेतल्या पाहिजेत व त्यात लिहिल्याप्रमाणे आकार भरला पाहिजे गोवर्धन शेट बोलले की, आम्ही नोटिशी घेत नाही तेव्हा गोवर्धन शेटची नोटीस साहेब त्याचे हातात देऊ लागले आणि सागितले की, जर तू घेणार नाहीस तर तुजवर हुकूम तोडल्याचा चार्ज ठेविला जाईल. त्यानतर शेट बोलले सत्ता तुमचे हाती आहे, खुशाल ठेवा मी नोटिस मात्र कधी घेणार नाही. नतर साहेबानी आपल्या जमादारास हुकूम केला की, यास पकडून त्याचे हातात नोटिस द्यावी गोवर्धन शेट शरीराने मजबूत, तशात ऐन पचविशीचे भरात असल्यामुळे व नोटिस घेतली नाही तर इस्टेट विकून पैसा घेतील आणखी काय करणार आहेत? अशा समजुतीने शिवाय सर्व पाढरपेशे लोकासमक्ष साहेब कैद करा असे बोलले ते ऐकून त्या अब्रूदार व पाणीदार व्यापाऱ्यास फार वाईट वाटून शेटजी म्हणाले, पकडा पाहू कसा पकडता तो. मी पकडला जात नाही तेव्हा जमादार व शिपाई लोक कैद करण्याकरिता त्यास धरू लागले शेट पडले तालिमबाज ते कसचे त्या शिपायास दाद देतात तेव्हाच शेटजीनी त्यास झिडकारून टाकले असा हातघाईचा प्रकार सुरू झाला सबब साहेब स्वत: बगल्याच्या पायऱ्या उतरून गोवर्धन शेटास धरू लागले असता त्याची व साहेबाचीही बरीच झटापटी झाली. शेवटी आठ शिपाई व साहेब मिळून त्यास तर एकदाचे धरले आणि पायऱ्या चढवून वर नेले अशी हकीकत झाली नतर साहेबानी पाढरपेशापैकी काही लोकास कैद करून बगल्यात नेले ही खबर त्या अशिक्षित लोकात पसरताच मग काय विचारता? ते आपआपसात एकमेकाशी अदवा तदवा बोलू लागले आणि त्या अडाणी लोकात थोडी हालचाल सुरू झाली व ते एकमेकास आपल्या भाषेत बोलू लागले की, 'कायगा सिनवाऱ्या, कायगा जनको, काय गा पदमण, कैसे करावाचे? बगताव काय? आपल्या सावकारासनी साहेबाजून धरून नेलेंना?' याप्रमाणे एकमेकांत बोलणी होऊन त्या लोकाचेपुढे जे लोक उभे होते त्यास या लोकानी दोन हातानी मागे सारून कोळी, माळी, किरिस्ताव (ख्रिश्चन) लोक एकदम पुढे सरले आणि प्रथम बगल्यात जाऊन साहेबापासून गोवर्धन शेट यास तर त्यानी तात्काळ सोडवून आणले. गोवर्धन शेटनी त्याची पुष्कळ समजूत घातली की, मजबाबद तुम्ही काळजी करू नका, ते त्यास पटेना. या लोकास शिपाई लोक हरतऱ्हेने बगल्याबाहेर घालवू लागले व सर्व लोक शेटजीस ताब्यात घेण्याकरता बगल्यात शिरू लागले. या प्रमाणे मामलेदाराकडील व साहेबाकडील शिपाई यात हे प्रकरण हातघाईवर येऊन बरीच ओढाताण सुरू झाली. या लोकानी गोवर्धन शेट यास न सोडता आपणही शिपायाचे स्वाधीन झाले नाहीत साहेब तर ही धिंगामस्ती आणि गर्दी पाहून अगदी घाबरून गेले आणि बगल्याचे आत शिरले. व शिपाई लोक आतील लोक बाहेर काढून लोकानी आत येऊ नये म्हणून बगल्याची दारे लावून घेऊ लागले; पण ते लोक ऐकेतना. कोळी, माळी वगैरे लोकानी बगल्यात जाऊन साहेबास धरून खुर्चीवर बसवून बोलणे चालविले की, आम्हास इन्‌कमटॅक्स सोडावा पाढरपेशापैकी पुष्कळ लोक त्या लोकास दाबण्याकरिता व बगल्याबाहेर आणण्याकरिता आत गेले पण हे बेफाम होऊन गेलेले लोक कोणासच आवरले गेले नाहीत* व इतर लोक चोहोकडून बगल्यात भरू लागले, सबब तेथे राहणे आता चागले नाही असे समजून बदरावर जाऊन तेथून जल मार्गाने ठाण्यास जाण्याचा साहेबानी निश्चय केला. या वेळी रेल्वे नव्हती. आणि त्या गर्दीतून बगल्याबाहेर पडले तो कोळी, माळी मागे लागले होतेच साहेब जलदी करून पायी धावून बदरावर जाऊ लागले (रहदारी बगला आणि जलमार्ग बदर यात अतर अर्धा–पाऊण मैलाचे आहे) त्याचे मागे हे लोकही धावू लागले. बदरावर एक कस्टमची बोट त्या वेळी तयार होती तीत बसून खलाशास जलदी बोट हाकारण्यास साहेबानी सागितले. त्याप्रमाणे खलाशी तयारी करतात व बोट हाकारतात तो दर्यावर्दी लोक मागोमाग येऊन पोचले बोट काहीशी हाकारिली व बोटीवरील खलाशी शीड (अवजार) चढवीत आहेत, म्हणजे काठापासून सुमारे वीस पचवीस हात बोट गेली आहे इतक्यात कोळयानी पाण्यात उडया टाकून पोहत पोहत जाऊन ती बोट धरली व वर जाऊन खलाशापासून 'सुकाण' हाती घेऊन बोट मागे फिरविली आणि ती परत बदरात घेऊन आले, व साहेबास विनती करू लागले की, आम्हास इन्‌कमटॅक्स सोडा. साहेब त्याजला लीनतेने जबाब देत की, 'तुम्ही काळजी करू नका, सरकारात लिहून सोडविण्याविषयी खटपट करीन. येथे माझे हाती काही एक नाही, मला कृपा करून सोडा लोक म्हणत तसे नाही. इन्‌कमटॅक्स सोडला म्हणून लिहून दे त्या शिवाय सोडणार नाही. याप्रमाणे दोन घटका बोलणे चालणे झाले शेवटी मागून आलेल्या व्यापारी लोकानी त्या लोकाची कशी तरी समजूत घालून साहेबास बोटीत बसवून एकदाची बोट हाकारून साहेब ठाण्यास निघून गेले. या एकदर धालमेलीत साहेबास कित्येकाही धोंडे मारले व धकाबुकीही केली. त्याचे अगावरील कपडे फाटले, धूळ उडविली इत्यादी सर्व प्रकार झाले. नतर

---

* गोवर्धनशेट यास त्याच्या चार–पाच कुळानी सोडवून आधीच निराळे मार्गाने गर्दीबाहेर गेले होते, परतु बगल्यात शिरलेले लोकास हे माहीत नसल्यामुळे व इन्‌कमटॅक्स कर सोडल्याबाबत साहेबाचा लेख घेण्याकरता अडाणी लोक तेथे राहिले होते.

साहेब ठाण्यास निघून गेल्यावर आता पुढे कसा प्रसग येणार याजबाबत आब्रूदार लोक अगदी घाबरून गेले कितीएकानी आपले घरातील डागडागिने पुरून टाकले, भाडीकुडी विहिरीत टाकून दिली. गोवर्धन शेट यानी याप्रमाणे काहीएक केले नाही. आपल्या विश्वासू नोकरास मात्र पुढील प्रसग येईपर्यंत जवळ रात्रदिवस ठेविले होते. दोन दिवसानी काही साहेब लोक व शभर पोलिसचे शिपाई ठाण्याहून एकदम वसईस पहाटेस येऊन गावात शिरले. सुमारे ३०–४० सावकार व व्यापारी लोक यास एकदम पकडून ठाण्यास नेले गोवर्धन शेट याचे घरावर पोलिसानी बरीच गर्दी केली होती.

वसई, पापडी, सोपारे, नाळे, आगाशी, येथील लोकही पकडून नेले होते. मग त्यास ठाण्यास नेल्यावर कलेक्टर साहेबापुढे उभे केले. साहेब त्यास पाहून अति सतापला व एकदम कैदेत टाका असा हुकूम केला, पण जामिनावर सोडून देईना. ठाण्याचे नगर शेट लालदास माधव व प्रतिष्ठित वाणी, ब्राह्मण मडळी यानी या लोकाची योग्यता व अब्रू वगैरे बाबत कलेक्टर साहेबाकडे जाऊन पुष्कळ प्रकारे सागितले तरी साहेबानी ते काहीएक ऐकिले नाही. ( त्यावेळेस ठाण्यापर्यंतही रेल्वे नव्हती ) त्यामुळे काही काळपर्यंत त्या निरपराधी प्रतिष्ठित लोकास प्रतिबधात रहावे लागले. इतक्यात मुबईहून मेहरबान ॲनेस्टी साहेब प्रसिद्ध बॅरिस्टर यास काही लोक घेऊन आले. त्यानी कलेक्टर साहेबाशी त्या लोकास जामिनावर खुले करण्याविषयी कायदेशीर तकरार करून सर्वांस मोकळे केलें. हा कज्जा ठाण्याचे सेशन जज्ज मे फार्बस साहेब याजपुढे ॲनेस्टी साहेब बॅरिस्टर यानी चालविला. एकसारखे सुमारे दहा दिवस काम चालले होते शेवटी एक दोन असामीवर ' धिंगामस्ती ' व गर्दी केल्याचा पुरावा झाल्यामुळे तितक्यास मात्र वर्ष सहा महिन्याच्या शिक्षा झाल्या आणि बाकीच्या सर्व लोकास एकदम सोडून दिले. ही हकीकत पुरी करण्यापूर्वी मे हटर साहेब याचा सत्याचे ठायी जो दृढ निश्चय दिसून आला त्याची हकीकत येथे सर्व वाचकापुढे ठेविल्याशिवाय माझ्याच्याने राहवत नाही ती सागून हे प्रकरण सपवितो, ती हकीकत अशी आहे की, यावेळी कित्येक वाईट मनाचे साहेब लोकानी मे. हटर साहेब असि. कलेक्टर (ज्यानी मार खाल्ला ते) यास असे सागितले होते की, जे लोक आम्ही वसईहून पकडून आणिले आहेत ते सर्व आपल्यास मारण्यास होते आणि त्यास मी पुरे ओळखितो अशी जबानी तुम्ही द्यावी व सरकार तर्फेचे कित्येक साक्षीदारानी मामलेदार वगैरेनी आपली बेचाळीस कुळे नरकात बुडवून अशा प्रकारच्या खोट्या जबान्याही दिल्या होत्या. यामुळे या कज्जाचा निकाल किती भयकर होतो याजकडे वसई बेटातील एकदर सर्व रयतेची मने अगदी उदासीन होऊन गेली होती. हिंदू लोकानी देवळातून अनुष्ठाने बसविली होती. ज्याचे घरचे लोक पकडले गेले होते त्याजकडे उपास, पारणी सुरू झाली होती. ख्रिस्ती मुसलमान लोकानी आपआपले देवळातून गावच्या पुढारी लोकाच्या सुटकेकरिता प्रार्थना केल्या. शेवटी मेहरबान हटर साहेब याची जबानी ज्या दिवशी झाली त्या समयी त्या सत्शील पुरुषाचे सत्याची योग्यता सर्वांस एकदम समजून आली मे. हटर साहेब यानी पकडलेल्या लोकापैकी ज्याची खरोखर ओळख होती व ज्यानी खरी धिंगामस्ती केली होती तितक्याचे अगास हात लावून बाकीच्या लोकास मी अगदी ओळखीत नाही असे स्वच्छ सागितले. म्हणजे कायद्याप्रमाणे त्याजवर गुन्हा शाबीत होत नाही असा निवाडा जज्ज साहेबानी मागितला. या हटर साहेबाचे बाप पाद्री होते. यामुळे खऱ्या ख्रिस्ती मनुष्याचा याप्रमाणे खरा जबाब होताच कोर्टात या महत्त्वाचे कज्याचा कसा निकाल होतो तो पहाण्याकरिता ठाणे आणि वसई येथील लोकाची जी गर्दी जमली होती ती इतकी होती की तेथे पाय ठेवण्यास सुद्धा जागा नव्हती असे प्रकारे सर्व कोर्ट भरून गेले होते. या सर्व जमलेल्या लोकाचे मुखातून एक आवाजाने जो उद्गार निघाला तो सागितल्यावाचून माझ्याने राहवत नाही. तो असा होता की ' इग्लिश लोकात जोपर्यंत याप्रमाणे सत्य आहे तोपर्यंत त्याचे राज्य येथे कायम राहील. परतु सत्य जाऊन नेटिव्हाचा द्वेष व पक्षपात करतील त्यावेळेस ईश्वर त्यास कधी मदत होणार नाही '

**समाप्त**


**सर्व सुखसोयीयुक्त आमच्या विविध सहली**
**नवीन नियमाप्रमाणे L. T. C. ची सोय**

## चितारी ट्रॅव्हल्स

4/C जावळे बिल्डिग, कबुतरखाना,
जैन मदिराजवळ, दादर (पश्चिम), मुबई ४०००२८
फोन– ४३०७७४४

**काश्मिर, उत्तर भारत, दक्षिण भारत, श्रीशैल्य, हैद्राबाद, म्हैसूर–बेंगलोर, नैनिताल–कौसानी, कुल्लू–मनाली, बद्रीनाथ–गंगोत्री, काशी–गया–प्रयाग, नेपाळ, कोणार्क–पुरी व राजस्थान–सौराष्ट्र**

**ग्रुपसाठी विशेष सवलत**

□

पर्यटनावरील एक सग्राह्य सचित्र ग्रंथ

**प्रवासी मित्र**

**लेखक– श्री. प्रमोद चितारी**

किंमत रु. ६०/–

या ग्रंथाचे साह्याने उत्तर भारत काश्मिरमध्ये आपण सर्वत्र बुकिंग करून कोणाचीही मदत न घेता बिनदिक्कत प्रवास करू शकता.

आजच ' चितारी ट्रॅव्हल्स 'कडून मागवा.

एक कडी जरी तुटली तरी सांधा
निखळेल आणि आक्रमक शक्ती
उधळतील. मने दुरावली तर
परदास्याचा पाश आवळेल.
अशा वेळी तर निकड भासते
सामाजिक सलोख्याची,
ऐक्याच्या भावनेची.
राष्ट्र म्हणजे एक विशिष्ट भूभाग
नव्हे, तर समानता आणि प्रबळ
इच्छाशक्ती असलेला अभेद्य ऐक्याची
जागृत समाज होय.

**सारे एक राहू...**
**राष्ट्र महान घडवू**

**एकसंध साखळीची**
**एक जरी कडी निखळेल**
**तरी पाश बसून विनाश ओढवेल**

# माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
# महाराष्ट्र शासन

# पर्यटनाचा सामाजिक संदर्भ

शास्त्र, कला आणि तत्त्व ह्या तिन्ही बाजूंनी पर्यटनाचा विचार करावा, त्यासाठी विद्यापीठाने किंवा इतर संस्थांनी पर्यटनाचा अभ्यासक्रम तयार करावा अशी मराठी साहित्य-संस्कृतीचे एक रसिक अभ्यासक व विचारवंत समीक्षक कै. स. शि. भावे यांची कल्पना होती. या संदर्भात त्यांनी सप्टेंबर १९८६ मध्ये हा लेख लिहून ठेवला होता. लेखाला तात्कालिक असे निमित्त काही नव्हते. या विशेषांकात तो प्रसिद्ध होण्यात मात्र सहजच औचित्य साधले जात आहे. . . . .

**स. शि. भावे**

पर्यटनाची विशेष आवड अलीकडील काळामध्ये निर्माण झालेली दिसते आहे. निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या ठिकाणी सहलींना जाणे, एवढ्यापुरतेच पर्यटनाचे स्वरूप आता मर्यादित राहिलेले नाही. पर्यटनाला सध्याच्या युगामध्ये अधिक व्यापक अर्थ आलेला आहे तो समजून घ्यावयाचा तर पर्यटन या संकल्पनेला असलेला सध्याचा सामाजिक संदर्भ जाणून घेणे आवश्यक ठरते.

पर्यटनाचे स्वरूप मुख्यत्वेकरून दोन प्रकारचे दिसते एक म्हणजे व्यावसायिक. दुसरे, हौशी हौशी पर्यटनाची सामाजिकता ही व्यावसायिक पर्यटनाच्या व्यावहारिक रूपापेक्षा तत्त्वतः निराळी असली, तरी या सामाजिकतेचा अचूक उपयोग करून घेण्यात व्यावसायिक पर्यटन मोठे तत्पर असते. मग त्यामध्ये 'भारतीय जेवण', 'अमेरिकन ब्रेकफास्ट', 'चायनीज डिनर' अशी भोजनी आमीषे ठेवलेली असतात. राहण्याच्या जागेविषयी 'एअरकंडिशन्ड', 'प्रायव्हसी सांभाळणारे' अशी आमीषे असतात. फिरावे, आसपासच्या जगातील गोष्टी पाहाव्या, या कुतूहलापोटी प्रवास करू इच्छिणाऱ्या सान्यानाच आरक्षण, निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था याची सोय करणे जमत नाही. आर्थिक कारणाने, वयामुळे, अज्ञानामुळे जमत नाही. बहुधा अज्ञानामुळेच. कारण नीटपणे माहिती घेतली, तर ते सहजशक्य असते

तथापि, अशी माहिती सहजी उपलब्ध होऊ नये यासाठी या व्यावसायिक पर्यटनयंत्रणा दक्ष असतात. शासकीय यंत्रणाकडे ही माहिती कागदोपत्री उपलब्ध असते. प्रत्यक्षात तिचा लाभ घेता येणे ओळखीशिवाय शक्य होत नाही. रेल्वे, एस. टी. इत्यादी वाहनांच्या सवलती एकट्यादुकट्याला मिळू शकत नाहीत समूहआरक्षण हे सरकारी खात्यांना सोयीचे असते आणि फायद्याचेही या साऱ्या व्यावहारिकदृष्ट्या अत्यावश्यक उपलब्धतांचा पुरेसा फायदा घेऊन व्यावसायिक पर्यटनयंत्रणा चालतात त्या त्या यंत्रणेचे निरनिराळे रंगही असतात. परिस्थितीनुसार ते बदलतात कधी हा रंग धार्मिक असतो, कधी शैक्षणिक, कधी केवळ निसर्गविषयक सौंदर्य लुटण्याचा. त्या त्या वेळी ती ती पिढी त्या त्या रंगाकडे आकर्षित होत राहते.

हे गैर नाही. किंबहुना, अशा काही पर्यटनयंत्रणांमुळे बरेचसे व्यावहारिक कटकटीचे प्रश्न सुटतात. आरामात चिंता न करता प्रवास करता येतो. तेवढ्यापुरता हा, या यंत्रणांनी त्या प्रवाशाचा घेतलेला पत्कर असतो. या पत्कराविषयी अपेक्षापूर्ती होते, तेव्हा पुन्हा पुन्हा पत्कर दिला जातो. पर्यटनयंत्रणा चालू राहतात अपेक्षाभंग होतो, तेव्हा पत्कराची जागा बदलते— त्यामुळेही पर्यटणयंत्रणा चालूच राहतात

मुळामध्ये, एकेकट्यापेक्षा माणसाला समूहात सुरक्षित वाटते, हे यामागचे कारण आहे विशेषतः सध्याच्या विलक्षण असुरक्षित, आक्रमणोत्सुक जगात ही सुरक्षितता समूहात, समूहाने मिळते, हे ध्यानी आले की, माणूस त्या सुरक्षित वर्तुळात खेचला जातो, इतरांनाही खेचतो या प्रश्नाचे सर्व आर्थिक, भौगोलिक, मानसिक ताणेबाणे बघणे येथे शक्य नाही. पण एक वस्तुस्थिती मात्र निदर्शनास आणावयास हवी ती अशी की, अशी खेचवर्तुळे जितकी जास्त निर्माण होतील, तितकी प्रतिष्ठित शासनाला हवी असतात त्यामुळे या यंत्रणांना अधिकाधिक सुविधा देण्यात शासन—ते सरकार असेल, खाजगी संतुलन असेल – कमालीचे तत्पर असते

याखेरीजच्या हौशी पर्यटनाचे आणखी दोन प्रमुख भाग स्पष्टपणे कळण्याजोगे असतात त्यापैकी एक म्हणजे केवळ मौज म्हणून फिरणे. यात एखादे शिखर गाठणे, काही जुन्या ऐतिहासिक तपशिलाचा थांग लावणे असा सांस्कृतिक भाग नसतो किंवा पूर्वीच्या काळी बरेचदा पर्यटनामागे असे, तसा व्यापारी हेतूही नसतो. केवळ नित्याच्या जीवनापासून थोडे दूर जाऊन हसावे—खेळावे मौज करावी अशी वृत्ती असते

गेल्या दहा—वीस वर्षांत ही वृत्ती अधिक बळावलेली दिसते पूर्वी माझ्या लहानपणी 'सहल' हा एक तर शालेय शैक्षणिक कार्यक्रम असे. किंवा मध्यमवर्गीयांचा विचार करता, 'सुटी घालवणे' असे उच्च वर्गींपुरता तो कौटुंबिक अगर खाजगी आनंदाचा भाग असे. त्याखेरीजच्या वर्गांशी या प्रकाराचा दूरान्वयानेही संबंध नसे एक तर या

वर्गांना व्यावहारिकदृष्ट्या हे शक्य नसे. दुसरे, हा एक उच्च वर्णीयांसाठी असणारा मनोरंजन प्रकार आहे, अशी या वर्गाची निर्भ्रांत कल्पना होती.

आधुनिकीकरणाच्या वेगवान प्रवाहात अशा अनेक कल्पना बदलत गेल्या—हीही बदलली. हौस—मौज करणे याकडे सर्वच वर्ग वळू लागले. अर्थात् हौशी 'ग्रुप्स' मधे फार सरमिसळ अजूनही नसते. ठरावीक समूह ठरावीक ठिकाणी जाऊन मौजमजा करतात. उटीला कोणी जावयाचे, महाबळेश्वरला कोणी जावयाचे आणि सौंदत्तीला कोणी जावयाचे हे कोणी ठरवून दिलेले नसले, तरी ते इमानाने पाळले जाते. हे 'इमान' लक्षात घेऊन शासकीय यंत्रणा 'सीझनल' गाड्या सोडून इमानाचा आज्ञाधारकपणा करीत राहते. म्हणजे, इमानाचे आज्ञाधारकीकरण करीत राहते.

आणखी एक महत्त्वाचा, पर्यटनाचा भाग म्हणजे हायकिंग. असाच इंग्रजी शब्द मुद्दाम वापरला, याचे कारण असे की, तोच आता चांगला रूळला आहे. केवळ पर्यटन, गिर्यारोहण, प्रस्तरारोहण एवढे आता पुरत नाही. या हायकिंगमधेही दोन गमतीदार भाग असतात. येथे तसे 'गमतीदार' म्हटले, तरी एक भाग दुसऱ्या भागावर गंभीर असा राग धरून असतो. राग धरणारा भाग हा तज्ज्ञ हायकर्सचा असतो. त्यांना असे वाटते की, हायकिंग ही गंमत नाही; ते शास्त्र आहे, ती कलाही आहे आणि त्याकडे तितक्याच गंभीरपणे पाहिले पाहिजे. ही रास्त अपेक्षा ठेवणाऱ्यांचा राग अशासाठी असतो की, हे व्याज (स्यूडो) हायकर्स संकल्पना तर शास्त्राच्या वापरतात, साधनसामग्रीचा बडिवारही मोठ्या झोकात तसाच करतात, तथापि त्यामधे शास्त्रशुद्धता नसते. असे हायकर्स वाऱ्याचा, दिशेचा, पद्धतींचा विचार करत नाहीत. असे हायकिंग हे खरे हायकिंग नसते; केवळ मौजेसाठी चालणेचढणे असते. त्यामुळे हायकिंग या शास्त्राचा गंभीरपणे विचार व अवलंब करणारे आणि व्याज हायकर्स यांच्यात सर्वसामान्य लोक कायम गल्लत करतात. व्याज-हायकर्सचे समूह हे सर्व परिवेश तसाच ठेवून नव्याने या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्यांची दिशाभूल करतात, असाही हायकर्सचा महत्त्वाचा आक्षेप असतो तो तसा कायम राहणार. स्काय-



लाइन्स समजावून न घेता हायकिंग करणारेही राहणार. याचे कारण असे की, क्षेत्र कोणतेही असो, तितक्याच दिमाखात बाह्य परिवेश मिरविणारी व्याजता असणारच. हा कोणत्याही समूहाचा, समाजाचा आणि संस्कृतीचा स्व—भाव आहे. पर्यटनातीलही असे 'व्याज' बाजूला काढण्याचा अनाठायी खटाटोप करण्यात तथ्य नाही. ते कळते किंवा कळत नाही.

एवढ्या सर्व बाह्य आणि आंतरिक ताणतणावांसह पर्यटन विकसित होते आहे. अशा परिस्थितीत मला असे वाटते की, पर्यटनाच्या सामाजिक संदर्भाविषयी वरील सर्व मुद्दे लक्षात घेऊन काही निश्चित आराखडा असावयास हवा. त्याचे स्थूलमानाने दिग्दर्शन येथे करतो.

'पर्यटन' याचा तीन विभागांमध्ये तात्त्विक व उपयोजित अभ्यास सुव्यवस्थित शिस्तीत व्हावयास हवा. हे भाग असे १ शास्त्र म्हणून २. कला म्हणून ३. ऐतिहासिकदृष्ट्या.

असा तीन विभागांमध्ये अभ्यास करण्यासाठी काही एक प्रारंभिक किमान पात्रता असावयास हवी. खाजगी आणि सरकारी संस्था त्यादृष्टीने अभ्यासक्रम सुरू करू शकतील. उपयोजित अभ्यासासाठीही काही कोर्सेस सुरू करता येतील. त्यासाठी काही शारीरिक, मनोबलात्मक किमान पात्रता अनिवार्य ठेवावी. उदाहरणार्थ **तात्त्विक अभ्यासात** पर्यटन म्हणजे काय, पर्यटनाचे प्रकार, पर्यटन आणि इतर सामाजिक शास्त्रे, पर्यटनाच्या पद्धती, पर्यटकाचे योगदान, शासनाचा सहभाग, पर्यटन स्थळांचा विकास अशा विषयांचा अंतर्भाव करता येईल. **ऐतिहासिक अभ्यासामध्ये** जुन्या काळातील पर्यटनहेतू, पर्यटनप्रकार, साधने इ. चा अभ्यास केला जाईल. **उपयोजित विभागामध्ये** पर्यटनातील व्यावहारिक भाग, पर्यटनयंत्रणा, नव्या पर्यटनयंत्रणांचा विकास, पर्यटकाचा प्रत्यक्ष सराव व कौशल्ये यांचा अभ्यास होईल. हे सर्व करताना अध्ययन—अध्यापन साहित्याची निर्मिती करण्यासाठी संस्थांना स्वतंत्र शाखा सुरू करता येईल.

असे झाल्यास समाजाच्या इतर क्षेत्रांच्या (उदा. शिक्षण, तंत्रज्ञान, आर्थिक यंत्रणा इ.) विकासासाठी पर्यटनाचा उपयोग कसा करावा, याविषयी निश्चित दिशा मिळू शकेल.

**छायाचित्र – सुरेश यशवंत, जळगाव**

□


# निलगिरीची शेती

दुसरी आवृत्ती
प्रसिद्ध झाली

**किं. रुपये पंधरा**

लेखक
**विनायक पाटील**

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**

# काश्मीर - कुलू - मनाली : एक नमुनेदार कार्यक्रम

राजा, राणी, महाराजा, राजकुमार ट्रॅव्हल्स या ख्यातनाम पर्यटन कंपन्यांचे चालक श्री. राजा पाटील यांच्या मते सहली जास्तीत जास्त १० ते १२ दिवसांच्या असाव्यात. अन्यथा प्रवासी कंटाळतात आणि सहलीचा आनंद नाहीसा होतो. म्हणून त्यांनी इतक्या वर्षाच्या अनुभवावरून एक नमुनेदार सहल-कार्यक्रम तयार केला आहे, तो खाली प्रसिद्ध करीत आहोत.

## दर्जेदार काश्मीर सफरींचा कार्यक्रम

( श्रीनगर येथे ७ रात्रीचे सुखद् वास्तव्य )

**दिवस** — **सफर कार्यक्रम**

**सोम :** मुंबई सट्रल : सकाळी सुपरफास्ट गाडीने प्रयाण — नपेक्षा आदल्या दिवशी निघून फ्रंटियर मेलनेही जाता येईल.

**मंगळ :** जम्मूतावी : दुपारी आगमन व बसने प्रयाण. मार्गावर चहा भोजनादी व्यवस्था असते. रात्री श्रीनगरला आगमन.

**बुध :** सकाळी शिकाराभ्रमण : दाल लेक, चार चिनार, फ्लोटिंग गार्डन्स पहा. तसेच स्विमिंग वा लाँच राऊडची अवर्णनीय मजा लूटा व शकराचार्य हील पहा.
दुपारी : एम्पोरियम, ओरिएंटल कार्पेट फॅक्टरी व सेंट्रल मार्केट पहा व खरेदीही उरका.

**गुरु :** हजरतबल, सिंधनाला, खिरभवानी, मानसबल व वूलर लेक, बादीपूर गार्डन व तद्नतर आमच्या बहादूर जवानाची शौर्यगाथा गाणारे बारामुल्ला स्मारक पहा.

**शुक्र :** निसर्गसुदर हीलस्टेशन गुलमर्ग पहा व हवे तर जीप राऊड वा रोप वे किंवा घोड्यावरून खिलनमर्गपर्यंतही जाऊन या !

**शनि :** सकाळी अवंतीपूरमार्गे अच्छाबलला जाऊन शहाजहानची मुलगी जहाँआरा हिने बांधलेल्या रम्य उपवनात भोजन. तद्नतर पहेलगाम पाहून सायकाळी परतावे. (वा १–२ रात्री मुक्काम करून परतावे.)

**रवि :** सकाळी विश्राती वा यूसमर्गला भेट. दुपारी चष्माशाही व हरवान उपवने, तसेच निशात व शालिमार ह्या मोगल गार्डन्स पाहून रात्री सुदर असा ' ध्वनिप्रकाश कार्यक्रम ' पहा.

**सोम :** पूर्ण दिवस विश्रांती अथवा रस्ता खुला असल्यास अवर्णनीय असे सोनमर्ग दर्शन.

**मंगळ :** पहाटे ४ ला बसने निघून मार्गावर पीरपजाल पर्वत, जवाहर टनेल, झेलम व चिनाब नद्या, बनिहाल, बटोट व कूदसारखी हीलस्टेशन्स पाहून दुपारी जम्मूमार्गे मुबई सेंट्रलकडे प्रयाण.

**बुध :** रात्री दादर/मुबई सेंट्रल येथे आगमन. गट नसल्यास व्यक्तिगत प्रवासी एक दिवस उशीरा मुबईस परततील, कारण त्याना ४ वाजता बस मिळत नसते.

## मसूरी - सिमला - चैल - कुलू - मनाली सफर कार्यक्रम

(मसूरी : ३ रात्री, सिमला . ३ रात्री व मनाली : ३ रात्री वास्तव्य)

**दिवस** — **सफर कार्यक्रम**

**शनि :** मुंबई : सकाळी/दुपारी शुक्रवारी रात्रीच्या गाडीने न्यू दिल्लीकडे प्रयाण.

**रवि :** न्यू दिल्ली सकाळी आगमन हवाई प्रवासीही मुबईहून सकाळच्या विमानाने निघून दिल्लीच्या एअरपोर्टवरून न्यू दिल्लीस येतील व नतर मसूरीकडे प्रयाण. मार्गावर भोजन व सायकाळी मसूरी येथील निसर्गरम्य परिसरातील हॉटेल्समध्ये आगमन व ३ रात्रीचे सुखद वास्तव्य.

**सोम :** मसूरी : (उची २००० मीटर्स) सकाळी ९ ला बसद्वारे १३ किलोमीटर्स जाऊन ४० मीटर्स उचीचा मनोहारी केम्प्टी फॉल्स पाहून व बाजारात फेरफटका मारून हॉटेलवर परतणे. दुपारी ३.३० ला शहराच्या मध्यभागी ४०० मीटर्स उचीवरील गनहील-वॉटर रिझर्वायरवर चित्तथरारक केबल कारने जाऊन डून हील्सचे विहंगम दृश्य पाहून परतणे.

**मंगळ :** मसूरी : विश्राती, खरेदी वा टॅक्सी, बसद्वारे ऐच्छिक असे हरद्वार, हृषिकेश, लक्ष्मणझुला दर्शन व गगा नदीत लाँचद्वारे जलविहार व हवा त्याना हरि की पावरी ' वर गगास्नान-पूजेचाही लाभ ! सायकाळी मसूरीस परतणे.

**बुध : मसूरी ते सिमला :** सकाळी डेहराडूनमार्गे बसद्वारे सिमल्याकडे प्रयाण. दुपारी बरोग टूरिस्ट कॉम्प्लेक्समध्ये भोजन ● सायकाळी सिमला येथे आगमन व अत्याधुनिक सोयी असलेल्या वा तत्सम हॉटेलमध्ये ३ रात्रीचे सुखद वास्तव्य. (सोमवारी मुंबईहून निघून दिल्ली/अंबाला/कल्कामार्गे जाऊन वा काश्मीरहून जम्मूमार्गे मंगळवारी निघून अंबाला/कल्का येथे उतरून फक्त सिमला-चैल-कुलू-मनाली पाहणारे प्रवासी बुधवारीच दुपारी सिमला येथे पोहोचतील व ह्या संयुक्त सफरीत सहभागी होऊ शकतील.)

**गुरु : सिमला-चैल-कुफरी :** (उंची २२१३ मीटर्स) सकाळी ८.३० ला एअरकंडिशन्ड बसने निघून २६३३ मीटर्स उंचीवरील 'विन्टर स्पोर्टस्‌ची राजधानी' कुफरीला भेट! जेथे दरवर्षी जाने/फेब्रुवारीत हजारो प्रवासी स्किअींग/स्केटींग खेळण्यासाठी येऊन अवर्णनीय मजा लूटत असतात. तेथील वनशोभा पाहून ब्रिटीश सरसेनापती, लॉर्ड किचनर ह्याने स्थापलेल्या 'वाईल्ड फ्लॉवर हॉल' ह्या पाईन वृक्षराजीतील रमणीय स्थळाला भेट. जेथून आपण कदाचित बर्फाच्छादीत हिमालयन पर्वतराजीची नेत्रदीपक शोभाही पाहू शकाल.

तद्नंतर थोड्याच अंतरावरील १६२२ मीटर्स उंचीवरील इंदिरा हॉलीडे होम (चिनी बंगलो) ह्या ऐतिहासिक व निसर्गरमणीय अशा स्थळाला भेट द्या को जेथे १९७२ साली माननीय पंतप्रधान इंदिराजी व पाकिस्तानचे पंतप्रधान भुत्तो ह्यांच्यात सिमला करार संपन्न झाला होता.

दुपारी बूफे भोजनासाठी २१५० मीटर्स उंचीवरील 'चैल पॅलेस हॉटेल'वर आगमन! चैल म्हणजे पतियाळाच्या महाराजांची स्वाभिमानी राजधानी. जेथे स्वातंत्र्यपूर्व काळात इतिहास घडला व महाराजा भूपेंद्र सिंग ह्यांच्या स्वाभिमानी बाण्यामुळे व महत्त्वाकांक्षेमुळेच 'चैल' हे प्रतिसिमला बनले आणि आज हजारो **पर्यटकांना चैलशिवाय सिमला दर्शन अपुरे वाट लागले आहे.**

भोजनानंतर चैल येथील क्रिकेट ग्राउंडला भेट. जे जगातील सर्वात उंचीवरील व रमणीय परिसरातील ग्राउंड आहे. नंतर कंडाघाटमार्गे सिमला येथे परतणे.

## विमानाने काश्मीरला जाणारे प्रवासी :

**मुंबईहून मंगळवारी सकाळी निघून व पुढील मंगळवारी रात्री मुंबईस पोहोचतील. मार्गावर त्यांचा दिल्ली येथे विमान बदलीसाठी अल्पकाळ मुक्काम असेल. श्रीनगर एअरपोर्टपासून हॉटेलपर्यंत जाण्यायेण्याचे टॅक्सीभाडे दरवेळी रु. ६० ते ७० असते.**

**शुक्र : सिमला :** सकाळी ८.३० ला एअरकंडिशन्ड बसने निघून २१४९ मीटर्स उंचीवरील 'मशोबरा' ह्या ओक व पाईन वृक्षांच्या घनदाट जंगलातून प्रवास. नंतर 'सतलज' नदीच्या काठावरील अति रम्य परिसरातील **'तट्टापानी'** ह्या उष्णोदक कुंडाना भेट व तेथेच झकास असे वनभोजन! दुपारी परतताना लॉर्ड कर्झनने उभारलेल्या **'नलडेरा'** येथील ९ होल गोल्फ कोर्सला भेट व चहापान! दुपारी ३ ते ६ सिमल्याच्या 'माल' व 'रोज' रोडवर फेरफटका, शॉपिंग वा विश्रांती. सायकाळी हॉटेलवर परतणे.

**शनि : सिमला ते मनाली :** प्रातःकाळी बसने मनालीकडे प्रयाण. मार्गावर 'सतलज'ने ८ मैलांच्या टनेलद्वारे 'बिआस'ला कुशीत घेतले त्यापुढचा परिसर पहा. दुपारी मार्गावर भोजन ● व कुलूला चहापान उरकून सायकाळी मनालीच्या रम्य परिसरात आगमन व आनंदाने नाचाल अशा हील टॉपवरच्या अत्याधुनिक 'लॉग हट्स' वा छोट्या पण टुमदार हॉटेल्समध्ये ३ रात्रीचे सुखद वास्तव्य घ्या.

**रवि : मनाली :** (उंची १८२९ मीटर्स) सकाळी बसने 'कुलू'कडे प्रयाण. (उंची १२०० मीटर्स) शॉपिंग उरकून मंदिर, ट्राऊट कल्चर फार्म वगैरे पाहून दुपारी अत्याधुनिक व 'निसर्गाच्या कोंदणातील हिरा' अशा सुंदर **'क्लब हाऊस'वर लंच** घ्या

**सोम : मनाली :** सकाळी बसने मनाली ह्या **'क्वीन ऑफ हिल स्टेशन्स'** मध्ये फेरी मारून गंधकमिश्रित गरम पाण्याचे **'वसिष्ठ कुंड'** पाहणे. (उंची १९८२ मीटर्स) नंतर शक्य झाल्यास रोहटांग पास चढाईच्या अगोदर **'रोहल्ला वॉटर फॉल्स'** दर्शन (उंची २५०१ मीटर्स) तद्नंतर लाहूल-स्पिति मार्गावरील जगातील सर्वात उंच बस रस्त्यावरील **रोहटांग** पासला भेट (उंची ४०८० मीटर्स) जेथून आपणास बर्फाच्छादीत शिखरावर खेळता वा ती पाहता येतील. त्याचप्रमाणे शोभिवंत पर्वतराजी व त्यातून वाहणाऱ्या वाऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरी आपणाला निश्चितच मोहवून टाकतील. ह्या खिंडीतूनच बिआस उर्फ व्यास नदीचा उगम होतो व पुढे ती सतलज व सिंधू नदीला पाकिस्तानात मिळते.

**मंगळ : मनाली :** प्रातःकाळी बसने निघून सायकाळी अंबाला कँट वा न्यू दिल्ली स्टेशनवरच्या प्रयाणस्थळीच आगमन व शक्यतो १७२ डाऊन जम्मूतावी सुपरफास्टने अथवा उपलब्धतेनुसार अन्य गाडीने मुंबईकडे प्रयाण. (रात्री मुक्काम करावा लागल्यास हॉटेल वास्तव्य अंबाल्याला कठीण म्हणून दिल्लीला परतणे बरे)

**बुध : मुंबई :** येथे रात्री ११ चे दरम्यान सुपरफास्टने अथवा अन्य गाडीने गुरुवारी सकाळी/दुपारी/रात्री आगमन.

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ

# यंत्रसामग्री साहाय्य योजना

— वैशिष्टये —

- नवीन यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी रुपये ६० लाखांपर्यंत अर्थसाहाय्य आकर्षक अटींवर त्वरित उपलब्ध.
- या योजनेखाली खरेदी करावयाची यंत्रसामग्री आधुनिकीकरण, विस्तार कार्यक्रम, उत्पादन-विविधता, ऊर्जा बचत, प्रदूषण—नियत्रण इत्यादींसाठी असावी.
- अशा कर्जांसाठी नियोजित यंत्रसामग्रीचे तारण हीच प्रतिभूती.
- चार वर्षे अस्तित्वात असून उत्तम कामगिरीची पार्श्वभूमी असलेला लघु किंवा मध्यम उद्योग घटक या योजनेखाली अर्थसाहाय्य मिळण्यास पात्र आहे.

(भरणा झालेले भांडवल + मुक्त राखीव निधी यांची रक्कम रुपये तीन कोटींहून अधिक असू नये.)

**अधिक माहितीसाठी संपर्क साधा :**

**मुख्य कार्यालय** : न्यू एक्सेलसिअर बिल्डिंग, अ. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी : २०४७७११–१२. २०४७७८६–८७

**विभागीय कार्यालये** : मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, कोल्हापूर, गोवा

# नवी मुंबई

## बंदरापलिकडील नवे योजनाबद्ध शहर



**नव्या शहराची खास वैशिष्ट्ये**

- आशिया खंडातील सर्वात मोठा नवे शहर प्रकल्प
- एकूण क्षेत्र ३४४ चौ. किलोमीटर्स
- अंदाजे लोकसंख्या २० लाख
- सुरेखित व्यापारी केंद्र
- लोखंड, पोलाद आणि कृषि उत्पन्ना साठी सुनियोजित घाऊक बाजारपेठा
- न्हावा येथे खोल पाण्याचे बंदर-बंदराशी निगडीत असलेल्या उद्योगांसाठी तरतूद
- विस्तृत मध्यवर्ती व्यवहार केंद्र (सी.बी.डी.)
- कौशल्यपूर्णतेने नियोजित केलेली २० नगरे
- निवासस्थानांच्या नजिकच्या क्षेत्रात शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, करमणुकीची साधने इत्यादीची उपलब्धता
- भरपूर मोकळ्या जागा
- सुरेखित रस्त्यांचे जाळे
- पादचारी आणि वाहनांसाठी वेगवेगळे मार्ग
- सर्व उत्पन्नगटांतील लोकांना परवडतील अशी भाडेखरेदी तत्वावरची घरे
- शहरात आणि आजुबाजुच्या दुसऱ्या शहरांशी संपर्क सांधणारी स्वतंत्र बससेवा

**सिडको**

सिटी अँड इंडस्ट्रीअल डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र

निर्मल. २रा मजला, नरीमन पॉइंट. मुंबई ४०० ०२१ टेलिफोन २३२४२०

## एखादा सिद्धार्थ किंवा येशू तुमच्या-माझ्या आयुष्यात आला तर....?




लेखक :
रिचर्ड बाक्

अनुवाद :
सौ. अंजनी नरवणे

रिचर्ड बाक् ह्यांचं ‘ जोनॅथन लिव्हिंग्स्टन सीगल्, हे पुस्तक अतिशय गाजलं. माणसानं आपलं आयुष्य कसं जगावं, ह्याबद्दलच्या स्वच्छ, स्पष्ट कल्पना त्या पुस्तकात सोप्या शब्दांत मांडल्या होत्या. ‘ तुम्हाला स्वत:ला खरोखर काय करावंसं वाटतं ते शोधून काढा आणि ते– फक्त तेच– करा. तुमचं आयुष्य असं करण्यानं खूप कठीण निश्चितच होईल; पण तितक्याच निश्चितपणानं सुखाचंही होईल.’ ‘ जोनॅथन 'मध्ये रिचर्ड बाक्नं हा विचार मांडला होता. त्यानंतरचं त्याचं पुस्तक ‘ इल्यूजन्स् ’ ह्या कथेमागची कल्पना अशी की, ‘ समजा, आपल्याला एखादी अशी व्यक्ती भेटली. जिला हे जग कसं चालतं हे ठाऊक आहे आणि त्यावर तिचं नियंत्रणही आहे, तर ? जगातील माया, आभास ह्यांच्यामागचं सत्य माहीत असलेला एखादा सिद्धार्थ किंवा येशू तुमच्या माझ्या आयुष्यात प्रत्यक्ष आला, तर ?’ ह्या भन्नाट कल्पनेतल्या मोठ्ठ्या ‘ तर ?’ मधून ‘ इल्यूजन्स् ’ ह्या कथेचा उगम आहे. लेखकाला असा एक साक्षात्कारी पुरुष भेटतो ज्यानं आपला द्रष्टेपणा नि त्यामुळं मिळालेलं ‘ देव 'पण सोडून देऊन पुन्हा चारचौघांसारखं साधं आयुष्य जगायचा प्रयत्न करायचं ठरवलं आहे !

पुस्तकाच्या कथेकडे आणि सवादांकडे बघण्याचे अनेक दृष्टिकोण असू शकतील. कोणाला ती दैवी चमत्कारांची मनोरंजक कथा वाटेल, कोणाला आभासांमागे दडलेल सत्य ह्यात गवसेल, तर आपण जसे जगतो आणि आपल्याला जस जगावंसं वाटतं, त्याची एक हसत खेळत केलेली मीमांसा कोणाला सापडेल; पण प्रत्येक वाचकाच्या विचारशक्तीला आव्हान देणारी नि कदाचित काहींची जीवनशैली बदलणारी ही कथा नक्कीच आहे. रिचर्ड बाक् पुस्तकाच्या प्रस्तावनेत शेवटी म्हणतात– 'असा एखादा साक्षात्कारी पुरुष मला खरोखरीच कधी भेटला, तर तो ह्या कथेतल्यासारखा मेकॅनिक–पायलट नसेलही आणि तो ह्यात लिहिलेलं काहीच कदाचित सांगणारही नाही; पण हा म्हणतो की, आपल्या अतर्मनातले सुप्त विचार आपणच आपल्या जीवनात कळत न कळत प्रतिबिंबित करतो, ते जर खरं असेल, तर मी हे पुस्तक लिहिलं आणि तुम्ही ते आता वाचताय्, हाही योगायोग नव्हे ? हे सारं पूर्वनियोजितच असेल ? मला तरी अस वाटतं ! आणि असंही वाटत, की माझ्या कल्पनेनं उभी केलेली ती साक्षात्कारी व्यक्ती खरीच कुठेतरी आहे, नि आपल्या नकळत आपल्या दोघांकडे बघून हसते आहे, तिला गंमत वाटते आहे की आपण दोघानी केव्हातरी नियोजित केल होत, तसंच आपण आता करत आहोत !'

## १

कथेच्या सुरुवातीला हा साक्षात्कारी पुरुष त्याला लोकानी बहाल केलेलं 'महात्मापण' सोडून पळून का जातो, त्याची पार्श्वभूमी सागितली आहे मुख्य कथेचा उगम ह्या छोट्या कथेतून होतो. कथा थोडक्यात अशी आहे.

इडियाना प्रातातील गूढरम्य डोगरी प्रदेशात ह्या साक्षात्कारी पुरुषान जन्म घेतला. तिथल्या शाळेत जुजबी शिक्षण घेतल्यावर तो मोटरमेकॅनिकच काम शिकला. अर्थात पूर्वायुष्यात प्राप्त केलेल सर्व ज्ञान अवगत असल्यामुळ, नव्यान घेतलेल्या शिक्षणान मिळालेल्या ज्ञानापेक्षा कितीतरी जास्त विद्वत्ता, समज नि शहाणपण त्याच्यामध्ये आधीच होत लोकाच्या ते लक्षात आलं आणि ते त्याच्याकडे सल्ला, उपदेश मागू लागले. स्वतःच्या सामर्थ्याची कल्पना असलेला तो महापुरुष लोकाची अनेक सकटं नि दुःख निवारण करू लागला

प्रत्येक मनुष्य हा परमेश्वराचंच सतान असतो, असा त्याचा दृढ विश्वास होता. त्याला भेटायला येणाऱ्या लोकाची तो जिथ जिथ काम करायचा त्या त्या गॅरेजमध्ये, दुकानामध्ये, खूप गर्दी व्हायला लागली, तेव्हा शेवटी तिथल्या मालकानी त्याला तिथून जायला सागितलं, कारण इतराना काम करायलाही अडचण होऊ लागली ! त्यानतर मग तो गावोगावी हिंडू लागला. लोक त्याच्या भजनी लागले त्याला महापुरुष समजू लागले. कधीकधी चमत्कारही घडत. तो बोलत असताना जोराचं वादळ होई, पाऊस पडे, पण ऐकणाऱ्याच्या अगावर एक थेबही पडत नसे. प्रचड जमावातल्या अगदी शेवटच्या माणसानाही त्याचं बोलण समोरच्या माणसाइतकच स्पष्ट ऐकू येई– अगदी विजा कडकडत असल्या तरी सुद्धा ! आणि तो नेहमी तात्पर्य असलेल्या गोष्टी सागे.

एकदा तो त्याना म्हणाला, 'आपण निरोगी रहायच की, आजारी, श्रीमत व्हायच की गरीब, स्वतंत्र व्हायचं की, गुलाम रहायच हे सगळ दुसऱ्या कोणाच्या नाही, आपल्याच हातात असत.' तेव्हा एक गिरणी कामगार त्याला म्हणाला, 'अहो, हे तुम्हाला बोलायला सोपं आहे, तुम्ही द्रष्टे पुरुष आहात, आमच्यासारखें मोलेमजुरी करणारे नाही ! मनुष्याला मेहेनत न करता, कोणाची ताबेदारी न करता, जगणच अशक्य आहे !' तेव्हा त्यान त्या लोकाना एक कथा सागितली, तो म्हणाला, 'एका स्फटिकासारख्या स्वच्छ नदीच्या तळाशी काही एका तऱ्हेच्या प्राण्यांची छोटीशी वस्ती होती त्या वस्तीतले तरुण नि वृद्ध, गरीब नि श्रीमत, सज्जन नि दुर्जन, सगळ्याच्या वरून तो स्फटिकाचा प्रवाह आपल्यातच मग्न, मस्त, असा वहात असे वस्तीतला प्रत्येक प्राणी, नदीतळाशी असलेल्या काटक्याकुटक्या, दगडधोंडे कशाला ना कशाला तरी चिकटून राही प्रवाहाबरोबर न वहाता, कशाच्या तरी आधारान जगत राही. कारण ते नेहेमी तसेच जगत आले होते, नि तोच त्याचा जीवनधर्म बनून गेला होता.

पण एक दिवस, त्याच्यातला एकजण म्हणाला, 'मला हे अस कशाच्या तरी आधाराने जिण जगायचा आता वीट आलाय इथून मला काहीच दिसत नाही हे खर, पण माझी खात्री आहे की ह्या प्रवाहाला ठाऊक आहे तो कुठ जातोय ते. मी आता कशालाही न धरता मोकळा होणार आहे आणि हा प्रवाह नेईल तिकडे जाणार आहे, हे अस जिण जगत राहिलो, तर मी निव्वळ कटाळ्यानच मरून जाईन !' बाकी सारेजण त्याला हसले आणि म्हणाले 'मूर्ख आहेस! हात सोडून तर बघ ! तुला ज्या प्रवाहाच एवढ कौतुक वाटतय ना, तो तुला उचलून कुठल्यातरी खडकावर फेकून देईल, नि कटाळून मरशील ना, त्याच्यापेक्षा कितीतरी आधी तू मरून जाशील !'

पण त्यान ह्या बोलण्याकडे लक्ष दिल नाही, हात सोडून दिले, नि क्षणार्धात तो वर उचलला गेला आणि दूर खडकावर फेकला गेला ! पण त्यानं पुन्हा आधार शोधायचाच नाही असा निश्चय केला होता, त्यामुळ पुन्हा एकदा तो तळापासून वर उचलला गेला, नि ह्यावेळी फेकला गेला नाही ! बस ! त्याक्षणी, तळाशी रहाणाऱ्या त्या प्राण्याच्या दृष्टीने तो एक वेगळाच प्राणी झाला ! ते ओरडू लागले, 'काय हो चमत्कार ! आपल्यासारखाच दिसणारा हा प्राणी चक्क प्रवाहाच्या वर तरगतो आहे ! हा महापुरुष आहे. आपला सर्वांचा उद्धार करायला हा आला आहे !' आणि तो 'वेगळा' प्राणी म्हणाला 'अरे ! मी तुमच्यापेक्षा महान किंवा वेगळा नाही. आपल्यात धाडस असेल, हिम्मत असेल, तर हा प्रवाह आपल्याला आनदान वर उचलून धरतो प्रवाहाबरोबर, स्वतंत्रपणे प्रवास करणं हेच आपलं साध्य

असल पाहिजे...' पण ते प्राणी ओरडत राहिले ' महापुरुष ! महा-पुरुष !' आणि स्वतः मात्र खडकाना, काटधाकुटयाना चिकटून राहिले ! जराशान त्यानी बघितल, तेव्हा तो दिसेनासा झाला होता ते मग त्याच्या कथा एकमेकाना सागत राहिले...'

... आणि मग असच एक दिवस त्याच्या लक्षात आल की, सर्व माणस त्याच्या जास्तजास्तच भजनी लागू लागली होती. त्याची अपेक्षा होती की, त्यान सतत त्याची दुःख दूर करत रहाव, चमत्कार दाखवत रहाव, त्याची आयुष्यच जणू काय ह्यान त्याच्या वाटची जगत रहाव ! तो हताश झाला, हतबुद्ध झाला, मग दूर एका डोगरमाथ्यावर जाऊन त्यान प्रार्थना केली. तो म्हणाला, 'हे अनादि अनत तेजोमय शक्ति ! माझ्यावर तू सोपवलेल हे अशक्य कोटीतल काम मला आता करायच नाही. अरे, त्या सर्वांची आता अशी अपेक्षा आहे की, त्यांची आयुष्यही मीच चालवावीत ! चूक कदाचित माझीच असेल, मला क्षमा कर, मला ह्यातून मोकळ कर, नि सर्वसाधारण आयुष्य जगू दे.' धीरगंभीर, पण प्रेमळ आवाजात उत्तर आल, 'प्रश्न माझ्या इच्छेचा नाही, तुझ्या इच्छेचा आहे. तुझ्या अतर्मनातून तुला जे वाटेल, तेच तू कर. तुझी इच्छा असेल, तर जा आणि चारचौघासारख जीवन जग.'

आनंदान स्वतःशीच गुणगुणत तो डोगर उतरला मात्र, पुन्हा सर्वजण त्याच्या मागे धावले ! उपदेश मागू लागले. आमची सकट, दुःख दूर कर म्हणू लागले, चमत्कार दाखव म्हणून विनवू लागले ! सर्वांकडे एकवार स्मितवदनान बघून तो म्हणाला, 'मी हे सार करायच सोडून निघून जात आहे !' जमाव आश्चर्यान स्तब्ध झाला. मग तोच पुढे म्हणाला, 'एखाद्याची एकमेव इच्छा ह्या दुःखी जगाला आपल्याकडून होईल तेवढी मदत करायची असली आणि त्यान तस देवाला सागितल, तर देव सागेल तस मग त्यान केल पाहिजे का ?' 'हो तर !' सर्वजण म्हणाले, 'परमेश्वरी इच्छा असेल, तर त्यान लोकासाठी यातना सहन केल्या पाहिजेत !' 'कितीही भयानक यातना झाल्या, कितीही दुर्घट काम असल, तरी ?' 'हो ना ! दैवी इच्छाच ती असेल, तर—फाशी जाव लागल, क्रूसावर चढाव लागल, जाळून घ्याव लागल, तरी बेहेत्तर' 'आणि समजा, देव अस म्हणाला की, 'तुझा तू आपला विचार कर आणि आजन्म ह्या जगात सुखान रहा, तर ?' कोणीही काहीही बोलल नाही सर्वत्र सपूर्ण शातता पसरली त्या शाततेलाच मग तो म्हणाला, 'हा जन्म जे ज्ञान मिळवण्यासाठी आपण घेतला, ते ज्ञान सुखाच्या वाटेवरच आहे आज माझ्या हे लक्षात आलय, आणि म्हणून मी आज आपल्या मार्गान जाणार आहे, तुम्हाला रुचेल त्या मार्गान जायला तुम्ही मोकळे आहात !'

आणि तेथून निघून तो पुन्हा रोजिद्या सामान्य जीवनात मिसळून गेला

# २

येथून पुढे मुख्य कथेला सुरुवात होते. कथानायक रिचर्ड बाक् स्वतःच, एक लहान विमान घेऊन गावोगावी हिंडायचं आणि मजा म्हणून लोकाना विमानातून हिंडवून आणून त्यावर पैसे मिळवायचे अस त्याच आयुष्य साचेबद शहरी आयुष्य त्याला आवडत नाही. त्याला कौटुबिक बधनही नसतात आणि डोक्यात काही विलक्षण कल्पना असतात. तो काहीतरी शोधत असतो, पण काय, ते त्याच त्यालाही धड ठाऊक नसत. चार वर्षं अशी विमान घेऊन गावोगाव भटकण्यात गेल्यावर एका सध्याकाळी असच एका शेतात विमान उतरवून विश्राती घ्यावी म्हणून तो विमान खाली आणत असतो, तो तिथेच, त्याच शेतात दुसर एक स्वच्छ, चकचकीत, छोट विमान आधीच उतरलेल असत आणि विमानाचा पायलट, विमानाच्या चाकाला टेकून शातपणे रिचर्डकडे पहात गवतात पाय पसरून बस-लेला असतो ! आज इतक्या वर्षांत रिचर्डला त्याच्यासारख हे काम करणारा दुसरा कोणीच भेटलेला नसतो !

इतक्या जवळ दुसर विमान उतरत असतानाही स्वस्थ, शात बसणारा तो माणूस, का कोण जाणे, रिचर्डला आवडतो. मजा म्हणून, विमानातन उतरायच्या आधीच तो त्या माणसाला म्हणतो, 'एकाकी दिसलात तुम्ही—' 'तुम्हीसुद्धा !' 'तुम्हाला त्रास द्यायची इच्छा नाही माझी—तुम्हाला एकटच रहायच असेल, तर मी दुसरी-कडे जातो.' 'छे छे ! मी तर वाटच बघत होतो तुमची !' रिचर्डला मजा वाटते नि तो उत्तर देतो, 'अस ? मग मला उशीर झाला असला तर त्याबद्दल माफी मागतो !' 'छे हो ! त्यात काय मोठस !'

रिचर्ड विमानातन उतरतो नि तो माणूस ओळखपाळख, शेकहँड वगैरेच्या भानगडीत न पडता सरळ म्हणतो, 'जेवायला हॅम आणि चीज आहे माझ्यापाशी, चालेल ना ? एखादी मुगी गेली असेल आत कदाचित !'

मग जेवता जेवता रिचर्ड त्याला विचारतो, 'तुम्ही कोण ? कुठले ? आज इतक्या वर्षात मी पाहिल कम नाही तुम्हाला ?' 'मी असाच आपला मेकॅनिक, वेल्डर वगैरे आहे डिझेल ट्रॅक्टर्स वगैरे दुरुस्त करायचा. पण एका जागी जास्त दिवस राहिलो की अडचणी निर्माण व्हायच्या. म्हणून मग हे विमान बनवल नि हा उद्योग सुरू केला. 'डिझेल ट्रॅक्टर्स', डी—९ का ? केवढाल्ले असतात ना ते ? मलाही खूप आवडायचे डोगर हलवू शकतील अशी ताकद असते त्याची.' पुसटस स्मित त्याच्या तोंडावर उमटत नि तो म्हणतो 'डोगर हलवायचे त्याहून सोपे मार्ग आहेत की !' त्या उजेडात त्याच्याकडे बघता बघता रिचर्डच्या एक गोष्ट लक्षात येते की, त्याच्याकडे निरखून बघता येत नव्हत. त्याच्या डोक्याभोवती जणू एखाद धूसर, पुसटस वलय होत रिचर्ड बघतोय हे लक्षात येऊन तो विचारतो, 'काय बघताय ? काय झाल !' 'काही नाही. पण—अड-चणी निर्माण व्हायच्या म्हणालात, कसल्या अडचणी ?' 'काही विशेष नाही हो, मलाही तुमच्यासारख भटकत रहायला आवडायला लागलय, एवढच !'

त्याच्या विमानाकडे बघता बघता रिचर्डच्या लक्षात येत की १९२८–२९ साली बनवल गेल असाव, अस ते विमान करकरीत कोर होत—कुठे चरा नाही, पॉलिश कमी झालेल नाही, कुठे तेलाचा डाग नाही. आत कुठे गवताची काडीसुद्धा पडलेली नाही—जणू पन्नास वर्षांपूर्वीच हे विमान त्या काळातून येट आत्ता, कुठून तरी अलगद,

इथे येऊन उभं राहिल होतं! रिचर्डच्या अंगातून एक शिरशिरी गेली. तो विचारतो, 'किती दिवस उडवताय हे विमान तुम्ही?'

'अ? चार–पाच आठवडे झाले' रिचर्डनं पुन्हा एकदा ते विमान निरखून पाहिल, मग तो जाऊन त्या माणसासमोर धीटपणान बसला नि म्हणाला, 'तुम्ही मला खरं का सांगत नाही?' खरच सांगतोय रिचर्ड' विमानावर लिहिलेल होतं म्हणून आपल नाव ह्याला कळलं असणार, रिचर्डला वाटलं त्यानही दुसऱ्या विमानावरच नाव बघून घेतल होत–डोनाल्ड शिमोडा. परत तो विचारतो, 'मग हे विमान इतक कोरं करकरीत कस, मला कळत नाही!' 'रिचर्ड, तुला ठाऊक नाहीत अशा काही गोष्टी आहेत!' 'अ? ह, असेल, पण डोनाल्ड, एक दिवस असा नक्की येईल की, त्या दिवशी सगळ्या गोष्टी मला ठाऊक झालेल्या असतील–त्या दिवशी मला उडायला विमानाची जरूर लागणार नाही! मग तुला देऊन टाकीन माझ विमान!' 'असं? ते कसं काय बुवा?' रिचर्डची आवडती कल्पना ऐकणारे कोणीतरी भेटल ह्याचा त्याला आनद झाला. तो सांगू लागला, 'अस बघ कित्येक हजारो वर्षं लोकाना विमान बनवून त्यातून उडता येईल ही कल्पनाच नव्हती, त्यामुळे एरोडायनामिक्स ह्या विषयाचा त्यानी अभ्यासच केला नाही, पण ते शास्त्र माणसाला माहीत नव्हत तरी अस्तित्वात होतच की नाही? तसच माझ्या मते अस काही ज्ञान असणार की, जे मिळवल्यावर, माणसाला उडायला विमानाचीही गरज लागणार नाही, भिंतीच्या आरपारही जाता येईल, अरे दुसऱ्या ग्रहावरसुद्धा पोचता येईल! माणसाच्या मनात असेल ना, तर तो हेही करू शकेल!'

तो किंचित हसला, गभीर झाला, नि त्यानं विचारलन्, 'आणि हे करतोयस ते काम करता करता हे ज्ञान तुला मिळेलस वाटत तुला?' 'मी आतापर्यंत जे काही शिकलो ना ते आपल आपल. मला जे शिकायचय ते शिकवणार कोणी ह्या जगात असल, तर आत्ता जाईन मी त्याच्याकडे, पण आहेच कुठे कोण?' रिचर्डकडे टक लावून बघत डोनाल्डनं विचारल, 'शिकायची खरोखरी इच्छा असेल. तर मार्ग दाखवणारा सापडतो, अस नाही वाटत तुला?' 'मार्ग दाखवणारी कोणी अदृश्य शक्ती आहे अस मला नेहमी वाटत आलय. ती शक्ती तर मार्ग दाखवतेच, नाही का?' 'मग कदाचित् ती शक्तीच तुला हवंय ते शिकवणाराही मिळवून देईल?' 'हो किंवा मीच माझा शिक्षक असेन, असही शक्य आहे' 'हो तसही शक्य आहे खरं!'

त्या छोट्याशा गावातल कोणी ना कोणी विमानात बसून तीन मिनिटं फिरून यायसाठी यायला लागत; आणि रिचर्ड आणि डोनाल्ड आळीपाळीन त्याना फिरवून आणतात डोनाल्ड विमान इतक्या सफाईन आणि कौशल्यान उडवतो की रिचर्ड दरवेळी चकित होतो. एकदा उंचावर जाण्याची खूप भीती असलेली एक छोटी मुलगी आपल्या आजोबाबरोबर नुसत बघायला म्हणून येते. डोनाल्ड तिचं मन कस वळवतो कोणास ठाऊक, पण ती त्याच्याबरोबर विमानात जाऊन येते, नि परत आल्यावर आपल्या आजोबाना आनद विभोर होऊन सांगते. 'आजोबा, मला मुळीच भीती नाही वाटली! मी आपल्या घरावरून उडताना आईला हात पण केला. डॉनकाका म्हणतात की, मी उंचावरून पडून एकदा मेले होते ना, म्हणून मी घाबरायची, आता तसं काही नाही होणार! आजोबा, मी मोठी झाल्यावर पायलट होणार आहे!' डोनाल्ड शिमोडा हसून खांदे उडवतो. आजोबा नि नात खूष होऊन घरी जातात. त्या दिवशी त्याना दोघानाही इतकं काम मिळत, की रिचर्ड ती छोटी मुलगी मरण्याबद्दल काय म्हणत होती, ते विचारायच विसरूनच जातो. जवळ असलेलं काहीबाही खाऊन ते झोपी जातात.

## ३

खूप प्रचड जमाव माणसाचा नि त्याच्या मधोमध एक माणूस. सगळे त्याच्या जवळ जवळ जाऊ बघतायत्. बघता बघता त्या जमावाचा समुद्र होतो, नि त्यात तो माणूस बुडणार की काय अस वाटत, तेवढ्यात तो अलगदपणे त्या समुद्रावरून शीळ घालत चालता चालता दिसेनासा होतो, नि समुद्राच्या जागी गवताचाच समुद्र होतो एक छोटस सुदर विमान त्या गवतावर येऊन थाबत नि पायलट बाहेर निघतो. रिचर्डला हे स्वप्न पडत असतानाच तो जागा होतो, तेव्हा रात्रीचे तीन वाजलेले असतात, चादण पडलेल असत आणि डोनाल्ड त्याच्या वळकटीवर बसून राहिलेला असतो! रिचर्ड डोळे उघडतो तेव्हा शातपणे विचारतो 'आता आल का तुझ्या लक्षात रिचर्ड?' 'काय लक्षात आल का?' अर्धवट झोपेत असलेल्या रिचर्डला डोनाल्ड जागाच बसून राहिलाय, ह्याचंही आश्चर्य वाटत नाही. 'तुझं ते स्वप्न' डोनाल्ड शातपणे म्हणतो, 'ती गर्दी, तो एकटा माणूस, मग ते विमान... मी कोण आहे ह्याच कुतूहल होत ना तुला? काही दिवसापूर्वी वर्तमानपत्रात डोनाल्ड शिमोडाबद्दल ठळक बातम्या आल्या होत्या. आठवतय तुला? लोक त्याला अवतारी पुरुष, मेकॅनिक महात्मा अस काय काय म्हणायचे. एक दिवस पचवीस हजार लोकासमोरून तो बघता बघता अदृश्य झाला ..' 'डोनाल्ड शिमोडा? हो, आठवतय...??' 'तोच मी. आता कळल ना तुला? झोप आता!' बऱ्याच वेळान रिचर्डला परत झोप लागते.

दुसऱ्या दिवशी विमानाची डागडुजी करता करता रिचर्ड डोनाल्डशी बोलत असतो. 'काय रे, तुझ्यासारख एकदा हे दीनदुबळ्याचा त्राता होण, अवतारी पुरुष म्हणवून घेण पत्करल, म्हणजे ते अस राजिनामा दिल्यासारख सोडून कस देता येईल?' 'का बर? माणसाला कुठलही काम करायची इच्छा राहिली नाही, तर त्यान ते लगेच सोडून द्याव. अगदी श्वासोच्छ्वास घेणसुद्धा! तसच, मी हे 'महात्मापण' सोडून द्यायच ठरवलं! काय बिघडल? मी माझ्या विक्षिप्तपणाच समर्थन करतोय ना? खरंय, पण इच्छा नसताना करत रहाण्यापेक्षा बरं, नाही का? खराखुरा महात्मा असेल ना, त्यानं तर कसलीही समर्थनं पण देऊ नयेत, स्वतःला पटेल त्या मार्गानं जाव. ते बाकी प्रत्येकाच्याच बाबतीत खर आहे. आपण सगळीच देवाची लेकरं आहोत, किंवा ईश्वरी अंश आहोत किंवा कोण्या महान शक्तीच्या कल्पनेचे खेळ आहोत... काहीही म्हणाव, अर्थ तोच!' 'पण एखाद्या अवतारी पुरुषानं परत आपलं साधं काही तरी काम करायला लागण विचित्र नाही वाटत? म्हणजे बघ ना, येशूख्रिस्त आपला लोहाराच काम करायला लागला असता, तर?' 'का बरं? काय बिघडल असत? खर म्हणजे लोक त्याला त्राता वगैरे म्हणायला लागले ना,

तेव्हाच त्यान ते काम सोडून द्यायला हव होत, म्हणजे नतरच सगळ टळल असत पण तसं न करता तो लोकाना म्हणाला, 'मी ईश्वरी अश आहे, कबूल, पण तुम्ही सगळीही तशीच आहात, मी जे करू शकतो, ते तुम्हीही करू शकाल !' खरच होत म्हणा त्याच म्हणण !' 'पण डॉन, हे महात्मापण सोडण आणि पुन्हा सामान्य आयुष्य जगणं जड नाही जात आहे तुला ?' 'तुझ म्हणण खरय. एका जागी दोन-तीन दिवस राहिलो, की लोकाच्या लक्षात माझ वेगळेपण यायला लागत, ते पुन्हा माझ्याभोवती गोळा होऊ लागतात. म्हणून मग हे विमानातन इथ तिथ भटकत रहाण बरं पडत' 'डॉन, तुला वाटत तितक हे सोप जाणार नाहीये तुला.' 'का बर ?' 'सारं जगच बघ ना भौतिकाचा ध्यास सोडून आध्यात्मिककाकडे वळतय, लोक तुला एकटा सोडणार नाहीत.' 'रिचर्ड, अरे दु ख तर तेच आहे त्याना मी नकोय, त्याना हवे आहेत चमत्कार, दैवी चमत्कार. चमत्कार दाखवण सोप आहे, ते मी दुसऱ्या कोणाला तरी शिकवून त्याला महात्मा बनवेन ! हे काम कटाळवाण आहे, हे मी त्याला सागणार नाही, म्हणजे झाल ! शिवाय अस आहे, की जिच्यापासून पळून जाता येणार नाही, इतकी, प्रचड समस्या कुठलीच नसते !'

'डॉन, तू काही म्हण, तुला पळून जाता येणार नाही अरे समज, मीच, आत्ता, इथे, तुझ्या भजनी लागलो तर ? माझ हे विमानाचं इजिन स्वत दुरुस्त करायच्या ऐवजी तू चमत्कार करून दुरुस्त कर, अस मी म्हटल तर ? बोल, आज तू मला हवेत तरगायला शिकवलस ना, तर मी माझी आजची सारी कमाई तुला देऊन टाकीन !' डोनाल्ड नुसता हसतो. मग जराशान अतराळात कुठेतरी बघत विषण्णपणे म्हणतो, 'मला लोकाना पटवून द्यायच होत, तुम्हाला स्वातंत्र्य हवय ना, सुख हवय ना ? अरे मग ते कुठे बाहेर नाही रे, तुमच्या आतच आहे. स्वत.ला पटवून द्या, की तुम्ही स्वतत्र आहात, सुखी आहात, नि तुम्ही तसे व्हाल. रिचर्ड, ह्यात अवघड काय आहे ? पण अरे, त्यानी ऐकूनही घेतल नाही. मोटारगाड्याच्या रेसेसना तिथले अपघात बघायला जाव, तसे ते माझ्याकडे चमत्कार बघायला येत होते! प्रथम प्रथम हताश झालो, अन् मग मात्र चक्क कटाळाच आला!'

विषय बदलावा म्हणून रिचर्ड विचारतो, 'आज कुठे जाणार आहोत आपण ?' 'कोण जाणे !' 'कोण जाणे म्हणजे ? तुला भूतकाळ ठाउक आहे नि भविष्यकाळ पण; आणि तुला आपण कोठे हे ठाऊक नाही ?' 'हू ऽऽ ! म्हणूनच मी त्याचा विचार करायचा टाळतो'

रिचर्डला वाटत, डोनाल्ड कायम आपल्याबरोबर राहिला तर किती बर-काही अडचणीच येणार नाहीत ! पण डोनाल्डच हे शेवटचं वाक्य ऐकल्यावर जगातल्या इतर अवतारी पुरुषाची काय गत झाली त्याची त्याला आठवण होते अन् डोनाल्डपासून दूर पळून जावस त्याला एकदम वाटत पण अखेर तो जात नाही, नि ती दोघ तिथून बरोबरच निघतात.

## ४

पुढे एकदा रिचर्ड डॉनला विचारतो, 'डॉन, तू हे एवढ अफाट ज्ञान नि शहाणपण कुठून मिळवलस ? कुठे शिकलास हे सगळ ?' 'देतात ना एक पुस्तक.' 'पुस्तक ?' 'हं ! महात्म्यासाठी उपयुक्त स्मरणवही ! बघायचय का तुला ? असेल इथच कुठेतरी !' 'म्हणजे चक्क छापलेल पुस्तक ?' डोनाल्ड त्याच्या पायलटच्या सीटच्या मागच्या जागेतनं एक छोट पुस्तक काढतो, रिचर्डला देतो नि तो स्वत: दुसऱ्या काहीतरी कामात गुतती. रिचर्ड पुस्तक चाळून बघतो. त्यात छोटी छोटी अवतरणं नि पॅरॅग्राफ होते. रिचर्ड एक वाचतो-

**'ह्या जगाच्या खऱ्या स्वरूपाला तुम्ही जाणत असाल, तर त्याचं भान राहू द्या, नाहीतर तुम्ही ते विसरून जाल. हे पान तुम्ही उघडून वाचता आहात ह्याचा अर्थ, तुम्ही हे विसरताय, की तुमच्या आजूबाजूला जे घडतय ते सत्य नव्हे. हे नीट लक्षात घ्या'**

**'तुम्ही आलात कोठून, जाणार आहात कोठे, आणि आज ज्या कठीण परिस्थितीत आहात, ती परिस्थिती मुळात तुम्ही उभी केलीच कशी आणि का, ह्या सगळ्याचा विसर पडू देऊ नका !'**

**'तुमचा शेवट यातनापूर्ण असेल हेही विसरू नका ह्या सर्व गोष्टी लक्षात असलेल्या चांगल्या. त्या तशा लक्षात ठेवल्यात तर तुम्ही जास्त सुखी जीवन जगाल तुमची अखेर, ही गोष्ट अगदीच हसण्यावारी नेऊ नका. कमी प्रगत आत्मे असतात, त्यांना हसत हसत मरणे समजू शकत नाही, ते तुम्हाला वेड्यात काढतील'**

'हे वास्तवाच भान ठेवण्याबद्दल वगैरे जे काही लिहिलय, ते तू वाचलयस डॉन ?'

'अह.'

'ह्यात लिहिलय की तुमचा शेवट यातनापूर्ण असेल' 'असच अगदी काही नाही. परिस्थिती कशी असेल त्यावर, आणि तुम्ही सर्व योजना कशी काय करता त्याच्यावर आहे.' 'तुझा शेवट असा असेल यातनापूर्ण ?' 'कोण जाणे, पण आता मी महात्मा बनायच सोडून दिलय, तेव्हा नसावा ! मी आपला साधा सरळ मरून जाईन की. बघूया; मी जे काम करायला जन्म घेतला, ते लवकरच पुर होईल, मग मी ठरवेन !'

तो मधून मधून थट्टेत बोलायचा तस बोलतोय अस रिचर्डला वाटत त्याला कल्पनाच नसते, की 'लवकरच' हे थट्टेत म्हटलेल नसत ! तो आपला ते पुस्तक पुन्हा थोड वाचतो-

**'शिक्षण म्हणजे तुम्हाला जें आधीपासून ज्ञात आहेच, त्याचा शोध घेणं; आणि कृती म्हणजे ते तुम्हाला ज्ञात आहे, हे इतरांना दाखवून देणं'**

**'शिकवणं म्हणजे इतरांनाही ते ज्ञान आहे, ह्याची त्याना जाण करून देणं.'**

'तुम्ही सगळेच विद्यार्थी आहात, कार्यकर आहात आणि शिक्षकही आहात.'

'तुमच्या कुठल्याही एका जन्मात तुमच कर्तव्य एकच आहे, ते म्हणजे स्वत शी प्रामाणिक रहाण दुसऱ्या कोणाशी किंवा कशाशी तरी प्रामाणिक रहाण अशक्य तर आहेच, पण ते भोदू महात्म्याच लक्षण आहे !'

सगळ्यात सोप्या वाटणाऱ्या प्रश्नामध्ये खूप खोल अर्थ असतो 'तुमचा जन्म कुठे झाला ?' 'तुमचा ठिकाणा काय ?' 'तुम्ही कोठे चाललाय ?' 'तुम्ही काय करताय ?' ह्या सगळ्या प्रश्नाचा मधून मधून विचार करून बघा; तुमची उत्तरं दरवेळी बदलत जातील !'

'ज्या ज्ञानाचा शोध घेण्याची तुम्हाला स्वत ला खूप गरज वाटत असते, ते तुम्ही उत्तम शिकवू शकाल'

'तुमच्या एखाद्या वक्तव्याला किंवा कृतीला जगभर प्रसिद्धी मिळाली, तरी त्याची खत बाळगू नका—अगदी खोटनाट प्रसिद्ध झाल असल तरी'

'तुमच्या खऱ्या मित्राना प्रथम भेटीतच तुमची जी ओळख पटेल ती इतराना हजार वर्षांतही पटणार नाही'

**'जबाबदारी टाळण्याचा उत्तम मार्ग म्हणजे माझ्यावर फार जबाबदाऱ्या आहेत असं म्हणत रहाणं!'**

वाचता वाचता रिचर्डच्या लक्षात एक विचित्र गोष्ट येते. 'डॉन, ह्या पुस्तकातल्या पानावर क्रमाक नाहीत?' 'नाहीत. कुठलही पान उघडायच. त्या घडीला तुम्हाला ज्या पानाची खूप गरज असेल, ते पानच उघडल जाईल' 'म्हणजे जादूच पुस्तक आहे काय हे?' 'अह. तू कुठल्याही पुस्तकावर, जुन्या वर्तमानपत्रावरसुद्धा हा प्रयोग करून बघ नीट लक्ष देऊन वाचल मात्र पाहिजे तू कधी करून पाहिल नाहीस अस? काही तरी विचार मनात घोळवत असताना, जवळ पडलेल कुठलही पुस्तक उघडायच, नि जे पान उघडेल त्यावर काय लिहिलय ते नीट वाचायच. करून बघ एकदा.'

रिचर्ड तस करून बघतो. डोळे मिटून विचार करत असताना त्याला वाटत, की ह्या जगावेगळ्या माणसाबरोबर जास्त दिवस राहून आपल काय होईल कोण जाणे! आता तरी मजा वाटत होती, पण मनात कुठे तरी सारा वेळ वाटत होत, की लवकरच काहीतरी फार वाईट होणार आहे, इथे राहू नये. मिटल्या डोळ्यानी हा विचार करता करताच, त्यान हातातल्या पुस्तकाच कुठल तरी पान उघडल त्यावर लिहिल होतं—

**'तुमच्या आतमध्ये जो ज्ञानपिपासू जीव आहे, तो हसत खेळत त्याची ज्ञानलालसा पूर्ण करता करता तुमचं आयुष्य घडवत जातो. तोच तुमचा अंतरात्मा, म्हणजे खरे 'तुम्ही''**

**'भविष्यकाळाच्या ज्या अनेक शक्यता तुमच्यासमोर उभ्या आहेत, त्या पडताळून बघा. त्यांचा स्वीकार केल्यानं काहीच शिकायला मिळायचं नाही, ह्याची खात्री झाल्याशिवाय त्यांचा नाद सोडून देऊ नका'**

**'शिवाय, तुमचा विचार तुम्ही केव्हाही बदलू शकता, आणि स्वतःचा भविष्यकाळ वेगळ्या तऱ्हेन आखू शकता, तसंच पाहिलं, तर स्वतःचा भूतकालही तुम्ही बदलू शकता!'**

भूतकाल बदलू शकता? म्हणजे? काय म्हणायचय ह्याना इथ? रिचर्डला गरगरायलाच लागल! 'डॉन, ह्याचा अर्थ तरी काय करायचा? हे शिकायच कस काय जमणार बुवा आपल्याला?' 'प्रयत्नान जमेल. ह्यातून वाचायच नि प्रयत्न करत रहायच. जमत, दहा एक दिवसात' 'दहा दिवसात?' 'हू! आपल्याला सगळे प्रश्न सुटले आहेत अस आपण स्वत ला पटवून दिल, की सगळे प्रश्न आपोआप सुटत जातातच. आपण ज्ञानी आहोत, अशी आपण स्वतःची खात्री करून घेतली, की आपण ज्ञानी होतोच हळूहळू!' 'पण मी कुठं म्हटल की मला ज्ञानी व्हायचय?' 'तेही बरोबर! तू तसं म्हटलं कधीच नव्हतस!' पण तरी ते पुस्तक रिचर्डन परत दिल नाहीच आणि डोनाल्डन ते कधी परत मागितलही नाही

## ५

मध्य पश्चिम अमेरिकेतल्या शेतकऱ्याना त्याची जमीन अर्थातच कसायला हवी असते आणि रिचर्डचा होता तसा विमान उडवून पैसे मिळवायचा धदा करायला, उभ पीक नसलेली, गावापासून फार लाब नसलेली, जवळपास गुरे चरत नसतील अशी, तिथपर्यंत पोचायसारखा कडेनं रस्ता असेल अशी जमीन पाहिजे पुन्हा, अस जे शेत सापडेल, त्याला लोकाना आत येण्यासाठी रस्त्याच्या बाजून प्रवेश करता येईल अस फाटक पाहिजे. अगदी जवळ वस्ती नसली पाहिजे, जमीन फार खाचखळगे नसली पाहिजे, शिवाय ती पुरेशी मोठी पाहिजे आणि एवढं सगळ सापडल्यावर जमिनीच्या मालकान तिथ विमान उडवायला, उतरवायला, रात्रीच ठेवायला, परवानगी दिली पाहिजे!

शनिवारी सकाळी रिचर्ड आणि डोनाल्ड उत्तरेकडे निघाले, तेव्हा रिचर्डच्या मनात हे सगळं येऊन गेल. डोनाल्डच चकचकीत स्वच्छ विमान सूर्यप्रकाशात कस चमचम करत होत. विमान मोठ होतं रिचर्डच्या विमानापेक्षा, त्यामुळं एका वेळी दोन सवाऱ्या घेता यायच्या, पण मोठ होत त्यामुळ जास्त मोठ शेतही हव. म्हणून तर रिचर्डन पूर्वी त्याच्याकडे असलेल तसल मोठ विमान विकून हे लहान विमान घेतल होत. कारण विमानाला उतरायला चालतील, अशी लहान शेतसुद्धा गावापासून कमी अतरावर असतात पाचशे फुटाच शेतसुद्धा रिचर्डच्या विमानाला पुरायच डॉनच्या विमानाला हजार बाराशे फुटाची तरी जागा पाहिजे रिचर्डला वाटत, 'ह्याच्याबरोबर हिंडत राहिलो, म्हणजे ही एक पचाईतच होणार आहे', आणि तेवढ्यात, अमेरिकेतल्या बहुतेक लहान गावाच्या बाहेर असत, तसं अदमासे बाराशे—तेराशे फुटाच एक नीटनेटक कुरण त्याला दिसत त्याचे दोन भाग करून अर्ध्याभागाच बेसबॉल ग्राउड केलेलही दिसत होत. डॉनला त्याचं विमान तिथे उतरवता येणार नाही हे ठाऊक असल्यान रिचर्डला जरा उगीच ऐटी दाखवायची हुक्की येते आणि तो ऐटीत आपल विमान त्या छोट्याशा जागेत उतरवतो मग तो परत विमान वर न्यायला सुरुवात करणार, तेवढ्यात बघतो तर काय? हळुवारपणे पण पूर्ण आत्मविश्वासान डॉन आपल विमान खाली आणत असतो! एवढ मोठ विमान ताशी साठ मैलाच्या वेगानं खाली आणाव लागतं— पन्नासच्या वेगाला तर ते हवेतच बद पडून चागलाच गोंधळ होईल पण डॉनन विमानाची गति तिसापेक्षाही कमी केली होती. रिचर्डच्या अगावर काटा उभा रहातो, पण दुसऱ्या क्षणी डॉनन अलगद विमान त्याच्याशेजारी आणून उतरवल होत आणि इजिन बद करता करता अवाक् होऊन त्याच्याकडे बघणाऱ्या रिचर्डला तो सहजपणे म्हणाला होता, 'छान जागा सापडली की तुला, गावाजवळ अगदी!' रिचर्ड चागलाच हादरलेला तो जवळजवळ ओरडलाच, 'कॅय छॅन जागा सापडली? हे काय विमान उतरवण झालं?' डॉननं डोळे मिचकावले 'जादू!' मग जरा गभीरपणे, 'रिचर्ड, हे असले सगळे चमत्कार— पाण्यावरून चालणं, पाण्याची वाइन बनवण, वस्तू हवेत अधातरी ठेवण, सगळ कसं करता येतं ते समजून घ्यायचय तुला?' एकाएकी रिचर्डला खूप प्रखर प्रकाशकिरण अगावर पडल्यासारखं वाटतं. 'मी एवढंच विचारतोय,

की तू इथे हे विमान कस उतरवलस...' त्या दोघामध्ये जणू एक प्रचड दरी असावी, अन् पलीकडून डॉन बोलत असावा, तस रिचर्डला त्याच उत्तर वाटल. आता तो हसत नव्हता, डोळे मिचकावत नव्हता, 'रिचर्ड, अरे माया आहे ही सगळीच ! ही सारी दुनियाच, इथल सगळं काही ! आता तरी हे लक्षात येतय का तुझ्या ?'

मोटरसायकलवरनं दोन तरुण पोर तेवढ्यात तिथे येऊन पोचली, नि त्यानी डॉनच्या विमानातन फिरून यायच ठरवल. रिचर्डन शेत-कऱ्याकडन परवानगी मिळवली. काम सुरू झाल, दिवसभर सुरू राहिल, पण रिचर्डला दिवसभर जादूचा खेळ बघितल्यासारख वाटत राहिल ते एवढ मोठं विमान त्या एवढ्याशा जागेतन वर न्यायच नि खाली आणायच हा एक चमत्कारच होता. 'माया आहे रिचर्ड ही सगळीच !' डॉनन गभीरपणानं काढलेल्या त्या उद्गाराचा रिचर्ड सारा दिवस विचार करत होता. माया ! कुठे ऐकला होता हा शब्द? मग त्याला आठवल. तो लहान असताना जादूचे खेळ बघायचा, ते ते जादूगार मुलाना असच सागायचे, 'पोरानो, तुम्हाला जो खेळ आम्ही दाखवतो ना, त्यात जादू काही नसते, ती नुसती माया असते, तुम्हाला दिसत ना, तस खर नसत ! अन् मग ते श्राफोडातन मोठं लखलखतं झुबर काढायचे आणि हत्ती बघता बघता टेनिसची रॅकेट व्हायचा ! रिचर्डला एकदम काही तरी आठवत नि तो डॉनन दिलेलं पुस्तक उघडतो. जिथे उघडतो, तिथे दोन वाक्य असतात—

**'तुमच्यापुढे उभी रहाणारी प्रत्येक समस्या तुम्हाला काहीतरी वरदान घेऊनच येते ते वरदान, ती देणगी तुम्हाला हवी असते म्हणून तुम्हीच समस्या उभ्या करता.'**

का कोण जाणे, रिचर्डच मन ते वाचून जरा शात झाल. तो परत परत त्या वाक्याचा विचार करत राहिला.

मागच्या गावातल्यासारखच इथेही चागल भरपूर काम मिळत होत पण तिथे जीवाला शातता होती. इथे रिचर्ड का कोण जाणे अस्वस्थ होता. येणाऱ्या गिऱ्हाईकाना हे विमानात बसून उडणं म्हणजे एक अपूर्वाई, एक साहस वाटत होत डॉनबरोबर रहाण, त्याच ते अशक्य कोटीतल विमान उतरवण नि उडवण पाहण, त्याच चमत्कारिक बोलण हेच रिचर्डला एक साहस होऊन बसल होत ! तो ते विमान जस उडवत होता तस ते उडवण अशक्य असत हे ठाऊकच नसल्यान त्या लोकाना तो चमत्कार वाटतच नव्हता ! ते आपले जुजबी बोलायचे, आभार वगैरे मानायचे नि जायचे

दुपारी बरेच लोक विमानात बसायला आले कमाई चागलीच होणार होती, पण रिचर्ड अस्वस्थ होता. तिथून पळून जावस त्याला वाटत होतं. दुपारपर्यंत दोनदा त्यान चालत चालत जाऊन पेट्रोलचे डबे भरून आणले होते. मग एकदम त्याच्या लक्षात आल की, त्याची भेट झाल्यापासन एकदाही डॉनन त्याच्या विमानात ना पेट्रोल भरलं होत ना तेल ! आणि तो एकामागून एक येणाऱ्या लोकाना फिरवून आणतच होता ! रिचर्डला पुन्हा एकदा भीती वाटली.

मध्येच एकदा डॉनला त्यान सधी साधून गाठल आणि अगदी शात-पणे, सहज सुरात विचारल, 'अरे डॉन, तुला पेट्रोल वगैरे हव असेल ना आता ?'—'अरे तुला श्वास घ्यायला हवा हवी असेल ना ? असं कोणीतरी विचारल तर जस वाटेल, तसा आश्चर्याचा भाव तोंडावर आणून त्यानं रिचर्डकडे रोखून पाहिल —'नाही रिचर्ड ! पेट्रोलची जरूर नाही मला !' रिचर्ड जरा चिडलाच. 'मग काही युरेनियम वगैरे ?' डॉन गोडस हसला नि त्याच्या त्या हसण्यान रिचर्ड शात झाला 'नाही, युरेनियम गेल्या वर्षीच घातल होत ना मी !'

लोक येतच होते रिचर्डला वाटत होत हे यायचे थाबतील तर बर. निदान आपण इथून निघालो तर बर—इथून आत्ता, ह्या क्षणी, निघून जाव.—दूरदूर कुठेतरी कुठल्याही गावापासून खूप लाव असलेल्या एखाद्या मोठ्या कुरणात आणि शात बसून जे काही घडत होतं त्याचा विचार करावा, अर्थ लावावा.

डॉनला तो पुन्हा एकदा सधी साधून गाठतो नि म्हणतो, 'डॉन, मला वाटत मला अगदी पुरे झालय आता थोडे दिवस जरा आराम करीन म्हणतो—बराय् तर मग ! मजा आली तुझ्याबरोबर – भेटू पुन्हा कधीतरी, काय ?' पापणीसुद्धा न हलवता शातपणान डॉन उत्तर देतो 'तो माणूस येऊन बसलाय त्याला फिरवून आणतो नि मग बोलतो तुझ्याशी.' 'बर.' येऊन बसलेला माणूस व्हीलचेअरमधन आला होता—अपग, अशक्त पण त्याला विमानात बसायच होत नि आता ह्याला हे लोक विमानात कस बसवणार हे बघायला भोव-ताली नाही म्हटल तरी चाळीस पन्नास बघे जमले होते. "काय ? विमानातन फिरायला यायचय का तुम्हाला ?' डॉनन विचारल आणि आपली अशक्त, वाकडी मान कशीबशी हलवत तो माणूस कसनुस हसला—हसताना चेहराही वाकडा होत होता. खेळता खेळता दमून जरा बाजूला बसलेल्या एखाद्या खेळाडूला परत रिंगणात बोल-वाव तितक्या सहज सुरात डॉन त्याला म्हणाला— 'चला ना मग !' नतर विचार करताना रिचर्डला वाटल होत की त्या स्वरात सहजता असली तरी एक तीव्र उत्कटता होती. काहीही सबब न सागता उठून विमानात चढायला सागणारी आज्ञा होती !— आणि जणू काही इतका वेळ करत असलेल्या नाटकातला शेवटचा प्रयोग सपला असावा तसा तो माणूस अर्धवट पळतच त्या व्हील चेअरवरून उठून विमाना-कडे निघाला ! तो स्वतही अफाट आश्चर्यचकित. रिचर्ड जवळच उभा होता त्यान त्या माणसाचे शब्द ऐकले— 'काय केलत तुम्ही मला ? कस केलत ?' 'आणि काही झालच नाही अशा सुरान डॉनन विचारल 'विमानात बसायचय ना तुम्हाला का नाही ? तीन डॉलर्स पडतील, ते आधी द्यावे लागतील !' 'बसायचय !' डॉनन त्याला आत चढायलाही मदत केली नाही—इतराना तो करीत असे !

भोवताली जमलेल्या समुदायात एकदम कुजबूज झाली नि मग प्रचड शातता अकरा वर्षांपूर्वी पुलावरून त्याची ट्रक खाली कोमळली तेव्हापासून हा माणूस असा अपग होता ! एखाद्या लहान मुलानं कापडी पख लावावे तसा तो उडी मारून विमानात चढून बसला नि नव्यानच मिळालेल्या खेळण्यासारखे आपले हात इकडे तिकडे हवेत उडवत हातवारे करत राहिला ! कोणी काही बोलायच्या स्थितीत येण्यापूर्वी डॉन विमान चालू करून वर गेलाही होता !

एखादा क्षण खूप आनदाचा नि खूप भीतिदायक, दोन्ही असू शकतो ? तो बिचारा माणूस क्षणार्धात असा खडखडीत बरा व्हावा हा मोठा सुखद चमत्कार होता, पण डॉन खाली आल्यानतर काय होईल, हा विचार घाबरा करत होता. खाली एक स्तब्ध जमाव असा जमाव केव्हाही प्रक्षुब्ध होऊ शकतो, काहीही करू शकतो !

डॉन विमान खाली उतरवत होता 'आता ह्यानं विमान कुर-

णाच्या दुसऱ्या टोकाला उतरवल नि त्या माणसाला खाली उतरवून परत पट्दिशी विमान वर नेल तरी बर !' रिचर्डला वाटत होत इकडे लोकाची गर्दी वाढत होती. व्हीलचेअरमधल्या आणखी एका माणसाला ढकलत एक स्त्री जवळ जवळ पळत पळत येत होती ! डॉनन जमावाच्या जवळ विमान उतरवल, एजिन बद केल. जमाव धावत विमानाशी पोचला. रिचर्डला वाटल आपण भ्याडपणा करतोय पण तो स्वत ला थांबवू शकला नाही. तो आपल्या विमानात चढला नि एजिन चालू करून तेथून निघाला. त्यान शेवटच बघितल तेव्हा डॉनला लोकानी गराडा घातला होता.

रिचर्ड पूर्वेकडे वळला, मग ईशान्येकडे गेला. शेवटी कुठल्याही गावापासून दूर त्याला एक मोठं शेत दिसल. जवळ झाडं होती, ओढाही होता. रिचर्ड तिथं उतरला.

## ६

रिचर्डन अस का केल ते त्याला कधीच सागता आल नाही. पण काहीतरी भयकर होणार आहे ह्या भीतीन त्याला घेरल होत नि ते होईल तेव्हा तिथ त्याला रहायच नव्हत–अगदी डॉनसारख्या माणसाजवळ-सुद्धा ! ह्या शेतात सगळ कस अगदी शांत शात होत ओढ्याचा आवाज-सुद्धा अगदी हळू ऐकू येत होता माणसाला एकटयान रहायची सवय तर होते, पण ती मोडली नि मग पुन्हा एकट रहायची वेळ आली की जरा जड जातच की ! रिचर्ड स्वत लाच समजावत होता, 'थोडे दिवस ठीक होत, मजा आली, त्याच्याकडून खूप शिकायलाही मिळाल. पण तो जमाव ! खूष असलेला जमावसुद्धा आपल्याला तर बुवा थोड्या वेळान नकोसा वाटायला लागतो, मग असा बिथरलेला जमाव तर ! तो मग तुमची पूजा तरी करतो किंवा तुम्हाला क्रूसावर तरी चढवतो ! छे बुवा–आपल्याला तरी अगदी पुरे झाल हे सारं !' ...'अ ? डॉन असच बोलायचा की ! मग मी तेथून निघालो तर तो का नाही निघाला ? मी कसा शहाण्यासारखा निघून आलो–बाकी आपण काही साक्षात्कारी पुरुष नाही म्हणा ! 'माया आहे सारी !' किती उत्कटतेन डॉन हे म्हणाला होता जणू काही त्याच्या त्या उत्कटतेन तरी माझ्या डोक्यात प्रकाश पडेलस त्याला वाटत होत समस्या आहे खरी आणि त्यातून मिळू शकणार वरदानही हवस वाटतय, पण 'माया आहे सारी' म्हणजे काय, हेच अजून कुठ कळतय ?' विचार करता करता रिचर्ड काटक्याकुटक्याची चूल पेटवून काहीतरी खायला बनवतो हातान चाळा म्हणून तो एक स्पॅनर हवेत उडवत असतो. 'डॉन शिमोडा स्पॅनर हवेत तरंगत ठेवायचा. आपण फेकला की दणदिशी जमिनीवर पडतोय ! माया ! ही सगळी माया आहे, तर मग सत्य काय आहे ? हे जीवन म्हणजे सगळा आभासच असेल, तर आपण ते जगतोच कशाला ? जाऊ दे झाल ! आपण आहोत तसे आहोत, आहे ज्ञान तेवढ पुरेय् आपल हे आयुष्य का आभास काय ते जगायला !' डॉनच नि त्याच्या बोलण्याच कोड उलगडायचा प्रयत्न सोडून देऊन रिचर्ड मोठमोठयान मनाला येईल ते गात सुटतो रात्र होते नि आपली वळकटी विमानाच्या पखाखाली पसरता पसरता रिचर्ड स्वतःशी म्हणतो, 'डॉन जिथं कुठ असेल, तिथ त्याचाही वेळ त्याला आवडतो तसा जात असू दे म्हणजे झाल.' अगातला शर्ट काढता काढता त्याच्या खिशातन डॉनच पुस्तक खाली पडत नि उघडत. उघडलेल्या पानावर लिहिलेलं असत –

**'खऱ्या अर्थाने जे एका कुटुंबातले आहेत, त्यांचं नातं रक्ताच नसतं परस्परांबद्दल आदर आणि परस्परांच्या आयुष्यात खराखुरा रस असण्याचं असतं. असे कुटुंबीय एकाच घरात क्वचितच रहात असतात !'**

'आता ह्या वाक्याचा आपल्याशी काय सबध ?' म्हणत रिचर्डन ब्लँकेट ओढून अगावर घेतल नि आकाशात चमचमणाऱ्या हजारो चादण्या – ('तीही माया होती का ? किती सुरेख माया होती पण !') बघत बघत तो गाढ झोपी गेला !

पहाटे पहाटे रिचर्डला जाग येत असते तेव्हा तोच स्पॅनर हवेत तरंगतोय, आपल्या डोक्याला स्पर्श करून पुन्हा हवेत जातोय, गवतात पडतोय, असा त्याला भास होतो. जागा होऊन तो खरोखरच जवळ गवतात पडलेल्या त्या स्पॅनरकडे वेड्यासारखा बघत रहातो त्याला पुन्हा डॉनची आठवण येते, 'ह्या सगळ्याचा काहीतरी अर्थ असणार की नाही ? .:. जाऊ दे झाल' म्हणत तो सकाळच्या न्याहारीची तयारी करायला लागतो, तेवढ्यात डॉनच्या विमानाचा आवाज येतो 'आता इतक्या मोठ्या देशात, इतकी हजारो कुरण असताना, आपण नेमके कुठे आहोत हे त्याला समजण शक्य तरी कसय्' अस स्वत शी म्हणत असतानाच तो उमगलेला असतो की, डॉनच येतोय ! डॉन विमान उतरवतो नि रिचर्डजवळ येतो. जणू आपल्याला काही नवल वाटलेलच नाही अशा आविर्भावात रिचर्ड हात हलवून त्याच स्वागत करतो नि मुकाटयान बनवलेल्या न्याहारीतली अर्धी त्याला देतो. 'काय झाल तिकडे ?' 'जीव वाचवून पळालो' 'मला जरा शकाच होती –' आणि त्यान आपल्याला कस शोधून काढल हे जाम विचारायच नाही अस मनाशी म्हणता म्हणताच रिचर्ड विचारतो, 'तुला सापडलो कसा काय मी ?' 'का ? सम विचाराची माणस एकमेकाना शोधून काढतातच की !' 'सम विचाराची ? छट् ! तू तर साक्षात्कारी पुरुष वगैरे ! का दोघाची विमान आहेत म्हणून म्हणतोयस ?' 'आपण दोघही चमत्कार घडवून आणतो ना ?' 'आपण दोघही ? – मी ?' 'का ? ती स्पॅनर तू सकाळी हवेत लटकत नव्हता ठेवलास ?' 'मी ? कसल आलय ? तो आपला आपलाच तरंगत होता असा भास झाला मला !' 'तू काय करू शकतोस हे तुलाच माहीत नाहीये रिचर्ड ! पुष्कळदा आपल्या नकळत आपण पुष्कळ गोष्टी शिकत असतो. उतावळा होऊ नकोस आपण सगळे सदैव नवीन ज्ञान मिळवण्याच्या मार्गावरच असतो. तू तर आता लवकर ज्ञानी पुरुष होऊन जाशील, सर्व काही समजून चुकशील !' पण मला काही समजायला नकोच आहे !' 'अस ?' 'तसं नाही, म्हणजे मला हे समजून घ्यायच आहेच की, हे जग का निर्माण झाल, हे जग म्हणजे आहे तरी काय, मी इथे काय करतोय आणि मी येथून पुढे कुठे जाणार आहे. हो, हे सगळं समजायला हवय मला आणि खरच, पखाशिवाय उडायचं कसं ते पण कळल तर – !' 'अहं' अहं काय ?' 'अंह म्हणजे, हे सगळं अस होत नसतं. हे जग म्हणजे आहे तरी काय, हे जेव्हा तुम्हाला समजतं,

तेव्हा तुमच्या हातून चमत्कार घडू लागतात — म्हणजे लोक ज्याला चमत्कार म्हणतात ते. पण खरं म्हणजे त्यात चमत्कार म्हणण्या-सारख काही नसतं. जादूगार जादू कशी करतो, हे समजल्यावर ती जादू वाटेनाशी होते की नाही ? तसच तुझ तसच झालय् तुला जे समजून घ्यायचय अस तुला वाटतय ना, ते खर म्हणजे तुला ठाऊकच आहे, पण तुझी तुलाच त्याची जाणीव नाहीये.' 'पण तू कधी मला विचारलं होतंस मला हे सगळं शिकायचय का, अस ? हे सगळं — ज्यामुळ तुझ्याभोवती लोकाची गर्दी जमायला लागली नि मग तू वैतागलास ते ? मला तरी आठवत नाही !' रिचर्ड म्हणाला खरा, पण त्याला ठाऊक होतं की आता हा म्हणणार 'आठवेल नतर' नि त्याच बरोबर असेल !

'ते गर्दीचं बिर्दीचं सोड. आपण त्याचा त्रास मानला नाही, तर तो होतही नाही.' 'त्या मागच्या गावात लोक तुझ्यामागे नाही लागले ?' 'मी लागू दिले म्हणून. मजा आली मला. हे सगळ ज्याला आवडत नाही, त्याला महात्मा होताच येणार नाही.' 'पण तू मागे कटाळून सोडून नव्हतं दिलस सगळ ?' 'होय ना. पण तेव्हा अतीच झालं रात्रंदिवस साक्षात्कारी महापुरुषाच काम करायचा मला कटाळा आला, म्हणून पळून गेलो पण इतके जन्म जे शिकण्यात घालवले ते सगळं अस विसरून तरी कसं जाणार ?' रिचर्डनं थकून डोळे मिटून घेतले. मग तो म्हणतो, 'हे बघ डॉन, तुला काय म्हणायचय ? हे काय चाललंय ते सरळ सागून का नाही टाकत मला तू ?'

बराच वेळ स्तब्धतेत गेला. मग डॉन म्हणाला, 'तूच साग ना. चुकलास तर मी सुधारेन. तूच साग; मला काय म्हणायचय ?'

रिचर्डनं जरा विचार केला, मग डॉनला चकित करून टाकायच ठरवल. ऊन बरच झालं होतं. खूप दूरवरून येणारा ट्रॅक्टरचा आवाज सोडला, तर सगळं कस शात शात होतं. 'असं ? मी सागतो तर मग. पहिली गोष्ट म्हणजे तू मला प्रथम भेटलास तो योगायोगानं नव्हे, बरोबर ?' उत्तर आल नाही. 'दुसरी गोष्ट म्हणजे कुठल्यातरी जन्मी आपण काही तरी वायदा केला होता— मी विसरलो, तू विसरला नाहीस !' उत्तर नाही रिचर्डच बोलण रिचर्डला स्वतःला ऐकू येत होतं आणि त्याच त्याला जाणवत होतं की हे सारं कुभाड नाही, सत्य आहे तो बोलत राहिला— 'खूप पूर्वी—तीन—चार हजार वर्षांपूर्वी आपण एकमेकाना ओळखत होतो. आपल्या आवडीनिवडी एक होत्या, आपल्याला विध्वसक लोक आवडत नव्हते, ज्ञानलालसा होती, ज्ञान मिळवण्याची गतीही सारखीच होती, पण स्मरणशक्ती तुझी चागली माझ्यापेक्षा, समविचाराची माणस एकत्र येतात अस तू म्हणालास, तेव्हा तुला हे सगळ अभिप्रेत होत; बरोबर ?' 'हं ! मला वाटलच होत तू जगाच्या उगमापासून सुरुवात करशील ! पण येईल गाडी रुळावर असं वाटतंय, पुढं बोल !' 'खरं म्हणजे मी काही बोलायची जरूरच नाहीये, कारण मला किती माहीत आहे, हेही तू जाणूनच आहेस. पण *मला काय काय कळतय अस मला* वाटतय, ते तुला सागितल पाहिजे, म्हणजे मला जे शिकायचय, ते शिकता येईल आणि दुसर म्हणजे डॉन, माझ्यासारख्या लोकांच्या भरीला तू का पडतोस ? तुझ्यासारख्या साक्षात्कारी पुरुषाला हे चमत्कार म्हणजे पोरखेळच तुला आमची गरज नाही ह्या जगातल्या एकाही वस्तूची तुला गरज नाही' डोळे मिटून पडल्या पडल्याच गालातल्या गालात हसत डॉन म्हणाला, 'पेट्रोलसारख्या ?' 'होय. म्हणून मग तुझ्यासाठी हे जग अत्यत कटाळवाण होणार. जगण्यातलं आव्हानच सपल, कारण तुला इथे काही त्रासच नाही. डॉन, तुला समस्याच नाहीत ही तुझी सर्वांत मोठी समस्या आहे !' रिचर्डला वाटत 'वा ! काय बरोबर बोललो आपण !' पण डॉन म्हणाला, 'अहं ! चुकलास तू. मी माझ प्रेषिताच काम सोडून का दिलं ? साग !' 'लोकाची गर्दी. आणि *त्याच्या तुझ्याकडून* चमत्काराच्या अपेक्षा ! तूच म्हणाला होतास–' 'गर्दीच काही नाही. गर्दीचा त्रास होत नाही मला. तो तुझ्यासारख्यांना होतो. मला त्रास होतो, तो मी काय शिकवतोय, ते ऐकूनच न घेणाऱ्या गर्दीचा. ते त्यानी ऐकून घ्याव म्हणून त्याना वाटेल ते चमत्कार करून दाखवा— लडनहून न्यूयॉर्कपर्यंत समुद्रावर अगदी चालून दाखवल तरी त्याच्या डोक्यात प्रकाश पडत नाही, ह्याला काय कराव ?' त्याक्षणी तो इतका, इतका एकाकी दिसला ! त्याला पैसा, कीर्ती, काही काही नको होतं, त्याला असलेले ज्ञान लोकापर्यंत पोचवायसाठी तो तळमळत होता आणि लोकाना त्या ज्ञानाची काही पत्रासच पडली नव्हती ! रिचर्डला भरून आल. ते दडवायसाठी तो म्हणाला, 'तू ओढवून घेतलयस् हे दुःख. दुसरा कोणी काय करतो किंवा करत नाही, ह्यावर तुम्ही तुमच सुख अवलबून ठेवलत, की आलच गळ्यात !'

डॉनन एकदम चमकून नजर वर केली एक क्षणभर त्यांच्या डोळ्यात क्रोधाग्नी तळपला. दुसऱ्याच क्षणी त्याचं ते पुसटस स्मित ओठावर आल आणि तो म्हणाला, 'रिचर्ड ! तुला ठाऊक आहे ? तू फार मोठ सत्य आत्ता बोलून गेलास ?'

आणि मग तो आपल्याच विचाराच्या तद्रीत जणू हरवून गेला. रिचर्डच्या डोक्यात जणू एकामागून एक उल्कापात होत असावेत, तसे अनेक विचार येत राहिले, नि तो ते सगळे बोलून दाखवत राहिला. किती तरी तास लोटले असतील. रिचर्डला नवनवे विचार सुचत होते, आपल्याला हे सगळ ज्ञान केव्हा नि कस मिळाल, हे सगळ आपल्याला आज कस येतय्, हे त्याचं त्यालाच समजेना. शेवटी त्यान डॉनलाच विचारल, 'अरे डॉन, मी बोलतोय् केव्हाचा, नि अजून किती तरी नव नवं सुचतच जातय् मला ! हे कस काय !' डॉननं उत्तर दिलं नाही. 'साग ना डॉन हे सगळ मला एकाएकी कसं समजलं, ह्याचं उत्तर माझ्याजवळ नाही ! काय झाल तरी काय मला ?' पण तरी डॉन काहीच बोलला नाही, कारण हा सगळा वेळ तो गाढ झोपी गेलेला होता !

## ७

आणि मग पहाटे पहाटे रिचर्डला जाग येते, ती सगीताच्या प्रचड *मोठ्यान ऐकू येणाऱ्या ध्वनिलहरींनी. चराचर जणू हलत होतं* रिचर्ड दिङ्मूढ होऊन उगवत्या सूर्यानं रगवलेल्या लाल केशरी आकाशाकडे बघत राहिला. तेवढ्यात डॉन चिडून मोठ्यान ओरडला, 'बद करा हे सगीत ! बद करा म्हणतोय ना !' त्याच्या ओरडण्याचे प्रतिध्वनी कमी कमी होत हवेत विरले नि सगीताचा प्रचंड कोलाहल बद होऊन शात, मगल सूर येऊ लागले. डॉनच समाधान झालं नाही.

बंद करा म्हटल ना!' सगीत बद झाल. 'हुश्!' डॉन म्हणाला, 'काही काळवेळ?' 'काळवेळ?' 'नाही, दिव्य स्वर्गीय सगीतानं वरं वाटतं– आपल्या अतर्मनात, आपलं आपल्याला केव्हा तरी ऐकायला, आणि तेसुद्धा काही विशेष प्रसगी. पण उगीच आपल सकाळी उठून एवढ्या मोठ्यानं! काय चालवलयस काय तू?' रिचर्ड दचकला. 'मी? मी? मी कुठे काय? मी तर गाढ झोपलो होतो!' डॉनन मान हलवली, खादे उडवले नि तो परत पाघरुणात शिरला. गवतात पालथ पडलेल ते पुस्तक रिचर्डन सुलटं केल उघडया पानावर लिहिल होतं '**स्वत:च्या मर्यादांच समर्थन करायला लागलात की तुम्हाला मर्यादा पडल्याच म्हणून समजा!**'

## ८

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे काम करून सध्याकाळी ते दोघे शेजारच्या गावात जेवायला गेले. परत येता येता रिचर्ड डॉनला म्हणतो, 'डॉन, आपल आयुष्य कटाळवाणं किंवा स्फूर्तिदायक, किंवा आणखी काही करण; हे आपल्या हातात असेलही तू म्हणतोस तस; पण मला एका प्रश्नाचा कितीही विचार केला तरी उलगडा होत नाहीये, की आपण ह्या जगात येतोच कशाला? तू साग मला, कशाला?' ते चालले होते त्या रस्त्यावर एक सिनेमा थिएटर होतं. डॉन थाबला. 'पैसे आहेत तुझ्याकडे?' 'चिकार. का?' 'सिनेमा बघू या.' 'तू बघून ये, जा. विमान तिकडे अशी टाकून एवढा वेळ.' 'विमानाना काही होत नाही. चल तू, सिनेमा बघू या' 'सुरू होऊन गेला असेल' 'असू दे.' तिकिट घेऊन ती दोघं अधारात चाचपडत पाठीमागच्या रागेत जाऊन बसली.

जेमतेम पन्नास माणस असतील आत चित्रपट रिचर्डन पूर्वी दोनदा पाहिलेलाच होता; पण अतिशय चागल्या चित्रपटापैकी एक असल्यानं बघायला मजा आली. शिवाय कथा माहीत असल्यान चित्रपटाच्या तात्रिक खुब्या, प्रसगाचे क्रम आणि चित्रीकरण, असल्या गोष्टी रिचर्ड लक्ष लावून बघत राहिला, नि चित्रपट बघण्यात रगून गेला. चित्रपटाच्या अगदी शेवटी शेवटी डॉनन त्याचा खादा हलवला पडद्यावरून नजर न काढता त्याच्याजवळ सरकत रिचर्ड म्हणाला– 'ह?' आणि मनात अर्थात वाटल की आता ह्याला जे काही म्हणायच होत ते नतर नसते का म्हणता आल? 'रिचर्ड?' 'हुंऽ?' 'तू इथे का आलायस?' 'शू:! चित्रपट छान आहे, बघ ना' 'काय छान आहे ह्या चित्रपटात?' 'अरे, काय झकास आहे मग सागतो, बघू दे ना' 'भानावर ये जरा रिचर्ड, हा नुसता आभास आहे सगळा, माया!' 'डॉन, अरे बाबा शेवटचा थोडा भाग बाकी आहे, बघू दे ना, मग बोलू या म्हटल ना!' डॉन नाट्यपूर्ण आवाजात परत म्हणाला, 'रिचर्ड? तू येथे का आला आहेस?' 'तू चल म्हणालास म्हणून!' 'मी चल म्हटल, पण तू नाही म्हणू शकला असतास!' 'पण मला आवडतोय हा चित्रपट, 'रिचर्ड जरा ओरडलाच. शेजारची माणसं वळून बघायला लागली. 'चूक आहे का आवडतोय हे?' 'नाही, अजिबात चूक नाही,' मग मात्र चित्रपट सपेपर्यंत तो काही बोलला नाही. परत निघाले, तेव्हा आभाळ भरून आल होत. डॉन ज्या विचित्रपणान थिएटरमध्ये वागला त्याचा रिचर्ड विचार करत होता, 'डॉन! तू जे काही करतोस, ते काही हेतून करतोस ना?' 'बहुतेक वेळा' 'मग आज चित्रपट बघायचा तू हट्ट का धरलास?' 'तू मला एक प्रश्न विचारला होतास त्याच्या आधी' 'हो, हो. सागणार आहेस त्याचं उत्तर आत्ता?' 'तेच माझ उत्तर. तुला चित्रपटाला घेऊन जाणं हे.' तो रिचर्डची थट्टा करत होता असच अर्थात रिचर्डला वाटल, 'डॉन, तू म्हणजे–! माझा प्रश्न काय होता!' 'की कितीही विचार केला, तरी आपण ह्या जगात कशाला आलोय, हे तुला कळत नाही!' 'आणि त्याला उत्तर हा चित्रपट?' 'हो!' 'असं अस!' 'नाही समजल?' 'नाही!'

'अस बघ. चित्रपट चागला होता, खरं ना? पण कितीही चागला चित्रपट असला, तरी तो शेवटी एक भास, एक मायाच आहे की नाही? अरे, ती चित्रं हलतसुद्धा खरोखरची नसतात. आपल्याला मात्र वाटत ती हलतायत म्हणून, बरोबर ना?' 'अ? हो, ते तर खरंच' रिचर्डच्या डोक्यात जरा जरा प्रकाश पडायला लागला होता. 'मग मला अस साग, कुठेही, कुठलेही लोक जेव्हा चित्रपट बघायला जातात, तेव्हा त्यानाही ठाऊकच असत की, हा सगळा नुसता आभास आहे. मग कशाला जातात ते?' 'का? करमणूक म्हणून, मजा म्हणून' 'बरोबर. मजा म्हणून ते एक कारण झालं दुसर?' 'शिकायला मिळत त्यातून कधीकधी म्हणून' 'छान बोललास. कधीकधी नाही, नेहमीच मिळत दोन झाली.' 'स्वप्नसृष्टीत रमून जाता येत थोडा वेळ' 'ते तर मजा ह्या कारणातच जमा होईल' 'तात्रिक दृष्टया चित्रपट कसा बनवलाय ते बघायला' 'ते तुझ्या दुसऱ्या कारणातच जमा' 'कटाळा घालवायला' 'म्हणजे करमणूक करून घ्यायला, ते सागितलस तू.' 'समाजात मिसळायला, मित्राबरोबर छान वेळ घालवायला' 'ते का जाव ह्याच कारण झाल, चित्रपट का बघावा, ह्याचं नाही आणि ते पुन्हा मजा, ह्याच सदरात मोडल.'

रिचर्ड जे काय म्हणेल, ते करमणूक आणि शिक्षण ह्या दोनच सदरात मोडत होत! 'म्हणजे तुला अस म्हणायचय की चित्रपट बघण हे जीवन जगण्यासारखंच आहे?' 'हो' मग जाणूनबुजून दु:खी जीवन–एक भयानक चित्रपट कोण स्वीकारेल?' 'लोक मजा म्हणून भीतिदायक चित्रपट बघायला जातात ना? जाण्यापूर्वीच त्याना ठाऊक असत हा चित्रपट भीती वाटेल असा आहे ते' 'पण का?' 'तुला आवडतात असे चित्रपट?' 'नाही' 'बघतोस कधी?' 'नाही' 'पण काही लोक बघतात, खरं ना? काही जण इतराना कटाळवाणे वाटणारे कौटुबिक चित्रपट पण बघतात?' 'हो' 'त्याना आवडणारे चित्रपट बघायची तुझ्यावर सक्ती नाही, तुला आवडणारे बघायची त्याच्यावर सक्ती नाही. स्वातंत्र्य ह्यालाच म्हणतात.' 'पण भीती वाटवून घ्यायला किंवा कटाळा आणवून घ्यायला कोणाला आवडेल उगीच?' 'भीती वाटण्यात वाटणारी मजा काहीना आवडते काही इतराना भिववतात म्हणून आपणही भिववून घ्यायलाच पाहिजे अस त्याना वाटत. काहीना वाटतं चित्रपट हे कटाळवाणे असणारच. तुला ठाऊक आहे, कित्येक लोकांना खरोखरच असं वाटत असत, की त्याच्या स्वत:च्या 'चित्रपटात' ते स्वत. अगदी

असहाय्य असतात ? एवढच नाही, तर अस वाटण्यानच त्याना एक तऱ्हेचं बर वाटत असत ? खर नाही ना वाटत ?' 'नाही ना,' 'हे तुझ्या लक्षात येईल तेव्हा काही लोक दु:खी का असतात, हे तुला कळेल त्यांना दु:खीच व्हायच असत, म्हणून ते दु:खी असतात–आणि रिचर्ड, तस असण्यात काही हरकत नाही–ठीकच आहे ते !' 'हं !' 'रिचर्ड, आपण माणस ही मूलत: खेळाडू वृत्तीची, आनंदप्रिय प्राणी आहोत. म्हणजे आपला गाभा तसा आहे आपला हा गाभा मृत्यू पावत नाही, किंबहुना आपण जखमी होतो, दु:खी होतो, अस आपल्याला वाटत, तो सुद्धा त्या पडद्यावरची चित्र दु:खी होताना दिसतात, तसा आभास असतो रे, पण आपल्याला खरोखरीच अत्यत दु:ख झालय, वेदना झालीय, अस आपण वाटवून घेऊ शकतो. आपणच मारक आहोत, आपणच मरणारे आहोत, दुर्दैवी आहोत, भाग्यवान आहोत, सुखदु:खाच्या झोक्यावर हिंदोळे घेत आहोत, अशी काहीही समजूत आपण आपली स्वत:ची करून घेऊ शकतो '

'म्हणजे–जन्मामागून जन्म... ?' 'चित्रपट किती पाहिलेस आत्तापर्यंत ?' 'आ ? अस अस !' 'अरे, ह्या पृथ्वीवर किंवा आणखी कुठल्या ग्रहावरसुद्धा, ज्या कुठल्या वस्तूला दृश्य आकार आहे, आणि सीमित आयुष्य आहे, अशी प्रत्येक वस्तू हा एक आभास आहे, पण आपण ह्या सर्व आभासातून खूप शिकू शकतो, खूप आनद मिळवू शकतो, खरं की नाही ?' 'ही चित्रपटाशी तुलना कुठपर्यंत ताणणार आहेस ?' 'तू म्हणशील तेवढी !' 'आज तू चित्रपट पाहिलास त्याला एक कारण मी चल म्हटल म्हणून, हे होत ना ? तसच, कित्येक आत्मे एकमेकाबरोबर रहायला मिळाव म्हणून इथे जन्म घेतात. आजच्या चित्रपटातल्या नटनटयानी इतर चित्रपटात ही एकत्र काम केली असतील–तू त्याना त्यातल्या कुठल्याही चित्रपटात प्रथम एकत्र पाहिल असण शक्य आहे, ते तू कुठला चित्रपट आधी पाहतोस त्यावर अवलबून असेल. हे चित्रपट बघायला आपण पैसे देऊन आत जाऊन बसतो, तेव्हा त्या वेळापुरता, त्यात दाखवलेल्या जगावर, वास्तवावर आपण विश्वास ठेवणार असतो, जे घडतय, ते खरं घडलय, अस मानणार असतो. खर तस काहीच नसत ! आपल हे आयुष्यही असच, खरं नसत, पण आयुष्य जगायसाठी चुकवावी लागणारी किंमत द्यायची तयारी नसेल तर ह्या पृथ्वीवर किंवा स्थलकालाची बधनं असलेल्या कुठल्याही ठिकाणी जन्म घेता येत नाही.'

'म्हणजे असेही जीवात्मे असतात, जे जन्मच घेत नाहीत अशा कुठल्याच जगात ?' 'हो ! का ? चित्रपट कधीच न बघणारी माणस नसतात का ?' 'मग त्या जीवात्म्याचा विकास कसा होतो ? वेगळ्या मार्गानं ?' 'अगदी बरोबर. हे स्थलकालसीमित आयुष्य अगदी प्राथमिक शाळेच्या दर्जाचं आहे, पण बऱ्याच लोकाना हा आभास कटाळवाणा वाटला तरीही हवाहवासा वाटतो. खेळ बद करायला त्यांना आवडत नाही' 'कोण लिहित या चित्रपटाच्या कथा डॉन ?' 'अरे, दुसऱ्याला विचारायचे प्रश्न स्वत:लाच विचारून बघ, किती पटपट उत्तर मिळतात. कोण लिहितं हे चित्रपट रिचर्ड ?' 'आपण स्वत:च' 'आणि काम कोण करत त्यात ?' 'आपणच !' 'आणि फोटो घेणारा, ते दाखवणारा, इतर व्यवस्था बघणारा, तिकिट विकणारा हे सर्व कोण ? त्यांच्याकडून काम करवून घेणारा कोण ? अर्ध्यातनच उठून जाण्याचा, हव तवे चित्रपटाची कथाच बदलण्याचा, किंवा तोच तो चित्रपट पुन्हा पुन्हा बघत रहाण्याचा अधिकार कोणाकडे ?' 'अं ? सागू ? ज्याची इच्छा असेल त्याच्याकडे ?' 'मग तूच बघ आता–पुरेस स्वातंत्र्य आहे की नाही ?' 'आपल आयुष्य इतर चित्रपटासारखं आहे, म्हणून तर चित्रपट हा प्रकार इतका लोकप्रिय झाला नसेल ?' 'असेल किंवा नसेलही बर, चित्रपट दाखवत कोण ?' 'आपल मन ? किंवा आपली कल्पनाशक्ती ?' 'आणि हा चित्रपट म्हणजे काय असत ?' 'ते नाही सागता येत मला–' 'आपल्या कल्पनेन आपण जे निर्माण करू ते.' 'होय डॉन, तसही असेल.'

'अस बघ, एखाद्या सिनेमाची रिळ आपण हातात घेतो, तेव्हा त्याची सपूर्ण कथा, त्यात दाखवलेल्या स्थलकालापेक्षा वेगळ्याच काळात आपल्या हातात असते, आणि आपल्याला जर त्या चित्रपटाची कथा माहीत असेल, तर ती बघण्यापूर्वीच काय काय होणार आहे ते आपल्याला ठाऊकच असत. लढाया, रोमाचकारी प्रसग, जित आणि जेते, प्रणयप्रसग, सकट सार काही ! पण ह्या साऱ्यात गुग व्हायला, त्याचा आनद लुटायला, ती रिळ प्रोजेक्टरमधे घालून एक एक दृश्य पडद्यावरून सरकवाव लागत ! कुठल्याही आभासाचा अनुभव घेण्यासाठी त्याला स्थलकालाच्या सीमा असाव्या लागतात आणि म्हणून आपण पैसे टाकून प्रवेश मिळवतो आणि मग थिएटरच्या बाहेर काय चाललय हे विसरून चित्रपटात गुगून जातो'

'आणि जे आपल्याला दु:ख, यातना वाटतात त्याही खऱ्या नसतात ?' 'तसं नाही. तेवढ्यापुरत्या त्या खऱ्याच असतात, पण आपल्या आतल्या खऱ्या आपल्यावर–आपल्या चित्‌शक्तीवर–त्याचा काही परिणाम होत नाही.' 'आणि आदिशक्ती ?' 'ती सपूर्णपणे निर्मम, निरपेक्ष आहे. रिचर्ड, लहान मूल खेळत असत. एक दिवस ते कथानायक बनत, तर दुसऱ्या दिवशी खलनायक. त्याची आई त्याची ही रूप मनावर घेते का ? आपण काय खेळ खेळत असतो, काय आभास निर्माण करत असतो, ह्यात ती आदिशक्ती लक्ष घालत नाही. ती स्वत:च परिपूर्ण असते आणि आपल्यामधील तिच्या परिपूर्ण अंशालाच जाणते.' 'दैवी परिपूर्णतेपेक्षा आपण आपल्या ह्या आयुष्याबद्दलच बोलू या मला वाटत !'

'अरे ! आभाळाकडे बघ ! डॉननं एकदम विषय इतका बदलला, की रिचर्डन आपोआपच वर पाहिल. चद्र उगवत होता नि आकाश खूप सुदर दिसत होत. 'किती सुदर !' 'पण परिपूर्ण आहे आहे का ते ?' आकाश तर नेहमीच परिपूर्ण नसत का डॉन ?' 'म्हणजे रिचर्ड, तुला अस म्हणायचय का, की क्षणाक्षणाला बदलणार आकाश तस परिपूर्णच असतं ?' 'होय रे, खरच की !' 'तसाच समुद्रही नसतो का ? क्षणाक्षणाला बदलणारा आणि तरीही परिपूर्ण ? आदिशक्ती तशीच आहे' 'सपूर्ण, परिपूर्ण व बदलणारी नि तरी क्षणोक्षणी बदलणारी ! समजतय, पटतय कुठेतरी !' 'तू ते केव्हाच पटवून घेतलयस. खर म्हणजे रिचर्ड, कालाची मर्यादा मान्य करून इथे आलास, तेव्हाच !' 'डॉन, ह्या एकाच परिमितीत इथे अडकून रहाण्याचा तुला कटाळा नाही येत ?'

'मी इथेच फक्त आहे, अस वाटत तुला ? तू इथेच आहेस फक्त ?'

'मी जे बोलेन ते चूकच का असतं ?' 'तू बोलशील ते सगळंच चूक असतं ?' 'मला वाटत मी ह्यात पडायलाच नको होत !' 'असं ? मग कशात ? जमीनजुमल्याच्या किंवा विमा उतरवण्याच्या धद्यात ? त्याला पुढे चागला अवसर आहे !...तुला पुढचा विचार करायचा असेल तर !' 'बर बाबा, मला पुढचा, मागचा काहीही विचार करायचा नाहीये ! मी पण मला वाटत ह्या मायावी जगतातला साक्षात्कारी पुरुष होऊन जातो. एखाद्या आठवडचात जमेल का ?' 'एखादा आठवडा म्हणजे फार जास्त वेळ झाला रिचर्ड' रिचर्डनं चमकून त्याच्याकडे निरखून बघितल पण त्याच्या चेहऱ्यावर हास्य नव्हत.

## ९

दिवस उलटत होते, रिचर्ड नि डोनाल्ड शिमोडा गावोगाव त्याची विमानं घेऊन फिरत होते; पण किती गाव फिरलो आणि किती पैसे मिळाले ह्याचा हिशोब न ठेवता, रिचर्ड आता आपण डॉनशी कशाकशाची चर्चा केली, काय काय शिकलो, मधेमधे काय काय चमत्कार झाले, ह्या गोष्टी लक्षात ठेवायला लागला. अन् शेवटी एक दिवस त्याच्या लक्षात येऊन चुकलं, की प्रथम प्रथम त्याला जे चमत्कार वाटत असत, ते म्हणजे चमत्कार नव्हतेच ! **'जग हे सुंदर आहे, संपूर्ण आहे, न्यायी आणि परिपूर्ण आहे असंच समजावं, (त्या पुस्तकात रिचर्डनं एकदा वाचलं) आणि मग हा दृढ विश्वासही बाळगावा की तुम्हाला वाटतंय त्यापेक्षाही त्या विधात्यानं ते कितीतरी जास्त सुंदर बनवलंय्.'**

## १०

अशीच एक शात दुपार. शेतात पडल्या पडल्या वर आभाळाकडे बघत रिचर्ड एक ढग केवळ इच्छाशक्तीनं अदृश्य करायचा प्रयत्न करत असतो. कितीही प्रयत्न केला तरी ढग काही हलत नाही. शेवटी रिचर्ड डॉनला ढोसतो 'मला नाही जमत हे' 'जमेल, जमेल' डॉननं उघडलेले डोळे पुन्हा मिटले ! 'डॉन, मी खूप प्रयत्न केला; पण जरा बाजूला होतोयसं वाटतंय तोवर तो ढग आणखी मोठा होतो.' एक सुस्कारा टाकून डॉन उठून बसला. 'बरं. दाखव मला एखादा ढग पाहू– लहानसा हं' रिचर्डनं एक प्रचड काळाकुट्ट ढग निवडला ! 'का रे बाबा ?' 'असच ! 'आव्हान' असल की चांगलं ना म्हणून !' 'बरं बरं, कळलं हं ! बघतो प्रयत्न करून. कुठला ढग म्हणत होतास ?' रिचर्डनं तो प्रचड काळा ढग दाखवायला वर बोट करून बघितल तर तो काळाकुट्ट राक्षस तिथं नव्हताच ! त्यानं हतबुद्ध होऊन कौतुकानं डॉनकडे बघितल. डॉन म्हणाला, 'काम असं असावं, की करावसं वाटेल ! नाही, पण हे करण खरंच अवघड नाही. तू करून बघ आता' त्यानं रिचर्डला एक छोटासा ढग दाखवला. रिचर्ड त्या ढगाकडे टक लावून बघत राहिला, त्याला घालवायसाठी त्याच्यावर सर्व लक्ष केन्द्रित करून राहिला, ढग तिथं नाहीच आहे, अशी कल्पना करत राहिला, हळूहळू जरा वेळानं तो ढग नाहीसा झाला, शेजारचे दुसरे ढग आणखी मोठे झाले 'अरे ! किती वेळ ?' 'वा ! पहिल्यादाच इतकी अशक्यप्राय गोष्ट केली मी आणि तू नुसता 'किती वेळ' म्हण ! खर साग, किती अवघड काम केलं का नाही मी ?' 'खरंय्, केलस तुझ सगळ लक्ष त्याच्याकडेच लागल होत, पण तरी तो तुझ्यापुरता तिथून नाहीसा झाला !' 'लक्ष म्हणजे ? अरे जंग जग पछाडल मी त्याला, होती नव्हती तेवढी शक्ती पणाला लावून' 'हे नकारात्मक लक्ष देण झाल रिचर्ड तुझ्या आयुष्यातला एखादा ढग तुला घालवून द्यायचा असेल ना, तेव्हा अस सर्व लक्ष केंद्रित करून त्याच्यामागे लागण्यापेक्षा मन स्वस्थ, स्थिर कर आणि त्या ढगाचा विचारच करायच सोडून दे. ढग आपोआप नाहीसा होईल !' पुस्तकात लिहिलं होत–

**'अमुक दिशेनं आणि अमुक गतीनं ढग का जातोय् हे ढगाला माहीतच नसतं त्याला फक्त आतून जाणवतं की आपल्याला असं जायचंय, आणि तो जातो. पण आकाश ? त्याला सर्व ढगांच्या हालचाली, त्यांचे लहान मोठे आकार, सगळयाचा कार्यकारण संबंध माहीत असतो. तुम्ही क्षितिजाच्या पलीकडे बघू शकण्याइतकं उंच, इतकं समर्थ स्वतःला बनवाल, तेव्हा हा कार्यकारणभाव तुम्हालाही समजेल.'**

## ११

**'तुमच्या मनात एखादी इच्छा निर्माण होते तेव्हाच ती पूर्ण करायचं सामर्थ्यही तुमच्यात आलेलं असतंच. एवढंच, की ती आपोआप पूर्ण होणार नाही, त्यासाठी तुम्हाला परिश्रम करावे लागतील.'**

अशाच कुठल्याशा गावापासून दूर असलेल्या एका मोठ्या कुरणात त्यांनी आपली विमानं उतरवली होती. शेजारीच एक मोठं तळ होतं. 'ऐकलस का मी काय सागतोय ते ? स्वस्थ बस, नि मी काय करतोय ते बघ. मी जे करणार आहे, तो चमत्कार नाही. ॲटॉमिक फिजिक्सचं पुस्तक वाचून बघ– एखाद्या पोरालाही जमेल हे.' आणि तो उठून त्या तळ्याजवळ गेला; अन् जसा जमिनीवर चालत होता तसाच पुढे त्या पाण्यावर चालत राहिला रिचर्डला वाटलं, हे पाणीच आहे का दगडावर दिसणारं मृगजळ ? डॉन त्यावर व्यवस्थित उभा होता, पाणी त्याच्या बूटांवरसुद्धा उडत नव्हतं ! 'ये, तू पण अस कर' रिचर्ड उठून उभा राहिला, नि चालू लागला. तोही सरळ पाण्यावरनं चालत डॉनकडे गेला ! 'डॉन ! तू हे काय चालवलयस?' 'केव्हाना केव्हा जे प्रत्येकाच्या लक्षात येतं, ते मी तुला दाखवून देतोय् कारण तू आत्ता इथं माझ्याजवळ आहेस. हे बघ, हे पाणी दगडासारखंही असू शकतं–' त्यानं एक पाय दगडावर हापटावा तसा त्या पाण्यावर हापटला– 'किंवा नसतंही' त्यानं पुन्हा पाय हापटला नि पाणी सगळीकडे उडालं !' 'आलं लक्षात ?'

'किती चट्दिशी चमत्कारांचीसुद्धा आपल्याला सवय होते !' रिचर्डला वाटलं, 'पाण्यावर चालणं हे सहज शक्य आहे, अगदी नैसर्गिक आहे ! –बरं मग ? पुढे काय ? समजा पाणी दगडासारखं आहे, मग आपण ते पिऊ कसं शकतो ?' 'त्याच्यावर चालू शकतोयस ना,

तसच. रिचर्ड, ते जे चिरंतन पुरातन तत्त्व आहे ना, त्याला स्वत चा आकार किंवा घन, वायू, द्रव, कसलीच स्थिती नाही. आपण कल्पना करू तस ते आपल्याला दिसत.' डॉननं मग त्याला जमिनीत पाण्यात बुडल्यासारख बुडून दाखवल रिचर्डही जमिनीत बुडला नि चिखलान माखून निघाला— डॉनच्या अगावर धुळीचा कणही नव्हता ! रिचर्डला मात्र मग परत पाण्याशी जाऊन सगळ धुऊन काढाव लागल. तो कपडे वाळत घालत होता, तेव्हा डॉन म्हणाला, 'रिचर्ड, आज जे शिकलास, ते विसरू नको आपल्याला मनातन समजलेल्या गोष्टीकडे चमत्कार किंवा स्वप्नं म्हणून दुर्लक्ष करून त्या विसरून जाण सोपं असत. जी खरोखर सुदरता आहे, ते स्वप्नही नसत, नि चमत्कारही नसतो. हे जग कधी कधी तुम्हाला खूप सुदर दिसतं. सूर्यास्त, ढग, आकाश— 'स्वप्नातल्यासारख सुदर!' तुम्ही म्हणता पण स्वप्न असतं ते प्रतिबिंब, त्यातल सौंदर्य खरच असत आल लक्षात तुझ्या?' रिचर्डला कळल्यासारख वाटल पण स्वच्छ लक्षात नव्हतं आल. त्यान हळूच पुस्तक उघडलं.

**'हे जग, हे तुम्हाला शिकवणारं पुस्तक आहे; ते म्हणजेच सत्य नव्हे; पण सत्याची अभिव्यक्ती तुम्ही तेथे करू शकता. अर्थात तुम्ही तेथे निरर्थक किंवा खोटंही लिहू शकता, किंवा पानं फाडूनही टाकू शकता. ह्या पुस्तकाचा काय उपयोग करायचा हे ठरवायचं तुमच्या हातात आहे.'**

## १२

**'त्या परम शक्तीला सीमा आहेत असं मानणं हाच मोठा गुन्हा म्हणता येईल— तेवढं करू नका !'**

अशीच आणखी एक दुपार. गावातन दोघे परत चालले होते चालत चालत. 'डॉन, तुला भिंतीतन आरपार पलीकडे जाता येईल, नाही ?' 'अहं' 'खोटं बोलतोयस— माझ्या प्रश्नातले शब्द बरोबर नसतील म्हणून—' 'कसं ओळखलस ? तुझ्या प्रश्नात तू हे गृहीत धरतोयस की मी स्थळकाळानं सीमित आहे !' रिचर्ड वैतागला. हा डॉन सरळ का नाही सांगत तो भिंतीच्या आरपार कसा जातो ते ? 'विचार नेहमी नेमका असला पाहिजे रिचर्ड' 'बर. मग प्रश्न असा होईल, की स्थलकालानं सीमित असा तुझ्या शरीराचा हा आभास जो आहे, तो तू भिंतीचा घन आभास जो असतो, त्याच्या पलीकडे नेऊ शकतोस ?' 'बरोबर ! आणि बरोबर विचारलस, त्यामुळं प्रश्नाच उत्तर प्रश्नातच येऊन गेल की !' 'नाही. प्रश्न असा आहे की तू भिंतीच्या मधून कसा जातोस ?' 'झाल परत ? मी भिंतीच्या मधनं जात नाही !' 'डॉन, हे सारा वेळ नेमक बोलण कठीण आहे. मला काय विचारायचंय, हे तुला चागलं ठाऊक आहे' 'कठीण आहे म्हणून सोडून थोडच द्यायच ? लहान होतास तेव्हा चालण किती कठीण होत ? आता वाटतय कठीण ?' 'हूं ! चल जाऊ दे— विसरून जा माझा प्रश्न.' 'मी विसरून जाईन, पण तू विसरशील का ?' 'मग तुला असं म्हणायचंय का, की तुझ शरीर आणि ती भित दोन्ही आभास असले तरी त्याच अस्तित्व खर आहे ?' 'मी कुठ काय म्हणतोय ? तू म्हणतोयस !' 'पण खर आहे ना ते ?' 'अर्थातच' 'मग तू हे कस करतोस ?' 'रिचर्ड, मी काही करत नाही. पण ती क्रिया झालीय असा तुम्हाला भास होतो, आणि म्हणून तसं झालेलं दिसतं.' 'मग तर सोपं आहे.' 'होय ना ! चालायला यायला लागल्यावर चालण सोप असत ना, तसंच'

'डॉन, तू काही म्हणालास तरी भिंतीच्या आरपार जाणं मला आत्ता तरी अवघड नाही, अशक्य आहे.' 'पाण्यावरून चालू शकलास आणि हे अशक्य आहे ?' 'ते सोप होत, पण हे अशक्य...' 'स्वतःच्या मर्यादाच समर्थन करायला लागलात की तुम्हाला मर्यादा पडल्याच म्हणून समजा !' डॉन पुस्तकातल वाक्य बोलला ! 'अरे रिचर्ड, त्या दिवशी तू जमिनीच्या आत पाण्यासारखा नव्हता बुडलास ? मग भित म्हणजे उभी जमीन—काय फरक आहे दोन्हीत ?' 'आं ? हा हा, तेही खरच. जरा जरा प्रकाश पडतोय आता' 'पडतोय ना ? मग आता एकट्यानं विचार करत रहा जरा. रस्त्याच्या कडेला धान्याच्या एका मोठ्या कोठाराची भित होती. रस्त्यानं चालता चालता शॉर्टकट घेऊन कडेच्या पायवाटेन निघाव तसा डॉन एकदम सहज वळला, नि त्या भिंतीत अदृश्य झाला ! रिचर्ड स्तिमित होऊन बघत राहिला, नि मग एक दिवस आपणही असं करून दाखवू असा स्वतःला धीर देत तो विमानाकडे परत आला.

तो परत आला तेव्हा डॉन त्याच्या विमानाच काहीतरी काम करत होता. 'डॉन मला वाटायला लागलंय, की तू काही खरा ह्या जगात जगतच नाहीस !' 'नाहीच ना मग ! तू पाहिलायस एक तरी माणूस ह्या जगात जगणारा ?' 'अरे ! म्हणजे काय ? मी स्वत च नाही का ह्या जगात जगतोय ?' 'वा वा ! छान ! रोज नवं शिकत असतोस हं तू ! शाबास ! आज जेवायला घेऊन जाईन मी तुला !' रिचर्डला कोडं पडलं. पण डॉन टिंगल करतोय्स वाटत नव्हतं. 'डॉन, काय अर्थ तुझ्या बोलण्याचा ? मी ह्या जगात जगतोय, माझ्यासारखे लाखो इतर लोकही जगतायत, तू मात्र...' 'झालं ? घालवलस ना जेवण ? मला वाटतं कळल तुला—पण छे !' त्याच्या नजरेत कीव होती, जरा रागही होता. 'अरे, एखादा शेअर-ब्रोकर जगतो, त्याच जगात तू जगतोस का ? एखाद्या बुद्धिबळपटूचं जग आणि तुझं जग एकच आहे का ? तू, तुझं हे जुनं विमान, त्याची डागडुजी, शेतकऱ्याच्या परवानग्या, खेड्यातल्या लोकाना विमानातनं फिरवून आणणं, ह्या तुझ्या जगात किती लोक आहेत सर्वस्वी तुझ्याच-सारखे ? लाखो लोक ह्या जगात जगतायत असं तू मला सागतोस ? अरे, ह्या लाखो लोकातला प्रत्येकजण आपापल्या स्वतंत्र जगात जगत नाही का ?' 'डॉन, तू मला जेवायला—' 'अहं—नेलं असत आनंदानं, पण आता नाही !' रिचर्डन ह्या जगात तू जगत नाहीस असं त्याला परत कधी म्हटल नाही, पण पुस्तकातल्या एका वाक्याचा अर्थ कळायला मात्र त्याला खूप दिवस लागले.

**'तुम्ही स्वत. एक काल्पनिक व्यक्ती आहात, असं थोडे दिवस धरून चालून बघा. तुमच्या लक्षात येईल की, हाडामांसाच्या खऱ्या माणसापेक्षा काल्पनिक व्यक्तिमत्त्वंच खूपदा जास्त खरी असतात'**

## १३

**'तुमच्या सदसद्विवेक बुद्धीचा कौल नेहमी घेत रहा. तुमचा आत्मकेंद्रितपणा किती प्रामाणिक आहे, त्याचा तो परिमाण आहे'** Your conscience is the measure of the honesty of your selfishness, listen to it carefully. अस मूळ वाक्य आहे, त्याचा मी वरीलप्रमाणे अनुवाद केला आहे. वाचकानीही त्याचा काही वेगळा अनुवाद सुचल्यास बघावा.)

'आपल्याला जे करायचं असेल ते करायला आपण मोकळे आहोत.' जगरहाटीचा हा नियम किती स्वच्छ, सोपा नि सरळ आहे, नाही रिचर्ड ?' एका रात्री डॉन म्हणाला. 'एक महत्त्वाच राहिल की', 'काय बुवा ?' 'आपल्याला जे करायचं असेल ते करायला आपण मोकळे आहोत, तस करताना आपण दुसऱ्या कोणाला दुखवत नाही, तोपर्यंत असच म्हणायच होतं ना तुला ?'

एकाएकी भोवतालच्या अंधारातून कोणीतरी तिथे असाव तसा आवाज आला. 'कोण आहे ?' रिचर्डनं विचारल. 'मी बघतो.' म्हणून डॉन उठून अंधारात गेला, मग कोणाशीतरी बोलला, हसला नि मग म्हणाला, 'या ना पुढे, या या' येणाऱ्या व्यक्तीचे कपडे, आवाज, बोलण्याची धाटणी, रूपरंग सारच विचित्र होत; त्या प्रदेशात कधीच न दिसणार. चेहऱ्यावर अगतिक भाव होता. तो शेकोटीजवळ आला. 'काही मदत हवीय का तुम्हाला ?' रिचर्डन उपचार म्हणून विचारल. 'हो ना, हवीय, माणसाच रक्त हेच माझ अन्न आहे. थोडं, अगदी थोडं रक्त पिऊ द्याल तुमचं ?' रिचर्ड सतापून ताडदिशी उठून उभा राहिला. तो माणूस घाबरून, आणखीच अंग चोरून मागे सरकला. 'माफ करा, तुम्हाला त्रास द्यायची इच्छा नाही माझी, पण मी आपल्या इच्छेनं ह्या जन्माला कशाला आलो असतो? पण तरी आलोय, नि रोज रात्री थोड माणसाचं रक्त मला नाही मिळाल तर मला भयकर वेदना होतात. अशा काही रात्री गेल्या, तर मी मरूनच जाईन. माझ्यावर दया करा नि थोड रक्त मला पिऊ द्या !' तो पुन्हा पुढे सरकू लागला 'एक पाऊल पुढे टाकलत तर जीव घेईन मीच तुमचा !' रिचर्ड ओरडला. एक सुस्कारा टाकून तो माणूस डॉनकडे वळला. 'झाल माझ काम ? जाऊ मी ?' 'हो, झाल मला वाटत !' आणि बघता बघता तो माणूस दिसेनासा झाला ! रिचर्ड भीतीन, संतापानं अजून थरथरतच होता. 'डॉन, ह्या असल्या क्रूर थट्टा मला आवडत नाहीत. हे काय चाललंय काय ? कोण होता तो ?' 'तो होय ? तो कोणी नव्हता. असा जो प्राणी असू शकेल त्याची कल्पनेन मनासमोर उभी केलेली आकृती होती, जी तुला खरी जिवत वाटली ! मुख्य मुद्दा लक्षात आला ना पण तुझ्या ?' 'कसला मुद्दा ?' 'त्या माणसावर एवढ सतापलास, तेव्हा तू तुला जे करायच होतं, तेच केलंस, त्याला त्रास होईल हे माहीत असून सुद्धा !' त्याला खूप त्रास होईल, अस त्यानं तुला सागितलं सुद्धा. 'अरे ! पण तो माझं रक्त मागत होता !' 'आपण जेव्हा कोणाला तरी सागतो ना की ते आपल्या मनासारखे वागले नाहीत तर आपल्याला दुःख होईल, तेव्हा आपणही त्याच रक्त मागत असतो !'

रिचर्ड खूप वेळ गप्प बसून विचार करत राहिला. त्याच्या आजपर्यंतच्या मानवी व्यवहाराच्या कल्पनेत हे बसत नव्हत. कुठेतरी काहीतरी स्पष्ट होत नव्हत. डॉन मग त्याला म्हणाला, 'तुला गोंधळल्यासारख वाटतय, कारण तू एक अशक्य नीतिनियम आत्तापर्यंत शक्य आणि न्याय्य समजत आलास. 'दुसऱ्याला दुखवण' हे शब्द ! आपण दुखावल जायच का नाही, हे जो तो स्वत.च ठरवतो; आपणच ठरवतो. कोणी कोणाला दुखवू शकतच नाही. तो माणूस तुला म्हणाला ना, की तू त्याला रक्त दिल नाहीस तर त्याला दुःख होईल ? दु.ख करून घ्यायच का नाही, हा त्याचा प्रश्न होता, त्याबद्दल निर्णय घेण्याच स्वातत्र्य त्याला आहे तू काय करावंस हे ठरवायच स्वातत्र्य तुला आहे–त्याला रक्त दे, त्याच्याकडे दुर्लक्ष कर, त्याला बाधून ठेव किंवा मारून टाक त्याला जीव वाचवायचा असेल तर प्रतिकार करण्याच स्वातत्र्य त्याला आहे. प्रत्येकजण आपल्याला हवा तो मार्ग पत्करायला स्वतंत्र आहे पुन्हा सागतो, ऐक. आपण सगळे, आपल्याला जे करायचं असेल, ते करायला मोकळे आहोत.'

## १४

**'तुमच्या आयुष्यात येणारी प्रत्येक व्यक्ती नि प्रत्येक प्रसंग, तुम्हीच खेचून आणत असता. त्यांचा उपयोग तुम्ही कसा करायचा ठरवता, हे तुमच्यावर अवलबून असतं.'**

असेच एकदा रिचर्ड आणि डॉन एका रेस्टॉरंटमध्ये बसले होते. 'डॉन तुला कधी एकटं एकटं नाही का रे वाटत ? बघ ना, ही सगळी माणसं – थोडासा वेळ आपण त्याना भेटतो, पुन्हा कधी बघतही नाही. मीच गावोगाव फिरत असतो, होणार कसे मित्र ? का होऊ शकतील रे ?' 'आता मला बोलू देशील ?' हो, बोल ना.'

डॉन थोडा वेळ गप्प राहिला, मग बोलू लागला, 'हे बघ रिचर्ड, आपण माणस एखाद्या लोहचुबकासारखी असतो – नाही, तसही नाही – ताब्याची तार गुडाळलेल्या लोखडाच्या तुकड्यासारखी. आपल्याला स्वत.मध्ये चुबकीय तत्त्व हवं असेल तेव्हा निर्माण करता येतं. आपण मनापासून प्रयत्न केला, तर आपली इच्छा असेल त्याला आपण आकर्षित करू शकतो. जो लोहचुबक असतो ना, तो आपल्याला हे कस जमेल ह्याची काळजी करत नाही, नाही का ? तो आपला लोहचुबक असतो आणि तो तसा असतो म्हणून काही वस्तू त्याच्याकडे आकर्षित होतात, काही होत नाहीत.' 'हो, पण हे आपण कस करू शकतो ?' 'आपण करतच नाही. समान वस्तू एकमेकाकडे आकर्षित होतात. आपल्या जागी शात, स्वस्थ रहाव. आपण जसे असतो त्या आपला प्रभाव आपल्या सभोवती पडतच असतो. स्वतःची मात्र खात्री असावी की आपण जसे आहोत आणि जे करतो आहोत, तेच आपल्याला मनापासून करायचय अस झालं म्हणजे ज्यांना आपल्यामध्ये खरोखर रस नसतो, ते आपल्याजवळ येतच नाहीत, ज्याना असतो ते येतात आणि ज्याच्यापासून आपल्याला काही शिकण्यासारख असत तेही येतात.'

'पण नुसत्या ह्या श्रद्धेच्या बळावर अस वाट पहात रहाताना एकटं नाही वाटत ?'

डॉनन रिचर्डकडे विचित्र नजरेनं पाहिलं. 'श्रद्धा? कसली आलीय श्रद्धा? श्रद्धेची नाही, कल्पनाशक्तीची जरूर आहे.' समोरच्या टेबलावरच्या वस्तू त्यान बाजूला सारल्या आणि एक तिळाचा दाणा त्या मोकळ्या जागेत मध्ये ठेवला – 'ह्या तिळाएवढी कल्पनाशक्ती असली ना, तरी पुरेशी आहे' रिचर्ड वैतागून म्हणाला, 'तुम्ही साक्षात्कारी पुरुष एकदा जमून काय ते ठरवत का नाही? मला वाटायचं सर्व जग आपल्याविरुद्ध असेल, तरी माणसानं श्रद्धा ठेवावी.' 'श्रद्धा हा फार जुना शब्द झाला आता; कल्पनाशक्ती हा जास्त चागला शब्द आहे.' 'हं? म्हणजे आपण असू तिथं आपला प्रभाव पडेल आणि एखादी सुदर स्त्री त्या शेतात येऊन ठेपेल अशी कल्पना करत राहू? काय उपयोग? अखेर ती फक्त माझी कल्पनाच ना?' 'फक्त कल्पनाच ना? अर्थात फक्त कल्पनाच. हे जग म्हणजेच सगळा नुसता कल्पनेचा खेळ आहे, विसरलास वाटत? आणि अरे, तुमची कल्पनाशक्ती कशीही धावली तरी त्यानं फक्त तुमचे आभास बदलत जातात. ती जी मूलभूत शक्ती आहे ना, ती आहे तशीच रहाते, तिच्यामध्ये काहीही बदल होत नाही. आपण आपल्या कल्पनानीच वेगवेगळी रूपं तयार करतो.

आपल्याला जी स्वप्न पडतात त्याचे अर्थ काय अस तू विचारत होतास ना? जागेपणीच्या तुझ्या जगात जे जे काही आहे – उदाहरणार्थ तुझी विमानं – त्याचा अर्थ काय, ह्याचा विचार केलायस कधी? तुला स्वप्नात विमान दिसली तर त्याचा तू काय अर्थ लावशील? 'स्वातंत्र्य, सुटका, उंच उडून बधनातून मुक्त होण.' 'होय ना? मग झाल तर, जागेपणी स्वप्न बघतो आपण, त्याचही असच असत – तुम्हाला ज्या गोष्टी जखडून ठेवतात अस तुम्हाला वाटत – दैनंदिन काम, वरिष्ठाची हुकूमत, कटाळा, गुरुत्वाकर्षणसुद्धा – त्या सगळ्यापासून तुम्ही मुक्ती मिळवू शकाल. तुमच्या हे लक्षात येत नाही की, तुम्ही मुक्तच आहात, नेहमी मुक्तच होतात. 'अखेर ती फक्त कल्पनाच' असं म्हणताना हे लक्षात घे ना!'

रिचर्ड परत मूळ पदावर आला 'म्हणजे तुला कधी एकाकी वाटत नाही डॉन?' 'माझी इच्छा नसेल तर नाही आपल्या ह्या जगात न वावरणारे पण आपले हितचिंतक असतातच ना, तुझेही असणारच' 'पण मी त्या काल्पनिक विश्वाच म्हणत नाहीये, ह्या जगाच बोलतोय. आपण एखाद्या लोहचुंबकासारखे आहोत अस तू म्हणतोस ना, मग त्याच एखाद प्रात्यक्षिक दाखव मला मला शिकायचय 'चमत्कार' करायला'

'मग कर ना. कर कल्पना एखद्या वस्तूची, कल्पना कर की, ती आहेच इथ तुझ्याजवळ' 'कोण? एखादी सुदर मुलगी?' 'अहं, पहिल्यांदा काहीतरी छोटं.' 'छोट? अ – वरं एक निळं पीस.' निळ पीस?' 'हो, छोट काहीतरी म्हणालास ना? मग पीस' 'बरं बरं, पीस. आता त्या पिसाच्या प्रत्येक भागाचा बारकाईनं विचार कर आणि तस ते डोळ्यासमोर आण.' 'आणलं' 'त्याच्याभोवती सोनेरी प्रकाश आहे अशी कल्पना कर.' 'केली' 'उघड आता डोळे' 'कुठय माझ पीस?' 'अगदी नीट कल्पना केलीस ना, मग येतच असेल ते आता'

सबंध दिवस रिचर्ड पिसाची वाट पहात बसला. ते दिसल नाही. मग रात्री जेवताना दुधाच्या डब्यावर एकाएकी त्याला निळ्या पिसाचं चित्र दिसलं. 'डॉन, हे बघ निळ पीस!' 'मला वाटलं तुला खरं पीस हवं होतं!' 'अरे हरकत नाही, सुरुवातीला नुसतं चित्रच.' 'तू कल्पना करशील ना, तेव्हा त्या वस्तूबरोबर स्वत:ला पण डोळ्यासमोर आण म्हणजे ती वस्तूच येईल, चित्र नाही. तेव्हा मी सागायला विसरलोच तुला.' रिचर्डला अजून पिसाच्या चित्राचच अप्रूप वाटत होत. 'वा! आलं की मला! मी पिसाची इच्छा केली, नि पीस दिसल, ... एक दिवस – सारी दुनियाच ...!' 'रिचर्ड!' खूप गभीर आवाजात डॉन म्हणाला, 'साभाळून! बेतान! पश्चात्ताप करायची वेळ येईल बरं!'

## १५

**'तुम्ही जे सत्य बोलता, त्याला भूतकाळ, भविष्यकाळ नसतो. ते निखळ सत्य असतं आणि एवढंच असणं त्याला पुरे असतं.'**

एक दिवस डॉन रिचर्डला म्हणाला, 'अरे, नुसता जगाच्या ह्या कोपऱ्यात हे विमान उडवत बसून तुला जगावर काय छाप पाडता येणार नि कशी?' 'हे बघ डॉन, मला जगावर छाप पाडायची नाहीये मला माझं आयुष्य माझ्या आवडीप्रमाणे जगायचय, हे एक' 'बर, हे एक, दुसर?' 'दुसर असं की 'प्रत्येकजण त्याला जे करायच असेल ते करायला मोकळा आहे!' तिसरं अस, की जबाबदार माणूस कोण, तर जो आपल्या वागण्याचं समर्थन देऊ शकतो, आणि आपण फक्त एकाच व्यक्तीला समर्थन द्यायला बाधलेले असतो, कोणाला?' 'स्वत:ला!' डॉनन उत्तर दिलं! रिचर्ड पुढे बोलत राहिला, 'आणि स्वत:ला समर्थन द्यायलासुद्धा सारा वेळ काय म्हणून बाधलेल असाव? वागलात बेजबाबदार कधी, तर काय बिघडल? पण आपण जे करतो, ते तस का करतो, जी निवड करतो तीच का करतो, असे प्रश्न बऱ्याच जणाना पडतात, मग ती क्रिया किंवा निवड अगदी साधी असो की महत्त्वाची असो!... डॉन, फार लाब उत्तर दिलं का मी?' 'कुठल्या कुठेच पोचलास!' 'बर, मी जगावर छाप कशी पाडणार, असच ना? ठीक मग समज मी असं म्हटल, की, जगाला काय करायच ते करू दे, मी मला काय पाहिजे ते करीन.' 'वा! वा! अगदी साक्षात्कारी महात्म्यासारख मोजक्या शब्दात, उद्धृत करता येईल, अस बोललास की! आणि शिवाय कोणी फारसा विचार केला नाही, तर हेही लक्षात येणार नाही, की ह्या प्रश्नाच हे उत्तर होत नाही!'

रिचर्डला मजा वाटायला लागली. 'आणखी विचार ना प्रश्न. मजा येतेय विचार करायला.' तो म्हणाला, 'विचारू? साग. 'मी लोकाशी मायेनं वागतो. लोकानीही मला प्रेमानं वागवावंसं मला वाटतं. त्यानी मला जसं वागवावस मला वाटतं तसा मी त्याच्याशी वागतो, तरीही मला मित्र असे नाहीत आणि मी एकाकी आहे.' काय म्हणशील ह्यावर?' 'मला तर समजतच नाही ह्यावर काय म्हणायचं ते.' 'काय? वा रे! असं कस म्हणता येईल ज्ञानी पुरुषाला?' 'अरे मजेत म्हटले.' 'लोक आपले प्रश्न नि अडचणी

घेऊन जेव्हा तुझ्याकडे येतील, तेव्हा ते गमतीन दिलेली उत्तर ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतात. तुम्ही साक्षात्कारी आहात ना, मग सोडवा आम्हाला आमच्या अडचणींमधून, हीच अपेक्षा असते त्याची, अस समजतच नाही वगैरे म्हणायला लागलास ना, तर तुझे भवत म्हणून आलेले लोकच उभा जाळतील तुला!'

रिचर्डला परत खुमखुमी आली. 'बर मग ऐक तर त्यानी तुम्हाला जस वागवावस वाटत तस तुम्ही लोकाशी वागा, हा नियम काही कामाचा नाही. स्वतःला शारीरिक पीडा करून घेण्यातच आनद वाटणारे काही असतात. असा एखादा तुम्हाला भेटला नि तो तुम्हालाही शारीरिक पीडा देऊन 'आनद' देण्याचा प्रयत्न करायला लागला, तर? किंवा एखाद्या मगरीला देव मानणाऱ्यान तुम्हाला मगरीच्या तळ्यात ढकलायला बघितल तर? आणि रस्त्याच्या कडेला पडलेल्या माणसाच्या जखमावर जो मलम लावतो, तो कशावरन ठरवतो की त्याला मलम हवय म्हणून? समजा तो औषध न लावता बरं व्हायचा प्रयत्न करत असेल, तर?

आणि समजा तुम्ही अस ठरवलत की लोकाना जस वागवून हवं असेल तस वागवा, तरी त्याना कस वागवून हवंय, हे तुम्ही कसं ठरवणार? तेव्हा खर म्हणजे असच करता येईल, की तुम्हाला प्रामाणिकपणान इतरासाठी जे करावस वाटेल, ते करा काय डॉन, फार लांबण लावली का?' 'नेहमी प्रमाणेच! थोडक्यात काय ते सागितलं नाहीस ना, तर नव्वद टक्के लोक निघून जातील कटाळून.' 'गेले तर गेले!' रिचर्डन टणकावलं, 'मला जे वाटतय, ते मला जसं सागायचय तस मी सांगणार! नसेल ऐकायच तर राहिल– बसा विमानात, टाका तीन डॉलर, नि निघा!' 'रिचर्ड' डॉन उठून उभा रहात म्हणाला, 'तुला ठाउक आहे? तू ज्ञानी पुरुष होऊन चुकलायस आज, आत्ता? कस वाटतय महात्मा असण?' 'अत्यत वैताग आणणार!' डॉन त्याच ते खास चिमूटभर स्मित करत म्हणाला, 'अरे, सवय होते त्याची!'

**'तुमच्या ह्या जगातला कार्यभाग सपला आहे की नाही हे ठरवणं सोपं आहे. तुम्ही जिवंत असाल तर तो संपलेला नाही'**

## १६

अशाच कुठल्या तरी लहानशा गावातल्या हार्डवेअरच्या दुकानात रिचर्डला हवे असलेले नटबोल्ट तो शोधत होता, तेव्हा त्याच दुकानात विकायला ठेवलेली एक अगदी स्वस्तातली गिटार उचलून डॉन त्याच्यावर एक खूप जुन छानस गाण वाजवायला लागला. रिचर्डला लहानपणी ते गाण खूप आवडायच 'डॉन, तुला इतकी छान गिटार वाजवता येते, हे नव्हत माहीत मला!' डॉन गमतीन म्हणाला, 'अरे! समज येशू ख्रिस्ताला कोणी म्हटल असत की ही माझी गिटार तुम्ही वाजवून दाखवा, तर तो काय म्हणाला असता, 'मला नाही येत' म्हणून? किंवा एखादा रशियन नाहीतर इराणी त्याच्याकडे गेला असता, तर येशूनं त्याला सागितल असत का, की बाबा रे, तू काय बोलतोयस ते मला कळत नाही किंवा एखादा विमान उडवून पैसे मिळवणारा भेटला असता, तर, की बाबा रे, मला तर विमान नाही चालवता येत?' 'म्हणजे तुला काहीही करता येत, असच ना?' 'तुलाही येत मला येत हे मला ठाऊक आहे, एवढाच फरक.' 'मी अशी गिटार वाजवू शकेन?' 'अह, तू तुझ्या पद्धतीन वाजवशील, माझ्या नाही.' 'कशी पण?' 'मनातनं ह्या विचार प्रथम काढून टाक की तुला गिटार येत नाही तुमच जन्मजन्मातरीच कुठल तरी नातं आहे–आणि ते असतच–अशा विश्वासान गिटार उचल, ती तू वाजवू शकणार आहेसच, अशा विश्वासान तुझ्या बोटाना गिटारच्या तारावरन मुक्तपणान फिरू देत, नि बघ सगीत निघत का नाही!' रिचर्डन कुठतरी वाचल होत की समोहिनी विद्येन विद्यार्थ्यांना एखादी कला पट्दिशी आत्मसात करायला शिकवता येत आणि माणस उत्तम चित्रकार किंवा वादक किंवा लेखक बनू शकतात. 'पण डॉन, मला गिटार वाजवता येत नाही, हे विसरून जाण अवघड आहे की रे!' 'मग तुला गिटार शिकायला खूप कष्ट पडतील, बरीच वर्षं परिश्रम करावे लागतील आणि जेव्हा तुझ्या अतर्मनाला अस वाटेल, की चागलं 'संगीत' निर्माण करायचा हक्क मिळावा इतकी कठोर साधना आपण आता केली आहे, तेव्हा तू यशस्वी होशील.' 'पण मग विमान चालवणं पण अवघड असत म्हणतात, ते कस मला लवकर आल?' 'ते याव अशी तुझी आत्यतिक इच्छा होती?' 'अतिशय दुसऱ्या कुठल्याही गोष्टीपेक्षा. अच्छा–! तुला असं म्हणायचय की गिटारबद्दल अस कधी वाटलं का?' 'गिटारबद्दल अस कधी वाटल का?' 'म्हणजे? डॉन! माझ्या डोक्यात आत्ता प्रकाश पडतोय, की तू विमान चालवायला पहिल्यादा कधी शिकलाच नव्हतास.' 'आहेस, हुशार आहेस!' 'लायसेंस तरी आहे का तुझ्याकडे?' 'लायसेन्स? हा हां, म्हणजे ते कागदाचं चिटोर होय?' त्यान खिशात हात न घालताच उजवा हात पुढे केला नि लायसेन्सचा कागद दाखवला! नवा कोरा! पण त्यावर जरूर ती सर्व माहिती लिहिलेली होती!

## १७

आणि मग डॉनन एक रेडिओ मुलाखत दिली. तिथ डॉनची एक अगदीच वेगळी प्रतिमा रिचर्डन बघितली मुलाखत घेणाऱ्याचं नाव होत जेफ साइक्स. पण ऐकणाऱ्यापैकी ज्याना प्रश्न विचारायचे असतील त्यांचे प्रश्नही फोनवरून सरळ पुनःक्षेपित करता येत होते, त्यामुळे श्रोते आणि डॉन ह्याच्यामधला तो सवादच होत होता आणि तो तीन तास चालला होता जेफ साइक्सन एक साधा प्रश्न विचारून सुरुवात केली, की तुम्ही ही विमान उडवता ते कायदेशीर आहे का, त्याला परवाना लागतो का, वगैरे पण डॉनन काय उत्तर द्याव! तो म्हणाला, 'जेफ, आपल्याला जे करायच असत ते करण्यापासून कोणीही थाबवू शकत नाही!' आता हे खर असल, तरी जरा नीट, चागल्या शब्दात सागता आल असत की! ताबडतोबच श्रोत्यांमधून एका स्त्रीचा फोन आला 'मी वक्ते श्री शिमोडा ह्याना सागू इच्छिते की सगळ्याना काही त्याच्या आवडीच काम करायची सधी मिळत नाही, आणि बऱ्याच लोकाना खूप मेहेनतीच काम करावं लागतं, विमानं उडवण्यापेक्षा जास्त जबाबदार काम

कराव लागतं !' डॉनन उत्तर दिल– 'जे लोक मेहनत करून कमावतात ते त्याच्या मर्जीनच तसं करतात. जे खेळ दाखवून पैसे मिळवतात, तेही स्वत.च्या मर्जीनच.' पण बायबलमध्ये लिहिलय की निढळाचा घाम गाळाल तेव्हाच भाकरी मिळेल, पण तरीही ती सुखानच खाता येईल अस नाही. In sorrow shalt thou eat of it)'

'तेही आपल्या मर्जीवर आहे' 'मर्जी ! मर्जी ! वीट आलाय ह्या शब्दाचा ! म्हणे प्रत्येकान त्याला जे वाटेल ते कराव ! अशान जगाच वाटोळ होईल ! होतच आहे बाकी ! काय दशा झालीय आपल्या नद्या, आपल्या वनस्पती, सगळ्याची !' आता ह्याला कितीतरी सात्वनपर, सामोपचाराची, उत्तरं देता आली नसती का? पण डॉनन काय म्हणाव ? 'काऽऽहीही बिघडणार नाही हे जग उद्ध्वस्त झालं तर हव्या तितक्या नव्या दुनिया आपण निर्माण करू शकतो, आपल्या इच्छेवर आहे ते.' आता हे उत्तर डॉनसारख्या साक्षात्कारी माणसाला, त्याच्या ज्ञानाच्या आधारावर, खर आहे हे माहीत असल, तरी एका सामान्य व्यक्तीला ह्यान दिलासा का मिळणार होता ? तिला फक्त हे जगच ठाऊक होत, जिथे जन्म आणि मृत्यू हीच आयुष्याची दोन टोक आहेत. पण डॉन हेही जाणूनच होता की, मग त्यानं अस विचित्र उत्तर का द्याव ? ती स्त्री पुढे म्हणाली, 'अस्स ? म्हणजे हे जे चाललय तेच सगळ बरोबर आहे काय ? जगात वाईट काही नाहीच, पाप घडतच नाहीये, घडत असल तरी त्यात तुम्हाला काही गैर वाटत नाही, असच ना ?' 'हे पहा बाई, गैर वाटून घेण्यासारख काही नाहीच. ह्या ब्रह्माडात आपण एखाद्या धुळीच्या कणासारखे आणि तो धुळीचा कण ही पण मायाच सगळ्याना सतुलन आपोआप होत असत आणि जो जो यातना भोगतो किंवा मृत्यू पावतो, तो त्या गोष्टीला आतून राजी असतो म्हणूनच. आपल्या अतरात्म्याच्या इच्छेविरुद्ध आपण काही करू शकत नाही. जे आपल्याला आनद देईल ते चागल, जे दुःख देईल ते वाईट, ह्या पलीकडे चागल नि वाईटाला सापेक्षता नाही.

एकाएकी ती स्त्री वाद घालायची थाबली नि तिन एवढच विचारले, 'तुम्हाला हे सगळ कस ठाऊक ? कशावरून हे खर आहे ?' 'मला ठाऊक नाही खर आहे का नाही. पण अस धरून चालण्यान मजा वाटते म्हणून मी असं धरून चालतो !' डॉननं का नाही सागितल तिला की त्याला हे सगळ ज्ञान होत ? का ? जाणूनबुजून तो त्याच्या श्रोत्याना काहीही मदत न करता अवघड कोडी टाकत होता –तो पुढे म्हणाला, 'ज्या ज्या महान व्यक्ती होऊन गेल्या, जे कोणी लोक खऱ्या अर्थानं सुखी झालेत, ज्यानी ज्यानी ह्या जगाला काही महान देणगी दिलीय, ते ते सर्व अत्यत आत्मकेंद्रित आत्मे होते– एकूण एक सर्व !'

दुसऱ्या एका श्रोत्यान विचारल, 'आत्मकेंद्रित ? स्वार्थी ? निरीश्वरवादी कुणाला म्हणतात ठाऊक आहे का हो तुम्हाला ?' 'तुम्हीच सागा ना' 'येशू ख्रिस्तान सागितल की आपण आपल आयुष्य दुसऱ्यासाठी जगाव हे निरीश्वरवादी म्हणतात की, प्रत्येकानं आपला स्वार्थ बघावा, आपल्यापुरत जगावं, बाकीच्यांची पर्वा करू नये.' 'बरोबर आहे !' 'तुम्ही बोलताय ते किती धोक्याच आहे काही कल्पना आहे, तुम्हाला ? प्रत्येकजण अस वागू लागला तर काय होईल ?' 'अहो ह्या ब्रह्माडातला सगळ्यात सुखी ग्रह ही पृथ्वी ठरेल !' 'मला वाटत माझ्या मुलाबाळाच्या कानावर तुमची ही मुक्ताफळ न पडलेली बरी !' 'अस तुम्हाला वाटत. मुलाना काय वाटत ?' 'प्रत्येकानं स्वत ला वाटेल तसं वागाव अस असेल ना, तर मी तुमच्या त्या शेतात येऊन गोळी घालीन तुमच्या डोक्यात, तरी चालेल नाही का ?' 'होय ना ! तुमची तशी इच्छा असेल, तर तुम्ही तसं करू शकता !'

त्या माणसान फोन खाली ठेवला. डॉनन ह्या दोन माणसाना तर त्याचे शत्रू बनवलेच होते, पण मग एकावर एक फोन यायला लागले, खूप रागावलेल्या माणसाचे. हे जाणूनबुजून लोकाना अस चिथावून द्यायची काहीच जरूर नव्हती. रिचर्डला जुनी आठवण झाली. एका गावात डॉनन जाणून बुजून चमत्कार दाखवून लोकांना उत्तेजित केलं होतन्. येथून लवकर दूर निघून जाण जरूर होत... गोंधळलेल्या रिचर्डला पुस्तकात जे वाक्य सापडल त्यानही काहीच उलगडा झाला नाही.

**'स्वतंत्र आणि सुखी होण्यासाठी आयुष्यातल्या कंटाळवाण्या तेच-तेच पणाचा त्याग करावा लागतो. हा त्याग करणं नेहमीच सोपं नसतं !'**

जेफ साइक्सन रिचड आणि डॉन काय काम करतात, सध्या त्यानी विमान कुठ उतरवली होती, रात्री त्या विमानांच्या पखाखालीच ते कसे झोपायचे, सगळ रेडिओ कार्यक्रमाच्या सुरुवातीला सागितल होत. इकड डॉन तर लोकाना चीड आणत चालला होता रिचर्डला परत भीती वाटायला लागली. कार्यक्रमाचा अजून अर्धा तास बाकी होता. आणखी एका श्रोत्याचा फोन आला, 'अहो मिस्टर, मी तर म्हणतो, की तुम्ही खोटे, भोदू आहात !' 'आहे ना ! खरंय् अगदी आपण सगळे भोदूच आहोत, खोटे आहोत. आपण जे नाही ते आपण असल्याचा आपण आव आणत राहतो. आपली ही शरीर ही सुद्धा खरी नाहीत. आपण आहोत फक्त त्या विधात्याच्या अविनाशी, अमर्त्य कल्पना. बाकी सगळ खोटच आहे.'

रिचर्डला त्याच बोलण आवडल नाही म्हणून तो निघून गेला असता, तरी डॉनला काही वाटल नसत. पण बिथरलेल्या लोकाचा जमाव आपल्यावर हल्ला करेल ह्या भीतीकडे मात्र त्यान लक्ष दिल नसत !

## १८

**'निरोप घेताना कधी वाईट वाटून घेऊ नका. पुन्हा भेट होण्यासाठी प्रथम दूर जाणं आवश्यकच असतं आणि जे खरेखुरे सुहृद आहेत, ते पुन्हा नक्कीच भेटणार असतात–थोड्याच वेळात किंवा काही जन्म उलटल्यावर–पण भेट होतेच.'**

दुसऱ्या दिवशी दुपारी डॉन रिचर्डला म्हणाला, 'तुला आठवतय तू मला एकदा काय म्हणाला होतास ?' 'काय ?' 'की माझं म्हणणं लोकाना आवडावसं वाटणं म्हणजे सुखी होण्यासाठी लोकावर अवलंबून रहाणं आणि तेच शिकायला मी इथे आलो–की मी लोकाना माझं म्हणणं समजावून सांगू शकतो का नाही, ह्याचं काहीही महत्त्व

नाही. मी हा जन्म घेतला, कोणाला तरी जगाचं रहस्य समजावून सागाव म्हणून. पण मी काही सागायची काही जरूरच नव्हती. ते लोकाना समजावून सागण्यासाठी त्या परमेश्वराला माझी किंवा कोणाचीच जरूर नाही.'

'ते तर आहेच ना !' 'वा ! सारा जन्म घालवल्यावर माझ्या हे लक्षात आल, की कोणाही साक्षात्कारी पुरुषानं जगाच रहस्य लोकाना उलगडून सागायची गरज ना लोकाना आहे, न त्या जग-न्नियत्याला–आणि हा इथ बसून नुसत म्हणतोय, 'ते तर आहेच ना !' तो हसत होता, पण खिन्न दिसत होता. असं का, ते रिचर्डला कळल नाही.

## १९

**'जगातला अन्याय, दु ख ह्या गोष्टी तुम्ही मनाला किती लावून घता ह्यावरनं तुम्ही किती अज्ञानी आहात, ते कळतं. एखाद्या सुर-वंटाला वाटतं, की सगळा खेळ खलास होतोय, पण ज्ञानी पुरुषाला ठाउक असतं, की खलास झालेल्या खेळातूनच फुलपाखरू जन्माला येणार आहे !'**

आदल्या दिवशी पुस्तकात दिसलेली ही वाक्य हीच काय ती धोक्याची सूचना रिचर्डला मिळाली होती नेहमीसारखी गर्दी जमली होती, नि काम चालू होत. रिचर्ड त्याच्या विमानात पेट्रोल घालत होता. एकदम टायर जोरात फाटावं तसा आवाज आला, नि जमाव इतस्तत: पळू लागला रिचर्डन वळून बघितल तर डॉन त्याच्या विमानात बसल्या जागी आडवा घायाळ होऊन पडला होता–त्याला कोणीतरी गोळी मारली होती. धावत तिकडे जाता जाता बदूकधारी माणूस रिचर्डच्या जवळून पळत गेला, पण त्याला पकडण्याच रिचर्डला महत्त्व नव्हत खरं तर त्या क्षणी त्याला शोक, सताप, धक्का–काहीच जाणवत नव्हत. महत्त्वाचं होत फक्त त्याच्या मित्राशी थोड तरी बोलायला मिळण !

डॉनच्या शरीराचा अर्धा भाग छिन्न–विच्छिन्न झाला होता, डोक पुढं झुकल होत. 'डॉन ! डॉन ! तू ठीक आहेस ?' डॉनन डोळे उघडले नि तो तशातही हसला. 'कसा दिसतोय ?' तो नीट बोलू शकतोय, विचार करू शकतोय ह्यान रिचर्डला खूप धीर आला,–मग तो बरा होऊ शकेल ! 'नाही–जरा सकटात दिसतोयस ! तुला कोणी शत्रू असतील स वाटलच नव्हत !' 'अंह नाहीतच तो शत्रू नव्हता, मित्रच होता शत्रून–माझा खून करण्यान–त्याच्या स्वत:-साठी केवढे प्रश्न उभे झाले असते–!' सगळीकडे रक्त वहात होते 'डॉन, हे असं व्हायची काही जरूर होती ?' डॉननं कसबसं उत्तर दिलं, 'असच काही नाही, पण छान नाट्यपूर्ण झाल, नाही का...' 'बर बरं, चल, आता तू स्वत:ला बर करून टाक पाहू ! आपल्याला आपली विमानं उडवायची आहेत ना ?' पण रिचर्डचं बोलणं संपायच्या आतच त्याचा सर्वज्ञानी व साक्षात्कारी मित्र डोनाल्ड शिमोडा खाली लवडला नि त्यानं प्राण सोडला !

रिचर्डच्या भोवती सार जग गरगरत होतं–त्याचं डोकं चालत नव्हत, काही सुचत नव्हत–तो कसाबसा खाली उतरला. उतरला कसला, गवतात आडवा पडलाच. त्याच्या खिशातन ते पुस्तक पडल. वाऱ्यान त्याची पानं फडफडायला लागली. हतबुद्ध अवस्थेतच रिचर्डनं ते उचलल त्याला वाटल, ज्ञानी पुरुषाचे हे सुदर वाटणारे शब्द ! काय उपयोग झाला ह्याचा ? कुठल्यातरी माथेफिरू माणसाच्या बदुकीपासून बचाव करू शकला नाही स्वत चा ! उघडचा पानावर दिसणारे शब्द त्यान परत परत वाचले, हे शब्द ह्याच पुस्तकात आहेत हे त्याला खरंच वाटेना– **'ह्या पुस्तकात लिहिलेलं सगळं चूकही असू शकेल !'**

## उपसंहार

रिचर्ड पुढ गावोगाव हिंडत राहिला, त्याला खूप काम मिळत राहिल. लहान लहान गावातन खूप लोकाना ह्या छोट्या विमानात बसून आपल्या गावावरून, शेतावरून चक्कर मारून यायला आवडा-यच बरेचसे लोक नतर रिचर्डशी गप्पा मारायला थाबायला लागले होते त्याच बोलण लोकाना आवडायला लागल होत कधी कधी तर त्याच बोलण ऐकून त्याना बरं वाटायचं असही घडल. मग ते लोक त्याच्याकडे जरा कुतूहलान बघायला लागायचे, की रिचर्ड तिथून पळ काढायचा ! चमत्कार वगैरे त्यान कधी केले नाहीत, पण अलीकडे त्याच विमान डॉनच्या विमानासारख आपोआप चकचकीत रहा-यच, त्याला पेट्रोलही कमी लागायच !

पण ज्या दिवशी आणि ज्या तऱ्हेन डॉनचा मृत्यू झाला, तो दिवस नि ते भयंकर मरण त्याच्या डोक्यातन जात नव्हत. कित्येकदा परत परत तो त्या घटनेचा विचार करत राही, त्याचा अर्थ लावायला बघे· त्याला काय शिकवायसाठी असं घडलं ते त्याला कळत नव्हत ! आता कोणाला विचारणार ? मन आणि बुद्धीला उत्तेजित करणार, दरवेळी काहीतरी नवं शिकवून जाणार कोण होतं आता डॉनसारख ? आपल्या आपल्याशीच रिचर्ड बोलत रहायचा, उलटसुलट चर्चा करत रहायचा, पण तैलबुद्धी आणि बोलण्याच कसब असलेल्या डॉनशी बोलण्याची सर त्याला कशी येणार ? पदोपदी डॉनचं नसण त्याला असं जाणवत रहायच अन् मग एक दिवस त्याला स्वप्न पडल. डॉन त्याच्या स्वप्नात आला

असाच एका कुरणात त्या बदुकीची गोळी विमानाला जिथ लागली होती, तो भाग दुरुस्त करत तो उभा होता ! झोपेतच रिचर्डला जाणवल की हे स्वप्न बघतोय आपण, पण तरी त्याच्या मनात कुठे-तरी त्याला असही वाटलं, की हे खरं घडतय ! 'डॉन !' डॉनन वळून त्याच्याकडे बघितलं, आणि तो हसला रिचर्डच्या डोळ्यातून आनदाश्रू वाहू लागले–नाही, मृत्यू अशी काही चीज नाहीच आहे, हा काय, हा माझा मित्र–'डॉन ! तू–तू जिवत आहेस ? काय कर-तोयस तू इथं ?' रिचर्डन धावत जाऊन त्याला मिठी मारली. डॉनचा स्पर्श त्याला खराच असल्यासारखा जाणवला. 'अरे अरे ! काय झालं काय ? मी हे विमान दुरुस्त करतोय !' 'पण तुला हे असं दुरुस्त करायची जरूर कुठे पडते ? तू तर हे असऽऽ दुरुस्त करणार' अस म्हणत विमानाच्या तुटलेल्या पत्र्यावरून रिचर्डनं हात फिरवला तर पत्रा एकदम एकसघ, नव्यासारखा होऊन गेला ! 'शाबास !

अस करता येत तुला !' कौतुकान डॉन म्हणाला. स्वप्नात रिचर्डला हे सगळं विचित्रही वाटल नाही !

'डॉन, तू ठीक आहेस ना अगदी ?' 'मग ?' तुला काय वाटलं की मी मरण पावलो ?' 'मी स्वप्नात नाही ना डॉन ? मी विसरणार नाही ना तुझी ही भेट ?' 'अह. आपण दुसऱ्याच स्थलकालाच्या परिमितीत भेटतो आहोत, आणि अस भेटण हे माणसाला नेहमी स्वप्नच वाटत ! आणि तू अजून काही काळ पृथ्वीवर माणूस म्हणूनच रहाणार आहेस, पण ह्या भेटीचा तुला विसर पडणार नाही, आणि तुझ आयुष्यही त्यामुळ बदलेल.' 'पण तू मला परत भेटशील ? परत येणार आहेस तू पृथ्वीवर ?' 'नाही. मला आता स्थलकालाच्या बधनाच्या पलीकडे जायचय–गेलेलाच आहे मी खर तर. पण माझे तुझ्याशी नि आपल्यासारख्या आणखी काही लोकाशी जुळलेले हे मैत्रीचे धागे–हा आपल्यातला दुवा आहे एखादा प्रश्न, एखादी अडचण, तुला फार सतावत राहील, तेव्हा त्या प्रश्नाचा विचार करत करत झोपी जा. आपण असे भेटू, नि तुझ्या प्रश्नाची चर्चा करू.'

'डॉन !' 'ह ?' 'तुला अस बदुकीची गोळी मारवून घेऊन मरण्यात काय अर्थ वाटला ?' 'अस आहे रिचर्ड, मी काही कोणी प्रसिद्धीत झळकणारा महापुरुष राहिलो नव्हतो, तेव्हा दुसऱ्या कोणाला मला काही करून दाखवायच नव्हतच. पण बाह्य रूपान मनाला त्रास करून घ्यायचा नाही, आणि मुख्य म्हणजे त्याच दुःख होऊ द्यायच नाही, हे तुला शिकवणं जरूर होतं. तेव्हा अस भयकर दृश्य बघण्यानं तुझ शिक्षणही झाल–आणि–मलाही मजा आली ! अरे, मरण म्हणजे ऐन उन्हाळ्यात खोल तळ्यात बुडी मारण्यासारख असत. उन्हातन गार पाण्यात पडताना एखादा सेकदच एकदम थोडा त्रास होतो नि मग पाण्यात पोहणच आपल्याला नैसर्गिक वाटू लागतं की नाही ? तसच असतं मरण, आणि इतकेदा तो अनुभव घेतल्यावर त्रासही कमी होतो रे दर वेळी !'

दोघे गप्प होते. जराशानं डॉन पुढे म्हणाला, 'हे बघ, तू जे काही सागू बघतोस लोकाना, ते ऐकायला आवडणारे फार कमी असतात. पण हरकत नाही. कुठला महात्मा किती गर्दी भोवती जमवू शकतो, ह्यावरून त्याच मोठेपण सिद्ध होत नाही !' 'डॉन, मी प्रयत्न करेन, नक्की, जरूर पण मला हे काम करण्यात मजा वाटेनाशी होईल ना, तेव्हा मात्र मी कायमचा पळून जाईन !'

स्वप्नातलं डॉनचं विमान कोणी हात न लावताच चालू झाल डॉन म्हणाला, 'मजूर, पण...' 'पण काय डॉन ? साग लवकर काय चुकल ?' 'पण अस, की तुला लोकाची गर्दी तर आवडत नाही !' 'खरय् मला उलटसुलट चर्चा करणं, प्रश्न विचारण, उत्तर शोधण आवडत, आधळी भक्ती, व्यक्तिपूजा–अह–ते मला जमणार नाही.'

'हे बघ रिचर्ड, मला एक साग. कागदावर सगळ लिहून काढायला काही हरकत तुझी ? तुझे विचार आणि अनुभव लिहून काढायला तर बदी नाही ना ? लोकाना नाही आवडलं तुझ लिहिण तर ते तुझ पुस्तक जाळून टाकतील फार तर, तुला तर नाही ना मारणार ? आणि आवडल तर, पुढेही कित्येक वर्षांनी तुझ पुस्तक वाचल जाईल, लोक त्यातली वाक्य पाठ करतील, त्यावर विचार करतील–ह्याला काही हरकत ?'

'पुस्तक ?' 'हू !' 'तुला काही कल्पना आहे एक पुस्तक लिहायच म्हणजे केवढ काम असत ? मी तर पुन्हा एक शब्दही न लिहायच ठरवल होत !' 'अस होय ? मला ठाऊक नव्हत. बर, मग जाऊ दे बराय् तर मग ! भेटू पुन्हा कधीतरी. त्रास नको लोकाच्या गर्दीला, आणि–नक्की लिहायच नाही तुला म्हणतोस ?' 'नाही, मुळीच नाही.'

डॉनने खादे उडवले, विमान चालू केल आणि तो आवाज डोक्यात घुमत असतानाच रिचर्डला जाग आली. त्याच्या विमानाच्या पख्याखाली तो झोपलेला होता, एकटाच. भोवताली सपूर्ण शातता, हिवाळ्याची थडी, नि थोड थोड बर्फ पूर्ण जागही व्हायच्या आधीच, मजा म्हणून त्यान आपली डायरी जवळ ओढली, आणि तो लिहू लागला–'इडियाना प्रातातील गूढरम्य डोगरी प्रदेशात ह्या साक्षात्कारी पुरुषान जन्म घेतला... [ समाप्त ]


# मराठी मासिकातील आश्चर्य

जेट, कॉम्प्युटर, रोबोच्या वेगाने होणाऱ्या वैज्ञानिक प्रगतीचा वेध साध्या सोप्या भाषेत घेऊ पाहणारे, एक विलक्षण, आगळेवेगळे असे मराठी मासिक जन्माला येत आहे, मासिक– 'ज्ञानविकास'

ज्ञान आणि विज्ञान सबधीत माहितीप्रद लेख व सदरे, उत्कृष्ट माडणी, पाढऱ्या कागदावरील सुस्पष्ट छपाई व प्रथम दर्शनीय छाप पाडणारे बहुरंगी मुखपृष्ठ असलेल्या या मासिकाची किंमत आहे फक्त पाच रुपये.

काळाबरोबर धावायचे असेल, प्रगती करून घ्यायची असेल, निदान पुढल्या पिढीला तरी या वेगवान स्पर्धेत आत्मविश्वासाने उभे करायचे असेल, तर आपल्या घरांत 'ज्ञानविकास' हवेच.

आजच विकत घ्या किंवा वार्षिक वर्गणी रुपये पन्नास पाठवा.

प्रकाशक : **मे. परांजपे उद्योग**

मुकुद अपार्टमेट, मानपाडा रोड,
डोंबिवली–४२१ २०१.

यापुढील अक ९ एप्रिल रोजी प्रसिद्ध होईल. कृपया विक्रेत्यांनी आपली ऑर्डर संबंधीत विनरकाकडे नोंदवावी

विकसनशील राष्ट्रधर्माची
मांडणी करणारी तीन पुस्तके

लेखक : श्री. ग. माजगावकर

**श्रीग्रामायन**

मूल्य पंचवीस रुपये

**बलसागर**

मूल्य तीस रुपये

**निर्माणपर्व**

मूल्य चाळीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे

MANOOS ( Marathi Weekly ) ( Licensed to post without prepayment of postage No. 11 ) Regd. No. PNC-W 28


# तुम्ही विशेष व्यक्ती व्हा—
# युटी आय एजंट व्हा!




होय. तुम्हीच. काहीतरी एक महिला म्हणून तुमचे कुटुंब हेच तुमचे विश्व असते. बऱ्यावाईट सर्व परिस्थितीत कुटुंबियाना तुमचा मोठा आधार वाटतो. पाठिंबा असतो. परंतु स्वतःच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाचे काय? आपल्याला आवडेल असा. अर्थार्जनाचा काहीतरी मार्ग असावा असे नाही वाटत तुम्हाला?

वाटते ना. तर मग युटीआय एजन्सी संचात तुम्ही सामील व्हा. तसे केलेत म्हणजे सुमारे १८,००० स्त्रीपुरुषांच्या एका महत्त्वाच्या गटाच्या तुम्ही सदस्य बनाल.

## आवश्यक पात्रता

तुमचे वय निदान १८ वर्षे असेल आणि एसएससी, आयसीएसई किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाला असाल तर एजंट व्हायला तुम्ही पात्र आहात. तुमचे शिक्षण याहून अधिक झालेले असले आणि विक्रीचा थोडा फार अनुभव असला तर अर्थातच तुमची निवड होण्याची शक्यता अधिकच.

नवनवीन ओळखी करून घ्यायची आवड असेल आणि दुसऱ्याचे मन वळवून एखादी गोष्ट घ्यायला लावायची क्षमता अंगी असली तर अधिकच बरे.

युटीआय एजन्सीचे बहुतेक काम तुम्हाला घरच्या घरी करता येईल. त्यासाठी मुद्दाम नेहमीच्या जीवनचाकोरीच्या बाहेर न जाताही तुमच्या संसारासाठी पूरक उत्पन्न तुम्ही कमावू शकाल.

## कामाचे स्वरूप

युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या अनेक आकर्षक योजना आहेत. त्या योजनांखाली विक्रीस काढलेल्या युनिटस्‌ची विक्री करणे हे एजंट या नात्याने तुमचे काम. त्यासाठी तुमचे घर हेच तुमचे मुख्य केंद्र. युनिटस् विक्री करून, तुम्ही आपले नातेवाईक, इष्टमित्र, परिचयातल्या व्यक्ती यांना त्यांच्या बचतीतून नियमित उत्पन्न मिळविण्यास, खरे म्हणजे, मदतच करता. करविषयक लाभ आणि सुलभ विनिमयता यांमुळे युनिटस् इतकी लोकप्रिय झाली आहेत. कुटुंबातल्या प्रत्येकासाठी— अगदी लहान मुलापासून थोरापर्यंत सर्वांना योग्य अशा. युटीआयच्या योजना आहेत.

## कमाई किती होईल?

तुम्ही विक्री कराल ती युनिटस् ज्या योजनेखालील असतील तदनुसार तुम्हाला १% ते २.७५% पर्यंत कमिशन मिळेल. आणि लवकरच तुमच्या कुटुंबासाठी नियमित जोड-उत्पन्न तुम्ही कमावू लागाल.

## चला तर, पहिले पाऊल उचला

आजच खालील कूपन भरून आमच्याकडे पाठवा. आम्ही तुम्हाला एजन्सी अर्जाचा फॉर्म, विविध युनिट योजनांचे माहिती साहित्य आणि एजन्सी पुस्तिका पाठवून देऊ. आमच्या आवश्यक गोष्टींची पूर्तता होत असली तर-अभिनंदन! तुम्ही झालातच युटीआय एजंट... समाजात मानाने वावरू शकेल अशी एक विशेष व्यक्ती.

आम्ही देशभरात मिळून सुमारे ४००० एजंटांची सर्वस्वी आमच्या मर्जीनुसार, निवड करणार आहोत. नाकारलेल्या अर्जांबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

चला तर. खालील कूपन आजच भरून पाठवा. कृपया पाकिटावर **'युटीआय एजन्सीसाठी अर्ज'** असे स्पष्ट लिहा.



**युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया**

(सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्था)

कूपन युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या पुढीलपैकी एका पत्त्यावर टपालाने पाठवा.

मुंबई : पोस्ट बॅग ११४१० फोन : २५६४४५

कलकत्ता : पोस्ट बॅग ६० फोन : २०९३९१

मद्रास : पोस्ट बॅग ५०६३ फोन : २७४३३

नवी दिल्ली : पोस्ट बॅग ५ फोन : ३३१८६३४

APPLICATION FOR UTI AGENCY

**होय, मला युटीआय एजंट व्हायचे आहे.**

कृपया अर्जाचा नमुना आणि साहित्य पाठवा.

नांव: __________ शैक्षणिक पात्रता: __________

वय: __________

पत्ता: __________

Interpub/UTI/1/87 MAR

**इतरांबरोबर स्वतःलाही मदत करा.**